



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, रविवार ८ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०+४








# अखेर मुंबईचे महापौरपद भाजपकडे

■ रितू तावडे होणार महापौर, शिंदे सेनेचे संजय घाडी उपमहापौर

■ 25 वर्षानंतर ठाकरेंची शिवसेना विरोधी बाकावर बसणार



**मुंबई/प्रतिनिधी :** देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईचे महापौरपद मिळवण्याचे भाजपाचे स्वप्न अखेर प्रत्यक्षात येणार आहे. मुंबईचा महापौर मराठीच होईल, असे भाजपाने निवडणुकीच्या प्रचारातच जाहीर केले होते. त्यानुसार भाजपाने महापौरपदासाठी नगरसेविका रितू तावडे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करत महापौरपदाचा सस्पेन्स आज संपवला. तर उपमहापौरपदासाठी शिंदेंच्या शिवसेनेचे संजय घाडी यांचे नाव जाहीर केले आहे. या दोघांनीच अर्ज दाखल केल्याने त्यांची बिनविरोध निवड निश्चित झाली असून तांत्रिक प्रक्रियेनंतर याबाबतची अधिकृत घोषणा होईल. ४४ वर्षानंतर भाजपकडे मुंबईचे महापौरपद आले आहे.

मुंबई महापालिकेसाठी ठाकरे बंधू आणि शिवसेना-भाजप महायुतीत जोरदार लढत झाली होती. २२७ पैकी ११८ जिंकून महायुतीने निसटते बहुमत मिळवले होते. शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे जन्मशताब्दी वर्ष असल्याने एक वर्ष शिवसेनेला महापौरपद मिळावे यासाठी शिंदे गटाकडून प्रयत्न झाले. पण त्यात त्यांना यश आले नाही. त्यामुळे महापौरपद भाजपकडे जाणार हे स्पष्ट झाले होते. पहिल्यांदाच भाजपाला महापौरपद मिळणार असा सर्वांचा समज होता. पण १९८२ साली सर्वपक्षीय आघाडी होउन भाजपचे प्रभाकर पै एक वर्षासाठी मुंबईचे महापौर झाले होते. त्यामुळे ४४ वर्षाच्या प्रदीर्घ परीक्षेनंतर भाजपाचा दुसरा महापौर सत्तेवर बसणार आहे.

भाजपकडून अनेक नावं चर्चेत होती. मुंबई भाजपाचे अध्यक्ष अमित साटम यांनी आज रितू तावडे यांच्या नावाची घोषणा केली. तर उपमहापौरपदासाठी शिवसेना शिंदे गटाने संजय घाडी यांच्या नावाची घोषणा केली आहे. संजय घाडी सव्वा वर्षासाठी पदावर बसणार आहेत. सत्तेसाठी आवश्यक असलेली ११८ हे संख्याबळ महायुतीकडे आहे. शिवसेना ठाकरे गटाकडून उमेदवार दिला जाणार अशी चर्चा होती. परंतु भाजपाने मराठी उमेदवार दिल्याचे सांगून शिवसेना ठाकरे गटाने माघार घेतली. त्यामुळे आता या दोघांची बिनविरोध निवड

**केवळ औपचारिकता बाकी आहे-** रितू तावडे यांच्या रूपाने गेल्या ४४ वर्षांनंतर मुंबई महापालिकेवर भाजपाचा महापौर बसणार आहे. मात्र रितू तावडे यांच्यासाठी ही लढाई सोपी नसणार आहे. समोर शिवसेना ठाकरे गटातील चार माजी महापौरांसह महापालिकेचे राजकारण कोळून प्यायलेल्या ज्येष्ठ नगरसेवकांचे आव्हान असणार आहे. विशाखा राउत, श्रद्धा जाधव, किशोरी पेडणेकर आणि मिलिंद वैदय या चार माजी महापौरांचा समावेश आहे. (पान २ वर)

## बारामती पोटनिवडणुकीसाठी वेळापत्रक जाहीर

### अजित पवारांची रिक्त जागा भरण्यासाठी निवडणूक आयोगाचा महत्त्वाचा निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातातील धक्कादायक निधनानंतर रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघासाठी आता राजकीय हालचालींना वेग आला आहे. या मतदारसंघातील पोटनिवडणूक घेण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने कंबर कसली असून, निवडणुकीपूर्वीची सर्वांत महत्त्वाची प्रक्रिया म्हणजेच विशेष संक्षिप्त मतदार यादी पुनरीक्षण कार्यक्रम प्रशासनाकडून अधिकृतपणे जाहीर करण्यात आला आहे.अजित पवार यांच्या निधनामुळे निर्माण झालेली राजकीय पोकळी भरून काढण्यासाठी आयोगाने कायदेशीर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० मधील कलम २१ अन्वये ही प्रक्रिया राबवली जाणार आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत करणे हा आहे. ज्या नागरिकांची नावे १ जानेवारी २०२६ पर्यंत नोंदणीकृत आहेत, तेच या आगामी पोटनिवडणुकीत आपला मतदानाचा हक्क बजावू शकतील.निवडणूक आयोगाने जाहीर



केलेल्या वेळापत्रकानुसार, ही प्रक्रिया पार पडणार आहे. यानुसार ९ फेब्रुवारी २०२६ रोजी एकत्रित प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. तर ९ ते २५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत नागरिक आपली नावे नोंदवू शकतात किंवा यादीतील त्रुटींबाबत दावे व हरकती सादर करू शकतात. ६ मार्चपर्यंत प्राप्त झालेल्या सर्व हरकतींची छाननी करून त्या निकाली काढण्याची अंतिम मुदत देण्यात आली आहे. तर १० मार्च रोजी बारामती मतदारसंघाची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल. ही अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यानंतरच बारामतीमध्ये प्रत्यक्ष मतदानाची तारीख जाहीर होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. २८ जानेवारी रोजी झालेल्या दुर्दैवी विमान अपघातात अजित पवार यांचे निधन झाले. या घटनेनंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्याने राज्याच्या राजकारणात मोठे फेरबदल झाले. गेल्या कित्येक वर्षांपासून बारामतीकर अजित पवार यांना मोठ्या मताधिक्याने निवडून देत होते. मात्र त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या आणि बारामतीच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली. आता सुनेत्रा पवार यांनी बारामती विधानसभेची पोटनिवडणूकही लढवावी अशी मागणी केली जात आहे.

## मलेशियातील असे स्वागत भारत लक्षात ठेवेल

### कुआलालंपूरमध्ये मोदींनी जिंकली लोकांची मने


**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या मलेशियाच्या दोन दिवसांच्या दौ-यावर आहेत. शनिवारी त्यांनी कुआलालंपूर येथे भारतीय समुदायाला संबोधित केलं. यावेळी त्यांनी म्हटलं की, मलेशियामध्येभारतासाठी प्रचंड प्रेम आणि सन्मान आहे. येथील हे स्वागत भारत नेहमीच लक्षात ठेवेल.'भारतीय समुदायाला संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, 'गेल्या वर्षी ॠक्क्र्ञ समिटमध्ये सहभागी होण्यासाठी मी मलेशियाला येउ शकलो नव्हतो. परंतु मी माझ्या मित्राला वचन दिलं होतं की, मी लवकरच मलेशियाला येईन आणि दिलेल्या वचनानुसार मी आज येथे उपस्थित आहे. २०२६ मधील हा माझा पहिलाच परदेश दौरा आहे.'



मोदी पुढे म्हणाले की, भारताप्रती मलेशियाचं प्रेम आज दिसून आलं आहे. मलेशियामध्ये भारतीय संगीत आणि सिनेमा अत्यंत लोकप्रिय आहे. विशेष म्हणजे मलेशियातील ५०० शाळांमध्ये भारतीय भाषांचं शिक्षण दिलं जात आहे, ज्यामुळे दोन्ही देशांमधील संबंध अधिक घट्ट झाले आहेत. पंतप्रधान मोदींनी नमूद केलं की, आज आपण प्रगतीच्या वाटेवर एकमेकांच्या सोबत आहोत. भारत आणि मलेशियाला एक सामायिक वारसा लाभला आहे. मलेशियामध्ये स्वामी विवेकानंद यांना मानणारा मोठा वर्ग आहे. त्यांनी सांगितलं (पान २ वर)

## तिरूपतीच्या लाडूमध्ये बाथरूम साफ करण्याचे केमिकल-चंद्राबाबू नायडू

**अमरावती/वृत्तसंस्था :** आंध्र प्रदेशातील प्रसिद्ध तिरुपती व्यंकटेश्वर मंदिरातील लाडू प्रसादाचा वाद वाढला आहे. मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी धक्कादायक दावा करत सांगितले की, लाडू तयार करण्यासाठी वापरण्यात येणा-या तुपात बाथरूम साफ करण्याचे केमिकल मिसळण्यात आले होते. कुर्नूल येथे झालेल्या एका कार्यक्रमात बोलताना नायडू म्हणाले ही भेसळ केवळ तिरुपतीपुरती मर्यादित नसून श्रीशैलम मंदिरातही असाच प्रकार घडल्याची शक्यता आहे. नायडूंनी हे वक्तव्य अशा वेळी केले आहे, जेव्हा एसआर काँग्रेस पक्षाने त्यांच्यावर खोटे आरोप करत असल्याचा ठपका ठेवला होता. याआधी नायडूंनी लाडूमधील तुपात बीफ टॅलो आणि डुकराची चरबी मिसळल्याचा आरोप केला होता. मात्र सीबीआयच्या चार्जशीटनुसार तुपात प्राणिजन्य चरबी आढळली नाही. मात्र वनस्पती तेल आणि काही रसायनांचा वापर करून तुपात भेसळ करण्यात आल्याचे तपासात समोर



आले आहे.ही भेसळ २०१९ ते २०२४ या काळात झाल्याचा आरोप असून, त्या काळात राज्यात वाय. एस. जगन मोहन रेड्डी यांच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेत होते.नायडूंच्या तेलुगु देसम पार्टीने, निवेदनात म्हटले आहे की सीबीआयच्या चार्जशीटनंतर भाविकांमध्ये तीव्र संताप आहे. लाडूमध्ये टायलेट साफ करण्यासाठी वापरले जाणारे केमिकल मिसळल्याचा प्रकार समोर येणे अत्यंत धक्कादायक आहे असे पक्षाने म्हटले. टीडीपीच्या माहितीनुसार, मार्च २०२२ ते मे २०२४ या कालावधीत आरोपींनी वेगवेगळ्या नावांनी बनावट बिले तयार केली. या काळात सुमारे ८,९०० किलो एलएबीएसए/ ॲसिड स्लरी आणि लॅक्टिक ॲसिड पुरवण्यात आले, असा आरोप आहे. एलएबीएसए हे रासायनिक द्रव्य असून ते गिळल्यास गंभीर इजा किंवा मृत्यूही होउ शकतो, असा दावा टीडीपीने केला आहे. एसआर काँग्रेसने हे सर्व आरोप राजकीय फायद्यासाठी धार्मिक भावना भडकवण्याचा प्रयत्न असल्याचे म्हटले आहे. जगन मोहन रेड्डी यांनी सांगितले की, सीबीआयच्या अहवालात प्राणिजन्य चरबीचा उल्लेख नाही आणि वायएसआरसीपीशी संबंधित कोणाचेही नाव चार्जशीटमध्ये नाही.

## जिल्हा परिषदेसाठी 62 टक्के मतदान

■ आज मतमोजणी ■ काही किरकोळ घटना वगळता शांततेत मतदान

**मुंबई / प्रतिनिधी-** राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्या अंतर्गत येणा-या १२५ पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज अंदाजे ६० ते ६२ टक्के मतदान झाले. राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार दुपारी साडेतीन वाजेपर्यंत ५२ टक्के मतदान झाले होते. सायंकाळी लागलेल्या मतदारांच्या रांगा बघता अंतिम टक्केवारी ६० टक्क्यांच्या पुढे जाण्याची शक्यता आहे. राजकीय कार्यकर्त्यांमधील बाचाबाची, स्थानिक प्रश्नांसाठी गावक-यांनी मतदानावर टाकलेला बहिष्काराच्या घटना वगळता सर्वत्र उत्साहात; पण शांततेत मतदान पार पडले. सोमवारी मतमोजणी होउन दुपारपर्यंत सर्व चित्र स्पष्ट होईल. राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्या अंतर्गतच्या १२५ पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज मतदान झाले. जिल्हा परिषदेच्या ७३१ तर पंचायत समितीच्या १ हजार ४६२ जागांसाठीच्या



या निवडणुकीत ७ हजार ४३८ उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले आहे. दुपारी साडेतीन वाजेपर्यंत सरासरी ५२ टक्के मतदान झाले होते. साडेपाच वाजता मतदान संपण्याच्या वेळीही अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर रांगा लागलेल्या होत्या त्यामुळे मतदानाची टक्केवारी ६० टक्क्यांच्या पुढे जाईल, असा प्राथमिक अंदाज आहे.

## अमेरिकेने झुंजवले पण विजय भारताचाच!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारताने टी-२० विश्वचषकमधील पहिल्या सामन्यात अमेरिकेवर २९ धावांनी विजय मिळवला. मात्र अमेरिका संघाने भारताला सहज विजय मिळवू दिला नाही, चांगलीच झुंज देत भारताला सामना आपल्या नावे करण्यासाठी मोठे प्रयत्न करावे लागले. अमेरिकेच्या गोलंदाजीसमोर तर भारताच्या फलंदाजी फळीने गुडघे टेकले. टीम इंडियाने पावरप्लेमध्ये ३ विकेट्स गमावले आणि इथून टीम इंडिया १४० धावा करेल का अशी शंका दिसत होती. पण एकट्या सूर्यादादाने संघाचा डाव उचलून धरला आणि दुस-या डावात भारताच्या गोलंदाजांनी संघाचा विजय सोपा केला.

भारताने दिलेल्या १६२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना अमेरिकेची सुरूवात खूपच खराब झाली. मोहम्मद सिराज व अर्शदीप सिंग यांनी



### भारत आणि अमेरिका यांच्यातील टी-२० विश्वचषक सामना चांगलाच अटीतटीचा

सलामीवीरांना दुस-या व तिस-या षटकात माघारी धाडलं. तर कर्णधार मोनांक पटेलला अर्शदीपने शून्यावर बाद केलं. यानंतर मिलिंद कुमार व संजय कृष्णमूर्ती यांनी चांगली फलंदाजी करत ५८ धावांची भागीदारी रचली. पण भारताच्या फिरकीपटूंनी मिलिंदला ३४ धावांवर तर संजयला ३७ धावांवर झेलबाद करत अमेरिकेच्या आशांवर पाणी फेरलं.मिलिंद बाद झाल्यानंतर संजयने संघाचा डाव सावरला होता. पण अक्षर पटेलने त्याला माघारी धाडलं. अक्षरने १६व्या षटकात सलग दोन विकेट्स घेत अमेरिकेला बॅकफूटवर टाकलं. हरमीत मोठा फटका खेळण्याचा प्रयत्नात गोल्डन डकवर झेलबाद झाला.

अमेरिकेने नाणेफेक जिंकत भारताला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं आणि भारताची सुरूवात प्रचंड खराब झाली. अभिषेक शर्मा गोल्डन डकवर बाद झाला. यानंतर तिलक वर्मा व इशान किशन यांनी ३७ धावांची भागीदारी रचत संघाचा डाव सावरला. पण इशान, तिलक व शिवम दुबे पॉवरप्लेमधील अखेरच्या षटकात बाद झाले. यानंतर रिंकूने थोडावेळ सूर्याची साथ दिली. पण तोदेखील ६ धावांवर बाद झाला. (पान २ वर)

## तब्बल ११ हजार कोटींचे सामंजस्य करार

### ६ हजारांवर रोजगार ॲडव्हांटेज विदर्भ औद्योगिक महोत्सव

**नागपूर/प्रतिनिधी :** ॲडव्हांटेज विदर्भ खासदार औद्योगिक महोत्सवात दुस-या दिवशी तीन महत्त्वाचे सामंजस्य करार करण्यात आले. या करारातून तब्बल १० हजार ८८३ कोटींची गुंतवणूक होणार आहे. उपराजधानीतील केअर हॉस्पिटलतर्फे अद्ययावत रुग्णालयासाठी ५०० कोटींची गुंतवणूक यामध्ये महत्त्वपूर्ण आहे. महोत्सवात पहिला करार महामेट्रो आणि केअर हास्पिटलमध्ये झाला. यात केअर ह?स्पिटद्वारे १३१ कोटी पायाभूत सुविधेसाठी आणि ५०० कोटी रुग्णालयासाठी गुंतवणूक करण्यात येणार आहे. दुसरा करार गॅलक्सी सोलर कंपनीसोबत झाला. कंपनीद्वारे १० हजार कोटींची गुंतवणूक करत सोलर सेल, बॅटरी स्टोअरेज सिस्टीम निर्मितीसाठी केली जाणार आहे. तिसरा करार टेलिकाम टावरची निर्मिती करणा-या जीआर इन्फ्रास्ट्रक्चरसोबत झाला आहे. कंपनीने २०० कोटींची गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे, अशी माहिती मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार कौस्तुभ धवसे यांनी दिली. यामुळे विदर्भात सहा हजारांवर तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्याचेही परिषदेत सांगण्यात आले. महोत्सवात ग्लोबल इंडियन बिझनेस फोरम (जीआयबीएफ) यांच्या संयुक्तवतीने आयोजित इंटरनॅशनल बिझनेस कॉन्क्लेव्हसाठी रशिया, चीन, ब्राझील, इजिप्त, टोगो, गयाना, बेनिन, उरुग्वे, नायजेरिया, झांबिया, व्हेनेझुएला यांसह २३ हून अधिक देशांचे राजदूत व व्यापार प्रतिनिधी सहभागी झाले होते. नागपूर व विदर्भातील उद्योजक प्रतिनिधींनी त्यांच्यासोबत बैठक करून जागतिक बाजारपेठेत आपले उत्पादने नेण्यासंदर्भातील संधींबाबत चर्चा केली. याशिवाय, विविध विषयांवर झालेल्या तांत्रिक सत्रांनादेखील विद्यार्थी, नवउद्योजक, गुंतवणूकदार, समन्वयक आदींची गर्दी बघायला मिळाली.

प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजना अंतर्गत देशभरात घरांच्या छतांवर सौरउर्जा प्रकल्प उभारणीला वेग आला असून महाराष्ट्र राज्य या क्षेत्रात आघाडीवर आहे. सोलर रूफटापच्या माध्यमातून खासगी तसेच गृहवापरासाठी स्वच्छ व शाश्वत उर्जा मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहे. या योजनेत नागपूर जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर असून, विदर्भातील अमरावती व बुलढाणा जिल्ह्यांचा राज्यातील पहिल्या दहा जिल्ह्यांमध्ये समावेश आहे. संपूर्ण देशात दररोज ६,५०० हून अधिक रूफटॉप सौर प्रकल्पांची स्थापना होत आहे, अशी माहिती नवीकरणीय उर्जा मंत्रालयाचे संचालक आदित्य प्रताप सिंग यांनी महोत्सवातील एका सत्रात दिली. यावेळी महावितरणचे वरिष्ठ अधिकारी तालेवार म्हणाले, योजनेची संपूर्ण प्रक्रिया डिजिटल व ऑटोमेटेड केली गेली. अनुदानाचे वितरणही अत्यंत वेगाने व पारदर्शक पद्धतीने होत आहे.

# धनादेश अनादरप्रकरणी शिक्षकाला सहा महिन्यांचा कारावास

## -ॲड. भेरडे यांचा यशस्वी युक्तिवाद

**अमरावती/प्रतिनिधीः-** येथील प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी डॉ.पद्माकर धोंडगे यांनी आपला निर्णय देताना धनादेश अनादर प्रकरणात आरोपी दिनकर मालखेडे यांना सहा वर्ष कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. दोषारोप पत्र नुसार मुकुंद पुसतकर ( रा.दस्तूरनगर) आणि आरोपी दिनकर मालखेडे यांच्या मध्ये गेल्या तीन ते चार वर्षांपासून मैत्रीपूर्ण संबंध होते. आरोपी हा पेशाने शिक्षक असून, जून २०१६ मध्ये घराच्या बांधकामासाठी त्याने मुकुंद पुसदकर यांच्याकडून २ लाख ५० हजार रूपये कर्ज म्हणून घेतले आणि सदर रक्कम ऑक्टोबर २०१६ पर्यंत परत करण्याचे आश्वासन दिले.



त्यानुसार मुकुंद पुसदकर यांनी सदर रक्कम आरोपीला दिली. त्यानंतर आरोपीने कॉर्पोरेशन बँक, अमरावतीचा धनादेश मुकुंद पुसदकर यांना दिला; मात्र तो धनादेश बँकेत वटलाच नाही. त्यानंतर आरोपीने पुन्हा एका महिन्यानंतर धनादेश देण्याचे आश्वासन दिले; परंतु तो दुसरा धनादेशही अनादरित होऊन परत आला. त्यानंतर आरोपीला कायदेशीर मागणी नोटीस पाठविण्यात आली. नोटीस घेण्यास आरोपीने नकार दिल्यामुळे त्याच्याविरोधात तक्रार दाखल करण्यात आली. त्यानंतर हे प्रकरण न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी डॉ.पद्माकर धोंडगे यांच्या न्यायालयात पोहोचले. याचिकाकर्त्याच्या बाजुने ॲड. ए.एस.भेरडे यांनी बाजू मांडली. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकल्यावर न्यायालयाने आरोपीला सहा महिन्यांच्या कारावासाची साधी शिक्षा सुनावण्यात आली असून, नऊ टक्के व्याजदराने एका महिन्याच्या आत संपूर्ण रक्कम याचिकाकर्ते मुकुंद पुसदकर यांना परत करण्याचेही आदेश आरोपीला देण्यात आले आहे.

# श्रीकृष्ण हायस्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

## सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा केला सत्कार

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** आमला विश्वेश्वर येथील श्रीकृष्ण हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी शाळेने नुकतेच सेवानिवृत्त झालेले शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या शाल,श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीकृष्ण व्यायाम शाळा,आमला विश्वेश्वर चे अध्यक्ष मधुकर नेरकर हे होते. उद्घाटन माजी अध्यक्ष दीपक खेरडे यांनी केले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे माजी अध्यक्ष शंकरराव बकाले, संस्थेचे सचिव गोपाळ यावले, संस्थेचे उपाध्यक्ष विनोद बकाले, संस्थेचे संचालक पुंडलिक बकाले,गोपाळ हांडे, शंकरराव मालधुरे, राजीव बकाले, संजय खोरडे, समीर बोडखे,अतुल बकाले,सुभाष केणे, किशोर बकाले ,गोपाळ बकाले, रामेश्वर वासनकर, दादाराव बकाले, संजय केणे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्रमुख अतिथींच्या हस्ते सेवानिवृत्त शिक्षक प्रा.विलास वाईकर,ग्रंथपाल जयंत गावंडे व चतुर्थश्रेणी कर्मचारी रमेश तेलंगे यांचा सपत्नीक शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. सेवानिवृत्त शिक्षिका प्रतिभा ठाकरे यांचा पतीसह शाल, श्रीफळ व

स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेचे गुणवंत विद्यार्थ्यांचे रोख बक्षीस देऊन सत्कार केला.तसेच बाहेर गावातील गरजू विद्यार्थिनींना नविन सायकलचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य दीपक बडोणे यांनी केले.तर संचालन प्रा.आशिष निमकर व आभार अशोक तायडे यांनी मानले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# माजी आमदार स्व. डॉ. पांडुरंग ढोले यांची जयंती साजरी

## -विचारमंच व मित्र परिवाराचे आयोजन

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** जनता दल सेक्युलर पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष व चांदूर रेल्वेचे माजी आमदार दिवंगत डॉ. पांडुरंग ढोले यांची जयंती सोमवारी २ फेब्रुवारी रोजी चांदूर रेल्वे शहरातील ढोले कॉम्प्लेक्स मधील स्व डॉ. पांडुरंग ढोले विचारमंच कार्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी आयोजित एका छोटेखानी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आम आदमी पार्टीचे नेते, नगर परिषद माजी उपाध्यक्ष नितीन गवळी होते. सदर कार्यक्रमात डॉ. क्रांतिसागर ढोले, डॉ. अनुया ढोले, नितीन गवळी यांनी स्व. डॉ. पांडुरंग ढोले यांच्या प्रतिमेचे पुजन व हारार्पण करून अभिवादन केले. यांनतर स्व. डॉ. पांडुरंग ढोले विचारमंचच्या सर्व उपस्थित कार्यकर्त्यांनी व मित्रपरिवारांनी प्रतिमेचे पुजन करून अभिवादन केले.

यावेळी डॉ. क्रांतिसागर ढोले, आपचे नितीन गवळी, कॉ. विनोद जोशी, माजी नगरसेवक महेमूद हुसैन, जनता दल (से) पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर भगत, अंबादास हरणे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, स्व.डॉ.पांडुरंग ढोले हा एक विचार होता. शेतकरी, शेतमजूर कष्टकरी वर्ग यांच्यासाठी त्यांनी रस्त्यावर उतरून संघर्ष केला. त्यांनी केलेला संघर्ष आजही प्रेरणादायी आहे. ते आज आपल्यात नाही परंतु त्यांचे विचार आजही जिवंत आहे. अशा जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी सदर कार्यक्रमाला शंकरराव आंबटकर, डॉ. उत्तमराव पडोळे, संजय डगवार, प्रमोद बिजवे, सुधीर सव्वालाखे, देविदास शेबे, ज्ञानेश्वर भोगे, रामकृष्ण पडधान, विठ्ठलराव गुल्हाने, दिलीप घोडे, राजेश्वरी ढोले, सर्वजित ढोले, डॉ. दिलीप घोडे, रमेश गुल्हाने आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. पडोळे यांनी केले तर आभार प्रदर्शन संजय डगवार यांनी केले.

# श्री च्या पालखी शोभायात्रेने मोर्शीनगरी दुमदुमलीं

**मोर्शी/प्रतिनिधीः-** इच्छापूर्ती गणपती महाराज सेवाभावी संस्था दीप कॉलनी मोर्शीच्या वतीने दि.२९ जानेवारी रोजी काढण्यात आलेल्या श्री च्या पालखी शोभायात्रेने मोर्शीनगरी दुमदुमली.इच्छापूर्ती गणपती मंदिर दीप कॉलनी येथे दि.२३ ते ३० जानेवारी पर्यंत ज्ञानयज्ञ सप्ताहाच्या निमित्ताने भागवताचार्य हभप देवानंद महाराज प्रधाने(आळंदीकर) यांच्या सुमधुर वाणीतून श्रीमद् भागवत कथेचे वाचन करण्यात आले. श्री चा अभिषेक व तीर्थस्थापनेनंतर दैनंदिन सामुदायिक पार्थना, रिद्धीसिद्धी भजन मंडळ,गोकुळ महिला भजन मंडळ यांचा भजनाचा कार्यक्रम सोबतच कृष्णजन्म, संत गजानन महाराज पारायण,गोवर्धन पूजा, कृष्णविवाह,भारुड इत्यादी कार्यक्रम सादर करण्यात आले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून



उपस्थित असलेले मोर्शी विधानसभा मतदारसंघाचे आमदार चंदू यावलकर यांचा युवा उद्योजक राजीव अजमीरे यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी नगराध्यक्षा प्रतीक्षा गुल्हाने, न.प.चे उपाध्यक्ष डॉ. प्रदीप कुऱ्हाडे, नगरसेवक हर्षल चौधरी,नितीन पन्नासे, प्रीती ब्रह्मानंद देशमुख,अजय आगरकर तसेच अशोक देशमुख,निलेश चौधरी जिजामाता शाळेच्या उपाध्यक्ष विमल ठाकरे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हरिहर पोदे यांनी संचालन माधुरी ठाकरे व गौरी चव्हाण यांनी तर आभार प्रदर्शन मनीष देशमुख यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रमेश देशमुख,अविनाश ठाकरे,सतीश देशमुख, वैभव देशमुख,राजीव अजमीरे,महाजन साहेब,बबलू खाडे,राजू मडघे,निखिल गोरे यासह कॉलनी परिसरातील महिलांनी अथक परिश्रम घेतले.

# ज्ञानदीप कॉलनी मोर्शी येथे श्रीमद्भागवत अमृत तुल्य प्रवचन

**मोर्शी/प्रतिनिधीः-**श्री संत गजानन महाराज मंदिर ज्ञानदीप कॉलनी मोर्शी येथे गजानन महाराज प्रगट दिनाच्या निमित्ताने दि.१ ते ७ फेब्रुवारीपर्यंत राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त धर्माचार्य भागवताचार्य वाणीभूषण गुरुवर्य ह.भ.प.श्री कनेरकरजी महाराज चिखलसावंगी ता.मोर्शी यांच्या सुमधुर वाणीतून श्रीमद्भागवत अमृत तुल्य प्रवचन होणार आहे.दि.१ फेब्रुवारी रोजी श्री चा अभिषेक,तीर्थस्थापना गजानन महाराज झॉकी व विठ्ठल दर्शन सोहळा, दैनदिन गुरुदेव सेवा मंडळ गजानन महाराज महिला भजन मंडळ, जय गुरुदेव पुरुष भजन मंडळ पारडी,रिद्धी सिद्धी महिला भजन मंडळ,राष्ट्रसंत खंजिरी भजन मंडळ दापोरी, बालाजी महिला भजन मंडळ,रामजीबाबा भजनी मंडळ,मरामाय माता महिला भजन मंडळ,नंदकिशोर महाराज महिला भजन मंडळ येरला, शिवपार्वती पुरुष भजन मंडळ,हरीओम दुर्गा महिला भजन मंडळ, गायत्री भजन मंडळ यांचा भजनाचा कार्यक्रम सोबतच श्री संत साईबाबा झॉकी व परीक्षित राजा शुकराजा दर्शन,शिवपार्वती विवाह,श्रीकृष्ण जन्मोत्सव,गोवर्धन पूजा,रुक्मिणी विवाह, सुदाम चरित्र सोहळ्यानंतर ग्रंथपूजा दीपोत्सव सोहळ्यानंतर भागवताची समाप्ती होणार आहे.श्री च्या पालखीची भव्य दिव्य शोभायात्रा निघणार असून भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी भाविक भक्तांनी या सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री संत गजानन महाराज मंदिर उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# १ व १० वरिल उर्वरित

## अखेर मुंबईचे महापौरपद

गेल्या पंचवीस वर्षांहूनही अधिक काळ मुंबईचे महापौरपद शिवसेनेकडे होते. यंदा भाजपाने कोणत्याही परिस्थितीत मुंबईचा महापौर आपलाच असावा असा चंग बांधला होता. त्यात अखेर भाजपाला यश आले आहे. रितू तावडे प्रभाग क्रमांक १३२ मधून भाजपाच्या नगरसेविका आहेत. त्या दोन टर्म नगरसेविका आहेत. याआधी त्यांनी शिक्षण समितीचे अध्यक्षपद, स्थापत्य समितीचे उपाध्यक्षपद भूषविले आहे. महापालिकेच्या प्रशासकीय कारभाराची त्यांना चांगली जाण आहे. भाजपाचा ईशान्य मुंबईतील चेहरा म्हणून त्यांची ओळख आहे.

अमित साटम यांनी केली घोषणा

शनिवारी सकाळी पालिका मुख्यालयातील भाजप कार्यालयात ज्येष्ठ नेत्यांची बैठक झाली. त्याला अमित साटम, मंगलप्रभात लोढा, राहुल शेवाळे, अमेय घोले आदी नेते उपस्थित होते. राहुल शेवाळे यांनी संजय घाडी यांच्या नावाची तर अमित साटम यांनी रितू तावडे यांच्या नावाची घोषणा केली. महापौरपदाच्या शर्यतीत भाजपकडून रितू तावडे, राजश्री शिरवाडकर, शीतल गंभीर, आणि तेजस्वी घोसाळकर ही नावे प्रामुख्याने चर्चेत होती. मात्र पक्षनेतृत्वाने सारासार विचार करत रितू तावडे यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे.

मुंबईची सेविका म्हणून काम करणार : रितू तावडे

माझ्यासाठी हा ऐतिहासिक क्षण आहे. सर्वांनी निर्मळ आणि प्रामाणिकपणे काम करावे. मुंबईची महापौर म्हणून माझी निवड झालेली असली तरी मी मुंबईची सेवक म्हणूनच काम करणार आहे. मुंबईच्या हितासाठी सर्व नगरसेक निवडून गेले आहेत. सभागृहाची गरिमा कायम ठेवत मुंबईच्या हितासाठी पक्षभेद विसरुन निर्मळ आणि प्रामाणिक काम करावे अशी माझी अपेक्षा असल्याचे रितू तावडे म्हणाल्या.

## मलेशियातील असे स्वागत

की, 'मी माझ्या 'मन की बात' कार्यक्रमातही मलेशियाचा उल्लेख केला होता. आपण एकमेकांचे भागीदार देश आहोत आणि भारताचं यश हे मलेशियाचंही यश आहे.' यावेळी त्यांनी एक महत्त्वाची घोषणाही केली की, 'यूपीआय' (छ्क्ष्) लवकरच मलेशियामध्येही लाँच केले जाईल

## अमेरिकेने झुंजवले पण विजय

यानंतर हार्दिक पंड्या ५ धावांवर माघारी परतला. अक्षर पटेल व सूर्यकुमार यादवने २६ धावांची भागीदारी रचत संघाचा डाव सावरला. पण अक्षर झेलबाद होत माघारी परतला. यानंतर कर्णधार सूर्यकुमार यादवने शेवटच्या षटकापर्यंत नाबाद राहत संघाचा डावाची जबाबदारी घेतली. कर्णधार सूर्यकुमार यादवने या सामन्यात ४९ चेंडूत १० चौकार व ४ षटकारांसह ८४ धावांची नाबाद खेळी केली आणि संघाला १६१ धावांवर नेउन ठेवलं

## विधीसंघर्षग्रस्त बालकांच्या कंबरेला

गोपनीय माहिती मिळाली की, बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिवाजीनगर परिसरात दोन विधीसंघर्षग्रस्त बालक अग्नीशस्त्र बाळगून वावरत आहेत. या माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने शिवाजीनगर नवी वस्ती ते बडनेरा रेल्वे लाईनकडे जाणाऱ्या कच्च्या रस्त्यावर सापळा रचून मोठ्या शिताफीने दोघांनाही ताब्यात घेतले. अंगझडतीदरम्यान त्यांच्या कंबरेला लपवून ठेवलेले दोन देशी कट्टे (पिस्टल) व दोन जिवंत काडतुसे आढळून आली. या गंभीर प्रकरणी दोन्ही विधीसंघर्षग्रस्त बालकांविरोधात पोलीस स्टेशन बडनेरा येथे आर्म ॲक्ट कलम ३/२५ तसेच कलम १३५ मपोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपासातून शस्त्रांचा स्रोत, पुरवठा करणारे घटक आणि या मागील नेटवर्क उघड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

ताब्यात घेतलेल्या दोन्ही विधीसंघर्षग्रस्त बालकांकडून दोन देशी कट्टे व दोन जिवंत काडतुसे असा सुमारे ८१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनात, पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

## महागाव नगरपंचायतीतील

वाहन मानवाडी फाटा (हदगाव पोलीस स्टेशन हद्द) येथे चावी ठेवून सोडण्यात आल्याचे निष्पन्न झाले, तर कुटुंब थेट सासरवाडीला गेल्याचे उघड झाले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता उपविभागीय पोलीस अधिकारी गायकवाड, एलसीबीचे गावंडे व त्यांचे पथक महागावात दाखल झाले. महागाव पोलिसांनी तीन स्वतंत्र पथके तयार करून तपासाची चक्रे वेगाने फिरवली. चौकशीदरम्यान उपाध्यक्षांचा भाऊ तक्रार देण्यासाठी पोलिस ठाण्यात आला, मात्र कडक चौकशीसमोर त्याची बोलतीच बंद झाली आणि अखेर संपूर्ण बनावट प्रकार उघडकीस आला. विशेष म्हणजे, यापूर्वीही खोटी तक्रार, बनावट हल्ला, धमकी व सहानुभूती मिळवण्यासाठी केलेले आरोप यांचा जुना इतिहास पोलिस रेकॉर्डमध्ये आढळून आला आहे. जुने रेकॉर्ड तपासल्यानंतर बनवाबनवीचा ठराविक पॅटर्न स्पष्ट झाल्याचे सूत्रांनी सांगितले. दरम्यान, महागाव नगरपंचायतीत खोटे दस्तावेज, बनावट ठराव, भ्रष्टाचार आणि अवैध दारू दुकानांच्या परवानग्यांमुळे वातावरण आधीच तापलेले आहे. प्रभाग क्रमांक १ व १७ मधील देशी दारू दुकाने बंद करण्यासाठी ठराव आणण्याच्या हालचाली सुरू असतानाच हा 'किडनॅप ड्रामा' घडवण्यात आल्याची जोरदार चर्चा शहरात रंगली आहे. या प्रकारामुळे पोलीस यंत्रणेला चुकीच्या पद्धतीने कामाला लावण्यात आल्याची गंभीर बाब समोर आली असून, खोटी तक्रार व अफवा पसरवणाऱ्यांवर लवकरच गुन्हे दाखल होणार असल्याचे संकेत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिले आहेत. महागावमध्ये सध्या विकासाऐवजी नाट्य, ड्रामा आणि पिक्चर-टाईप राजकारण सुरू असल्याची चर्चा चौकाचौकात ऐकू येत आहे.

## मेळघाटाच्या डोंगरदऱ्यांत जिल्हा

उद्दिष्ट निसर्गाशी नाते जोडणे आणि दैनंदिन कामातून थोडा विरंगुळा मिळवणे असा होता.

आज सकाळी ६ वाजता मोझरी गावातून पदभ्रमंतीला सुरुवात करण्यात आली. सहभागी पदभ्रमंती करून सकाळी ९ वाजता किल्ल्यावर पोहोचले. यावेळी जिल्हाधिकारी येरेकर यांनी गाविलगड किल्ल्याचा इतिहास, भौगोलिक रचना व संवर्धनाबाबत सविस्तर माहिती घेतली. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्यासह अचलपूरचे उपविभागीय अधिकारी बळवंत अरकराव, उपवनसंरक्षक अग्रिम सैनी, चिखलदऱ्याचे तहसीलदार जीवन मोराणकर, अचलपूरचे तहसीलदार सुदर्शन सहारे, जिल्हा प्रशासन अधिकारी विकास खंडारे, चिखलदराचे नायब तहसीलदार सुधीर धावडे, प्रवीण काळे व तुषार बुरघाटे, चिखलदरा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी धीरज गोहाळ, सहायक वनसंरक्षक अक्षय तळपे, वनपरिक्षेत्र अधिकारी युवनाते, वनपाल विनोद कासदेकर, वनरक्षक मयूर सानप, मलवार, बोरकर, मनीष ढाकुलकर उपस्थित यांनी मोहिमेत सहभाग नोंदविला. या मोहिमेचे नियोजन विभागीय वन अधिकारी अनंत डिगोळे यांनी केले. यावेळी शिवा काळे यांनी गाविलगड किल्ल्याचा ऐतिहासिक वारसा, महत्त्व व संरक्षणाची गरज याबाबत सविस्तर माहिती दिली. ही पदभ्रमंती ऐतिहासिक वारसा जतन व पर्यटन विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरली.

## पाणी टाकी साहित्य चोरी

घेण्यात आले. चौकशीत आरोपींनी चोरीची कबुली दिली. तपासात पुढे उघड झाले की, चोरी केलेले साहित्य आरोपींनी विजय सुर्यभान किर्तक (वय ६१, रा. रमाबाई आंबेडकर नगर, अमरावती) या भंगार विक्रेत्यास विकले होते. त्यानुसार नमूद भंगार विक्रेत्याकडून १,२०,००० रुपये किमतीचा चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक फौजदार प्रकाश मेश्राम करीत आहेत. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजीराव बचाटे, पोलिस निरीक्षक अतुल वर, विजया पंधरे, समाधान वाठोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सदर यशस्वी कारवाई सपोनि. मनोज मानकर यांच्या नेतृत्वाखाली गाडगेनगर डी.बी. पथकातील सफौ. प्रकाश मेश्राम, पोहवा. भारत वानखडे, अमोल, नपोका. राजेश, पोशि. सिद्धार्थ, मतीन, सुशांत, सचिन, रूपेश व महेश यांनी केली.

## ट्रक दरीत कोसळल्याने २ ठार

ट्रक क्रमांकएमएच-२९-बीएफ-६०७४ चालकाचा ताबा सुटल्याने रस्त्यावरील डिव्हायडर ओलांडून विरुद्ध दिशेने पुलालगत असलेल्या खोल दरीत ट्रक कोसळला. यामध्ये चालक अनिसोद्दीन रफिकोद्दीन काझी (वय ४०) आणि क्लीनर मोहम्मद रेहान मोहम्मद नाजिम (वय २२,दोघेही रा. जोहर नगर, बुलढाणा) यांचा जागीच मृत्यू झाला. या दुर्दैवी अपघाताची माहिती बुलढाण्यात येऊन धडकताच मुस्लिम बहुल परिसरात एकच खळबळ उडाली आहे. जोहर नगर परिसरावर शोककळा पसरली आहे. माहिती नुसार अनीसोद्दीन रफीयोद्दीन काझी आणि रेहान नाजिम पठाण हे दोघे नागपूरहून लोखंडी पाईप घेऊन आयशर ट्रक एमएच-२९-बीएफ-६०७४ ने नागपूर वरून छत्रपती संभाजी नगर कडे निघाले होते. रात्री अमरावती – अकोला राष्ट्रीय महामार्गावर मूर्तीजापुर तालुक्यातील कुरूम गावाजवळ त्यांच्या वाहनाला अपघात झाला. वाहन अनियंत्रित झाल्याने भर वेगात रस्त्याच्या बाजूला असलेल्या उतारातील दरीत जाऊन ते धडकले. यामुळे वाहनातील जड लोखंडी पाईप वाहनाच्या केबिन वर आदळले. कॅबिनमध्ये चेपल्या गेल्याने चालक व क्लीनर असलेल्या या दोन तरुणांचा मृत्यू झाला. कुरूम येथे आज सकाळ पासून मोठ्या संख्येतील लोखंडी पाईप बाजूला काढून दोघांच्या मृतदेहाला बाहेर काढण्यात आले. या घटनेमुळे शहरात शोककळा पसरली आहे.

## सेंट्रल बँक ऑफ इंडियाचा

अध्यक्ष किरण पातूरकर अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे उप महाप्रबंधक हेमंत शर्मा, अभिनंदन बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी देठे उपस्थित होते. प्रमुख वक्ते म्हणून सीए आणि एमएसएमई सबसिडी विशेषज्ञ पंकज अग्रवाल उपस्थित होते. यावेळी एमसीईडीचे प्रकल्प अधिकारी नेत्रदीप चौधरी, सुरेश जैन इंडस्ट्रीजचे संचालक सुरेश जैन, आरोग्यम् हॉस्पिटलचे संचालक किरण हातगावकर उपस्थित होते.

हेमंत शर्मा यांनी सेंट्रल बँक ग्राहकासाठी सदैव तत्पर असल्याचे सांगितले. शिवाजी देठे यांनी बँक एमएसएमई क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत आहे असे सांगितले. किरण पातूरकर यांनी अमरावती वेगाने प्रगती करत असलेले शहर असून भविष्यात अमरावतीमध्ये येणारे विविध उद्योगाबद्दल माहिती दिली. बँक आपल्या दारी आली असून सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. पंकज अग्रवाल यांनी राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध व्यवसाय योजना आणि त्या मध्ये मिळणारे अनुदान याबाबत चर्चा करून प्रश्नाची उत्तरे दिली.

यावेळी सेंट्रल बँक ऑफ इंडिया आणि एमआयडीसी असोसिएशन अमरावती यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या कॅम्पमध्ये बँकेतर्फे २७ कोटी रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले. सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रमुख सुनील पांडेय यांनी प्रास्ताविकातून बँकेच्या सुविधा, तसेच सायबर गुन्ह्यापासून वाचण्यासाठी घेण्यात येणाऱ्या सावधानीबाबत मार्गदर्शन केले. निलेश मुंदेकर यांनी सूत्रसंचालन केले. अग्रणी बँक व्यवस्थापक नरेश हेडाऊ यांनी आभार मानले.

## अवैध प्रवासी वाहतुकीवर

न्यायालयात प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद व अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली श्रेणी पोलीस उपनिरीक्षक दिपक साबळे, शकुर शेख, सुनिल मलातपुरे व पोहेकॉ. अरविंद सरोदे यांच्या पथकाने केली. दरम्यान, अमरावती ग्रामीण पोलीस दलातर्फे नागरिकांना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याचे, दुचाकी चालविताना हेल्मेट वापरण्याचे व वाहनांची वैध कागदपत्रे सोबत ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध पुढेही कडक दंडात्मक व न्यायिक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

## आरटीओ कार्यालयातून

चोरी करून त्याचे सुटे भाग केले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार गुन्हे शाखेने तात्काळ हालचाल करत दोन्ही भावांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली देत ट्रक स्क्रॅप करून त्याचे भाग ट्रान्सपोर्ट नगर परिसरात लपवून ठेवल्याचे सांगितले. त्यानुसार पथकाने छापा टाकून ८ टायर, ८ लोखंडी टायर डिस्क, तुटलेल्या अवस्थेतील इंजिन, साईड पत्रे, अँगल व इतर स्क्रॅप पार्ट्स असा सुमारे ८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. शासकीय कार्यालयातून चोरी झालेला वाहन गुन्हे शाखेने इतक्या कमी वेळात उघडकीस आणल्याने, पोलिसांच्या कार्यक्षमतेचे शहरात कौतुक होत आहे.

## रात्री घरफोडी करणारा गुन्हेगार

रविंद्र बारड यांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवत गुप्त माहितीच्या आधारे संतोष प्रकाश गावंडे (वय ३०, रा. मोचर्डा) यास संशयास्पद हालचालींवरून ताब्यात घेतले. प्रारंभी आरोपीने उडवाउडवीची उत्तरे दिली; मात्र विश्वासात घेऊन सखोल चौकशी केली असता त्याने घरफोडी केल्याची कबुली दिली. त्यानंतर आरोपीकडून रोख रक्कम व सोन्या-चांदीचे दागिने असा संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही यशस्वी कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण) विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे व गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार रविंद्र बारड यांच्या नेतृत्वात पोहेकॉ किशोर घुगे, विजय निमकांडे, विशाल हरणे व जितेंद्र पाली यांनी केली.

## अ.भा. आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल

विरुध्द एमडीएस विद्यापीठ, अजमेर यांच्यातील सामना एमडीएसयू ने ११-० ने जिंकला. भोपाळ विद्यापीठ विरुध्द मुंबई विद्यापीठ यांच्यातील सामना भोपाळ विद्यापीठाने ७-० ने जिंकला. संजीवनी विद्यापीठ, अहिल्यानगर विरुध्द जुनागढ विद्यापीठातील सामना संजीवनी विद्यापीठाने १२-२ ने जिंकला. उस्मानिया विद्यापीठ, हैद्राबाद विरुध्द महात्मा गांधी विद्यापीठ, कोट्टम यांच्यातील सामना उस्मानिया विद्यापीठाने ६-५ ने जिंकला. बीआरएयू, आग्रा विद्यापीठ विरुध्द माधव विद्यापीठ, राजस्थान यांच्यातील सामना बीआरयू ने १६-६ ने जिंकला. आंध्रा विद्यापीठ विरुध्द बिलासपूर विद्यापीठातील सामना आंध्रा विद्यापीठाने १५-० ने जिंकला. लखनौ विद्यापीठ विरुध्द उदयपूर विद्यापीठातील सामना लखनौ विद्यापीठाने १०-० ने जिंकला. केबीसीएनएमयू जळगांव विरुध्द कन्नौर विद्यापीठ यांच्यातील सामना जळगाव विद्यापीठाने ११-० ने जिंकला. अमरावती विद्यापीठ विरुध्द व्हीएस विद्यापीठ, नेल्लोर यांच्यातील सामना अमरावती विद्यापीठाने ७-० ने जिंकला. कोटी विद्यापीठाने एकतर्फी विजय मिळविला. जीएनडीयू विद्यापीठ विरुध्द बीसीयू विद्यापीठातील सामना जीएनडी विद्यापीठाने १०-० ने जिंकला. कुएमपू कर्नाटक विद्यापीठ विरुध्द पॅसेफिक विद्यापीठ, उदयपूर यांच्यातील सामना कर्नाटक विद्यापीठाने ८-६ ने जिंकला. पंजाब विद्यापीठ विरुध्द बीबीसी विद्यापीठातील सामना पंजाब विद्यापीठाने १०-० ने जिंकला. संभाजीनगर विद्यापीठ विरुध्द पंजाब विद्यापीठ, चंदीगड यांच्यातील सामना पंजाब विद्यापीठाने १०-० ने जिंकला. दिल्ली विद्यापीठ विरुध्द मुंबई विद्यापीठातील सामना दिल्ली विद्यापीठाने १०-० ने जिंकला. केरला विद्यापीठ विरुध्द उस्मानिया विद्यापीठातील सामना केरला विद्यापीठाने ४-१ ने जिंकला. एसपीपी विद्यापीठ, पुणे विरुध्द मंगलगंगोत्री विद्यापीठातील सामना पुणे विद्यापीठाने ११-० ने जिंकला. कालिकत विद्यापीठ विरुध्द डीएव्हीव्ही विद्यापीठ, इंदौर विद्यापीठातील सामना कालिकत विद्यापीठाने जिंकला. दुर्ग विद्यापीठ विरुध्द व्हीसीआयडब्ल्यूयू कोटी विद्यापीठातील सामना दुर्ग विद्यापीठाने ७-१ ने जिंकला. नागपूर विद्यापीठ विरुध्द एसआरटीएम विद्यापीठ, नांदेड यांच्यातील सामना नांदेड विद्यापीठाने ८-२ ने जिंकला. अजमेर विद्यापीठ विरुध्द सिकर विद्यापीठ यांच्यातील सामना अजमेर विद्यापीठाने १०-० ने जिंकला.

## पाटीपुरा ड्रग्स अड्डयावर

आले. त्यामुळे दोघांविरोधात कठोर कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. विश्वसनीय गोपनीय माहितीच्या आधारे आखलेल्या या कारवाईमुळे पाटीपुरा परिसरात एकच खळबळ उडाली असून, ड्रग्स विक्रीत गुंतलेल्या घटकांमध्ये मोठी धास्ती निर्माण झाली आहे. पोलिसांकडून आता ड्रग्स कुठून आणले जात होते, कोणाला पुरवठा केला जात होता आणि या मागे कोणते मोठे रॅकेट कार्यरत आहे, याचा कसून तपास सुरू आहे.

**अमरावती ड्रग्स तस्करीचे नवे केंद्र?**

अमरावती शहरात सातत्याने उघडकीस येणाऱ्या ड्रग्स कारवायांमुळे गंभीर चित्र समोर येत आहे. काही दिवसांपूर्वी डीआरआयने ५ किलो एमडी ड्रग्स जप्त केल्यानंतर आता शहर गुन्हे शाखेने थेट राहत्या घरातून एमडी हस्तगत केल्याने शहर ड्रग्स माफियांच्या रडारवर असल्याचे संकेत मिळत आहेत. तरुणांचा गैरवापर, स्थानिक पातळीवर तयार झालेले वितरण जाळे आणि वाढती मागणी ही बाब चिंतेची असून, संपूर्ण ड्रग्स नेटवर्क उद्ध्वस्त करणे हे पोलिसांसमोर मोठे आव्हान ठरत आहे.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ रविवार, ८ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# गर्भपाताच्या औषध खरेदी – विक्रीचा संशयास्पद 'खेळ'

■ प्रतिनिधी | अकोला ■

**शहरात गर्भपातासाठी वापरल्या जाणाऱ्या मिसोप्रोस्टॉल या औषधांच्या खरेदी-विक्री व्यवहारात गंभीर अनियमितता झाल्याचा संशय बळावत असून, या प्रकरणातील ठोस कागदोपत्री पुरावे असूनही अन्न व औषध प्रशासन (FDA) विभाग माहिती देण्यास टाळाटाळ करत असल्याचा आरोप उघडपणे पुढे आला आहे. विशेष म्हणजे, FDA च्याच अधिकृत पत्रात नमूद असलेले पुरावे नंतर माहिती अधिकारांतर्गत नाकारण्यात आल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर संशयाची सुई रोखली गेली आहे.**

याबाबत सविस्तर वृत्त असे की, शहरातील मे. श्रीनिवास फार्मा तसेच शहरातील चार डॉक्टरांनी गेल्या १० ते १२ वर्षांपासून गर्भपाताची औषधे वापरलेली नसल्याचे लेखी निवेदन दिले होते. मात्र, FDA विभागाने दि. २६ डिसेंबर २०२४ रोजी केलेल्या तपासणीत या डॉक्टरांनी संबंधित औषधांची खरेदी केल्याचे डिमांड नोट व विक्री बिलांद्वारे स्पष्ट झाल्याची नोंद केली होती. याच अनुषंगाने FDA चे सहायक आयुक्त अनिल माणिकराव यांनी दि. ८ मार्च २०२५ रोजी



जिल्हा शल्य चिकित्सकांना अधिकृत पत्र पाठवून सदर कागदपत्रे जोडली असून, फेरचौकशी करण्याची शिफारस देखील केली होती.

या प्रकरणातील सत्य समोर आणण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते संजय कृष्णराव देशमुख यांनी माहिती अधिकार कायद्यांतर्गत डिमांड नोट व विक्री बिलांची प्रत मागितली. मात्र, FDA विभागाकडून 'माहिती उपलब्ध नाही' आणि 'सदर माहिती कार्यालयाशी संबंधित नाही' असे उत्तर देण्यात आले. यामुळे, स्वतः पुरावे सादर करणारेच कार्यालय आता पुरावे नसल्याचे सांगत असल्याने 'काहीतरी दडपले जात आहे का?' असा थेट प्रश्न उपस्थित झाला आहे.

या गंभीर प्रकरणी FDA कडून माहिती देण्यास आणखीन विलंब झाल्यास तक्रारदार संजय देशमुख यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार करीत जन माहिती अधिकाऱ्याविरोधात कारवाईची मागणी करणार असल्याचा इशारा दिला. तसेच भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागामार्फत (ACB) चौकशी करण्याची मागणी करणार असून गरज भासल्यास उच्च न्यायालयात धाव घेण्याची तयारीही त्यांनी दर्शविली आहे.

**PCPNDT विभागाची चुप्पी**

गर्भपाताशी संबंधित औषधांचा गैरवापर हा PCPNDT कायद्यानुसार गंभीर व दंडनीय गुन्हा आहे. अशा प्रकरणात माहिती लपवली जात असल्यास, दोषींना अप्रत्यक्ष संरक्षण मिळत असल्याचा संशय व्यक्त होत आहे. परिणामी याप्रकरणी पीसीपीएनडीटी विभागाने अद्याप आपली भूमिका काय ? ही समोर न आणल्याने त्यांची भूमिका सद्यस्थितीत गुलदस्त्यात आहे. तर या प्रकरणी जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर देण्यासाठी विलंब केल्याने माहिती अधिकार कायद्याच्या उद्देशावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**प्रशासनाची भूमिका गुलदस्त्यात**

या संपूर्ण प्रकरणावर FDA प्रशासन आणि आरोग्य विभागाकडून अद्याप कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. मात्र, आरोग्य व्यवस्थेशी थेट संबंधित असलेल्या या गंभीर प्रकरणात दोषींवर कारवाई होणार की प्रकरण फाईलमध्येच गाडले जाणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

**'FDA कडून परस्परविरोधी उत्तरे दिली जात आहेत.**

ज्या पुराव्यांचा उल्लेख अधिकृत पत्रात आहे, तेच पुरावे माहिती अधिकारात नाकारले जात आहेत. हा प्रकार अत्यंत गंभीर असून, निष्पक्ष चौकशी झाल्याशिवाय मी गप्प बसणार नाही.'

**संजय कृष्णराव देशमुख**
सामाजिक कार्यकर्ते

............

**आमच्यावरील आरोप बिनबुडाचे - अनिल माणिकराव**

या संपूर्ण प्रकरणाची माहिती आधीच माहिती अधिकारातून जा. क्र. ९४० या पत्रानुसार संबंधित आरटीआय ला दिली आहे. सदर पत्राऐवजी दुसऱ्या पत्र क्रमांकाचा उल्लेख करून त्यांनी माहिती मागितल्याने ती देऊ शकलो नाही. FDA विभागाने त्यांची पूर्ण जबाबदारी पार पाडली आहे, याप्रकरणी पुन्हा चौकशीचे पत्र काढून आदेश दिले आहे. हे संपूर्ण प्रकरण FDA नेच उघडकीस आणल्याने आमच्याकडे सर्व पुरावे आहेत अशी प्रतिक्रिया सहाय्यक आयुक्त अनिल माणिकराव यांनी दिली.

# लैंगिक अत्याचारग्रस्त मुलांच्या मदतीसाठी सहाय्यक व्यक्तींची नियुक्ती

■ प्रतिनिधी | वाशिम ■

लैंगिक अपराधापासून मुलांचे संरक्षण (पॉक्सो) कायदा २०१२ अंतर्गत लैंगिक शोषण झालेल्या किंवा अत्याचाराला बळी पडलेल्या मुलांना मदत करण्यासाठी सहाय्यक व्यक्तींची नियुक्ती करण्यात येणार आहे. यासाठी बालकांच्या क्षेत्रात काम करण्याची इच्छा असणाऱ्या पात्र व्यक्तींनी अर्ज सादर करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी उत्तम शिंदे यांनी केले आहे.

पॉक्सो कायदा हा १८ वर्षाखालील बालकांवरील लैंगिक शोषण व पोर्नोग्राफीपासून संरक्षणासाठी लागू करण्यात आला आहे. लैंगिक अत्याचारग्रस्त बालकांना मानसिक, सामाजिक व कायदेशीर आधार देण्याची जबाबदारी संपूर्ण समाजाची आहे. या पार्श्वभूमीवर बालकांच्या क्षेत्रात कार्यरत सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढे येऊन सहाय्यक व्यक्ती म्हणून काम करणे आवश्यक आहे.

## पात्र व्यक्तींनी अर्ज करण्याचे आवाहन

**पात्रता :** सामाजिक कार्य, समाजशास्त्र, मानसशास्त्र किंवा बाल विकास या विषयात पदव्युत्तर पदवी घेतलेली व्यक्ती तसेच बालशिक्षण व विकास संरक्षण क्षेत्रात किमान तीन वर्षांचा अनुभव असलेली पदवीधर व्यक्ती अर्ज करू शकतात. बाल हक्क संरक्षणाच्या क्षेत्रात सक्रिय असलेल्या संस्था, तसेच बालगृह किंवा निवारा गृहाशी संबंधित अधिकारीही सहाय्यक व्यक्ती म्हणून अर्ज करण्यास पात्र असतील.

**निवड प्रक्रिया :** अर्ज प्राप्त झाल्यानंतर जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांच्यामार्फत अर्जांची पडताळणी करण्यात येईल. त्यानंतर निवड समितीसमोर वैयक्तिक संवादाद्वारे मूल्यांकन करून पात्र उमेदवारांची सहाय्यक व्यक्ती म्हणून शिफारस केली जाईल.

**मानधन :** सहाय्यक व्यक्तींना रुग्णालय, बाल कल्याण समिती, पोलिस ठाणे, बालसंगोपन संस्था, न्यायालय, शैक्षणिक संस्था व इतर संबंधित ठिकाणी केलेल्या कामकाजाच्या दिवसांनुसार मानधन देण्यात येईल. हे मानधन किमान वेतन कायदा १९४८ अंतर्गत कुशल कामगारासाठी निर्धारित दरानुसार अदा केले जाईल. मात्र, नियुक्ती असूनही कोणतेही प्रकरण दिले नसल्यास मानधन देण्यात येणार नाही.

**अर्ज सादर करण्याची मुदत :** सहाय्यक व्यक्ती म्हणून काम करण्याची इच्छा असणाऱ्या उमेदवारांनी बातमी प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जिल्हा बाल संरक्षण कक्ष, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, कक्ष क्र. २०४, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम येथे अर्ज सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ब्रम्हा येथे दारूबंदीबाबत उद्या मतदान

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम तालुक्यातील मौजे ब्रम्हा, येथे असलेल्या ऋषी रेस्टॉरंट ॲण्ड बाईन बार यांची मद्यविक्रीची अनुज्ञप्ती बंद करावी अथवा नाही, याबाबत दारूबंदी निवडणूक घेण्यात येणार असून, ही निवडणूक दि. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडणार आहे.

जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिलेल्या आदेशान्वये सदर मतदान प्रक्रिया राबविण्यासाठी वाशिम तहसिलदार निलेश पळसकर यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. तसेच तहसिलदार, वाशिम यांचे आदेश क्रमांक जा.क्र. म.स./सा.नि./कावि/२४/२०२६, दिनांक २३ जानेवारी २०२६ अन्वये नायब तहसिलदार, ही. एस. आडे यांना निवडणूक प्रक्रियेची जबाबदारी देण्यात आली आहे.

**मतदान केंद्रांचा तपशील :**

३४ – वाशिम (अ.जा.) विधानसभा मतदार संघातील मतदार यादी भाग क्र. ३३० व मतदान केंद्र क्र. १ मधील मतदारांसाठी : जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, ब्रम्हा, खोली क्र. १ (पूर्वेकडील भाग)

मतदार यादी भाग क्र. ३३१ व मतदान केंद्र क्र. २ मधील मतदारांसाठी : जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, ब्रम्हा, खोली क्र. २ (पूर्वेकडील भाग)

**मतदान व मतमोजणी**

मतदानाची वेळ सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत राहील. मतमोजणी दि. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपासून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ब्रम्हा येथे होणार असून, निकाल तात्काळ जाहीर करण्यात येणार आहे.

# गलवानमध्ये शहीद झालेल्या जवानांची जबाबदारी कोण घेणार?

■ प्रतिनिधी | वाशिम ■

देशा समोर आज अत्यंत गंभीर, संवेदन शील आणि धक्का दायक प्रश्न उभा राहिला असून, २०२० साली गलवान खोऱ्यात झालेल्या संघर्षात शहीद झालेल्या भारतीय जवानांच्या मृत्यूची जबाबदारी नेमकी कोणाची, असा थेट सवाल युवक काँग्रेसने उपस्थित केला आहे.

केंद्र सरकारच्या कथित अपयशांवरून तसेच लोकशाही विरोधी कारभारा विरोधात १० फेब्रुवारी रोजी दिल्ली येथे युवक काँग्रेसच्या वतीने संसद घेराव आंदोलन आयोजित करण्यात आले असून, या आंदोलनात देशभरातून हजारोंच्या संख्येने युवकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन अमरावती युवक काँग्रेसचे विभागीय प्रभारी व प्रदेश महासचिव कपिल ढोके यांनी वाशिम येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत केले.



**केंद्र सरकारच्या दडपशाहीविरोधात १० फेब्रुवारीला युवक काँग्रेसचा संसद घेराव; हजारोंच्या उपस्थितीचे आवाहन**

पत्रकार परिषदेत बोलताना कपिल ढोके यांनी केंद्र सरकारवर तीव्र शब्दांत टीका करत म्हटले की, देशाच्या सुरक्षिततेशी संबंधित अत्यंत गंभीर विषयांवर प्रश्न विचारणाऱ्यांचा आवाज दाबण्याचे काम सध्याचे सरकार सातत्याने करत आहे. लोकशाहीमध्ये प्रश्न विचारणे हा नागरिकांचा मूलभूत हक्क असून, मात्र आज या हक्कालाच गुन्हा 'रवण्याचा प्रयत्न सुरू आहे. यावेळी त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चेत असलेल्या 'एफस्टीन फाइल्स' प्रकरणाचा उल्लेख करत, या प्रकरणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नाव चर्चेत असल्याचा दावा केला. या कथित गंभीर आरोपांवर पंतप्रधानांनी आजपर्यंत देशाला कोणताही अधिकृत खुलासा दिलेला नाही किंवा नैतिक जबाबदारी स्वीकारलेली नाही, असा आरोपही त्यांनी केला. या प्रकारामुळे भारताची प्रतिमा आंतर राष्ट्रीय स्तरावर मलीन होत असल्याचे युवक काँग्रेसचे म्हणणे आहे. कपिल ढोके पुढे म्हणाले की, लष्कराचे माजी प्रमुख जनरल मनोज नरवणे यांनी गलवान संघर्षा संदर्भात केलेल्या खुलास्या नंतर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. जनरल नरवणे यांनी आपल्या पुस्तकात, लष्कराने वेळोवेळी दिलेल्या सूचनांकडे सरकारने दुर्लक्ष केल्याचा उल्लेख केल्याचा दावा युवक काँग्रेसकडून करण्यात आला. याच पार्श्वभूमीवर गलवान मध्ये शहीद झालेल्या जवानांच्या मृत्यूची जबाबदारी निश्चित करून दोषींवर कारवाई झाली पाहिजे, अशी 'म मागणी करण्यात आली. याच मुद्द्यांवर संसदेत चर्चा सुरू असताना विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले असता त्यांचा माईक बंद करण्यात आल्याचा आरोपही युवक काँग्रेसने केला. हा प्रकार संसदीय परंपरांचा अपमान असून लोकशाहीवरचा थेट हल्ला असल्याचे ढोके यांनी सांगितले. सरकार विरोधात बोलणाऱ्या खासदारांचे निलंबन, त्यांचा आवाज दाबणे, हे हुकूमशाही वृत्तीचे लक्षण असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला या सर्व पार्श्वभूमीवर युवक काँग्रेसने पुढील प्रमुख मागण्या मांडल्या आहेत – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एफस्टीन फाइल्स प्रकरणावर देशासमोर जाहीर खुलासा करावा.

# वटफळी येथील धम्म परिषदेमध्ये दिलीप गवई धम्मभूषण पुरस्काराने सन्मानित



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वटफळी ता.नेर जिल्हा यवतमाळ येथे दरवर्षी बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात येते.त्याअनुसंगाने याही वर्षी ३४ द्या धम्म परिषदेचे दि ३ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजन करण्यात आले होते.

या धम्म परिषदेमध्ये महाराष्ट्रातून बहूसंख्येने बौद्ध उपासक, उपासिका व बौद्ध भिक्षू यांची उपस्थिती असते.या धम्म परिषदेमध्ये जे बौद्ध उपासक, उपासिका हे धम्माचे आचरण करून धम्म जागृतीचे कार्य करतात.अशा बौद्ध उपासक,उपासिका यांचा सन्मान केला जातो.त्यामध्ये यावेळी वाशीम येथील बौद्ध उपासक से.नि.केंद्रप्रमुख तथा त्रिरत्न बुद्ध विहार वाशीमचे विश्वस्त दिलीप गवई यांना भदन्त डॉ.नागघोष महाथेरो यांचे हस्ते धम्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.यावेळी प्रमुख भदन्त डॉ. हर्षबोधी महाथेरो,भदन्त डॉ. एच. आर. धम्मदीप महाथेरो यांची उपस्थिती होती. तर वाशीममधून से. नि. उपमुख्य कार्यकारी अधिकारी आयु.विलास खिल्लारे, से. नि. शिक्षक आयु.अरविंद पडघान, आयु.अनिल वानखेडे यांची देखील उपस्थिती होती. दिलीप गवई यांना धम्मभूषण पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

# वाशिम जिल्ह्यात कॉपी संस्कृतीला आव्हान मनसे विद्यार्थी सेनेने घेतली आक्रमक भूमिका



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगाव-रिसोड तालुक्यातील खाजगी शाळांमध्ये परीक्षेदरम्यान होणारी कॉपी (नकल) रोखण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना (मनसे विद्यार्थी सेना) ने तीव्र भूमिका घेतली आहे. वाशिम जिल्ह्यातील मालेगाव-रिसोड तालुक्यातील खाजगी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये (१०वी, १२ वी) कॉपीमुक्त अभियान राबवण्याची मागणी करत जिल्हा परिषद शिक्षणाधिकाऱ्यांना पत्र दिले आहे.पत्रातील मुख्य मुद्दे आणि तक्रार मनसे विद्यार्थी सेनेच्या वाशिम जिल्हा अध्यक्ष राजु पाटील किडसे, गजानन वैरागडे जिल्हा सचिव यांच्या मार्गदर्शनात व प्र.जिल्हाध्यक्ष गजानन कढणे, जिल्हा उपाध्यक्ष अनिकेत शेटे यांच्या नेतृत्वात हे निवेदन ५ फेब्रुवारी २०२६ रोजी शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांना सादर केले गेले. यावेळी उपस्थित होते: उमेश टोलमारे उपजिल्हाध्यक्ष वाशिम-मंगरुळनाथ, अतिश डहाळे उपजिल्हाध्यक्ष मालेगाव - रिसोड, ज्ञानेश्वर गवळी तालुकाध्यक्ष मालेगाव, आकाश लोलप शहर उपाध्यक्ष वाशिम, विनोद वानखेडे वाहतूक सेना जिल्हा संघटक मालेगाव.

**पत्रात नमूद केलेल्या प्रमुख तक्रारी खालीलप्रमाणे:** मालेगाव-रिसोड तालुक्यातील खाजगी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये परीक्षेदरम्यान कॉपीचे प्रमाण वाढले आहे. विद्यार्थ्यांना पैसे, मोबाईल किंवा इतर साधनांद्वारे कॉपी करण्यास प्रोत्साहन दिले जाते.


# नीरज शाह यांना मानाचा 'रेड डायमंड डायरेक्टर' अवॉर्ड

■ प्रतिनिधी | अकोला ■

महानगरातील सेवाभावी सामजिक कार्यकर्ते नीरज शाह यांना मानाचा अकोला जिल्ह्यातील मोदीकेअर इंडियाचा सर्वोच्च 'रेड डायमंड डायरेक्टर' अवॉर्ड मिळाला आहे. मोदीकेअरच्या योजनांमध्ये सेवाभावी उत्कृष्ट कार्य, कार्यक्षम संघटन नेतृत्व आणि मेहनतीचे उद्दिष्ट लक्षात घेता हा जिल्हास्तरीय पुरस्कार नीरज शाह यांना प्रदान करण्यात आला.गुजरातमधील वडोदरा येथे संपन्न या अवॉर्ड वितरण सोहळ्यात नीरज शाह व त्यांच्या पत्नी सौ प्रतीक्षा शाह यांना हा मानाचा जिल्हास्तरीय पुरस्कार मान्यवरां च्या हस्ते प्रदान करण्यात आला.मोदी केअरच्या माध्यमातून शाह सुमारे पाच वर्षांपासून स्वदेशी बना,स्वदेशी वापरा या तत्वावर स्वदेशी उत्पादन,नागरिकांचे आरोग्य व बालकांसाठी मोबाईल जागरण वर कार्य करीत आहेत. यात त्यांनी शेकडो कार्यकर्त्यांना जोडून जिल्ह्यात नावलौकिक प्राप्त केला आहे. नीरज शाह हे अनेक सेवाभावी संस्थांशी जुळलेले असून ते अनेक वर्षापासून सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी म्हणून आपली सामाजिक सेवा देत आहेत.

# श्री संत नरहरी सोनार पुण्यतिथी निमित्ताने भव्य शोभायात्रा

**मालेगाव :** येथे सर्व सोनार समाज बांधव तसेच सराफा व्यावसायिक यांच्या तर्फे दि. ४ फेब्रुवारी रोजी श्री संत नरहरी सोनार पुण्यतिथी निमित्ताने भव्य शोभायात्रा काढण्यात आली.



सोनार समाजाचे आराध्य दैवत श्री संत नरहरी सोनार यांचे भव्य मंदिर मालेगाव शहरात उभारले आहे त्याचा पहिला वर्धापनदिन आणि नरहरी सोनार पुण्यतिथी निमित्ताने ४ फेब्रुवारी रोजी शहरात सर्व सोनार समाज बांधवांतर्फे भव्य दिव्य शोभायात्रा सकाळी ९ वाजता शहरातून भव्य शोभायात्रा गावातील मुख्य मार्गावरून काढण्यात आली. सजवलेल्या रथात सर्व प्रतिमा , मूर्ती ठेवलेल्या होत्या. त्यामध्ये सोनार समाजातील सर्व बांधव आणि भगिनी यांनी सहभाग घेतला होता. शिस्तबद्धरीत्या ही मिरवणूक टाळ मृदंगाच्या गजरात वाजत गाजत शिव चौक पासून गावातील मुख्या रस्त्यावरुन ते संत नरहरी महाराज मंदिरापर्यंत नेण्यात आली. मिरवणूक गावातील मुख्य मार्गावर येत असताना गावात घरासमोर रांगोळ्या काढण्यात आल्या. होत्या फटाक्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. नरहरी सोनारांचे मालेगाव तालुक्यात तसेच जिल्ह्यात हे पहिलेच मंदिर असल्याने सर्वांमध्ये आनंद व उत्साह ओसंडून वाहत होता. पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता.

# राष्ट्रीय गुणवत्ता नामांकन प्राप्त ग्रामीण रुग्णालय वरिष्ठ अधिकारी यांची भेट



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

शहरातील राष्ट्रीय गुणवत्ता नामांकन प्राप्त असलेल्या ग्रामीण रुग्णालयास दिनांक पाच फेब्रुवारीला उपसंचालक अकोला डॉ सुशीलकुमार वाकचौरे तसेच वाशिम जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर ठोंबरे यांनी भेट देऊन परिसराची पाहणी केली, याप्रसंगी मालेगाव तालुका ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर श्रीकांत जाधव, डॉक्टर महेश शिंदे, डॉक्टर कपिल सुर्वे यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत, वरिष्ठ अधिकारी भेटी दरम्यान परिसराची पाहणी करून समाधान व्यक्त करून काही त्रुटी आढळल्या त्या दुरुस्त करण्यासंदर्भात सूचना दिल्या यावेळी डॉक्टर बोरसे तसेच इतर कर्मचारी व अधिकारी यांची उपस्थिती लाभली होती.

# व्याड–चिखली रस्त्याचा प्रश्न अखेर मार्गी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

रिसोड तालुक्यातील व्याड ते चिखली या अत्यंत महत्त्वाच्या रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामास अखेर प्रारंभ झाला असून, त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून त्रस्त असलेल्या वाहनचालक व नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. हा प्रश्न मार्गी लावण्यात भाजपचे युवा नेते ॲड. नकूलदादा देशमुख यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला आणि माजी खासदार अनंतराव देशमुख यांच्या प्रभावी नेतृत्वाला यश आले आहे.

व्याड–चिखली रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने दुचाकी व चारचाकी वाहनचालकांना दररोज जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत होता. पावसाळ्यात तर परिस्थिती अधिकच बिकट होत होती. खड्ड्यांमुळे वाहने उसळणे, किरकोळ अपघात होणे, रुग्णवाहिका व शालेय वाहनांना अडचणी येणे, अशी गंभीर स्थिती निर्माण झाली होती. या समस्येबाबत व्याड व चिखली परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी होती. व्याड येथील नागरिकांनी सुरूवातीला लोकप्रतिनिधींकडे रस्ता कामासाठी निधी देण्याची

**ॲड. नकुल देशमुख यांचा पाठपुरावा : माजी खासदार अनंतराव देशमुख यांची दखल**



मागणी केली होती. परंतु, लोकप्रतिनिधींकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला नसल्याने व्याड येथील नागरिकांनी माजी जिल्हा परिषद सदस्य स्वप्नील सरनाईक यांच्याकडे धाव घेतली. रस्त्याचा प्रश्न निकाली काढण्यासाठी स्वप्नील सरनाईक यांनी व्याड येथील नागरिकांचे शिष्टमंडळ घेऊन भाजपचे ज्येष्ठ नेते तथा माजी खासदार अनंतराव देशमुख व युवा नेते ॲड. नकुल देशमुख यांची रिसोड येथे भेट घेतली व रस्त्याच्या दुरवस्थेबाबत सविस्तर माहिती दिली. हा प्रश्न तात्पुरता नव्हे तर कायमस्वरूपी सोडवावा, अशी आग्रही मागणी त्यांनी यावेळी केली. या मागणीची गंभीर दखल घेत माजी खासदार अनंतराव देशमुख व ॲड. नकुलदादा देशमुख यांनी तत्काळ वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा सुरू केला. संबंधित विभागांशी समन्वय साधून रस्त्यासाठी पुरेसा निधी मंजूर करून घेतला. त्यांच्या प्रभावी हस्तक्षेपामुळे व्याड–चिखली रस्त्याचा प्रश्न अखेर निकाली निघाला असून प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली आहे. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य स्वप्नील सरनाईक, संतोष वानखडे, चिखलीचे माजी सरपंच गौतम भगत, व्याडचे उपसरपंच रामभाऊ बोरकर, गौतम वानखडे, गायकवाड, अंभोरे यांच्यासह व्याड व चिखली परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**एका महिन्यात काम पूर्ण होण्याचा अंदाज**

या रस्त्याचे काम येत्या एका महिन्यात पूर्ण होण्याची शक्यता असून, यामुळे शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांचा दैनंदिन प्रवास सुरक्षित व सुखकर होणार आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ७४ ■ रविवार, ८ फेब्रवारी २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# ग्रामीण रुग्णालयासाठी सिंदी नगर परिषद मैदानात

## -प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दर्जावाढीसाठी सर्वानुमते ठराव



**सिंदी (रेल्वे) । जनमाध्यम** - स्थानिक नागरिकांची वाढती लोकसंख्या, आजूबाजूच्या ग्रामीण भागातील रुग्णांचा वाढता भार आणि अपुऱ्या आरोग्य सुविधांच्या पार्श्वभूमीवर सिंदी (रेल्वे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा देण्याचा ठाम निर्णय नगर परिषदेने घेतला आहे. दोन दिवसांपूर्वी पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत या संदर्भातील ठराव क्रमांक ६ सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सिंदी (रेल्वे) शहराला सन १९५० पासून 'क' वर्ग नगर परिषदेचा दर्जा असून, १९६२ पासून येथे प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत आहे. मात्र, गेल्या ६४ वर्षांत लोकसंख्या व रुग्णसंख्या दुपटीहून अधिक वाढली, तरीही आरोग्य सुविधांमध्ये कोणतीही ठोस वाढ झालेली नाही. परिणामी नागरिकांना उपचारासाठी आजही वर्धा, सेवाग्राम किंवा नागपूरकडे धाव घ्यावी लागत आहे.

सध्या शहराची लोकसंख्या २२ ते २५ हजार असून, शहरालगतच्या १० किलोमीटर परिसरातील २५ ते ३० गावांतील नागरिक सिंदी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रावर अवलंबून आहेत. मात्र येथे केवळ प्राथमिक उपचारांची सुविधा उपलब्ध असून, मध्यम व गंभीर आजारांवरील तपासणी, उपचार व शस्त्रक्रियेची सोय नाही. त्यामुळे गोरगरीब रुग्णांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर, प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात रूपांतर झाल्यास सिंदी शहरासह परिसरातील हजारो नागरिकांना दिलासा मिळणार असून, अत्याधुनिक उपचार स्थानिक पातळीवर उपलब्ध होतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

भाजपच्या नवनियुक्त नगराध्यक्षा राणी कलोडे यांच्या अध्यक्षतेखाली हा ठराव मंजूर करण्यात आला. या ठरावाच्या अंमलबजावणीसाठी राज्याचे आरोग्यमंत्री तानाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली पालकमंत्री डॉ,भोयर व आमदार कुणावार यांच्यामार्फत राज्य शासनाकडे अधिकृत प्रस्ताव सादर केला जाणार आहे. येणाऱ्या उन्हाळी अधिवेशनात या मागणीला मंजुरी मिळावी, यासाठी विशेष पाठपुरावा केला जाणार असल्याचे नगर परिषदेने स्पष्ट केले आहे.

> नागरिकांचे आरोग्य हा केवळ प्रशासकीय मुद्दा नसून, तो जीवन-मरणाचा प्रश्न आहे. सिंदी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात रूपांतर व्हावे, यासाठी नगर परिषद शेवटपर्यंत पाठपुरावा करेल.
>
> **राणी स्नेहल कलोडे,** नगराध्यक्षा, नगर परिषद सिंदी (रेल्वे)

# सार्वजनिक ठिकाणी प्रवाशांच्या जीवाशी खेळ; हिंगणघाट बसस्टँडवरील संतापजनक घटना

## निष्काळजी इसमाची बाटली प्रवाशाच्या डोक्यावर उपचाराऐवजी शिवीगाळ, धमकी देत फरार

**हिंगणघाट जनमाध्यम :** सार्वजनिक ठिकाणी प्रवाशांच्या जीवाशी खेळण्याची मोकळीक कुणी दिली, हिंगणघाट बसस्टँडवर घडलेल्या एका धक्कादायक घटनेत एका अनोळखी इसमाच्या निष्काळजीपणामुळे प्रवाशाच्या डोक्यावर थेट पाण्याची बाटली कोसळली. डोके फुटून रक्तस्राव होत असतानाही त्या इसमाने माणुसकी दाखवण्याऐवजी शिवीगाळ, दमदाटी आणि धमकी देत घटनास्थळावरून पळ काढला.



पांढरकवड्यावरून नागपूरकडे जाणारी बस हिंगणघाट बसस्टँडवर थांबली होती. बसमधील लगेज कॅरियरमधून आपली बॅग काढताना संबंधित इसमाने कसलीही काळजी न घेता बॅग खाली ओढली. त्यातून तांब्याच्या धातूची पाण्याची बाटली थेट पुंडलिक भीमराव कोवे (रा. बोध, ता. केळापूर, जि. यवतमाळ) यांच्या डोक्यावर आदळली. क्षणार्धात डोके फुटले, रक्त सांडले आणि बसमधील प्रवाशांमध्ये खळबळ उडाली.

जखमी अवस्थेत असलेल्या प्रवाशास तात्काळ दवाखान्यात नेण्याची विनंती कुटुंबीयांनी केली असता संबंधित इसमाने मदतीचा हात देण्याऐवजी वाद घातला. जे करायचं ते करा, मी खोट्या गुन्ह्यात अडकवीन, अशी उघड धमकी देत त्याने शिवीगाळ केली आणि फरार झाला. बस चालक व वाहकांनीही जबाबदारी झटकत पीडित कुटुंबाला बसमधून खाली उतरविल्याचा आरोप करण्यात येत आहे.यानंतर पोलिसांच्या मदतीने जखमी पुंडलिक कोवे यांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय तपासणीत एऊ स्कॅन, ईंध करण्यात आले असून डोळ्याच्या गंभीर दुखापतीमुळे शस्त्रक्रियेची शक्यता डॉक्टरांनी वर्तविली आहे.

या प्रकरणी कुसुनिता पुंडलिकराव कोवे यांच्या तक्रारीवरून हिंगणघाट पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध अप.क्र. १५२/२०२६ नुसार भा.दं.वि. कलम १२५(अ), ३५१(२), ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक महेश इंटकल पुढील तपास करीत आहेत.

# वेळा गावाजवळ भीषण अपघात

## घोराड येथील युवकाचा जागीच मृत्यू

**सेलू जनमाध्यम :** हिंगणघाट तालुक्यातील वेळा गावाजवळ शनिवारी सकाळी झालेल्या भीषण रस्ता अपघातात घोराड येथील युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. प्रथमेश मुजबैले (वय २५) असे मृत युवकाचे नाव आहे. या घटनेमुळे घोराड परिसरात शोककळा पसरली आहे.



प्रथमेश हा शनिवारी सकाळी एम.एच. ४९ बी.जी. ८९४१ क्रमांकाच्या दुचाकीने हिंगणघाटच्या दिशेने जात असताना वेळा गावाजवळ रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एम.एच. ३४ बी.झेड. ८१७४ क्रमांकाच्या टिप्परला त्याची दुचाकी जोरात धडकली. धडकेनंतर प्रथमेश रस्त्यावर फेकला गेला आणि गंभीर जखमी होऊन जागीच त्याचा मृत्यू झाला.

प्रथमेश हा कुटुंबातील एकुलता एक मुलगा असून तो एका खाजगी कंपनीत नोकरी करत होता. अपघाताची माहिती मिळताच नातेवाईक व ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. अचानक आलेल्या या दुर्घटनेने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून हळहळ व्यक्त केली जात आहे.

# शिवजयंतीनिमित्त हिंगणघाटात विदर्भस्तरीय वादविवाद स्पर्धा

## युवकांमध्ये वैचारिक जागृतीसाठी आधार फाउंडेशनचा पुढाकार

**हिंगणघाट जनमाध्यम :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी आधार फाउंडेशन, हिंगणघाट यांच्या वतीने शिवजयंतीनिमित्त विदर्भस्तरीय वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. युवकांमध्ये वैचारिक जागृती घडवून आणणे आणि समाजातील महत्त्वाच्या प्रश्नांवर विवेकी चर्चा घडवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

ही स्पर्धा विदर्भातील १८ ते ४५ वयोगटातील महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच खुल्या गटातील स्पर्धकांसाठी खुली आहे. स्पर्धेचा




विषय नैतिक नेतृत्वाचा अभाव आजच्या समाजातील मोठी समस्या आहे,/ नाही असा असून, आजच्या सामाजिक वास्तवावर परखड मतमांडणीची संधी स्पर्धकांना मिळणार आहे.

ही वादविवाद स्पर्धा गुरुवार, १९ फेब्रुवारी २०२६ रोजी श्री साई मंदिर हॉल, नंदोरी रोड, हिंगणघाट (जि. वर्धा) येथे होणार आहे. स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक रोख पारितोषिके, प्रोत्साहन बक्षिसे, सन्मानचिन्हे व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी प्रा. अभय दांडेकर, ॲड. इब्राहिम बक्ष, डॉ. अनिता मनवर, जगदीश वांदिले, श्याम निमट यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# वर्धा साहित्याची नवी संकल्पना; मी कविता लिहीन... प्रकाशन सोहळा

**वर्धा जनमाध्यम :** ज्येष्ठ कवी व समीक्षक डॉ. राजेंद्र मुंढे यांचा नूतन कवितासंग्रह मी कविता लिहीनष्ठ नुकताच यशवंतराव दाते स्मृती संस्थेच्या पुरस्कार वितरण समारंभात प्रकाशित झाला. या प्रसंगी सुप्रसिद्ध समाजसेवक व लेखक डॉ. अभय बंग यांनी वर्धा साहित्य ही संकल्पना रूढ व्हावी असे प्रतिपादन केले.

डॉ. बंग म्हणाले की, गांधी, विनोबा, ज्ञानोबा-तुकोबा यांचे वास्तव्य वर्ध्याला पावन साहित्यभूमी बनवते. गीताईचे लेखन वर्ध्यात पूर्ण झाले असल्यामुळे वर्धा आधुनिक मराठी साहित्याचे केंद्र ठरले आहे. त्यांनी डॉ. मुंढे यांना लेखन प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या व ज्ञानोबा-तुकोबा-विनोबा ही खऱ्या अर्थाने मराठी साहित्याची अधिष्ठानत्रयी आहेत. याला अनुसरून आळंदी ते वर्धा अशी साहित्य दिंडी काढावी असे सुचवले. स्थानिक बजाज सार्वजनिक वाचनालय येथे झालेल्या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. गजानन कोटेवार, संस्थाध्यक्ष व विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते, प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, कवी संजय इंगळे तिगावकर, तसेच प्रा. वृषाली मगदूम, डॉ. देवकुमार अहिरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रफुल्ल दाते यांनी तर आभार रंजना दाते यांनी मानले. साहित्यिक आणि रसिकांची उपस्थिती कार्यक्रमास उत्साहपूर्ण बनवणारी ठरली.

# शिक्षकांच्या बदल्या ३१ मेपूर्वीच

## शासनाच्या निर्णयाचे स्वागत; बदल्यांसाठी शिक्षकांमध्ये उत्सुकता

**आर्वी । जनमाध्यम :** जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांच्या बदल्या यंदा ३१ मेपूर्वी पूर्ण केल्या जाणार असल्याचे स्पष्ट संकेत वरिष्ठ पातळीवरून मिळत आहेत. येत्या १० फेब्रुवारी २०२६पर्यंत संचमान्यता अंतिम करण्यात येणार असून, शाळांच्या पटसंख्येनुसार अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांचे प्रथम समायोजन, त्यानंतर आंतरजिल्हा आणि शेवटी जिल्हाअंतर्गत बदल्या केल्या जाणार असल्याची माहिती शिक्षण विभागाच्या सूत्रांनी दिली आहे.

शासनाच्या निर्णयानुसार, शेवटी ८० टक्के निकषांनुसार रिक्त पदे भरली जाणार असल्याने अनेक शिक्षकांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. मात्र, बदल्यांबाबत उत्सुकता असतानाच काही शिक्षकांमध्ये अनिश्चिततेची छाया देखील दिसून येत आहे. वर्धा जिल्हा परिषद अंतर्गत ९०० हून अधिक शाळा असून, त्यातील मोठा भाग एकशिक्षकी आहे. विशेष म्हणजे, २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. अशा शाळांमधील विद्यार्थ्यांना पर्यायी व्यवस्था होईपर्यंत शेजारील शाळांमधील शिक्षकांकडून तात्पुरते अध्यापन सुरू आहे.


शाळांची संख्या मोठी असतानाही आवश्यक त्या प्रमाणात शिक्षक उपलब्ध नसल्याने ३१ मेपूर्वी शिक्षक भरती होण्याचे संकेत मिळत आहेत. मात्र, १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार संचमान्यता अंतिम झाल्यानंतर पटसंख्येअभावी हजारो शिक्षक अतिरिक्त ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे नव्या भरतीतील पदसंख्याही कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर वर्धा जिल्ह्यासह संपूर्ण राज्यातील शिक्षकांचे लक्ष संचमान्यतेकडे लागले आहे.

**अतिरिक्त शिक्षकांचे आधी समायोजन-** बदल्या सुरू करण्यापूर्वी जे शिक्षक अतिरिक्त ठरतील, त्यांचे सेवाज्येष्ठतेनुसार व रिक्त जागांवर समायोजन करण्यात येणार आहे. यंदा सुमारे ७०० शिक्षकांच्या बदल्या होण्याचा अंदाज आहे.

मात्र, २०२६ च्या जनगणनेमुळे बदल्यांवर काही प्रमाणात परिणाम होण्याची शक्यता असल्याचेही जाणकारांचे मत आहे. असे असले तरी बदलीसाठी इच्छुक शिक्षक आशेने वाट पाहत आहेत. त्यामुळे शिक्षकांमध्ये सध्या कभी खुशी, कभी गम असे संमिश्र वातावरण आहे.



> शिक्षकांच्या बदल्या ग्रामविकास व शिक्षण विभागाच्या अखत्यारीत पारदर्शक पद्धतीने केल्या जातात. मात्र, संवर्ग-१ मधील शिक्षकांची वैद्यकीय प्रमाणपत्रे योग्य आहेत की नाही, याची शहनिशा नामवंत वैद्यकीय समितीकडून व्हावी, अशी अपेक्षा आहे.
>
> **अविनाश ल. टाके** (शिक्षक, आर्वी) जिल्हा परिषद



> बदलीधोरणात सुसूत्रता असली तरी संवर्ग-४ मधील एकल शिक्षकांवर अन्याय होत असल्याचे चित्र आहे. खोटी माहिती देणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे.
>
> **मंगेश कोल्हे** (मुख्याध्यापक, जि.प. शाळा नेरी)



> संवर्ग-१ व २ मधील शिक्षकांना जवळची गावे मिळतात मात्र नवोदित व संवर्ग-४ मधील शिक्षकांना मोठा फटका बसतो. संवर्ग-१ चा लाभ पुन्हा-पुन्हा मिळू नये, यासाठी धोरणात सुधारणा आवश्यक आहे.
>
> **उमेशकुमार आसटकर** (आदर्श/गुणवंत शिक्षक, आर्वी)

# वाढदिवस सत्तेचा नव्हे, रोजगाराचा

## आ. बकाने यांच्या पुढाकाराने देवळीत शेकडोंच्या हातात नोकरीची किल्ली

### -८०० युवक-युवतींची नोंदणी; बचत गट महिलांना पीठ गिरणीची भेट

**देवळी /वर्धा जनमाध्यम :** राजकीय वाढदिवस म्हणजे केवळ हारतुरे, शुभेच्छांचे फलक आणि शक्तिप्रदर्शन अशी रूढ प्रतिमा मोडीत काढत आमदार राजेश बकाने यांनी आपल्या वाढदिवसाला सामाजिक बांधिलकीचे स्वरूप दिले. देवळी येथे आयोजित रोजगार मेळाव्यातून शेकडो युवक-युवतींच्या हातात थेट नियुक्तीपत्रे देत त्यांनी वाढदिवस म्हणजे लोकांसाठी काहीतरी देण्याचा दिवस हा संदेश ठामपणे दिला.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, वर्धा तसेच हरदयाल शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पुलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक खा. रामदास तडस इनडोअर स्टेडियम येथे या भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यास तब्बल ८०० युवक-युवतींनी नोंदणी केली असून १४ विविध कंपन्या व विभागांमार्फत शेकडो उमेदवारांना थेट रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात आली. मेळाव्याचे उद्घाटन खासदार अनिल बोंडे यांच्या हस्ते झाले, तर अध्यक्षस्थानी माजी खासदार रामदास तडस होते. हिंगणघाटचे आमदार समीर कुणावार, राजुराचे आमदार देवराव भोंगळे, जिल्हाधिकारी वामन्थी सी., माजी खासदार सुरेश वाघमारे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.



यावेळी महिला बचत गटांसाठी लकी ड्रॉद्वारे पीठ गिरणीचे वितरण करण्यात आले. त्यामुळे महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाला चालना मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. खासदार अनिल बोंडे यांनी लखपती महिला योजनेचा उल्लेख करत महिलांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्याची जबाबदारी सरकार घेणार असल्याचे स्पष्ट केले.

आमदार राजेश बकाने म्हणाले, युवक, महिला, शेतकरी, कामगार यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवणे हाच माझा राजकीय अजेंडा आहे. लोकांच्या चेहऱ्यावरचे समाधान हेच माझ्यासाठी खरे वाढदिवसाचे गिफ्ट आहे.

# शस्त्रक्रियेत ब्लेड लागल्याचा आरोप; दोन दिवसांच्या नवजात बाळाचा मृत्यू

## -सावंगी मेघे रुग्णालयातील प्रकाराने वर्धा जिल्हा हादरला

**वर्धा जनमाध्यम :** सावंगी मेघे येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयात प्रसूती शस्त्रक्रियेदरम्यान निष्काळजीपणामुळे दोन दिवसांच्या नवजात बाळाचा मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप कुटुंबीयांनी केला असून या घटनेमुळे संपूर्ण वर्धा जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे.

शस्त्रक्रियेच्या वेळी बाळाच्या पोटावर ब्लेड लागल्यानेच मृत्यू झाल्याचा आरोप करत बाळाच्या वडिलांनी सावंगी (मेघे) पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

तळेगाव येथील आकाश पचारे यांची पत्नी नीलिमा पचारे यांना ३ फेब्रुवारी रोजी प्रसूतीसाठी सावंगी मेघे येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दुसऱ्या दिवशी पोटदुखी वाढल्याने डॉक्टरांनी शस्त्रक्रियेद्वारे प्रसूती केली. शस्त्रक्रियेनंतर जन्मलेल्या बाळाच्या पोटावर जखम असल्याचे निदर्शनास आल्याने कुटुंबीयांनी तत्काळ चौकशी केली असता, शस्त्रक्रियेदरम्यान जखम झाल्याचे सांगण्यात आल्याचा दावा पचारे कुटुंबीयांनी केला आहे. दरम्यान, बाळाची प्रकृती गंभीर होत गेल्याने त्याला अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले. उपचार सुरू असतानाच ५ फेब्रुवारी रोजी दोन दिवसांच्या बाळाचा मृत्यू झाला. या घटनेनंतर संतप्त कुटुंबीयांनी रुग्णालय प्रशासनावर गंभीर निष्काळजीपणाचा आरोप केला आहे. या प्रकरणी सावंगी (मेघे) पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून बाळाचे शवविच्छेदन करण्यात आले आहे. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल, अशी माहिती पोलीस निरीक्षक पंकज वाघोडे यांनी दिली आहे. अहवालानंतर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

# पालकमंत्र्यांनी घेतला पदविधर मतदार नोंदणीचा आढावा

**वर्धा जनमाध्यम :-** पदवीधर मतदारसंघाच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी आर्वी विधानसभा क्षेत्रातील पदवीधर मतदार नोंदणीचा सविस्तर आढावा घेतला. आर्वी, तळेगाव श्यामजीपंत आणि कारंजा या तिन्ही तालुक्यांत आयोजित बैठकीत मतदार नोंदणीची सद्यस्थिती, अडचणी व पुढील नियोजनावर चर्चा करण्यात आली. आर्वी येथे आमदार सुमित वानखेडे यांच्या जनसंपर्क कार्यालयात झालेल्या बैठकीला आमदार सुमित वानखेडे, माजी आमदार सुधाकरराव कोहळे, नगराध्यक्ष सौ. स्वातीताई गुल्हाने, भाजपचे जिल्हा महामंत्री कमलाकर निंभोरकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना पालकमंत्री डॉ. भोयर म्हणाले की, मागील निवडणुकीत झालेल्या चुका यावेळी टाळणे आवश्यक आहे. प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्याने जास्तीत जास्त पदवीधरांची नोंदणी करण्यासाठी सक्रिय राहावे, असे आवाहन त्यांनी केले. भाजपच्या काळात विकासाला गती मिळाली असून हा विकासाचा प्रवाह कायम ठेवण्यासाठी ही निवडणूक निर्णायक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीत विशेष नोंदणी अभियान राबवण्याचा निर्धार करण्यात आला.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# सुरक्षारक्षक विदीप जाधव यांच्या पत्नीला शासन सेवेत कायम करा

## अनिल देशमुखांनी मुख्यमंत्र्यांना लिहिले पत्र

**मुंबई :**दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाचा अपघात झाला. या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला. अजितदादांचे सुरक्षारक्षक विदीप जाधव यांचाही यात मृत्यू झाला आहे. दरम्यान, आता विदीप जाधव यांच्या पत्नीला शासन सेवेत कायमस्वरूपी सामावून घ्यावे, अशी मागणी माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे नेते अनिल देशमुख यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.विमान अपघातानंतर अनिल देशमुख यांनी सातारा



जिल्ह्यातील फलटण तालुक्यातील तरडगाव या विदीप जाधव यांच्या मूळ गावी जाउन त्यांच्या कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली होती. या भेटीदरम्यान जाधव कुटुंबाने विदीप यांच्या पत्नीच्या नोकरीबाबतची कैफियत मांडली होती. याबाबत पत्रही जाधव यांच्या कुटुंबीयांनी देशमुख यांना दिले होते.विदीप जाधव यांच्या पत्नी श्रीमती संध्या जाधव या सध्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा (ठाणे) येथे औषध निर्माण अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांची नियुक्ती २०२० मध्ये कोविड भरती अंतर्गत तात्पुरत्या स्वरूपात करण्यात आली होती.विदीप जाधव यांनी राज्यासाठी दिलेले बलिदान आणि कुटुंबाची ढासळलेली आर्थिक परिस्थिती पाहता, त्यांच्या पत्नीला मानवतावादी दृष्टिकोनातून विशेष बाब म्हणून शासन सेवेत कायमस्वरूपी सामावून घेण्यात यावे, अशी मागणी या पत्रात केली आहे. संध्या जाधव यांची शैक्षणिक पात्रता आणि त्यांनी कोविडच्या कठीण काळात दिलेली रुग्णसेवा विचारात घेउन हा निर्णय घेण्याची विनंती पत्रात करण्यात आली आहे. अनिल देशमुख यांनी या पत्राच्या प्रतिलिपी उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई पवार, आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर तसेच ठाणे महानगरपालिका आयुक्तांना देउन या प्रकरणाचा गांभीर्याने पाठपुरावा करण्याची विनंती केली आहे

# कार उलटून 2 ठार

**कोल्हापूर :** कोल्हापूर शहरातील शाहू मिल चौकात शनिवार दि. ७ फेब्रुवारी रोजी भीषण अपघाताची घटना घडली. या अपघातात भाग्यश्री लक्ष्मण गवळी(३०, रा. कसबा बावडा) आणि दीपक महादेव वंशी(६२, रा. सनगर गल्ली, कोल्हापूर) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, शाहू मिल चौकात भरधाव चारचाकीने दुचाकींना उडविले. या भीषण अपघातात घटनास्थळीच दोन जणांचा मृत्यू झाला. अपघातात आणखी पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेउन वाहतूक नियंत्रणात आणली. काही काळ या मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. या दुर्दैवी घटनेमुळे मृतांच्या कुटुंबीयांवर शोककळा पसरली असून परिसरात शोक व्यक्त केला जात आहे.




# सर्वांचे एकमत असेल तर एकत्र येऊ

## *विलीनीकरणाबाबत मुश्रीफांनी दिले संकेत*

**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसाठी मतदानाला सुरुवात झाली आहे. जिल्हा परिषदेच्या ६८ तर पंचायत समितीच्या १३६ जागांसाठी ही निवडणूक होत असून ६९६ उमेदवार रिंगणात आहेत.जिल्हा परिषदेसाठी आणि पंचायत समितीसाठी मतदान होत असताना वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी देखील आज कागल तालुक्यातील लिंगनूर दुमाला येथे जाउन मतदानाचा हक्क बजावला. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधत विलीनीकरण आणि अजित पवार यांच्या अपघाताच्या चौकशीबद्दल भूमिका स्पष्ट केली. दोन्ही राष्ट्रवादीतील सर्व नेत्यांचे एकमत असेल तर एकत्र येण्यास काही हरकत नाही अशी भूमिका मंत्री मुश्रीफ यांनी मांडली. अजित पवार यांच्या जाण्याने राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना मोठा धक्का बसला असला, तरी त्यांच्या प्रती असलेली सहानुभूती मतदारांमधून व्यक्त होईल, असा विश्वास नेत्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे, अशा भावना मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडून व्यक्त करण्यात आल्या.



आमदार रोहित पवार यांनी १२ फेब्रुवारी रोजी पत्रकार परिषद घेउन विलीनीकरणाबाबत झालेल्या चर्चेवर खुलासा करणार असल्याचे जाहीर केले आहे. यावर प्रतिक्रिया देताना मुश्रीफ म्हणाले की, विलीनीकरणाबाबतची चर्चा ही केवळ अजित दादांच्या पातळीवर झाली होती, त्यामध्ये आम्ही सहभागी नव्हतो. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व नेत्यांचे एकमत झाले आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सहमती दर्शवली, तर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यास आमची हरकत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. अजित पवार यांच्या निधनानंतर उपस्थित झालेल्या शंकांवर भाष्य करताना मुश्रीफ यांनी सांगितले की, राज्य व केंद्र सरकारने चौकशी सुरू केली असून विमान अपघातानंतर ब्लॅक ब?क्स सापडला आहे. त्यातील अहवालानंतर सर्व सत्य समोर येईल. या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना शरद पवार यांनी हा केवळ अपघात असून त्यामध्ये अन्य काही नाही, असे स्पष्ट केले आहे. पवार कुटुंबीय एकत्रित असून, पार्थ पवार यांनी शरद पवार यांची भेट घेतली तर तो कुटुंबीयांचा विषय आहे, त्यावर चर्चा करण्यासारखे काही नाही, असेही मुश्रीफ यांनी सांगितले अजितदादांच्या अचानक जाण्याने मीटिंग कोणी बोलवायची? सुनील तटकरे प्रदेशाध्यक्ष आहेत आणि प्रफुल्ल पटेल कार्याध्यक्ष आहेत. त्यांनी जबाबदारीने पाउल उचलले तर ते व्हिलन कसे ठरू शकतात? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. राष्ट्रवादी काँग्रेस हा आमचा स्वतंत्र पक्ष आहे, त्यामुळे त्यात इतरांनी लुडबुड करण्याची गरज नाही.

# सूरजकुंड मेळ्यात झुला कोसळला:एसएचओचा मृत्यू

## ■13 जखमी ■ झुल्यावर 18 लोक बसले होते ■ मेळाव्याचे मैदान रिकामे करण्यात आले

**फरीदाबाद/वृत्तसंस्था :**हरियाणातील फरिदाबादमध्ये सुरू असलेल्या सूरजकुंड मेळ्यात शनिवारी एक झुला कोसळला. या अपघातात एका पोलिस निरीक्षकाचा मृत्यू झाला, तर १३ जण जखमी झाले. जखमींवर खासगी आणि बादशाह खान सिव्हिल रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेनंतर डीसी आयुष सिन्हा घटनास्थळी पोहोचले आणि मेळा मैदान रिकामे करण्यात आले. घटनेचा एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यात झोका वरून खाली येताना कोसळताना दिसत आहे. यानंतर मेळ्यातील लोक इकडे-तिकडे धावू लागले.

डीसी म्हणाले- या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. निष्काळजीपणा करणा-यांना कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही. पलवलमधील चांदहट पोलिस ठाण्याचे एसएचओ जगदीश प्रसाद यांचाही झुल्याच्या धडकेत मृत्यू झाला.

३९ वा आंतरराष्ट्रीय सूरजकुंड हस्तकला मेळा ३१ जानेवारी रोजी सुरू झाला होता, ज्याचे उद्घाटन उपराष्ट्रपती सीपी राधाकृष्णन यांनी केले. हा मेळा १५ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. यात भारतातील ३० राज्यांमधील सुमारे ११५० कलाकार सहभागी होत आहेत. तसेच ४६ देशांमधील कलाकारही पोहोचले आहेत. झुला पडताच लोक ओरडू लागले: सूरजकुंड मेळ्यातील दुकानदार आणि प्रत्यक्षदर्शी राघव यांनी सांगितले की ते ग्राहकांना सेवा देत होते. अचानक झुला खाली येउन पडला. झुल्यावरील अडकलेले लोक ओरडू लागले. ते लोकांना वाचवण्यासाठी झोक्यावर चढले आणि हळूहळू ७ ते ८ लोकांना खाली उतरवले. त्यानंतर तेही खाली आले.

काही लोकांना उतरवले, अचानक खाली आला: राघव यांनी पुढे सांगितले की, त्याचवेळी अचानक झुला आणखी खाली येउन पडला. त्यांच्यावरही रेलिंग



पडली, ज्यामुळे त्यांच्या खांद्याला किरकोळ दुखापत झाली. त्यानंतर पोलिस कर्मचारीही बचावकार्यात लागले. तिथे उभे असलेले एक इन्स्पेक्टरही जखमी झाले. त्यानंतर पोलिसांची पथके आली आणि तो परिसर रिकामा करण्यात आला.

**डीसी म्हणाले- विक्रेत्याच्या निष्काळजीपणाची चौकशी होईल.**

डीसी आयुष सिन्हा यांनी सांगितले की, या घटनेत १३ लोक जखमी झाले आहेत. ९ लोकांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, तर ३ लोकांवर बादशाह खान सिव्हिल रुग्णालयात उपचार सुरू आहेत. लोकांना वाचवताना आमचे एक पोलिस निरीक्षक जगदीश प्रसाद यांचा मृत्यू झाला, जे पलवल येथे तैनात होते. सध्या त्यांची मेला ग्राउंडवर ड्युटी होती. या प्रकरणी कठोर कारवाई केली जाईल. पर्यटन विभागाकडून दररोज तपासणी अहवाल तयार केला जात होता. विक्रेत्याच्या निष्काळजीपणाची चौकशी केली जाईल आणि दोषी लोकांविरुद्ध गुन्हा दाखल केला जाईल.

**संध्याकाळी गेट कोसळले, एक व्यक्ती जखमी-**शनिवारी संध्याकाळीच जत्रेच्या गेट नंबर-२ जवळील डिझायनर गेट अचानक कोसळले. गेट आधीच झुकलेले होते. त्याच्या धडकेने एक व्यक्ती जखमी झाली. तथापि, त्याला जास्त दुखापत झाली नाही. यानंतर जत्रा प्रशासनाने घटनास्थळी पोहोचून गेटचा ढिगारा हटवला.

# अपघाताविषयी महाराष्ट्र पुरावा मागतोय : अमोल मिटकरी

**अकोला /प्रतिनिधी-** बारामती येथील विमान अपघाताचे थातूर-मातूर चौकशी अहवाल येत आहेत. अजितदादा पवार इतकी सामान्य व्यक्ती नव्हते, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार अमोल मिटकरी यांनी सुनावले आहे. महाराष्ट्र पुरावा मागतोय, असे देखील ते म्हणाले.राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान दुर्घटनेत २८ जानेवारीला निधन झाले. या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली. त्यानंतर सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. या सर्व घटनेवर आमदार अमोल मिटकरी यांनी संशय व्यक्त करीत अनेक प्रश्न उपस्थित केले होते. आता पुन्हा एकदा मिटकरींनी समाज माध्यमांवर पोस्ट करीत अपघाताच्या चौकशीवर तीव्र नाराजी व्यक्त केली.ते म्हणाले, अजितदादा पवार यांच्या विमान अपघाताचा थातूर-मातूर चौकशी अहवाल येण्यास सुरुवात झाली आहे. अजितदादा इतके सामान्य व्यक्ती नव्हते. अहवाल सांगेल तांत्रिक चूक होती व वैमानिकाचा अंदाज चुकला, तर जनता मान्य करेल? महाराष्ट्र पुरावा मागतोय! विमानतळावरील सीसीटीव्ही फुटेज प्रसारित करून अजितदादांच्या आगमनापासून विमानात बसेपर्यंत प्रत्यक्षदर्शी पुरावा सादर करावा. अंजली दमानिया यांनी दुःखाच्या क्षणी केलेली विधाने अत्यंत दुर्दैवी आणि असंवेदनशील आहेत, अशी टीका अमोल मिटकरी यांनी केली आहे. अजितदादांच्या अपघाती निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हादरलेला असताना जाणीवपूर्वक संशय निर्माण करणे हा केवळ राजकीय हेतूने प्रेरित प्रयत्न आहे. या कठीण आणि भावनिक काळात शब्दांचा विपर्यास करून वातावरण दूषित करण्याऐवजी, दुःखात सहभागी होणे अपेक्षित होते. तथ्यांशिवाय आरोप करणे हे ना माणुसकीला शोभते, ना जबाबदार सार्वजनिक भूमिकेला. अंजली दमानिया यांच्या असंवेदनशीलतेचा निषेध व धिक्कार असल्याचे अमोल मिटकरी यांनी म्हटले आहे.



# हौसिंग सोसायट्यांना अमर्याद स्वातंत्र्य नाही

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** हौसिंग सोसायट्यांना (गृहनिर्माण संस्था) स्वतःचे व्यवहार व्यवस्थापित करण्याचे स्वातंर्त्य नक्कीच आहे; परंतु ते स्वातंर्त्य अमर्याद नाही. सहकारी गृहनिर्माण संस्थांनी सभासदत्वाबाबतचा निर्णय घेण्यास नकार दिल्यास किंवा प्रदीर्घ काळ असा निर्णय प्रलंबित ठेवल्यास वैधानिक संस्था किंवा सरकारी अधिकारी त्या प्रकरणात हस्तक्षेप करू शकतात असे महत्त्वपूर्ण निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले आहे.

मुंबईतील मालबोरो हाउस को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लिमिटेडमधील एका प्रकरणावर न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. संबंधित सदनिकाधारकांना सोसायटीने सभासदत्व देण्यास विलंब केला होता. सदनिकाधारकांनी सुरुवातीला गृहनिर्माण संस्थेकडे सभासदत्वासाठी अर्ज केला होता. मात्र, संस्थेकडून प्रतिसाद मिळत नसल्याने त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अंतर्गत विभागीय सहनिबंधकांकडे धाव घेतली.



**उच्च न्यायालयाने रद्द केला होता सहनिबंधकांचा आदेश**

सहनिबंधकांनी कागदपत्रांची पडताळणी करून त्यांना सभासदत्व देण्याचे आदेश दिले होते. मात्र, मुंबई उच्च न्यायालयाने हा आदेश रद्द केला होता. कोणाला सभासद करून घ्यावे, याचा अधिकार केवळ गृहनिर्माण संस्थेलाच आहे असा तर्क उच्च न्यायालयाने दिला होता. या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते.

**गृहनिर्माण संस्थेला अमर्याद स्वातंर्त्य नाही : सर्वोच्च न्यायालय**

मुंबई उच्च न्यायालयाने दिलेला आदेश बाजूला ठेवत न्यायमूर्ती मेहता यांनी नमूद केले की गृहनिर्माण संस्थेला स्वतःचे व्यवहार व्यवस्थापित करण्याचे स्वातंर्त्य नक्कीच आहे; परंतु ते स्वातंर्त्य अमर्याद नाही. जर एखादी संस्था जाणीवपूर्वक निर्णय घेण्यास टाळाटाळ करत असेल किंवा प्रकरण अनेक वर्षे प्रलंबित ठेवत असेल, तर पारदर्शकता आणि न्याय सुनिश्चित करण्यासाठी सरकारी अधिकारी हस्तक्षेप करू शकतात.

**उच्च न्यायालयाचा तर्क कायदेशीररित्या टिकणारा नाही-** न्यायालयाने पुढे स्पष्ट केले की अर्जदारांनी प्रथम संस्थेच्या अधिकृतअधिका-यांकडेच मागणी केली होती. मात्र, धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार आपल्याला नाहीत असे सांगून संस्थेने अर्ज फेटाळला होता. त्यानंतरच अर्जदारांनी कायद्यातील तरतुदींनुसार अपील आणि पुनरीक्षणाचा मार्ग अवलंबला होता. त्यामुळे उच्च न्यायालयाचा तर्क कायदेशीररित्या टिकणारा नाही असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

# छत्तीसगड नेहमी घरासारखे वाटते

## • राष्ट्रपती मुर्मू यांचे प्रतिपादन • बस्तर पंडुम दौ-यावर

बस्तर/**वृत्तसंस्था :**राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या की, छत्तीसगडमध्ये येणे मला नेहमी घरासारखे वाटते. येथील संस्कृती प्राचीन आणि सर्वात मधुर आहे. बस्तर पंडुम लोक उत्सवाप्रमाणे जगतात. येथील सौंदर्य आणि संस्कृती पर्यटकांना आकर्षित करते.

गेल्या ४ दशकांपासून नक्षलवादामुळे बस्तरमधील आदिवासींना नुकसान झाले. पण आता बस्तर नक्षलमुक्त होत आहे. मोठ्या संख्येने नक्षलवादी शस्त्रे खाली ठेवत आहेत. मुर्मू पुढे म्हणाल्या, हिंसाचाराचा मार्ग सोडून मुख्य प्रवाहात परतलेल्या लोकांचे मी स्वागत करते, जे लोक दिशाभूल करत आहेत, त्यांच्या बोलण्याला बळी पडू नका. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी जगदलपूरच्या लालबाग मैदानावर आयोजित बस्तर पंडुममध्ये हे सांगितले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी त्यांना ढोकरा आर्टपासून बनवलेले कर्मा वृक्ष आणि कोसा शिल्पातून तयार केलेला गमछा भेट दिला.

**आत्मसमर्पित नक्षलवाद्यांनीही राष्ट्रपतींना ऐकले-**राष्ट्रपतींचे भाषण



ऐकण्यासाठी बस्तर पंडुम कार्यक्रमात अनेक आत्मसमर्पित नक्षलवादीही पोहोचले होते. छत्तीसगडमध्ये एक कोटींहून अधिक बक्षीस असलेला आत्मसमर्पित नक्षलवादी रुपेश म्हणाला की, भविष्याबद्दल राष्ट्रपतींचे विचार ऐकण्यासाठी ते आले होते. दोन दिवसीय बस्तर पंडुममध्ये अनेक आदिवासी जमातींचे पारंपरिक नृत्य, लोकगीते, वाद्ये, वेशभूषा आणि चालीरीतींचे आकर्षक सादरीकरण केले जात आहे.

**ढोकरा शिल्पामुळे बस्तरला जागतिक ओळख-**यापूर्वी राज्यपाल रमेन डेका म्हणाले, बस्तर पंडुम २०२६ च्या उद्घाटनप्रसंगी येथे उपस्थित राहणे माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. या भव्य आयोजनासाठी मी सर्वांचे अभिनंदन करतो. आमचे पारंपरिक पदार्थ, संस्कृती हे सर्व मिळून बस्तरची ओळख जागतिक स्तरावर दाखवतात. येथील लोक जल, जंगल आणि जमिनीच्या सान्निध्यात राहतात. गावागावातून आलेले लोक आपली कला आणि संस्कृती दाखवत आहेत. मला ढोकरा कलेचा उल्लेख करायला आवडेल, बस्तरची ढोकरा कला देश-विदेशात पसंत केली जात आहे. हीच आमची ओळख आहे. येथील आदिवासी आणि समाज आपल्याला निसर्गाचा संदेश देतात.

# कुवेतमध्ये नांदेडच्या तरूणाचा संशयास्पद मृत्यू

## मुखेडच्या घरी लग्नाची तयारी होती सुरू

मुखेड(नांदेड) : पोटाची खळगी भरण्यासाठी कुवेतला गेलेल्या मुखेड तालुक्यातील बिहारीपूर येथील शेख जुबेर महंमद(३०) या तरुणाचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. त्याचा मृत्यू नैसर्गिक नसून घातपात असल्याचा आरोप त्याच्या कुटुंबीयांनी केला आहे. याप्रकरणी केंद्र सरकार आणि भारतीय दूतावासाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी आर्त साद मृताच्या वडिलांनी घातली आहे.शेख जुबेर हा मागील चार वर्षांपासून कुवेतमधील अल झहार येथे कूक म्हणून कार्यरत होता. ३ फेब्रुवारी रोजी रात्री ८:३० वाजता त्याने आपल्या वडिलांशी फोनवर संवाद साधला होता. मात्र, त्यानंतर दुस-याच दिवशी ४ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता जुबेरच्याच फोनवरून कुवेत पोलिसांनी त्याच्या वडिलांना संपर्क केला आणि तुमचा मुलगा जळून मेला आहे, अशी धक्कादायक माहिती दिली.जुबेरचे लग्न जमले असून घरी त्याच्या लग्नाची लगबग सुरू होती. अशा परिस्थितीत तो टोकाचे पाउल उचलूच शकत नाही, असा विश्वास वडिलांनी व्यक्तकेला आहे. कुवेत पोलिसांशी बोलताना वडील शेख महंमद यांनी माझा मुलगा आत्महत्या करू शकत नाही, त्याला कोणी तरी मारले आहे असे ठणकावून सांगताच, पोलिसांनी फोन बंद केल्याची माहिती समोर आली आहे. या विसंगतीमुळे हा प्रकार घातपाताचा असावा, अशी शक्यता कुटुंबीयांनी व्यक्तकेली आहे. मृत जुबेरच्या पश्चात वृद्ध आई-वडील आणि एक बहीण असा परिवार आहे. त्याचे वडील गावातच एक छोटे किराणा दुकान चालवून उदरनिर्वाह करतात. तरुण मुलाच्या अशा जाण्याने पूर्ण बिहारीपूर गावावर शोककळा पसरली आहे.



**भारतीय दूतावासाकडे दाद-** जुबेरचे वडील शेख महंमद इमामसाब यांनी भारतीय दूतावास (कुवेत) यांना ईमेलद्वारे निवेदन पाठविले आहे. या निवेदनात त्यांनी घटनेची सखोल आणि निष्पक्ष चौकशी व्हावी, स्थानिक प्रशासनाशी समन्वय साधून मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट करावे, दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली आहे.

# सलमान राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमाला हजार

## भाईजानची एन्ट्री होताच सगळे कॅमेरे झटक्यात सलमान खानकडे वळले

**मुंबई/प्रतिनिधी :** जाज्वल्य राष्ट्रभक्ती आणि प्रखर हिंदुत्वाचा विचार जनमानसात रुजवणारे तसेच अखंड भारताचे ध्येय उराशी बाळगणा-या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (RSS) स्थापनेला १०० वर्षे पूर्ण होत आहेत. या ऐतिहासिक शताब्दी वर्षानिमित्त मुंबईत एका अत्यंत भव्य आणि दिमाखदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मुंबईतील वरळी येथील नेहरू सेंटरमध्ये आयोजित या दोन दिवसीय व्याख्यानमालेचा शनिवारी अत्यंत उत्साहात शुभारंभ झाला. या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे, वैचारिक व्यासपीठावर चित्रपटसृष्टीतील नामांकित कलावंतांची मांदियाळी पाहायला मिळाली.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी पूर्तीनिमित्त नवे क्षितिज या नावाने एक विशेष व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमाच्या उद्घाटन सत्राला दिग्दर्शक सुभाष घई, अभिनेत्री हेमा मालिनी, अश्विनी भावे आणि सुनील बर्वे यांसारख्या सिनेसृष्टीतील दिग्गजांनी आपली उपस्थिती दर्शवली. मात्र, या सर्व मान्यवरांमध्ये ब?लीवूडचा भाईजान



अर्थात अभिनेता सलमान खान याची उपस्थिती सर्वांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली. सलमान खानने या कार्यक्रमाला हजेरी लावताच उपस्थितांच्या भुवया उंचावल्या आणि सर्वांचे लक्ष त्याच्याकडे वेधले गेले. एका अर्थाने, या वैचारिक व्यासपीठावर सलमान खान शो स्टॉपर ठरला.

**सरसंघचालक मोहन भागवत यांचे मार्गदर्शन आणि कार्यक्रमाचे स्वरूप**

डॉ. केशव बळीराव हेडगेवार यांनी १९२५ मध्ये हिंदू समाजाला संघटित, शिस्तबद्ध आणि सामर्थ्यशाली बनवण्याच्या उद्देशाने संघाची स्थापना केली होती. आज या कार्याला एक शतक पूर्ण होत असताना, शताब्दी सोहळ्याचे औचित्य साधून आयोजित या कार्यक्रमात सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांचे प्रमुख व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

**सलमान खानची एन्ट्री आणि चर्चांना उधाण**

नेहरू सेंटरमध्ये सलमान खानचे आगमन होताच प्रसारमाध्यमांचे कॅमेरे आणि उपस्थित मान्यवरांची नजर त्याच्याकडे वळली. सलमान खानभोवती चाहत्यांचा आणि उपस्थितांचा मोठा गराडा पाहायला मिळाला. एरव्ही राजकीय किंवा वैचारिक व्यासपीठांपासून दूर राहणा-या सलमान खानने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या या कार्यक्रमाला दिलेली हजेरी राजकीय वर्तुळात आणि चित्रपटसृष्टीत चर्चेचा विषय ठरली आहे. त्याची ही उपस्थिती नवे क्षितिज या संकल्पनेला अधिक व्यापक बनवणारी ठरली.

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा शताब्दीपर्यंतचा प्रवास**

शंभर वर्षांपूर्वी विजयादशमीच्या मुहूर्तावर नागपुरातून सुरू झालेला संघाचा हा प्रवास आज जागतिक स्तरावर पोहोचला आहे. राष्ट्राच्या पुनर्निर्माणासाठी समर्पित असलेल्या या संस्थेने अनेक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. मुंबईतील हा कार्यक्रम केवळ एका संस्थेचा उत्सव नसून, तो बदलत्या काळातील संघविचारांचे नवे क्षितिज मांडणारा ठरत आहे.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने वैचारिक मंथन आणि सांस्कृतिक संगम असे दुहेरी स्वरूप पाहायला मिळत असून, आगामी काळात संघाच्या शताब्दी निमित्त देशभरात अशाच प्रकारच्या विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे.

# मध्यान्ह भोजनानंतर मुलांना विषबाधा

## उलट्या, पोटदुखी 70 हून अधिक मुलांची प्रकृती बिघडली

**मधेपुरा :** बिहारच्या मधेपुरा जिल्ह्यात मध्यान्ह भोजनानंतर मोठी खळबळ उडाली आहे. शाळेत शनिवारी जेवल्यानंतर ७० हून अधिक मुलांची प्रकृती अचानक बिघडली. जेवणानंतर काही वेळातच मुलांना उलट्या, पोटदुखी आणि अस्वस्थता जाणवू लागली. मुलांची प्रकृती बिघडत असल्याचे पाहून शाळा परिसरात एकच गोंधळ आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले.शिक्षकांनी तातडीने याची माहिती स्थानिक प्रशासन आणि आरोग्य विभागाला दिली. मिळालेल्या माहितीनुसार, माध्यान्ह भोजनात पाल पडल्याची शक्यता वर्तवली जात आहे, ज्यामुळे मुलांची प्रकृती बिघडली. मात्र याला अधिकृत दुजोरा तपासणीनंतरच मिळू शकेल. आजारी मुलांना रुग्णवाहिका आणि खाजगी वाहनांच्या मदतीने मधेपुरा सदर रुग्णालयात नेण्यात आले. रुग्णालयात पोहोचताच डाक्टरांच्या पथकाने मुलांवर उपचार सुरू केले. डाक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, बहुतांश मुलांची प्रकृती आता स्थिर असून ते धोक्याबाहेर आहेत. मात्र, उपचारादरम्यान एका मुलीची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत असून तिला विशेष निरीक्षणाखाली ठेवण्यात आले आहे. रुग्णालयात मुलांच्या पालकांनीही मोठी गर्दी केली होती.



# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## मणिपूर शांततेच्या मार्गावर

मणिपूरमध्ये गेल्या दोन वर्षापासून उसळलेला संघर्ष आता शांत झाला असून हा भाग आता विकासाच्या वाटेवर आहे. येथील ईशान्येकडील मणिपूर राज्यात मैतेई आणि कुकी भागात मे २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या एका निकालामुळे ईशान्येकडील मणिपूर राज्यात जो हिंसेचा आगडोंब उसळला, त्याचे निखारे दोन वर्षांहून अधिक काळ धगधगत राहिले. केंद्र आणि राज्याकडून राज्यात शांतता निर्माण करण्याचे, दोन्ही जातीय समुदाय, धार्मिक गटांमध्ये ऐक्य घडवण्याचे प्रयत्न सुरू होते. मैतेई आणि कुकी समाजांमधील रुंदावलेली दरी सांधण्यासाठी चर्चेच्या फेऱ्या सुरू होत्या. पंतप्रधानांनी मणिपूरच्या विकासासाठी ८,५०० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचा शुभारंभही केला होता. चुराचांदपूरसारखा कुकीबहुल भाग आणि इम्फाळमधील मैतेईबहुल भागात ते उपस्थित राहिल्याने केंद्र सरकार मणिपूरमधील सर्व समुदायांच्या हितासाठी कटिबद्ध असल्याचा संदेश गेला होता; मात्र तरीदखील परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आली नव्हती. १३ फेब्रुवारी २०२५ पासून राज्यात राष्ट्रपती राजवट लागू होती. ६० सदस्यांच्या विधानसभेचा कार्यकाळ २०२७ पर्यंत आहे; परंतु राष्ट्रपती राजवट लागू झाल्यानंतर विधानसभा स्थगित करण्यात आली होती. शेवटी लोकांची सुख-दुःखे ऐकून घेऊन, त्यानुसार कारभार करण्यासाठी सरकार आवश्यक असते. आता राष्ट्रपती राजवटीची अखेर झाली असून, 'एनडीए' विधिमंडळ पक्षाचे नेते यमनम खेमचंद सिंह यांनी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. कुकी समुदायाच्या भाजप आमदार नेमचा किपगेन आणि नागा पीपल्स फ्रंटचे आमदार एल. दिखो यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यामुळे राज्यातील लोकशाही प्रक्रिया पुन्हा सुरळीत झाली आहे. फेब्रुवारी २०२४ मध्ये तत्कालीन वीरेन सिंह सरकारविरोधात अनेक आमदारांनी नवी दिल्लीत जाऊन भाजप पक्षश्रेष्ठींकडे तक्रार केली. तक्रार करण्यात सर्वात पुढे खेमचंद हेच होते. वीरेन सिंह हे पक्षपाती वर्तन करत होते आणि ते केवळ मैतेई समाजालाच झुकते माप देत होते; मात्र खेमचंद यांनी कुकी समाजाशीदेखील संवाद साधण्याची भूमिका घेतली. डिसेंबरात खेमचंद यांनी कुकी-झो समाजाच्या निर्वासित छावण्यांना भेट दिली. त्यामुळे दोन्ही समाजांतील कटुता कमी होण्यास मदत झाली. नव्या उपमुख्यमंत्र्यांपैकी एक कुकी-झो समाजातील, तर दुसरे नागा समुदायातील आहेत. खेमचंद सरकारलादेखील आता मैतेई कुकी-झो आणि नागा या समाजांत सलोखा निर्माण करण्याचे काम करावे लागेल. गेल्या महिन्यात कुकी-झो आमदार आणि काही घुसखोरांचे गट यांनी एक बैठक घेतली. आम्हाला स्वतंत्र प्रशासन देण्याची हमी केंद्र सरकारने द्यावी, अशी त्यांची मागणी होती. राज्य सरकारमध्ये सामील होण्याची त्यांची ती पूर्वअट होती. कांगोप्पीमधील 'कमिटी ऑन ट्रायबल युनिटी' नेदेखील प्रथम विश्वासाचे वातावरण निर्माण करावे आणि नंतरच राज्य सरकारची पुनःर्स्थापना करावी, अशी भूमिका घेतली होती. राज्यात मैतेई आणि कुकी यांच्या वेगवेगळ्या वस्त्या आहेत. अजूनही हजारो लोक निर्वासित छावण्यांत राहत आहेत. घरी परतण्याची त्यांना भीती वाटते. येथे खुलेआम शस्त्रांची विक्री केली जाते. दहशतवादी गट बिनधास्तपणे फिरतात. ही परिस्थिती बदलण्याचे आव्हान नवीन सरकारसमोर आहे. कुकी-झो आदिवासी समाजाच्या संघटनांनी भाजपच्या सातही कुकी आमदारांना सरकारवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन केले होते. ही सर्व परिस्थिती विचारात घेता राज्यातील समस्या पूर्णपणे सुटली असे मानणे भाबडेपणाचे होईल. दीड वर्षापूर्वी येथील जिरीबम जिल्ह्यात मैतेई समाजातील एका ज्येष्ठ नागरिकाची हत्या झाल्यानंतर उसळलेल्या दंगलीत पाचजणांचा मृत्यू झाला होता. शिवाय तेव्हा ड्रोनमधून स्फोटके टाकण्याच्या घटना राज्यात प्रथमच घडल्या. विद्यार्थ्यांनी राजभवनवर काढलेल्या मोर्चास हिंसक वळण लागल्यामुळे पोलिसांनी लाठीमार आणि अश्रुधुराचा मारा केला. त्यात किमान ४० विद्यार्थी जखमी झाले होते. राज्यभर हिंसाचाराची आग पसरली आणि तत्कालीन वीरेन सिंह सरकार ती आटोक्यात आणण्यात पूर्णतः अपयशी ठरले होते. केंद्र सरकार, मणिपूर सरकार तसेच कुकी नॅशनल ऑर्गनायझेशन आणि युनायटेड पीपल्स फ्रंट या दोन समाजांच्या स्थानिक संघटनांमध्ये २००८ मध्ये कारवाई स्थगिती करार झाला होता. तो रद्द केला जावा, अशी मागणी वीरेन सिंह यांनी केंद्र सरकारकडे केली होती. वास्तविक, मुख्यमंत्र्यांनी राज्यातील सर्व जाती-जमातींबाबत समान भूमिका घेऊन सर्वांना न्याय देण्याची आवश्यकता असते; परंतु वीरेन सिंह केवळ मैतेई समाजाचे हित बघून कुकी व झो या राज्यातील बहुसंख्य ख्रिश्चन समुदायांकडे दुर्लक्ष करत होते. कुकी आणि मैतेई समाजात इतका तणाव होता की, एका समाजाची व्यक्ती दुसऱ्या समाजाचे प्राबल्य असलेल्या भागात जाऊ शकत नव्हती. आरक्षण व अन्य मुद्द्यांवरून दोन्ही समाजांमध्ये संघर्ष झाला. आपापल्या समाजाच्या पापांवर पडदा घालण्याचा प्रयत्न त्या-त्या समाजांचे सरकारी अधिकारी करत असतात. राज्याची लोकसंख्या ३० ते ३५ लाख असून मैतेई, नागा आणि कुकी समाजांचे लोक तेथे राहतात. मैतेई समाज हा मुख्यतः हिंदुबहुल आहे. लोकसंख्येत मैतेई समाजाच्या नागरिकांचे प्रमाण सगळ्यात जास्त आहे. नागा आणि कुकी मुख्यतः ख्रिश्चन आहेत. ६० आमदारांपैकी ४० मैतेई समाजाचे आहेत. राज्यातील दहा टक्के भूभागावर मैतेईंचे वर्चस्व असून, हा समाज इम्फाळ खोऱ्यात वसला आहे. बाकी ९० टक्के कुकी, नागा वगैरे हे डोंगराळ भागात राहतात. तेथे ३४ अनुसूचित जमाती आहेत. त्यातील बहुतांश नागा व कुकी समाजातील आहेत. या वांशिक संघर्षाच्या पार्श्वभूमीवर लोकसभा निवडणुकीत मणिपूरमधील दोन्ही जागी काँग्रेसचे खासदार विजयी झाले. मैतेईबहुल अशा राजधानी इम्फाळमध्येही भाजपचा पराभव झाला. खेमचंद हेदेखील मैतेई असले, तरी वीरेन सिंह यांच्याप्रमाणे ते संकुचित राजकारण करणारे नसावेत. मैतेईंना अनुसूचित जमातीचा दर्जा देण्यात आल्यामुळे कुकी-झो समाज संतप्त झाला होता. खेमचंद यांना कॅबिनेट मंत्री म्हणून तसेच विधानसभा अध्यक्ष म्हणूनही कामाचा अनुभव आहे. केंद्र सरकारच्या सहकार्याने आणि राज्यातील सर्व समुदायांशी वाटाघाटी करून मणिपूरला शांततेच्या व विकासाच्या मार्गावर नेण्याचे आव्हान त्यांच्या समोर आहे.

# नागपूर आणि अमरावतीत भाजपचेच महापौर

**विदर्भातील चारही महापालिकांमध्ये सत्तासमीकरणे झपाट्याने बदलत असून भाजपने नागपूर, अमरावती आणि अकोला येथे महापौरपद आपल्या ताब्यात घेतले आहेत. नागपूरमध्ये महिला नेतृत्व, जातीय समतोल आणि विकासाच्या अपूर्ण प्रश्नांमुळे नव्या सत्तेसमोर मोठी आव्हाने उभी आहेत, तर अमरावतीतील अनपेक्षित युती आणि चंद्रपूरमधील त्रिशंकू परिस्थितीमुळे विदर्भाचे राजकारण अधिकच रंगतदार झाले आहे.**




विदर्भातील नागपूर, अमरावती, अकोला आणि चंद्रपूर या चार महानगर पालिकांपैकी अकोला महानगर पालिकेत गेल्या आठवड्यातच महायुतीच्या हातात सत्ता आली होती. तिथे भारतीय जनता पक्षानेच महापौरपद आपल्या ताब्यात घेतले होते. आता अमरावती आणि नागपूरमध्ये देखील भाजपचाच महापौर सत्तारूढ झाला आहे. नागपुरात भारतीय जनता पक्षाच्या नीता ठाकरे या महापौर झाल्या, तर भाजपच्या लीला हाथीबेड या उपमहापौरपदी विजयी झाल्या आहेत. १५१ नगरसेवकांच्या नागपूर महापालिकेत भाजपने १०२ जागांवर विजय मिळवला होता, तर शिंदे यांची शिवसेना एका जागी विजयी झाली होती. त्यामुळे १०३ चे घसघशीत बहुमत असल्यामुळे दोन्ही जागा भाजपनेच आपल्याकडे ठेवलेल्या आहेत.

अमरावती महापालिकेत भारतीय जनता पक्षाचे श्रीचंद तेजवानी हे महापौर बनलेले आहेत, तर युवा स्वाभिमान पक्षाकडे उपमहापौर पद गेलेले आहे. विशेष म्हणजे या महापालिकेत एकच नगरसेवक असलेल्या एमआयएमने भाजप उमेदवारालाच पाठिंबा दिला आहे. त्याची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे. इथे निवडणुकीत भारतीय जनता पक्ष आणि युवा स्वाभिमान पक्ष परस्परांविरुद्ध लढले होते. युवा स्वाभिमान पक्षाचे नेते आमदार राणा रवी राणाआहेत, तर त्यांच्या पत्नी राणा नवनीत राणा या भाजपच्या माजी खासदार आहेत. तरीही निवडणुकीत युती होऊ शकली नव्हती. मात्र आता सत्तेसाठी दोघेही एकत्र आले आहेत हे विशेष, नागपुरात नीता ठाकरे या आठव्या महिला महापौर आहेत. पहिल्या महिला महापौर कुंदा विजयकर या झाल्या होत्या. त्यानंतर डॉ. कल्पना पांडे, वसुंधरा मसूरकर, अर्चना डेहनकर, माया इवनाते, पुष्पा घोडे, नंदा जिचकर या महापौर झाल्या होत्या.

नागपुरात उपमहापौर पद हे देखील लीला हाथीबेड यांच्याकडेच सोपवण्यात आले आहे. स्थायी समिती अध्यक्षाची निवड अद्याप व्हायची आहे. मात्र त्या पदासाठी देखील शिवानी दाणी वखरे या तरुण नगरसेविकेचेच नाव घेतले जात आहे. हे बघता पुढील अडीच वर्षे महापालिकेत महिलाराज राहणार असेच चित्र दिसत आहे.

नागपूर महापालिकेत पदाधिकारी ठरवताना भारतीय जनता पक्षाने जातीय समीकरणे सांभाळत महापौर उपमहापौर ठरवले आहेत. वस्तुतः शिवानी दाणी वखरे यांचे नाव महापौरपदासाठी सुरू होते. त्या आर्थिक सल्लागार आहेत. त्याचबरोबर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी या दोघांच्या देखील अतिशय निकटवर्ती आहेत. त्या प्रथमच महापालिकेत निवडून आलेल्या आहेत. ज्यावेळी महापालिकांचे आरक्षण जाहीर झाले, त्यावेळी नागपूरचे महापौरपद महिला खुल्या प्रवर्गात आरक्षित झाल्याची बातमी येताच काँग्रेसचे विधानसभेतील गटनेते विजय वडेट्टीवार यांनी सरळ सरळ फडणवीसांना शिवानी दाणी यांना महापौर करायचे असल्यामुळेच हे आरक्षण मॅनेज केले गेले आहे असा आरोप केला गेला होता. मात्र जातीची समीकरणे सांभाळत भाजपने यावेळी शिवानी दाणींना महापौर पद दिलेले नाही. मात्र त्यांना स्थायी समिती अध्यक्षपद दिले जाण्याची जोरदार चर्चा सुरू आहे. नागपूर महापालिकेत २००७ पासून सातत्याने भारतीय जनता पक्षाचीच सत्ता राहिलेली आहे. २०१४ पासून देशात आणि राज्यात देखील भाजपची सत्ता आहे. या काळात नागपूरमध्ये देखील बऱ्यापैकी विकास झाला आहे मात्र जसा विकास झाला. तशाच समस्या देखील वाढत चालल्या आहेत. सिमेंटचे रस्ते सर्वत्र बांधले जात असतानाच रस्त्यावरून सांडपाणी वाहून जाण्याची योग्य व्यवस्था नसल्याने गेली तीन-चार वर्षे दरवर्षी पावसाळ्यात शहरात पाणी साचण्याची समस्या निर्माण होते. २०२२ नंतर महापालिकाच अस्तित्वात नव्हती. त्यामुळे कोणीही नगरसेवक हाताशी नव्हते. परिणामी प्रत्येक समस्येचे खापर हे गडकरी आणि फडणवीसांवरच फुटत होते. आता नागरिकांच्या समस्या सोडवण्याची जबाबदारी या १०२ नगरसेवकांवर येणार आहे.

गडकरी आणि फडणवीस या जोडीने मिळून नागपुरात मेट्रो आणली. तसेच मिहान आणले. ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस सिम्बॉयसिस अशा मोठ्या शिक्षण संस्था आणल्या. तशीच अनेक कार्यालये देखील आणले. मात्र अनेक वर्षांपासून मिहानचा विकास रखडलेलाच आहे. शहरात बरेच काही नवीन होत असल्यामुळे आता जुन्या छोट्या भूखंडांवर बहुमजली इमारती उभ्या राहत आहेत. परिणामी लोकसंख्या देखील वाढत आहे. त्यामुळे नागरी व्यवस्थांवर प्रचंड ताण पडत आहे. बहुमजली इमारती झाल्या. मात्र शहरात पुरेशी पार्किंगची व्यवस्था नाही. त्या तुलनेत वाहने मोठ्या प्रमाणात वाढली आहेत. लोकसंख्या वाढल्यामुळे वाहिन्यांवरही ताण आला आहे. तसेच पाणीपुरवठ्याची समस्या देखील दिवसेंदिवस गंभीर होत आहे. नव्या महापौर उपमहापौर आणि स्थायी समिती अध्यक्षांना या सर्व समस्यांना तोंड देत पुढे जावे लागणार आहे. त्याशिवाय मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री आणि राज्य मंत्रिमंडळातील वजनदार पालकमंत्री नागपूरचेच असल्यामुळे तोदेखील त्यांच्यावर दबाव राहणार आहे. हे बघता त्यांची पुढील वाटचाल ही आव्हानांचीच राहणार आहे हे निश्चित.

अमरावती नगरपालिकेत देखील भाजप आणि युवा स्वाभिमान पक्षाची सत्ता आली आहे. अमरावती हे विदर्भातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे शहर आहे. तिथे स्वतंत्र आयुक्तालय आहे. त्यामुळे या शहरातदेखील समस्या मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. हे शहर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आजोळ आहे. त्यामुळे फडणवीसांचे इथे विशेष लक्ष राहणार आहे. हे बघता इथल्या पदाधिकाऱ्यांना देखील अनेक आव्हानांना सामोरे जावे लागेल हे निश्चित. चंद्रपूर महानगरपालिकेत महापौर व उपमहापौर पदाची निवडणूक १० फेब्रुवारी रोजी होणार आहे. इथे महापालिकेची एकूणच अवस्था ही त्रिशंकू आहे. इथे सर्वांत मोठा पक्ष हा काँग्रेस आहे. मात्र काँग्रेसमध्येच खासदार धानोरकरांचा गट आणि आमदार वडेट्टीवारांचा गट असे दोन गट पडल्याने त्यांच्यातच मारामाऱ्या सुरू आहेत. दोन दिवसांपूर्वी दिल्लीत एक उच्चस्तरीय बैठक होऊन त्यात या दोघांमधल्या मारामारीवर तोडगा काढल्याची बातमी होती. अर्थात काँग्रेसला देखील सत्ता मिळवण्यासाठी उबाठा गटाची मदत घ्यावी लागणार आहे. शिवसेनेत फक्त सहा नगरसेवक असताना महापौर पदासाठी अडून बसली आहे. त्याचवेळी काँग्रेसच्या दोन गटांमध्ये महापौर कोणाचा यावर वाद चालू आहे. अशातच भाजपने उबाठा गटाला पहिल्या अडीच वर्षात सव्वा वर्षे महापौर पद देण्याचे मान्य केल्यामुळे कदाचित उबाठा पक्ष भाजप सोबतही जाऊ शकेल असे चित्र आज निर्माण झाले आहे. तसे झाले तर इथे भाजप, शिवसेना आणि अपक्ष असे समीकरण जुळू शकते असे बोलले जात आहे. अर्थात त्यासाठी १० फेब्रुवारीपर्यंत वाट बघावी लागणार आहे. भाजपमध्ये किशोर जोरगेवार आणि सुधीर मुनगंटीवार यांची स्वतंत्र मोर्चेबांधणी सुरू आहे त्यात कोण जोर मारते हे लवकरच कळेल.

**अविनाश पाठक**

# मावळत्या दिनकरा.....

आज भारतीय शहरे झपाट्याने आधुनिक होत आहेत. नोकऱ्या फिरत्या झाल्या आहेत, कुटुंबे लहान झाली आहेत घरांमधील अंतर वाढत चालले आहे. या बदलांमध्ये निवृत्तीनंतर जीवन जगणारे जेष्ठ नागरिक शहरांमध्ये मुले दूर गेल्यामुळे एकटे पडत आहेत. पती-पत्नी म्हणून राहणारे ज्येष्ठ नागरिक शांतपणे आपले आयुष्य पुढे नेत आहेत.

बहुतेक वेळा एकटे राहतो याचा अर्थ दुर्लक्ष किंवा तुटलेली नाती असा होत नाही. मुलांचे प्रेम असतेच, आणि आई-वडीलांचे मुलांवर सुद्धा असते. परंतु त्यांच्या नोकऱ्या, शिक्षण, संसार यांच्या जबाबदाऱ्यांमुळे एकत्र राहणे शक्य होत नाही. नाती टिकून असतात, फक्त अंतर वाढते. त्यामुळे ज्येष्ठांचे आयुष्य स्वावलंबी, सन्मानपूर्ण आणि शांत असते. पण ते हळूहळू अधिक संवेदनशीलही होत जाते.

ज्येष्ठ मंडळींमध्ये बरेच जण आजही शारीरिकदृष्ट्या सक्रिय आहेत, मानसिकदृष्ट्या सजग आहेत. यांना काम करायला आवडते, वाचायला, लिहायला, फिरायला आवडते. तरीही वृद्धत्व अटळ आहे. सांधेदुखी, थकवा, चिंता, कधी अचानक उद्भवणाऱ्या वैद्यकीय अडचणी या सगळ्या गोष्टी हळूहळू दैनंदिन जीवनाचा भाग बनतात. दिवसभर सगळे ठीक असते, पण संध्याकाळ झाली की एक वेगळीच अस्वस्थता मनात येते. या वयातीलक्ष सर्वात मोठी अडचण म्हणजे एकटेपणा. मित्र-मैत्रिणी असतात पण अनेक कारणांमुळे नियमित भेटी कमी होत जातात. हालचाली मर्यादित होतात. वेळा जुळत नाहीत, आणि सामाजिक वर्तुळ नकळत लहान होत जाते. फोन किंवा व्हिडिओ कॉल उपयोगी ठरतात, पण मानवी उपस्थितीचा तो उबदारपणा ते देऊ शकत नाहीत. यासोबतच रोजच्या कामाचे ओझे वाढते. स्वयंपाक, घराची देखभाल, छोट्या-मोठ्या दुरुस्त्या, कामवाली यांचे नियोजन हे सगळे हळूहळू थकवणारे ठरते. नियमित मदत मिळणे अनेकदा अवघड, अनिश्चित किंवा परवडणारे नसते. विशेषतः रात्री सुरक्षिततेची चिंता सतावते. अचानक पडणे, आजारपण किंवा चोरीसारख्या प्रसंगी तात्काळ मदत मिळेल का, हा प्रश्न ज्येष्ठ मंडळीच्या मनात येतो.



अनेकांकडे स्वतःचे घर असते. त्यामुळे त्यांना कुठे कायमचे जावे, घर सोडावे, अशी इच्छा होत नाही. पण तरीही त्यांना कधी-कधी थोडा विराम हवा असतो. अशा वेळी सामूहिक ज्येष्ठ निवासाची कल्पना ज्येष्ठांना एक वेगळे स्वातंत्र्य देते. हवे तेव्हा ये-जा करण्याचे स्वातंत्र्य स्वताच्या घरात हवे तेव्हा परत येऊ शकतो, परिचित परिसराशी नाते टिकवू शकतो आणि पुन्हा ज्येष्ठांची दिनचर्या सुरू करू शकतो. ही लवचिकता त्यांना मालकी, नियंत्रण आणि भावनिक सलगता जपण्याची संधी देते, तसेच गरज भासल्यास दैनंदिन जबाबदाऱ्यांपासून थोडा विरामही देते. 'वृद्धाश्रम' या शब्दाबाबत अनेकांच्या मनात संकोच आहे, कारण ही मंडळी स्वतःला 'वृद्ध' म्हणून पाहत नाही; आम्हाला हवे आहे स्नेह पूर्ण, सुरक्षित आणि स्वतंत्र सहजीवन. त्यामागे केवळ वैयक्तिक भावना नसून समाज काय म्हणेल, मुलांनी सोडले असे समजले जाईल का, अशी एक न बोललेली भीती असते. प्रत्यक्षात तसे नसते. नाती तुटलेली नसतात, परिस्थिती बदललेली असते. 'वृद्धाश्रम' हा शब्दच अंतिमता, परावलंबित्व आणि स्वायत्ततेचा अभाव दर्शवतो पण तोच आनंदाश्रम असला तर?. अशा ज्येष्ठांना सेवा नको आहे; त्यांना आश्वासन हवे आहे. नियंत्रण नको आहे; सुरक्षितता हवी आहे. दान नको आहे; निवड करण्याचा अधिकार हवा आहे. संशोधनही अनुभवांना दुजोरा देते. सामाजिक संबंध टिकून राहिले तर आरोग्य चांगले राहते, आयुष्य अधिक अर्थपूर्ण होते. सामूहिक निवासात राहिल्याने एकटेपणा कमी होतो, मानसिक स्वास्थ्य सुधारते. चालणे, बागकाम, गप्पा, किंवा फक्त एकत्र बसणे अशा साध्या गोष्टी जीवनमान उंचावतात आणि सुरक्षिततेची भावना देतात. म्हणून एक प्रश्न उपस्थित होतो..

सन्मान राखून, एकाकीपणा कमी करणारी, गरजांना अनुरूप अशी राहणीव्यवस्था शक्य आहे का? याचे उत्तर आहे तात्पुरत्या, समुदायाधारित ज्येष्ठ निवास व्यवस्थेत. कायमची संस्था नको; घरासारखी, लवचिक जागा हवी. जिथे काही महिने किंवा गरज भासल्यास अधिक काळ, पूर्णपणे ज्येष्ठांना इच्छेने राहू शकू.

प्रत्येकासाठी स्वतंत्र, आरामदायी निवास असावा. सामायिक विरंगुळा कक्ष असावा. वाचन, खेळ, चर्चा यासाठी, पण कोणतीही सक्ती नसावी. छोट्या बागा, सकाळ-सायंकाळी फिरण्याची सोय, शांत कोपरे असावेत. गरज पडल्यास मदत, त्वरित वैद्यकीय सेवा, वाहतूक आणि जवळचे रुग्णालय उपलब्ध असावे. जवळच मंदिर किंवा उपासनेचे स्थान असावे. वैद्यकीय मदत हजर असावी. हवे तेव्हा सहभागी होता यावे, नको असेल तेव्हा निवांत राहता यावे. एकत्र राहूनही गर्दीची भावना येऊ नये. अशा जागा आजारपणातून सावरण्याच्या काळात, ऋतुगत एकाकीपणात किंवा मुले दीर्घकाळ दूर असताना आम्हाला आधार देऊ शकतात. गरज भासल्यास स्वावलंबी जीवन आणि अधिक सहाय्यक काळजी यामधील सौम्य संक्रमणही शक्य होईल. ही व्यवस्था कुटुंबांची जागा घेणारी नाही. ती त्यांना पूरक आहे. दोषी न वाटता . अशा ज्येष्ठांना ही ओळख, दिनचर्या आणि निर्णयक्षमता टिकवून ठेवता येईल. आयुष्याच्या या टप्प्यावर अशा मंडळींना फार मोठ्या अपेक्षा नसतात. कुटुंब आणि मित्रांसोबत, विविध रंगांनी सजलेल्या आकाशाखाली, मावळत्या सूर्याच्या शांत साक्षीने, संध्याकाळ आनंदात घालवता यावी. इतकेच पुरेसे आहे. कविवर्य भा.रा.तांबे यांच्या शब्दांत सांगायचं झाल्यास - मावळत्या दिनकरा अर्घ्य तुज जोडूनि दोन्ही करा !

**प्र.सु.हिरुरकर, अमरावती**

# काँग्रेसचा स्वबळाचा नारा !

लवकरच होणारी पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक काँग्रेस स्वबळावर लढणार आहे. २०१६ नंतर काँग्रेस प्रथमच, पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक कोणत्याही पक्षाशी आघाडी न करता लढणार आहे. २०१६ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने, मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडी बरोबर निवडणूक समझोता केला होता. त्या निवडणुकीत काँग्रेसला ४४ जागांवर विजय मिळाला होता. तर मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीला ३२ जागांवर विजय मिळाला होता. त्यावेळी काँग्रेस हा पश्चिम बंगाल विधानसभेतील सर्वात मोठा विरोधी पक्ष ठरला होता.

२०२१ मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत पुन्हा एकदा काँग्रेसने मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडी बरोबर निवडणूक समझोता केला होता. त्या आघाडीत नौशाद सिद्दीकी यांच्या नेतृत्वाखालील इंडियन सेक्युलर फ्रंटही सहभागी झाला होता. हे तीन पक्ष एकत्र येऊनही त्यांना २०२१ मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत चांगली कामगिरी करता आली नव्हती. त्या निवडणुकीत काँग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीची पाटी कोरी राहिली होती. तर इंडियन सेक्युलर फ्रंटचे नेते नौशाद सिद्दीकी हे आघाडीतर्फे विधानसभेत निवडून आलेले एकमेव आमदार होते. काँग्रेसला तीन टक्के मते मिळाली होती. तर मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीला साडेपाच टक्के मते मिळाली होती. एकेकाळी पश्चिम बंगालवर राज्य केलेल्या काँग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीला त्या निवडणुकीत, विधानसभेमध्ये आपला एकही आमदार निवडून आणता आला नव्हता. त्या उलट २०११ पर्यंत पश्चिम बंगाल मध्ये नगण्य असलेल्या भाजपाला २०२१ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत ७७ जागांवर विजय मिळाला होता आणि तो पक्ष विधानसभेतील सर्वात मोठा विरोधी पक्ष ठरला होता.

ममता बॅनर्जी यांचा तृणमूल काँग्रेस हा पक्ष २०११ साली पश्चिम बंगाल मध्ये सत्तेवर आल्यानंतर, त्या राज्यात विधानसभेच्या ज्या पोटनिवडणूका झाल्या, त्यांमध्ये तृणमूल काँग्रेसने मोठे यश मिळवले. मात्र २०२३ मध्ये सागरडिघी विधानसभा मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीत काँग्रेसने विजय मिळवला होता. अर्थात काँग्रेसचा तो विजय क्षणिक ठरला. कारण काँग्रेसच्या विजयी उमेदवाराने थोड्याच दिवसात, तृणमूल काँग्रेसमध्ये प्रवेश केला. या पार्श्वभूमीवर लवकरच होणारी पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक एकट्याच्या बळावर लढण्याचा काँग्रेसचा निर्णय धाडसीच म्हणावा लागेल. अर्थात पश्चिम बंगालमध्ये काँग्रेसकडे गमावण्यासारखे काहीच नसल्याने, एकट्याच्या बळावर लढू इच्छिणाऱ्या काँग्रेसचा २०२१ प्रमाणे दारुण पराभव झाला तरी काँग्रेसला काही फरक पडणार नाही. एकट्याच्या बळावर लढल्यास काँग्रेसला पश्चिम बंगाल विधानसभेच्या सर्व जागांवर (२९४) आपले उमेदवार उभे करता येतील आणि त्या निमित्ताने आपली संघटना तळागाळापर्यंत पोहोचवता येईल. महत्वाचे म्हणजे काँग्रेसला नवीन चेहऱ्यांना उमेदवारी देता येईल. सध्या काँग्रेस पक्ष, मुर्शिदाबाद आणि माल्डा या विभागांपुरता मर्यादित राह्यल्याचे चित्र दिसत आहे. काँग्रेसला लवकरच होणाऱ्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत कितपत यश मिळेल हे आताच सांगता येणार नाही. परंतु काँग्रेस, तृणमूल काँग्रेसची व्होट बँक असलेल्या मुस्लिम मतांमध्ये काही प्रमाणात विभाजन घडवून, भाजपाचा फायदा करू शकेल. विशेषत: माल्डा आणि मुर्शिदाबाद या मुस्लिम बहुल भागात मुस्लिम समाजाच्या मतांमध्ये विभाजन घडवून, काँग्रेस, तृणमूल काँग्रेसचे नुकसान करू शकेल. माल्डा आणि मुर्शिदाबाद विभागातील मुस्लिम समाज हा पुर्वीपासून काँग्रेसचा पाठिराखा राहिला आहे. काँग्रेसचे नेते ए.बी.ए. घनीखान चौधरी हे माल्डा मधील अतिशय लोकप्रिय नेते होते. तेंव्हा पासून माल्डा हा काँग्रेसचा बालेकिल्ला राहिला आहे. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत (२०२१) काँग्रेसचा एकही आमदार निवडून आला नसला तरी २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत माल्डा उत्तर मतदारसंघातून काँग्रेसचा उमेदवार निवडून आलेला आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत माल्डा आणि मुर्शिदाबाद या विभागातील विधानसभेच्या जागांवर मुख्य लढत ही काँग्रेस, भाजपा आणि तृणमूल काँग्रेस यांच्यात होईल. येथे काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेस यांच्यात मुस्लिम मतांचे मोठ्या प्रमाणात विभाजन झाल्यास त्याचा फायदा भाजपाला मिळू शकेल. काँग्रेसने कोणत्याही पक्षाशी आघाडी करण्यास नकार दिल्याने, त्याचा सर्वात मोठा फटका मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीला बसू शकेल. तृणमूल काँग्रेस आणि भाजपा बरोबर एकट्याने सामना करण्याइतकी ताकद आता मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीकडे राहिलेली नाही. त्यामुळे तृणमूल काँग्रेसला कडवा विरोध करणारे, डाव्या आघाडीचे जे समर्थक आहेत त्यापैकी काही समर्थक तृणमूल काँग्रेसचा पराभव करण्यासाठी भाजपाला मतदान करु शकतील. कारण तृणमूल काँग्रेसचा पराभव फक्त भाजपाच करु शकेल ही वस्तुस्थिती आहे.



मध्यंतरी तृणमूल काँग्रेस मधून बाहेर पडलेले मुस्लिम नेते हुमायून कबीर हे ममता बॅनर्जी यांना आव्हान देत आहेत. हुमायून कबीर यांनी जनता उन्नयन पार्टी या पक्षाची मध्यंतरी स्थापना केली आहे. त्यांनी ओवैसी यांच्या मजलिसे इत्तेहादूल मुस्लिमीन या पक्षाशी तसेच नौशाद सिद्दीकी यांच्या इंडियन सेक्युलर फ्रंट या पक्षाशी आघाडी करण्यासाठी प्रयत्न चालवले आहेत. ती आघाडी अस्तित्वात आली तर तृणमूल काँग्रेस समोर मोठे आव्हान उभे राहू शकेल. या आघाडीला पश्चिम बंगाल मधील मुस्लिम समाजाचा बऱ्यापैकी पाठिंबा मिळाला तर, ममतांच्या मुस्लिम व्होट बँकेला खिंडार पडू शकेल आणि त्याचा फायदा भाजपाला मिळेल. काँग्रेसने एकट्याच्या बळावर पश्चिम बंगाल विधानसभेच्या निवडणुका लढण्याचा जो निर्णय घेतला आहे, त्याचा कितपत फायदा काँग्रेसला मिळेल, हे पाहण्यापेक्षा, त्यामुळे तृणमूल काँग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीचे किती नुकसान होईल, ते पाहणे महत्त्वाचे ठरेल.

**अभय गोखले**

# श्री क्षेत्र धामणगाव देव येथील यात्रा महोत्सवात भाविकांच्या सुविधेसाठी सूक्ष्म नियोजन करा

## सुमारे ५० हजार भाविक येण्याचा अंदाज

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : भगवान मुंगसाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त दारव्हा तालुक्यातील श्री क्षेत्र धामणगाव (देव) येथे दि. २३ व २४ फेब्रुवारी रोजी भव्य यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. या यात्रा महोत्सवाच्या नियोजनासंदर्भात पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात शनिवारी बैठक घेवून भाविकांच्या सुविधेसाठी सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले.



पालकमंत्री ना. संजय राठोड यांचे निर्देश, मुंगसाजी महाराज पुण्यतिथीनिमित्त दोन दिवसीय यात्रा महोत्सवाचे आयोजन

या बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, अतिरिक्त जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, दारव्हाचे उपविभागीय अधिकारी विजय सुर्यवंशी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी मनोज ढगे, मुख्याधिकारी विठ्ठल केदारे, गटविकास अधिकारी, विविध विभागाचे अधिकारी, पराग पिंगळे, तिर्थक्षेत्र संस्थानचे पदाधिकारी गजानन अंबोरे, राजू देशमुख, सरपंच जगदिश जाधव उपस्थित होते. पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी प्रशासनाच्या तयारीचा आढावा घेत या यात्रा महोत्सवाला राज्यभरातून भाविक व पालख्या येत असतात. त्यांच्या सोयीसुविधेसाठी शुद्ध पिण्याचे पाणी, प्रसाधनगृह, शौचालय, पाणी पुरवठ्यासाठी टँकर, अखंडित वीज पुरवठा, विद्युत रोषणाई, एसटीच्या अतिरिक्त बस गाड्या, आरोग्य पथक, अग्निशमन, सीसीटिव्ही यंत्रणा, मदत कक्ष, सावलीसाठी निवारा, हायमास्ट लाईट, वाहन पार्किंग व्यवस्था, बॅरिकेटींग, बस थांबा आदी सुविधा उपलब्ध कराव्यात. तसेच श्री क्षेत्र धामणगाव देव परिसरात स्वच्छता, गर्दीचे व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन, आपत्ती व्यवस्थापन, घंटागाड्या, कचराकुंड्या, भक्त निवासाची स्वच्छता व डागडुजी, रस्त्यांची दुरुस्ती करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी प्रशासनाला दिले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या यात्रा महोत्सवाच्या अनुषंगाने विविध विभागांनी नियोजनबद्ध कामे पूर्ण करावीत. तसेच क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी श्री क्षेत्र धामणगाव देव येथे भेट देवून पाहणी करण्याचे निर्देश दिले.

### ५० हजार भाविक येण्याचा अंदाज

श्री क्षेत्र धामणगाव देव येथे भगवान मुंगसाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित दोन दिवसीय यात्रा महोत्सवात बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, अकोला, अमरावतीसह विविध भागातून सुमारे ५० हजार भाविक येण्याचा अंदाज या बैठकीत वर्तविण्यात आला. त्याअनुषंगाने नियोजन करण्याच्या सूचना पालकमंत्री ना. संजय राठोड आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांनी यावेळी दिल्या.

# शहरात भेसळयुक्त पनीर-खव्याचा सुळसुळाट !

## अन्नपुरवठा विभागाची संशयास्पद शांतता, नागरिकांचे आरोग्य धोक्यात!

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - शहर व परिसरात पनीर, खवा व इतर दुग्धजन्य पदार्थांच्या भेसळीने कळस गाठला असून नागरिकांच्या आरोग्याशी उघडपणे खेळ सुरू आहे. शहरात मोठ्या प्रमाणावर दूधजन्य पदार्थांची विक्री होत असताना या पदार्थांची गुणवत्ता, शुद्धता व स्वच्छतेची तपासणी करण्याची जबाबदारी असलेला अन्न व पुरवठा विभाग मात्र जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याचा गंभीर आरोप नागरिकांमधून होत आहे.

लगतच्या छोट्या तालुक्यासारख्या ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात पनीरची आवक यवतमाळ शहरात होत असून, या पनीरची गुणवत्ता तपासली जाते का, याबाबत मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. हॉटेल्स, ढाबे, लग्नसमारंभ व सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये या भेसळयुक्त पनीर-खव्याचा सर्रास वापर होत असून त्यामुळे पचनसंस्थेचे आजार, विषबाधा व दीर्घकालीन आरोग्य समस्या उद्भवण्याचा धोका वाढला आहे. जिल्ह्यात दूध उत्पादन क्षमता व दुधाळ जनावरांची संख्या [illegible]



लिटर दुधाची रोज विक्री कशी होते? पनीर व खवा निर्मितीसाठी लागणारे दूध नेमके कुठून येते? अवैध मार्गाने होणाऱ्या दुधाच्या व दुग्धजन्य पदार्थांच्या वाहतुकीकडे प्रशासन का दुर्लक्ष करत आहे.असा थेट सवाल उपस्थित होत आहे. अन्न व पुरवठा विभागाच्या नियमांनुसार दूध, पनीर, खवा तसेच इतर खाद्यपदार्थांची नियमित गुणवत्ता तपासणी, नमुने संकलन व कारवाई अपेक्षित असताना यवतमाळ शहरातील नामांकित नमकीन दुकाने, खवा-पेढा उत्पादक कारखाने व दूध प्रक्रिया केंद्रांची तपासणी होत नसल्याचे चित्र आहे. स्वच्छता, दर्जा व अन्नसुरक्षा मानकांचे पालन होते का, याची कोणतीही खातरजमा नाही. वेळीच कठोर कारवाई, व्यापक तपासणी मोहीम व दोषींवर गुन्हे दाखल झाले नाहीत, तर शहरातील नागरिकांचे आरोग्य गंभीर धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा जाणकारांकडून दिला जात आहे.

# एमआयडीसीतून काळ्या मातीची चोरी

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : काळी मातीचे उत्खनन करून ट्रॅक्टरने चोरी केली. ही घटना ५ फेब्रुवारीला दुपारच्या सुमारास अतिरिक्त एमआयडीसी प्लॉट न. बी-३९ लोहारा येथे उघडकीस आली. तुकाराम थावरा जाधव (६७) रा. शिवनेरी सोसायटी आर्णी मार्ग असे फिर्यादीचे नाव आहे. त्यांचा लोहारा परिसरातील अतिरिक्त एमआयडीसी प्लॉट न. बी-३९ आहे. त्या प्लॉटमधील काळी माती खोदून एमएच-२९, एम-४५४३ क्रमांकाच्या ट्रॅक्टरमधून शंकर कोकाडे (३५), किशोर धाबेकर (३५), यशवंत शिंदे (५२) रा. भोयर यांनी संगमत करून चोरून नेताना दिसून आले. त्या ठिकाणावरून ६० ते ७० हजारांची काळी माती चोरून नेली. याबाबतची तक्रार त्यांनी लोहारा पोलीस ठाण्यात दिली. यावरून पोलिसांनी तिघांविरोधात गुन्हा दाखल केला. पुढील तपास लोहारा पोलीस करीत आहे. रिकाम्या प्लॉटमधून माती तसेच मुरूम खोदून चोरी करीत असल्याच्या घटना घडत असल्याचे दिसून येत आहे.


# वेचक



## "कुठल्याही कामाची लाज बाळगू नका" : रणजीत राठोड

राळेगाव : कला वाणिज्य महाविद्यालय राळेगाव यांच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे आयोजन वरुड जहागीर येथे २ ते ९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान करण्यात आले. या शिबिरातील बौद्धिक सत्र दिनांक ६ फेब्रुवारी रोजी "ग्रामीण उद्योग व व्यवसाय विकास मार्गदर्शन" या विषयावर घेण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विशाल दौलतकर यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा देताना म्हटले की "जर शून्यातून विश्व निर्माण करायचे असेल तर कोणत्याही कारणावर मात करता येते." मुख्य वक्ते रंजीत राठोड (कृषी प्रक्रिया उद्योजक आर्णी ) यांनी विद्यार्थ्यांना अगदी सोप्या भाषेत परिस्थितीवर मात करण्याचे मार्ग सांगितले. त्यांनी स्वतःच्या अनुभवातून "एक रुपया एक लाख कसा होऊ शकतो" हे उदाहरण देत विद्यार्थ्यांना प्रेरित केले. तसेच "लाजला तो संपला" या उद्गारातून कोणत्याही कामाची लाज बाळगू नये असा संदेश दिला. दुसरे वक्ते श्री. प्रवीण काळे यांनी "कोई काम छोटा या बडा नही होता" असे सांगत विद्यार्थ्यांना प्रत्येक कामाचे महत्त्व पटवून दिले. अध्यक्ष स्थानावरून बोलताना प्रा. डॉ. रुपेश पवार (वाणिज्य विभाग प्रमुख) यांनी विद्यार्थ्यांना विविध उदाहरणे देत प्रेरणा दिली. त्यांनी कलाकार कीर्ती सुरेश हिचे उदाहरण देत "मोठे व्हायचे असेल तर चहाच्या टपरीवरूनही मोठं होता येते" असे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन अनुष्का होले यांनी केले तर आभार प्रदर्शन प्राजक्ता सिडाम यांनी केले. या कार्यक्रमाला डॉ. शालिनी हटवार (महिला कार्यक्रमाधिकारी), प्रा. धीरज गोबरे (सह कार्यक्रम अधिकारी), तसेच एनएसएसचे माजी विद्यार्थी सुशील दांदडे व पंकज आत्राम उपस्थित होते. गावातील मंडळी व एनएसएस विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केला.

## समता पर्वच्या मुख्य संयोजकपदी नारायण थूल



यवतमाळ - समता पर्व प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित होणाऱ्या समता पर्व 2026 साठी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नारायण थूल यांची मुख्य संयोजकपदी एकमताने निवड करण्यात आली. तर डॉ. सुमेध देवतळे यांची कार्यकारी समन्वयक म्हणून आणि उमेश मेश्राम यांची प्रवक्ते म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त गेल्या २१ वर्षांपासून यवतमाळ येथे सातत्याने साजरा होणारा समता पर्व यंदा ७ ते १४ एप्रिल २०२६ दरम्यान विविध सामाजिक, सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांनी भरलेला असणार आहे. यवतमाळ येथील शासकीय विश्राम भवनात डॉ. लीलाताई भेले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सहविचार सभेत या निवडींना मंजुरी देण्यात आली. यवतमाळ आयडलची जबाबदारी इंजि. धर्मपाल भितकर यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. समता, बंधुता, न्याय व मानवतावादी मूल्यांचा जागर करणारा समता पर्व यंदा अधिक व्यापक व प्रभावी ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## अंतरगाव येथे युवकाची आत्महत्या

यवतमाळ : युवकाने कीटकनाशक औषध प्राशन करून आत्महत्या केली. ही घटना अंतरगाव राघोपोड येथे शुक्रवारी सकाळी घडली. संदीप चंदनदास आत्राम (३२) असे आत्महत्या करणाऱ्या युवकाचे नाव आहे. त्याने गावालगत असलेल्या शेतात कीटकनाशक प्राशन केले. यातच त्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती वडगाव जंगल पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळ गाठून घटनेचा पंचनामा केला.

# एका महिन्यात २२ शेतकरी आत्महत्या..!

## नैतिक जबाबदारी मुख्यमंत्री व जिल्ह्यातील मंत्र्यांनी घ्यावी : शेतकरी नेते मनीष जाधव

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - यवतमाळ जिल्ह्यात जानेवारी २०२६ या एका महिन्यात तब्बल २२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक बाब समोर आली असून, या आत्महत्यांची नैतिक जबाबदारी मुख्यमंत्री तसेच जिल्ह्यातील सर्व मंत्र्यांनी घ्यावी, अशी तीव्र मागणी शेतकरी नेते मनीष जाधव यांनी केली आहे. जिल्हा प्रशासनाच्या शासकीय आकडेवारीतूनच ही भयावह वास्तवस्थिती उघड झाली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

चालू खरीप हंगाम २०२६-२७ मध्ये ओला दुष्काळ, अतिवृष्टी, सततची नापिकी, कर्जबाजारीपणा, शेतमालाला मिळणारे अपुरे दर, वाढलेला उत्पादन खर्च, वन्यजीवांचा त्रास आणि नैसर्गिक आपत्ती यामुळे शेतकरी आर्थिक कोंडीत सापडला आहे. त्यातच बाजारपेठेतील खाजगी खरेदी



पद्धतीत व्यापाऱ्यांकडून होणारी लूट शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरत असल्याचा आरोप जाधव यांनी केला. विहिरीत उडी घेणे, गळफास घेणे, विषप्राशन करून जीवन संपवणे अशी दाहक व विदारक उदाहरणे समोर येत असून, शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष हेच आत्महत्यांचे प्रमुख कारण असल्याचे ते म्हणाले. आत्महत्यांसाठी कुप्रसिद्ध ठरलेल्या यवतमाळ जिल्ह्यात शोषणमुक्त व्यवस्था व पायाभूत सुविधांचा अभाव आजही कायम आहे.केंद्र सरकारच्या मुक्त व्यापार धोरणामुळे भारतातील शेतकऱ्यांना आता थेट अमेरिकेतील शेतकऱ्यांशी स्पर्धा करावी लागणार असून, तंत्रज्ञानाच्या अभावामुळे देशांतर्गत शेतकऱ्यांचा टिकाव लागणार नाही, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. मका, कापूस व सोयाबीन उत्पादकांना आगामी काळात मोठा आर्थिक फटका बसण्याची शक्यता असून, आत्महत्यांचे संकट अधिक गडद होईल, असा इशाराही त्यांनी दिला. जिल्ह्यातील २२ शेतकरी हे शासनाच्या अनास्थेचे बळी ठरले असून, त्यांच्या आत्महत्यांची नैतिक जबाबदारी जिल्ह्यातील दोन मंत्र्यांसह पालकमंत्र्यांनी घ्यावी, असा गंभीर आरोप मनीष जाधव यांनी केला. आत्महत्या रोखण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणाऱ्या ठोस पायाभूत उपाययोजना तातडीने राबविण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# न्याय मागणीसाठी तहसील कार्यालय येथे धरणे व आमरण उपोषण

## ९ फेब्रुवारीला शशिकांत धुमाळ यांच्यासह नागरिक महिला आंदोलनात होणार सहभागी

जनमाध्यम प्रतिनिधी

राळेगाव : शहरातील गोरगरीब, सर्वसामान्य नागरिक, महिलांभगिनींचा आजही हक्काच्या घरासाठी संघर्ष सुरू आहे .शासन निर्णय असताना त्यांना घरकुल चा लाभ मिळत नाही ,या बाबत वारंवार मागणी करूनही कोणताही निर्णय घेण्यात न आल्याने राळेगावकर नागरिक शशिकांत उर्फ बाळू धुमाळ यांच्या नेतृत्वात एकत्र आले .अतिक्रमित जागेवरील पट्टे तातडीने देण्याच्या मुख्य मागणीसह इतर जनहित मागण्यांकरिता तहसील कार्यालय राळेगाव येथे 9 फेब्रुवारी पासून धरणे आंदोलन व आमरण उपोषण करण्यात येणार आहे.

व्यापक जनहिताच्या न्याय मागण्याची दखल घेण्यात येत नसल्याने 9 फेब्रु.धरणे आंदोलन व 10फेब्रु .पासून आमरण उपोषण चा इशारा देण्यात आला .घरकुल अतिक्रमणे नियमित करणेबाबत शासन निर्णय क्र. जमीन 2025/प्रक 236/ज 1, दि.1 ऑगस्ट 2025, प्रधानमंत्री आवास योजना शहरी, 2.0 अंमलबजावणी, शासन निर्णय नपप्रस/ प्रधानमंत्री आवास योजना 2.0/2024/ का./07अ /8589दि.16 डिसेंबर 2024 व सर्वांसाठी घरे 2022 शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2019/प्र. क्र.15/ नवी 26दि. 6 मार्च 2019, हे स्वयंस्पष्ट शासनदेश असताना राळेगाव येथील घरकुल पासून शहरवासी वंचित आहे. अतिक्रमण धारकांना कायम पट्टे मिळालेले नाहीत, त्यामुळे त्यांचे न्याय हक्क डावलण्यात येत आहे. याबाबत वारंवार लेखी तोंडी मागणी करण्यात आली पण त्यावर कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही .व्यापक जनहित लक्षात घेऊन संविधानिक मार्गाने आंदोलन करण्याशिवाय पर्याय नाही असे नमूद असून विविध न्याय मागण्या करण्यात आल्या. यात वरील संदर्भीय शासन निर्णयानुसार रहिवासी असणाऱ्या राळेगाव शहरातील अतिक्रमण धारक लाभार्थ्यांना कायम रहिवासी पट्टे देण्यात यावे. घरकुला पासून वंचित असणाऱ्या गोरगरीब सर्वसामान्य नागरिक, महिलांना घरकुल चा लाभ देण्यात यावा. नवीन घरकुल चे अर्ज स्वीकारण्यात यावे. घरकुल लाभार्थ्यांना दहा ब्रास रेती मोफत देण्यात यावी. इत्यादी मागण्या करण्यात आल्या. जनतेच्या मनात असलेल्या असंतोषाला वाचा फोडण्यासाठी 9 फेब्रुवारी पासून उपविभागीय कार्यालय समोर धरणे आंदोलन व 10 फेब्रुवारी 2026 पासून आमरण उपोषण करण्यात येईल, समस्या, प्रश्न तातडीने सोडवण्यात आला नाही तर उग्र आंदोलन करू असा इशारा देण्यात आला मागण्यांची पूर्तता करावी अशी विनंती करण्यात आली आहे .या आंदोलनाच्या निमित्ताने जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाला वाचा फुटल्याची चर्चा राळेगाव शहरात व्यक्त होताना दिसते . संविधानिक मार्गाने हे आंदोलन होईल या आंदोलनात मोठ्या संख्येने नागरिकांनी, महिलांनी, युवकांनी सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# त्यागाचे मूर्तीमंत रूप म्हणजे रमाई : प्रो. अनिल काळबांडे

जनमाध्यम प्रतिनिधी

उमरखेड - हिमालयासारख्या उत्तुंग व्यक्तिमत्व असणाऱ्या बाबासाहेब आंबेडकर यांच्या संपूर्ण आयुष्यात रमाई ही सावली सारखी सोबत राहीली कुठलीही अपेक्षा न ठेवता निरपेक्ष भावनेने काटकसर करीत संसाराचा गाडा ओढणारी रमाई म्हणजे त्यागाचे मूर्तिमंत रूप असल्याचे प्रतिपादन प्रख्यात आंबेडकरी विचारवंत प्रोफेसर डॉ . अनिल काळबांडे यांनी केले ते तालुक्यातील बेलखेड येथे आयोजित रमाई जयंती सोहळ्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ समाजसेवक नामदेवराव शिंगणकर हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून विजयानंद शिंगणकर, डी .बी .शिंगणकर ' नामदेव काळबांडे, मुकिंदा शिंगणकर हे होते.

सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते



महापुरुषाचा प्रतिमेचे पुजन करून उपस्थितांना सामूहिक त्रिशरणा सह पंचशील डी बी शिंगणकर यांनी त्यानंतर भाग्यश्री सिंगणकर हिने रमाई गीत गायले. आपल्या प्रमुख मार्गदर्शनात डॉ . काळबांडे यांनी, रमाईचा संघर्षमय इतिहास सांगून रमाईचा आदर्श सर्वांनी घेण्याचा आवाहन केले . बाबासाहेब बॅरिस्टर झाल्यानंतर बाबासाहेबांना परदेशातून परत भारतात येण्यासाठी पैसे नसल्याने बाबासाहेब रमाईला तार करतात तेव्हा रमाई गोबऱ्या, कोळशे विकून बाबासाहेबांना पैसे पाठवते .तेव्हा कुठे बॅरिस्टर झालेले बाबासाहेब परत भारतात येतात. साध्या भोळ्या रमाईच्या त्यागातून, कर्तृत्वातून कसे घडत जातात हे उदाहरण देऊन त्यांनी समजावून सांगितले . रमाईचा आदर्श घेऊन महिला मंडळांनी सुद्धा आपल्या कुटुंबामध्ये त्याग, बचत, काटकसर करून रमाईचा आदर्श जोपासण्याचे या वेळेस आव्हान केले. या कार्यक्रमाला राजू शिंगणकर, बालाजी शिंगणकर, गयाबाई बहादुरे, लक्ष्मीबाई शिंगणकर, गयाबाई सिंगणकर, रंजनाबाई पाईकराव, जिजाबाई शिंगणकर सुमनबाई काळबांडे, शांताबाई पाईकराव, प्रजावंती पाईकराव,भगवान शिंगणकर उपस्थीत होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भीमशाहीर सुभाष शिंगणकर यांनी केले. तर प्रास्ताविक मुकुंदा शिंगणकर यांनी केले. आभार भगवान शिंगणकर यांनी मानले.

# "नियम कागदावर, शहर कचऱ्यात !"

## कचरा उचलायला नगरसेवक मैदानात.. मग ठेकेदार व नगरपालिकेचे काम काय?

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - यवतमाळ शहरातील कचरा संकलन व्यवस्थेची दयनीय अवस्था पुन्हा एकदा उघड झाली असून प्रशासन, ठेकेदार व सफाई यंत्रणेच्या अपयशावर शिक्कामोर्तब झाले आहे. ई-रिक्षा चालक व सफाई कर्मचारी गैरहजर असल्याने प्रभाग क्रमांक १० मध्ये अनेक दिवस कचरा उचलला जात नसल्याचे वास्तव समोर आले. परिणामी नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत नगरपालिकेचे गटनेते तथा नगरसेवक डॉ. नीरज वाघमारे यांनी थेट मैदानात उतरून स्वतः ई-रिक्षा चालवत कचरा संकलन केले.

लोकप्रतिनिधीला स्वच्छतेसाठी रस्त्यावर उतरावे लागत असेल, तर कचरा संकलनाचा ठेका घेतलेले ठेकेदार, संबंधित



अधिकारी व सफाई कर्मचारी नेमके काय करत आहेत, असा थेट सवाल उपस्थित होत आहे. प्रशासक राज संपून सत्तास्थापना होऊनही शहर स्वच्छ व सुंदर होण्याऐवजी अधिकच अस्वच्छतेकडे वाटचाल करत असल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे. कचरा संकलन ठेकेदारांकडून कामगारांची नियमित उपस्थिती, वेळापत्रकानुसार कचरा उचल, ई-रिक्षांचे दररोजचे फेरे, गणवेश व ओळखपत्रांची अंमलबजावणी होत नसल्याचे नागरिकांनी सांगितले. नगरपालिकेचा ठेकेदारांवर कोणताही प्रभावी अंकुश नसल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. स्वच्छ भारत अभियान, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम तसेच घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ नुसार दररोज घराघरातून कचरा संकलन करणे, ओला-सुका कचरा वेगळा गोळा करणे व नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई करणे ही नगरपालिकेची जबाबदारी आहे. मात्र प्रत्यक्षात हे नियम केवळ कागदावरच असल्याचे चित्र आहे. डॉ. नीरज वाघमारे यांनी प्रशासन व सत्ताधाऱ्यांना इशारा देत सांगितले की जबाबदारी झटकून चालणार नाही. ठेकेदार, अधिकारी व कामगार यांची जबाबदारी निश्चित करून तातडीने कारवाई झाली पाहिजे, अन्यथा आंदोलन छेडले जाईल. ही घटना संपूर्ण यवतमाळ शहरातील स्वच्छता व्यवस्थेच्या अपयशाचे जिवंत उदाहरण असल्याची चर्चा आता नागरिकांमध्ये सुरू आहे.

# महागाव येथे भाजप शहर मंडळाची संवाद बैठक संपन्न

जनमाध्यम प्रतिनिधी

महागाव - भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यालयाच्या आदेशानुसार आज दिनांक ४ फेब्रुवारी २०२६ रोजी महागाव शहर मंडळाच्या वतीने बूथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख व सक्रिय कार्यकर्ता संवाद बैठकीचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला भारतीय जनता पार्टीचे अनेक ज्येष्ठ नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या संवाद बैठकीला माजी तालुकाप्रमुख दीपक आडे, माजी तालुकाप्रमुख विलास शेंबे, शहर मंडळ अध्यक्ष निलेश नरवाडे, माजी नगर उपाध्यक्ष तथा नगरसेवक सुरेश पाटील नरवाडे, माजी तालुका सरचिटणीस संजयजी पाटे, भारतीय जनता पार्टी गटनेते गजानन साबळे, माजी जिल्हा परिषद सदस्य सुदामजी खंदारे , जगदीश नरवाडे पाटील,आणि के. डी. नरवाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शहर मंडळ सरचिटणीस



रघुनाथ नरवाडे, विशाळ डाहळे, भारतीय जनता पार्टी महिला तालुका अध्यक्ष माया भाई राजनकर, नगरसेविका रंजना ताई आडे नरवाडे बाई, छाया खंदारे बाई, पुष्पा कावळे बाई, निर्मलाबाई सोयाम आणि मुकिंदा आबोरे ,श्रीकांत राऊत , गजानन मोरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या बैठकीत आगामी संघटनात्मक कार्याचा आढावा घेण्यात आला असून शक्ती केंद्र आणि बूथ स्तरावर पक्षाची बांधणी अधिक मजबूत करण्यावर चर्चा करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सक्रिय राहण्याचे आवाहन केले. या संवाद बैठकीमुळे महागाव शहरातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये नवीन उत्साह संचारला असून, संघटन वाढीसाठी सर्वांनी कंबर कसली आहे.

# यशवंत स्टेडियम मधील व्यायाम मशीनची झाली दुरवस्था; जिल्हा क्रीडा प्रशासनाचे दुर्लक्ष

जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - येथील यशवंत स्टेडियम तसेच तालुका क्रीडा संकुल येथे ज्येष्ठ नागरिक, नवतरुण तसेच क्रीडाप्रेमीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यवतमाळ अंतर्गत या ठिकाणी व्यायाम करण्याच्या अनेक मशीन एक-दोन वर्षा अगोदर व्यायाम करण्यासाठी लावण्यात आल्या आहे.

परंतु ह्या मशीन एक वर्षा मध्येच खराब होऊन त्याचे काही भाग(पार्ट) निघाल्यामुळे या मशीनची दुरवस्था झालेली आहे त्यामुळे या क्रीडा संकुलातील पाई फिरणारे नागरिक, धावपटू तसेच व्यायाम करणारे क्रीडाप्रेमी यांना या मशीनवर व्यायाम करताना त्रास होत असून मोठी कसरत करावी लागत आहे, या मशीनची देखभाल दुरुस्ती व (मेंटेनन्स) याकडे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यवतमाळ तसेच तालुका क्रीडा अधिकारी पुसद या प्रशासनाचे कुठल्याही



प्रकारचे लक्ष नाही. याठिकाणी रोज स्टेडियम मध्ये क्रीडाप्रेमी व सुप्रभात ग्रुपचे सदस्य यांच्याकडून सदर व्यायाम मशीनच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी कोणाकडे आहे असा प्रश्न उपस्थित होत आहे. या विषयाकडे लोकप्रतिनिधी किंवा जिल्हा क्रीडा अधिकारी यवतमाळ यांनी लक्ष देऊन शासनाकडून लाखो रुपये खर्च करून नागरिकांचे आरोग्य सुदृढ राहावे या दृष्टिकोनातून व्यायाम करण्यासाठी मशीन फिट करण्यात आलेल्या आहे. परंतु याठिकाणी कोणाचेही लक्ष नसल्यामुळे प्रशासनाचे लक्ष देऊन तात्काळ दुरुस्ती करणे आवश्यक आहे, अशी मागणी मॉर्निंग ग्रुप तसेच क्रीडाप्रेमी कडून केल्या जात आहे.

# पंतप्रधान आवास योजनेतून जाणीवपूर्वक नाव गहाळ केले

## धनज ग्रामपंचायतमधील प्रकार; मारोती मोडक यांची शंभर रुपयांच्या बॉण्डवर गटविकास अधिकाऱ्याकडे तक्रार

जनमाध्यम प्रतिनिधी

उमरखेड - तालुक्यातील ग्रामपंचायत धनज मधील मारोती खंडू मोडक या लाभार्थ्याचे नाव पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत जाणीवपूर्वक कमी करून आवास योजनेच्या लाभापासून वंचित ठेवण्याचा प्रकार झाला असून याबाबतची तक्रार लाभार्थ्याने गटविकास अधिकारी यांना शंभर रुपयांच्या बॉण्डवर लेखी स्वरूपात दिली आहे.

पंतप्रधान आवास योजनेतील लाभार्थी मारोती खंडू मोडक हे मौजे धनजचे रहिवासी असून त्यांना आवास योजनेअंतर्गत यादी क्रमांक 6 ड मध्ये समाविष्ट करण्यात आले होते. त्यानुसार लाभार्थ्याने योग्य त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता ग्रामपंचायत मध्ये केली. घरकुला विषयी ग्रामपंचायत सचिव, सरपंच व सदस्य व संबंधित पदाधिकारी यांना लाभार्थ्यांनी वारंवार विचारपूस केली पण त्यांना उडवा उडवीची उत्तरे मिळाली. पात्र असताना सुद्धा जाणून-बुजून डावलण्यात आले. पंतप्रधान आवास योजनेचे घरकुल बांधकाम करत असताना जिओ टॅग करणे आवश्यक आहे असे असले तरी सदर काम करणारे अभियंता अविनाश आडे यांनी काही लाभार्थ्यांचे बांधकाम झालेले नसताना सुद्धा आर्थिक देवाणघेवाणीतून घरकुल ची पूर्ण रक्कम लाभार्थ्याच्या खात्यात देण्यात आल्याचा प्रकार सुद्धा झाला आहे, इतर पात्र लाभार्थ्यांच्या तसेच ज्या लाभार्थ्यांनी कोणतेही बांधकाम केलेले नसताना सुद्धा लाभ घेतला अशा लाभार्थ्यांची चौकशी करण्याची गरज असल्याचे मोडक यांनी निवेदनातून म्हटले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# गज़ल हृदयाची धडधड जिवंत ठेवते-वैभव जोशी

## तिसऱ्या अ. भा. 'एल्गार' मराठी गज़ल संमेलनाचे उद्घाटन देशभरातून शेकडो गज़लकारांची उपस्थिती



**अमरावती/का.प्र.**

गज़ल ही हृदयाची धडधड जिवंत ठेवणारी विधा आहे. आज उदंड प्रमाणावर मराठी गज़ल लिहिली जात असून रोज नवनव्या शक्यतांचे प्रदेश खुले होत आहेत. अमरावती येथे होणारे तिसरे अखिल भारतीय 'एल्गार' मराठी गज़ल संमेलन हे मराठी गज़लच्या प्रवासातले महत्त्वाचे आणि दखलपात्र वळण ठरणार आहे. गज़लचे भवितव्य उज्वल असल्याने गज़लकारांची जबाबदारी देखील वाढते. लिहिणाऱ्यांनी गज़लकारापेक्षा आपल्यातला वाचक आणि आस्वादक टिकून ठेवावा, असे आवाहन तिसऱ्या अखिल भारतीय एल्गार मराठी गज़ल संमेलनाचे अध्यक्ष प्रख्यात गज़लकार वैभव जोशी यांनी केले. तिसऱ्या अखिल भारतीय एल्गार मराठी गज़ल संमेलनाचे अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. स्व. सुरेश भट स्मृती प्रतिष्ठान आणि वसंतराव पालेकर स्मृती प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या दोन दिवसीय संमेलनाला आज संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे थाटात प्रारंभ झाला. मंचावर संमेलनाचे उद्घाटक म्हणून ज्येष्ठ शाहीर सुरेशकुमार वैराळकर, मावळते संमेलनाध्यक्ष डॉ. दिलीप पांढरपट्टे, संमेलनाचे स्वागताध्यक्ष नाना लोडम यांच्यासह विशेष अतिथी म्हणून उर्दू शायर ओबेद आजम आजमी, डॉ. गणेश गायकवाड, ओमप्रकाश चर्जन, गज़लकार नितीन देशमुख आणि दुसऱ्या एल्गार गज़ल संमेलनाचे स्वागताध्यक्ष दगडू लोमटे मंचावर उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते शमा प्रज्वलन तसेच स्व. सुरेश भट आणि स्व. वसंतराव पालेकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. मावळते अध्यक्ष डॉ. दिलीप पांढरपट्टे यांनी संमेलनाची सूत्र विद्यमान अध्यक्ष वैभव जोशी यांना प्रदान केली. यावेळी उद्घाटकीय भाषणात बोलताना शाहीर सुरेशकुमार वैराळकर यांनी मराठी गज़ल समृद्ध होती, आहे आणि भविष्यात होत राहिल, असे मत मांडले. डॉ. पांढरपट्टे यावेळी आपल्या मनोगतातून व्यक्त होताना 'देशभरात अनेक गज़लकार सकस मराठी गज़ल लिहित आहेत हे सुरेश भट यांचे ऋण असून त्यातून उतराई होणे शक्य नाही, असे प्रतिपादन केले. प्रास्ताविकातून नाना लोडम यांनी संमेलनाच्या आयोजनाची भूमिका विषद केली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रशांत वैद्य यांना अंबाजोगाई येथील साधना सेवाभावी संस्थेचा दगडू लोमटे द्वारा दिला जाणारा गज़ल साधना २०२६ हा पुरस्कार तर कुणाल शिरोडे आणि श्वेता बरकडे यांना 'गज़लांकुर' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. काही मराठी गज़ल संग्रहांचे विमोचनही मान्यवरांनी केले. त्यात अजीजखान पठाण यांच्या 'दोन ओळींच्या मधे', राधिका फराटे यांच्या 'मी अस्सल प्रत जन्माची', विजय आव्हाड यांच्या गज़लांचा 'समग्र विजय आव्हाड' आणि जयदीप विघ्ने यांच्या 'रुईची फुले'च्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन झाले.संचालन सुप्रसिद्ध निवेदक नितीन भट यांनी तर आभार नीलेश कवडे यांनी मानले. देशभरातून आलेले शेकडो गज़लकार, शहरातील राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील नामवंत विभूती, गज़लप्रेमी तसेच साहित्यिक या सोहळ्याचे साक्षीदार झाले.

### ■ मराठी, हिंदी मुशायरे आणि गायनाने बहरला पहिला दिवस

उद्घाटक सोहळ्यानंतर संमेलनाचा पहिला दिवस बहरला तो मराठी, हिंदी मुशायरे आणि गज़ल गायनाने. दिवंगत गज़लकार इलाही जमादार, अनिल कांबळे, प्रकाश मोरे, मधुसूदन नानिवडेकर, सतीश दराडे आणि लक्ष्मण जेवणे यांच्या स्मृतीत झालेल्या एकूण आठ मुशायऱ्यांमध्ये देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या गज़लकारांनी आपल्या आशयसंपन्न मराठी गज़ला सादर करून उपस्थितांची दमदार दाद मिळवली. सायंकाळी सुरेश दंडे, गज़लरत्न राजेश उमाळे आणि राहुलदेव कदम यांची संयुक्त गज़ल मैफिल रंगली. गायकांनी रसिकांना दीड तास खिळवून ठेवले. पहिल्या दिवसाचा समारोप स्व. बशर नवाज यांच्या स्मृतीत आयोजित हिंदी- उर्दू मुशायऱ्याने झाला. जनाब हफिज मोमीन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या मुशायऱ्यात ओबेद आजम आजमी, डॉ. दिलीप पांढरपट्टे 'रिंद', डॉ. गणेश गायकवाड 'आगाज', अनंत नांदूरकर 'खलिश', नीलम साळुंखे, सुधीर बल्लेवार 'मलंग', एजाज शेख आदींनी भाग घेतला. सूत्रसंचालन हारून उस्मानी यांनी केले. यावेळी अनंत नांदूरकर 'खलिश' यांच्या 'खलिश बाकी रहे थोडी' आणि सुधीर बल्लेवार 'मलंग' यांच्या 'आईनासाजी' या हिंदी गज़ल संग्रहांचे प्रकाशन करण्यात आले.

### ■ आज संमेलनात काय?

आज गज़ल संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी देखील भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार असून यात ७ मुशायरे आणि एक परिसंवाद होणार आहेत. शिवाजी जवरे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या परिसंवादाचा विषय 'मराठी गज़लचं वर्तमान आणि भविष्य' असा असून यात वक्ते म्हणून आशिष मुजुमदार आणि दत्ता बाळसराफ भाष्य करतील. याचे सूत्रसंचालन जनार्दन म्हात्रे करणार असून आभार नीलेश कवडे मानतील. सायंकाळी आबेद शेख यांच्या अध्यक्षतेखाली तरन्नुम मुशायरा होणार असून यात नितीन देशमुख, आनंद पेंढारकर, दिवाकर जोशी, भैरवी चितळे, प्रमोद राठोड, राम रोगे, अविनाश काठवडे, अलका तालणकर आणि कालिदास चवडेकर गज़ल सादर करतील. याचे सूत्रसंचालन शरद धनगर करतील. रात्री ८ वाजता गज़ल संमेलनाचा समारोप सोहळा मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूरचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. मंचावर संमेलन अध्यक्ष वैभव जोशी, विषेश अतिथी शीतल पालेकर, स्वागताध्यक्ष नाना लोडम उपस्थित राहतील. समारोप सोहळ्यात स्व. व्यंकटराव देशमुख स्मृती पुरस्काराचे वितरण होणार असून गज़लकार गजानन वाघमारे यांना हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. मंगेश आणि क्षिप्रा देशमुख (पुणे) या दाम्पत्याकडून दिल्या जाणाऱ्या या पुरस्काराचे हे पहिले वर्ष आहे. समारोप सोहळ्याचे संचालन अजीजखान पठान करतील. संमेलनाचा समारोप दत्तप्रसाद रानडे यांच्या 'सोबतीचा करार' या गज़ल मैफलीने होणार असून यात वैभव जोशी यांच्या आशिष मुजुमदार यांनी संगीतबद्ध केलेल्या गज़लांचा आस्वाद रसिकांना घेता येईल.

# शहानूर नदीतील सांडपाणी प्रक्रिया उपक्रमावर भर

## नगराध्यक्षांनी सांडपाणी पथकासह नदीपात्राची केली पाहणी



**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

नगरपरिषदेच्या क्षेत्रांतून शहानूर नदीपात्रात शहरातील सांडपाणी वाहून जात असल्याने दुर्गंधी पसरली आहे.शहरातील नदीपात्रात येत असलेले सांडपाणी व्यवस्थापनासाठी एक महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यासाठी नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांनी नदीपात्रातील सांडपाण्याची पाहणी करून स्वच्छ व सुंदर आपले शहर असा एक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले आहे.

शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा दर्जा सुधारण्यासाठी शहरातील नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन नगराध्यक्षांनी केले आहे.विशेष म्हणजे, हा उपक्रम यशस्वी झाल्यास नदीकाठी सौंदर्यात भर पडू शकते. गावातील इतर सर्व मोठ्या शहरांमध्येही अशाच प्रकारचा उपक्रम राबविले जाऊ शकतो.शहरातील मोठ्या प्रमाणात नदीपात्रात सांडपाणी थेट जलस्रोतात न सोडता, त्यावर आधुनिक तंत्रज्ञानाने प्रक्रिया केली जाणार असल्याचे गायगोले यांनी सांगितले. यामध्ये सांडपाण्याचा प्रवाह नियंत्रित करणे आणि त्याचे शुद्धीकरण करणे या कामांचा समावेश आहे. त्यामुळे पर्यावरणाची हानी टळणार असून, पाण्याचा पुनर्वापर करणेही शक्य होणार आहे.

या उपक्रमामुळे पर्यावरण रक्षण होणार असून, दूषित पाणी थेट निसर्गात सोडल्यामुळे होणारे प्रदूषण थांबेल, सांडपाण्यातील घातक घटकांचा नायनाट होणार असून परिसरातील आरोग्य सुरक्षित राहील. प्रक्रिया केलेले पाणी बागकाम किंवा इतर स्वच्छतेच्या कामांसाठी वापरता येईल, ज्यामुळे पिण्याच्या पाण्याची बचत होईल. तसेच हा उपक्रम एक 'मॉडेल' म्हणून पाहिला जात आहे. नगराध्यक्ष हे पेशाने इंजिनिअर असल्याने त्यांचा उपक्रम शहर स्वच्छ सुंदर बनविणे आहे मात्र यात सरकार स्थानिक नगरपरिषदला किती सहकार्य करते हे पाहणे गरजेचे असणार आहे

> ■ शहराच्या मध्यवर्ती भागातून वाहणारी शहानुर नदीतील प्रदूषित सांडपाण्यावर प्रक्रिया करून जलस्रोत स्वच्छ ठेवण्यासाठी नगरपरिषद लोकजागर, शहरातील नागरिकांनी पुढाकार घेतला आहे. यात सांडपाणी प्रक्रिया करणे, प्रक्रिया केलेले पाणी पुनर्वापरासाठी वापरणे, आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शहानूर नदीचे पुनरुज्जीवन करणे यावर भर दिला जात आहे.
>
> **अविनाश गायगोले नगराध्यक्ष**

# मीना कांबळे यांचे सदस्यत्व रद्द करा

## एमआयएम नगरसेवकांनी जिल्हा दंडाधिकारी आणि महापालिका आयुक्तांना निवेदन सादर केले.



**अमरावती/का.प्र.**

एमआयएमच्या जुनी वस्ती वॉर्ड क्रमांक २१ च्या नगरसेवक मीना कांबळे यांनी महापौर आणि उपमहापौरांच्या समर्थनार्थ मतदान केल्याचा मुद्दा चर्चेचा विषय बनत आहे. निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर, सर्व नवनिर्वाचित एमआयएम नगरसेवकांनी जिल्हा दंडाधिकारी आशिष येरेकर आणि महापालिका आयुक्तांची भेट घेतली आणि नगरसेवक मीरा कांबळे यांची हकालपट्टी आणि त्यांचे नगरसेवकपद रद्द करण्याची मागणी केली. एमआयएमचे नगरसेवक शेख हमीद शेख वाहेद यांनी महापालिका आयुक्तांना पत्र सादर केले, ज्यामध्ये असे म्हटले आहे की एमआयएम वॉर्ड क्रमांक २१ च्या नगरसेवक मीरा भगवान कांबळे पक्षाविरुद्ध गेले आहेत.

एमआयएमने सर्व नगरसेवकांना पक्षाच्या विचारसरणी आणि नियमांबद्दल माहिती देणारा औपचारिक व्हीप जारी केला होता, तरीही मीरा कांबळे यांनी महानगरपालिका कायदा आणि पक्षांतर विरोधी कायद्याचे उल्लंघन केले. परिणामी, पक्षाविरुद्ध मतदान केल्याबद्दल मीरा कांबळे यांना दोषी ठरवण्यात आले.त्यांचे सदस्यत्व तात्काळ रद्द करण्याची कारवाई करावी. या मागणीचे निवेदन विभागीय आयुक्त आणि जिल्हा दंडाधिकाऱ्यांनाही सादर करण्यात आले आहे. प्रशासन या प्रकरणात काय कारवाई करते हे पाहावे लागेल. सध्या पक्षाने नगरसेवक मीरा कांबळे यांना पक्षातून काढून टाकण्याची कारवाई केली आहे.

> एमआयएमच्या नगरसेवक मीरा कांबळे यांनी पक्षाच्या नियमांचे उल्लंघन करून महापौर आणि उपमहापौरपदाच्या निवडणुकीत भाजप आणि युवा स्वाभिमानच्या उमेदवारांना पाठिंबा देऊन मतदान केले, पक्षाचा व्हीप जारी असतानाही. असे असूनही मीरा कांबळे यांनी पक्षाच्या नियमांचे उल्लंघन करून मतदान केले. अशा फसव्या नगरसेवकांना पक्षात स्थान नाही. मीरा कांबळे यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल.
>
> **-हाजी इरफान, शहराध्यक्ष, एमआयएम**

## संक्षिप्त

### माळी व ओबीसी समाजाचा घटस्फोटीत परिचय मेळावा

**अमरावती-**येथील क्रांती ज्योती ब्रिगेड संघटनेच्या वतीने १५ वा राज्यस्तरीय माळी व ओबीसी समाजाचा पुनर विवाहित, घटस्फोटीत, विधवा, विधुर,वयस्क युवक युवती व पालक परिचय मेळावा रविवार २२ फेब्रुवारी २६ रोजी स्थानिक पंचवटी चौकातील मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृहात सकाळी ११ ते ४ पर्यंत आयोजित करण्यात आला आहे.संमेलनात 'जीवनवेल' परिचय पुस्तिकेचे विमोचन उपस्थित मान्यवर यांचे हस्ते होईल. परिचय पुस्तिका मध्ये नोंदणी निशुल्क असून नोंदणीची अंतिम १० फेब्रुवारी आहे. इच्छुक युवक युवती व पालकांनी नोंदणी करण्याचे आवाहन केले आहे.

### संत गजानन महाराज प्रकटदिन महोत्सव

**अंजनगाव बारी-**परिसरातील आसरा नगर येथे गजानन महाराज मंदीराचे वतीनें संत गजानन महाराज प्रक़टदिन महोत्सव साजरा केल्या जात आहे.या निमित्त ८ फेब्रुवारी पर्यंत राबविला जात असुन सप्ताहाभर भजन, किर्तन, हरिपाठ, कलश स्थापना, ग्रंथ शोभायात्रा काल्याचे किर्तन असे विवीध कार्यक्रम राबविण्यात येणार आ श्री राम कथा ज्ञानयज्ञ सप्ताहात कथा प्रवक्ता ह.भ.प. अभिनंदन गायकवाड महाराज (सोलापूर) यांचे मधूर वाणीतून श्रीराम कथेचे श्रवण भाविक- भक्तांना करिता येईल.रविवार ८ला ला सकाळी १० ते १२ काल्याचे किर्तन किर्तनकार ह.भ.प. शंकगीर महाराज यांचे वाणीतुन होणार आहे. भव्य महाप्रसादाच्या आयोजनाने महोत्सवाचा समारोप होणार आहे.

# जी एच रायसोनी विद्यापीठात रस्ता सुरक्षा जनजागृती



**अमरावती-** शहरातील महामार्ग पोलीस विभाग, बडनेरा आणि जी एच रायसोनी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत एक जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमातून विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये रस्त्यावरील दुर्घटनांबाबत जागृती निर्माण करण्यावर भर देण्यात आला.कार्यक्रमाला महामार्ग पोलीस विभाग, अमरावतीचे पोलीस निरीक्षक संदीप धोबे, नागपूरचे अधिवक्ता डॉ. राजेंद्र गुंडलवार, महामार्ग पोलीस बडनेरा येथील पोलीस उपनिरीक्षक रविंद्र इंगळे व गजानन देशमुख, तसेच जी. एच. रायसोनी विश्वविद्यालयाचे कुलसचिव डॉ. स्नेहिल जैस्वाल आणि विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता डॉ. प्रशांत अवचट यांची प्रमुख उपस्थिती होती.

पोलीस निरीक्षक संदीप धोबे यांनी मार्गदर्शन केले. अभियानांतर्गत त्यांनी सर्वांना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याची आणि इतरांच्या सुरक्षेची काळजी घेण्याची आवाहन केले.कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन आणि संयोजन राष्ट्रीय सेवा योजना प्रभारी विशाल सपाटे यांनी केले. हा कार्यक्रम रस्ता सुरक्षा अभियानाला बळ देणारा ठरला आहे.

# अमरावतीमध्ये अ.भा.आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल महिला स्पर्धेचे उद्घाटन

## ९८ विद्यापीठांचा सहभाग;पाच दिवस रंगणार सामने






**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व श्री शिवाजी शिक्षण संस्था संचालित श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल (महिला)स्पर्धा २०२५-२६ चे भव्य उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. सॉफ्टबॉलच्या इतिहासात प्रथमच महिला आणि पुरुष अशा दोन्हीगटांच्या राष्ट्रीय स्पर्धा एकाच वेळी आणि एकाच ठिकाणी आयोजित करून अमरावतीने एक नवा इतिहास रचला आहे.उद्घाटन समारंभात प्रमुख अतिथी म्हणून अमरावतीचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगाले,प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, महाराष्ट्र सॉफ्टबॉल असोसिएशनचे सहसचिव डॉ. सुरजसिंह येवतीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनीषा कोडापे,डॉ. श्वेता बारहाते,डॉ. स्वाती ढोरे, निर्मला हर्षवर्धन देशमुख,प्रेरणा दिलीपबाबू इंगोले,मीना विजय ठाकरे, शारीरिक शिक्षण व क्रीडा मंडळाचे संचालक डॉ. तनुजा राऊत, सदस्य प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे, डॉ. सतीश पहाडे, डॉ. विकास टोणे, प्राचार्य डॉ. जी व्ही कोरपे, डॉ. रूपाली इंगोले, ए.आय.यु.चे निरीक्षक दिलीप तूरकी, स्पर्धेचे मुख्य परीक्षक मुकुंद देशपांडे आदी उपस्थित होते.

### खेळ माणसांना जोडतो - जिल्हाधिकारी


प्रमुख अतिथी म्हणून खेळाडूंना संबोधित करताना जिल्हाधिकारी येरेकर यांनी अमरावतीच्या पावन भूमीत सर्व खेळाडूंचे स्वागत केले. ते म्हणाले की, 'अमरावती ही अंबादेवी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांची भूमी आहे. या भूमीने देशाला अनेक नामवंत खेळाडू दिले आहेत. खेळाचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी सांगीतले की, भारतातील विविध राज्यांतून आलेल्या खेळाडूंमुळे शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, खेळ हे सर्व प्रांतांना एकत्र जोडण्याचे एक महत्त्वाचे साधन आहे. 'केवळ शिस्तबद्ध व्यक्तीच आयुष्यात खऱ्या अर्थाने प्रगती करू शकतो.' खेळांमुळे आयुष्यात शिस्त येते. संघभावना आणि स्वतःवरचा विश्वास या गोष्टी खेळामुळे शिकायला मिळतात, ज्यामुळे खेळाडूच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास होतो. पुढील चार दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत देशभरातील विविध विद्यापीठांचे संघ सहभागी झाले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व महिला खेळाडूंना शुभेच्छा देत त्यांनी देशपातळीवर उत्तम कामगिरी करून देशाचे नाव उज्ज्वल करावे, अशी आशा व्यक्त केली.

दिलीपबाबू इंगोले मनोगत व्यक्त करताना म्हणाले,अमरावती ही रुक्मिणीची नगरी आणि चिखलदरा हे भीमाचे स्थान (जिथे कीचक वध झाला) असल्याचे सांगून त्यांनी देशभरातून आलेल्या खेळाडूंचे पौराणिक संदर्भासह स्वागत केले. नुकत्याच झालेल्या मुलांच्या स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडल्या असून, आता ६ ते १० तारखेपर्यंत मुलींच्या स्पर्धा चालणार आहेत. हार-जीत पेक्षा एकता आणि खेळाडूवृत्ती महत्त्वाची आहे. प्रत्येकाने 'इंडिया' टीममध्ये खेळण्याचे स्वप्न उराशी बाळगून मैदानात उतरण्याचे आवाहन त्यांनी केले. खेळाडूंच्या राहण्याची आणि जेवणाची उत्तम व्यवस्था करण्यात आली असून, कोणत्याही तांत्रिक किंवा प्रशासकीय अडचणी आल्यास त्या तत्परतेने सोडवण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे.

अध्यक्षीय भाषणातून कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी खेळाडूंना संबोधित करताना अमरावतीच्या ऐतिहासिक वारशाचा उल्लेख केला आणि खेळाडूंना 'टीम स्पिरिट'ने खेळण्याचे आवाहन केले.अमरावती ही अंबाबाई आणि श्रीकृष्णाची पत्नी रुक्मिणी यांची नगरी आहे. त्यामुळे या जिल्ह्याला मातृशक्तीचा मोठा आशीर्वाद आणि परंपरा लाभलेली आहे. या स्पर्धेसाठी देशभरातून आणि विविध राज्यांतून सुमारे ९८ महिलांचे संघ अमरावतीत दाखल झाले आहेत. जरी प्रत्येकाची भाषा आणि पार्श्वभूमी वेगळी असली, तरी सर्वांच्या मनात भारताविषयीचे प्रेम आणि भावना एकच आहेत.'विविधतेत एकता' हीच आपल्या देशाची खासियत असल्याचे त्यांनी सांगितले.

सुरुवातीला क्रीडा ज्योत मान्यवरांच्या हस्ते प्रज्वलित करण्यात आली. कर्मयोगीश्री संत गाडगेबाबा व शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्याप्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. तिरंगा असलेली फुगे मान्यवरांच्या हस्ते आकाशात सोडण्यात आली. स्मृतीचिन्ह व पुष्प देऊनपाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. स्वागतपर भाषण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.व्ही. कोरपे यांनी केले. प्रास्ताविक डॉ. तनुजा राऊत संचालन डॉ. रेखा मग्गीरवार व डॉ. मुकुंद भोंडे यांनी तर आभार डॉ. रूपाली इंगोले यांनी मानले. डॉ. अवंतिका मानकर यांनी प्रेरणादायी गीत सादर केले. कार्यक्रमाला देशभरातील सर्व विद्यापीठांचे सहभागी खेळाडू, विद्यापीठ व शिवाजी शिक्षण संस्थेच्या विविधप्राधिकारणींचे सन्माननीय सदस्य,शिक्षक अधिकारी, कर्मचारी, तसेच गणमान्य नागरिक मोठ्यासंख्येने उपस्थित होते. अमरावतीकर नागरिकांनी या स्पर्धांचा आनंद घ्यावा, असे आवाहन विद्यापीठ व महाविद्यालयाच्या वतीने करण्यात येत आहे.

# गण गण गणात बोते!!



गजानन महाराज हे महाराष्ट्रातील थोर संत असून, त्यांचा प्रभाव संपूर्ण महाराष्ट्रात तसेच भारतभर आहे. त्यांचे जीवन अत्यंत रहस्यमय होते, आणि त्यांच्याबद्दलच्या अनेक गोष्टी आजही भक्तांच्या श्रद्धेचा भाग आहेत. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे, आणि येथे अनेक महान संतांनी आपले जीवन भक्ती, ज्ञान, आणि सेवा यासाठी अर्पण केले आहे. अशा महान संतांपैकी एक म्हणजे श्री गजानन महाराज. ते १८७८ साली शेगाव येथे प्रकट झाले आणि भक्तांसाठी एक अद्भुत आध्यात्मिक दीपस्तंभ बनले. त्यांच्या चमत्कारिक लीला आणि उपदेश आजही लाखो भक्तांना मार्गदर्शन करतात.

श्री गजानन महाराज हे एक दिव्य संत होते, ज्यांनी आपल्या अलौकिक शक्ती आणि भक्तसंवर्धनाच्या कार्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात श्रद्धेचे केंद्र निर्माण केले.त्यांचे 'गण गण गणात बोते' हे मंत्र वाणी आणि त्यांचे चमत्कार भक्तांसाठी प्रेरणादायी ठरले. १८७८ साली शेगाव येथे प्रकट झालेल्या महाराजांनी सेवा, परोपकार आणि भक्तीचा मार्ग दाखवला. त्यांनी गरिबांना मदत केली, अनेक चमत्कार घडवले आणि त्यांच्या साध्या पण प्रभावी शिकवणींनी लोकांना जीवनाचा खरा अर्थ शिकवला. १९१० मध्ये त्यांनी समाधी घेतली, पण आजही शेगावच्या मंदिरात त्यांची भक्ती अविरतपणे चालू आहे.

श्री गजानन महाराज यांच्या भक्तीसंपन्न आणि चमत्कारिक लीलांमुळे ते अजरामर झाले.त्यांच्या जीवनात असे अनेक प्रसंग घडले, जिथे त्यांनी भक्तांच्या संकटांचे निवारण केले आणि त्यांना भक्तीमार्गाची प्रेरणा दिली. रुग्णांना केवळ त्यांच्या स्पर्शाने बरे करणे, उपासमारलेल्या भक्तांना अन्नप्रदान करणे, आणि निसर्गाशी संवाद साधून चमत्कार घडवणे, अशा त्यांच्या अद्भुत लीलांनी लोकांच्या हृदयात अढळ स्थान मिळवले.आजही शेगावच्या समाधीस्थळी लाखो भाविक येऊन त्यांच्याकडे आशीर्वाद मागतात, आणि त्यांच्या उपदेशांवर चालत जीवनाला नवी दिशा देतात.

श्री गजानन महाराज हे एक दिव्य संत होते, आणि त्यांची जीवनगाथा अनेक अद्भुत चमत्कारांनी भरलेली आहे.

अन्नदान आणि जिवदान: एकदा, एक भक्त अत्यंत अशक्त आणि मरणासन्न स्थितीत गजानन महाराजांकडे आला. श्री गजानन महाराजांनी त्याला आशीर्वाद दिला आणि तो भक्त पुनः स्वस्थ झाला. त्याने आपल्या जीवनाची पुन्हा सुरूवात केली.

तांदळाच्या शिळ्यांमध्ये भाकरी: गजानन महाराज एकदा एका गोठ्यात तांदळाच्या शिळ्यांमध्ये भाकरी खात होते. हे पाहून लोक आश्चर्यचकित झाले. त्याच वेळी तेच शिळ्यांमध्ये अन्नाचे भंडार तयार झाले.

स्पर्शाने रोगमुक्ती: महाराजांच्या स्पर्शाने अनेक भक्तांच्या शारीरिक दुखण्यांवर चमत्कारीक उपचार झाले. त्यांनी भक्तांच्या वेदना समजून त्यांना शारीरिक आणि मानसिक शांतता दिली.

निसर्गाशी संवाद: गजानन महाराज यांनी निसर्गाशी एक अद्वितीय संवाद साधला. त्यांनी पाणी, वाऱ्याशी संवाद करून चमत्कार घडवले. एका प्रसंगी ते पावसाची मागणी करत असताना पाऊस पडला.

आध्यात्मिक मार्गदर्शन: गजानन महाराज नेहमी भक्तांना योग्य मार्गावर चालण्याचा आणि आत्मा आणि परमेश्वराचा संग यावर ध्यान देण्याचा उपदेश करत. त्यांचे शब्द आणि उपदेश नेहमीच साधे आणि प्रभावी होते.

दान आणि सेवा: त्यांनी गरिबांना अन्नदान केले आणि मदतीची हातवाटी केली. तसेच, त्यांनी त्यांची शिक्षण संस्था सुरू केली, ज्याद्वारे गरिब मुलांना शिक्षण दिले जात होते.

'गण गण गणात बोते' मंत्र: गजानन महाराजांचा प्रसिद्ध मंत्र 'गण गण गणात बोते' हा मंत्र भक्तांच्या जीवनाला आधार देणारा ठरला. या मंत्राने भक्तांचा आत्मविश्वास आणि श्रद्धा वाढली.

निस्वार्थ सेवा: महाराजांनी सर्वांगीण सेवा आणि निस्वार्थ भावनेने भक्तांची सेवा केली. त्यांचे जीवन समर्पण, सेवा आणि भक्तीसारखे होते. त्यांनी संसाराच्या मोहापासून मुक्त होण्याचा मार्ग दाखवला. श्री गजानन महाराजांचे चमत्कार आणि भक्तसंवर्धन हे त्यांच्या दिव्यतेचे प्रतीक होते. त्यांच्या शिकवणींमुळे आणि चमत्कारांनी लाखो भक्तांचे जीवन बदलले आणि आजही त्यांच्या मार्गावर लाखो लोक चालत आहेत.

**महाराजांची शिकवण आणि तत्वज्ञान**

भक्तीचा मार्ग- श्री गजानन महाराज यांचा प्रमुख उपदेश भक्तीवर आधारित होता. त्यांचे म्हणणे होते की, 'भगवानात विश्वास ठेवून, निस्वार्थ भावनेने केलेली पूजा आणि सेवा जीवनाचे शुद्धीकरण करते.'

भक्ती हेच जीवनाचे अंतिम ध्येय आहे.ईश्वरावर अढळ श्रद्धा ठेवा आणि त्याच्या नावाचा जप करा. त्यांचे प्रसिद्ध मंत्र 'गण गण गणात बोते' हाही भक्तीच्या प्रवासाची महत्त्वाची शिकवण आहे.

सेवा आणि परोपकार– श्री गजानन महाराज यांचे जीवन पूर्णपणे सेवा आणि परोपकाराने ओतप्रोत होते. 'सेवा करा, परोपकार करा, आणि दुसऱ्यांचे भले करा.' त्यांचे मान्य होते की सेवा हेच खरे धार्मिक कर्तव्य आहे. गरीबांना मदत करणे, दुःखी लोकांना आश्वासन देणे आणि लोकांच्या दुःखात सामील होणे हे त्यांच्या जीवनाचे मुख्य ध्येय होते.

अहंकार आणि लोभाचा त्याग- श्री गजानन महाराज यांचा उपदेश होता की, आत्मा शुद्ध करण्यासाठी अहंकार आणि लोभाचा त्याग करावा लागतो. अहंकार आणि लोभ हे जीवनाचे शत्रू आहेत. त्यांनी सांगितले की, 'स्वतःला महान समजून दुसऱ्यांना दुर्बल समजणे हे चुकीचे आहे.' जीवनात सत्त्व, शांति आणि प्रेम यांचे महत्त्व आहे.

साधेपणा आणि शांती- श्री गजानन महाराज यांचे जीवन अत्यंत साधे होते. त्यांनी आपल्या कार्यांमध्ये एक प्रकारचा निस्वार्थ साधेपणा दाखवला. 'शांतता आणि साधेपणा हाच वास्तविक सुखाचा मार्ग आहे.' श्री गजानन महाराज यांनी सांगितले की, संपत्ती आणि भौतिक सुख हे तात्पुरते असतात, परंतु आत्मिक शांति आणि साधेपणा हे कायमचे असतात.

गुरु भक्ती– गजानन महाराज यांचा उपदेश होता की, गुरु हे ईश्वराचे प्रत्यक्ष रूप आहेत. 'गुरूचाच मार्ग अनुसरण करा, त्याचे शब्द वाचा आणि त्यांच्यावर विश्वास ठेवा.' श्री गजानन महाराज नेहमी म्हणत की, गुरुच्या कडून मिळालेल्या मार्गदर्शनामुळेच जीवनाचे खरे मूल्य समजते.

आत्मज्ञान आणि सत्य शोध- श्री गजानन महाराजांचे तत्वज्ञान आत्मज्ञानावर आधारित होते. ते म्हणत, 'आत्मा शुद्ध आहे, त्याला शोधा आणि सत्य गाठा.' आपल्या विचारांचा नियंत्रण ठेवा आणि सत्याची प्राप्ती करण्यासाठी साधना करा. त्यांचे तत्वज्ञान या मार्गावर चालण्याची प्रेरणा देते की, आपण आपल्या आंतरिक शक्तीचा उपयोग करून सत्य शोधू शकतो.

'गण गण गणात बोते' हे मंत्राचे महत्त्व- 'गण गण गणात बोते' हा मंत्र श्री गजानन महाराजांनी दिला आणि तो भक्तांच्या जीवनात अमूल्य ठरला. या मंत्राच्या उच्चारणामुळे मनातील सर्व नकारात्मकता दूर होते आणि शुद्धता प्राप्त होते. या मंत्राने आत्मविश्वास वाढतो आणि जीवनात सुख-शांती येते.

**गजानन महाराज संस्थान आणि त्याचे सामाजिक कार्य**

श्री गजानन महाराज हे एक महान संत होते, जिने आपल्या जीवनाने भक्ती, साधना, आणि निस्वार्थ सेवा यांचे महत्त्व शिकवले. त्यांच्या शिकवणीमध्ये भक्ती, साधेपणा, अहंकाराचा त्याग, सेवा, परोपकार, आणि आत्मज्ञान यांचा समावेश होता. त्यांच्या चमत्कारिक लीलांमुळे आणि भक्तांसाठी केलेल्या कार्यांमुळे ते अजरामर झाले.

श्री गजानन महाराजांची समाधी आणि मंदिर हे आज भक्तांच्या आस्थेचे केंद्र बनले आहे. त्यांच्या समाधीस्थळी दररोज लाखो भक्त येऊन पूजा, आरती आणि ध्यान करतात. शेगाव मंदिर त्यांच्या कार्याचा साक्षीदार आहे आणि इथल्या सामाजिक कार्यांमुळे ते लाखो लोकांच्या जीवनात आशेचा किरण बनले आहेत.'गण गण गणात बोते' या मंत्राने लाखो लोकांच्या जीवनात शांति आणि आंतरिक बल निर्माण केले. श्री गजानन महाराजांच्या जीवनाचा संदेश आजही मानवतेला दिशा देतो, आणि त्यांच्या शिकवणींवर चालल्यास जीवनातील अडचणी दूर होतात.

श्री गजानन महाराजांचे जीवन आणि कार्य आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतात.जीवन साधेपणाने आणि निस्वार्थ भावनेने जगायला हवे, कारण त्याच्यातच खरा सुख आणी शांती आहे.(साभार-लेख मराठी)

# एकनिष्ठ प्रेम..

आयुष्यात प्रत्येक जण कधी ना कधी प्रेमात पडतोच...!कुणी चेहऱ्यावर, काळजावर, वागणुक, जिव्हाळा, आपलेपण, काळजी, काही विशिष्ट गुण,दिसण,वागणे, बोलणे, राहणे,भावनात्मक, फॅशन यासारख्या अनेक गोष्टी ज्या चालता बोलता,कळत नकळतपणे, आपल्याशी घडतात किंवा आकर्षित होतात तेव्हा आपणही प्रेमवेडे होता. प्रेमाला वयाचे बंधन नाही. प्रेम हे कुटुंब समाज तसेच भावनिक आरोग्य जपण्यासाठी एक माध्यम आहे, आपण म्हणतो ना की कुणाला जिकायचे असेल तर प्रेमाने जिंका...दोन शब्द प्रेमाचे अन ऋणानुबंध आयुष्याचे ...खरेच आहे.

प्रेम हे मैत्रीत, कुटुंबात, आपल्या सानिध्यात येणाऱ्या भावनात्मक बंधने जाणणाऱ्या प्रत्येक सजीव गोष्टीत प्रेम घडते.आपल्या घरातील सदस्या व्यतिरिक्त आपल्या दैनंदिन सहवासात असणारी प्रत्येक जण आपले मित्र, सोबती, अन पाळीव प्राणीही आपल्या वागणुकीमुळे ही कधी ना कधी आपल्या प्रेमात पडतात.

प्रेम होणे अन ते शेवटपर्यंत टिकवणे ही खऱ्या नात्याची निशाणी आहे.नाहीतर परिस्थिती प्रमाणे बदलणारी अनेक जण आज विविध संबंधात गुरफटून गेली आहेत स्वतःला खऱ्या प्रेमाची जाणीव होण्यासाठी त्याग,संयम,समजूतदार,अन काळजी, जवाबदारी ची सवय असली की रोजच रोज डे, प्रपोज डे,चॉकलेट डे, टेडी डे,प्रॉमिस डे, हग डे,किस डे, व्हॅलेंटाईन डे. आजच्या आधुनिक जीवनशैली मध्ये सोशल मीडिया मुळे अनेक जण फास्ट फ्रेंड होऊन निववळ जवळीक साधून प्रेमसुख घेण्यासाठी उतावीळ झालीत. त्या मुळे खऱ्या प्रेमाचा आनंद घेण्यास कुठेतरी उणीव भासत आहे.म्हणून खरे प्रेम मिळणे अन ते टिकवणे ही नात्याची पहिली पायरी आहे..

**उमेश ईखे-मो.९५१८५७११३८**

# ढासळती गुणवत्ता अन् भविष्यातील शिक्षक व शिक्षणाची अवस्था

उद्याची पिढी घडवणाऱ्या राज्यातील प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षक पात्रतेसाठी महत्त्वाची असलेली महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीईटी) च्या २०२५ मध्ये झालेल्या अंतिम परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. मात्र, या निकालाने राज्यातील अनेकांच्या अपेक्षांवर पाणी फेरले गेले आहे. हा निकाल शिक्षण क्षेत्रास चांगलाच धक्का देणारा ठरला असून राज्यातील शिक्षक गुणवत्तेवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. या परीक्षेत केवळ ११.२८ टक्के शिक्षक उमेदवार उत्तीर्ण झाले. ४.७५ लाख शिक्षकांपैकी ३ लाख ९६ हजार शिक्षक अनुत्तीर्ण झाले ही बाब धक्कादायक आहे. केवळ धक्कादायकच नसून भविष्यातील शिक्षक व शिक्षण यांच्या दारुण परिस्थिवर प्रकाश टाकणारी आहे. सर्वाधिक कन्नड माध्यमाचे १५ टक्के तर मराठीचे १२.२८ टक्के, हिंदीचे १२.१९ टक्के तर तेलुगू माध्यमाचे याच सरासरीच्या आसपास उमेदवार उत्तीर्ण झाले. यात उर्दू, इंग्रजी आणि विशेषत: गुजराती माध्यमाचा निकाल सर्वात कमी ३.४४ टक्के लागला.

क्षेत्र कोणतेही असो मग ते आयटीचे असो की वैद्यकीय. झपाट्याने होणा-या बदलांना सामोरे जाताना स्वत:ला कालसुसंगत राखणे हे आवाहन झाले आहे. एकदा डीएड झालो आणि शिक्षक म्हणून चिकटलो की मोकळे ही ब-याच शिक्षकांची मानसिकता...आता वर्षानुवर्ष मी कुठल्याही परीक्षेला कशाला सामोरे जायचे? या भावनेतून टीईटी परीक्षेला काही शिक्षक संघटनांचा विरोध राहिला. अन्य क्षेत्रात स्वत:ला अपडेट ठेवण्याकरिता धडपड सुरु असताना शिक्षकांनी अशी भूमिका घेणे हे योग्य नव्हेच. एआयमुळे वेगवेगळ्या क्षेत्रात झपाट्याने बदल होत आहेत. भविष्यात शिक्षण क्षेत्रही त्यापासून वेगळे नसेल. त्यामुळे आपल्या बुद्धीला तावूनसुलाखून पाहण्यात काहीच गैर नाही.

मात्र, ज्यांनी शिकविण्याकरिता अजून खडू हातात धरलाही नाही, अशा शिक्षकांची या परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्याची मोठी संख्या आहे. आता जे उत्तीर्ण झाले ते सध्या शिक्षक असून ही परीक्षा दिल्याखेरीज आपली नोकरी कायम होणार नाही, अशी टांगती तलवार मानगुटीवर कायम असल्याने ज्यांनी परीक्षा दिली तेच यात उत्तीर्ण झाल्याने निकाल ११ टक्क्यांच्या आसपास लागला. यावरून भविष्यातील शिक्षक व शिक्षण यांची अवस्था कशी भीतीदायक आहे, याचाच साक्षात्कार होतो. शिक्षक होण्याकरिता धडपडणा-यांना अपयश येण्याचे मुख्य कारण हे सध्याच्या कंत्राटी शिक्षणात आहे. अनेक युवक-युवती वेळप्रसंगी अन्य छोटी-मोठी कामे करणे पसंत करतात. मात्र, शिक्षक होण्याला तिलांजली वाहतात. अत्यल्प वेतन देऊन अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षकांची पिळवणूक होते. एका रकमेवर स्वाक्षरी घ्यायची आणि अत्यल्प रक्कम हातावर टेकवायची, असे प्रकार अनेक शैक्षणिक संस्थामध्ये सर्रास होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे अन्य कुठल्याच क्षेत्रात पाय रोवता आला नाही तोच शेवटचा पर्याय म्हणून या क्षेत्राकडे वळतो, असे म्हटले तर ते अयोग्य ठरणार नाही. याच भीतीपोटी असले प्रकार सहन करण्यावाचून पर्याय नसतो.

ज्यांना निवृत्तीला केवळ ६ महिने बाकी आहेत. अशा शिक्षकांनाही ही परीक्षा सक्तीची केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे ही परीक्षा अनिवार्य केली गेली. एकीकडे अशैक्षणिक कामाच्या बोजाने शिक्षक त्रस्त आहेत. शालेय पोषण आहारातील तांदुळाचा हिशेब ठेवण्यापासून तंबाखुमुक्त अभियानाची माहिती सरकारला भरून देण्यापर्यंत जवळपास शंभरेक कामे शिक्षकांना लावली आहेत. सरकारचे अशैक्षणिक कामे शिक्षकांवर लादण्याचे धोरण असमर्थनीय आहे. यामुळे शिक्षकांचे मूळ कामाकडे दुर्लक्ष होत आहे. या कामांच्या बोजाने शिक्षक अक्षरश: वाकले आहेत. शिवाय शिक्षकांकरिता वेगवेगळे प्रशिक्षण आयोजित केले जाते. त्यामुळेही या परीक्षेला विरोध होत आहे. टीईटी परीक्षेची काठिण्य पातळी जास्त आहे. दिलेल्या ४ पर्यायातून १ पर्याय निवडायचा असतो. शिवाय निगेटिव्ह मार्किंग (नकारात्मक गुण पद्धत) आहे. त्यामुळे अनेकदा शिक्षकांचा गोंधळ उडतो. परिणामी त्यांच्या पदरात भोपळा पडतो. जसे टीईटी परीक्षेला विरोध करणा-यांचे समर्थन करता येत नाही तसेच टीईटीची सरसकट सक्ती ही देखील योग्य म्हणता येत नाही. विद्यार्थ्यांकडून गुणवत्तेची व पैकीच्या पैकी गुणांची अपेक्षा करणा-या शिक्षकांनी टीईटी परीक्षेत अधिक चमकदार कामगिरी करून आपली गुणवत्ता सिद्ध करावी ही अपेक्षा बाळगणे अचूक आहे.

**● सुनील शिरपुरे**
कमळवेल्ली,यवतमाळ
मो.-७०५७१८५४७९

**तिसरे अ.भा.गझल संमेलन अमरावती येथे ७ आणि ८ फेब्रुवारी रोजी होत आहे.हेच निमित साधून यावर्षीपासून मंगेश आणि क्षिप्रा देशमुख यांनी त्यांचे काका गझलकार स्व. व्यंकटराव उर्फ सुभाष देशमुख यांच्या स्मृतिप्रित्यर्थ 'गझल गुंफण' पुरस्कार देण्याची परंपरा सुरू केली असून ती निरंतर सुरू राहणार आहे. त्याचे औचित्य साधून स्व. व्यंकटराव उर्फ सुभाष देशमुख यांच्या कार्याचा घेतलेला आढावा.**

# एक अर्धवट मतला...

काही माणसे कधीच घडाघडा बोलत नाहीत. व्यक्त होत नाहीत. पण म्हणून त्यांचा भावनेशी छत्तीसचा आकडा असतो का? ते भावनाशून्य असतात का? तर, उत्तरादाखल 'नाही' हाच शब्द सापडतो. खरंतर अशी माणसे परिस्थितीशी दोन हात करताना मन आणि व्यवहाराच्या कात्रीत अडकलेली असतात. जगण्यासाठी, प्रपंचासाठी मनाविरूद्ध करावा लागणारा पराकोटीचा संघर्ष आणि त्यासाठी स्वतःच्या आवडी-निवडीवर फेरलेले पाणी ही घुसमट त्यांच्या या अबोल्यातून सातत्याने जाणवत रहाते. हा कोंडून ठेवलेला श्वास कधी मोकळा करावा म्हणून एखादी कला, एखादा छंद? विरंगुळ्याचे साधन बनते आणि कालांतराने तेच त्यांचे जगण्याचे कारणही ठरते ! मग मात्र अशी माणसे इहलोकातून गेल्यानंतरही बोलत रहातात. जाण्याआधीच सगळे बोलून ठेवतात ... शब्दांत, ओळींत, शेरांत. स्व. व्यंकटराव उर्फ सुभाष देशमुख याच पठडीतले होते.

आज मागे वळून पाहताना जाणवते, ते आपल्याशी बोलत नव्हते; तर आयुष्यभर स्वतःशीच संवाद साधत होते. आपण फक्त तो ऐकत होतो.११ फेब्रुवारी १९५२ अकोला जिल्ह्याच्या पातुर तालुक्यातील चरणगावसारख्या आडवळणाच्या गावात केशवराव देशमुखांच्या घरात त्यांचा जन्म झाला. सात भावंडांमध्ये वाढतानाच व्यंकटराव स्वतःतच रमणारे, मूडी आणि बऱ्यापैकी तापट वृत्तीचे म्हणून वेगळे जाणवत होते. त्यांचे हे वेगळेपण हळव्या, संवेदनशील, कलासक्त मानसिकतेमुळे असल्याचा साक्षात्कार व्हायला त्यांच्या वयाची तीशी उलटावी लागली. व्यवसाय म्हणून एसटी महामंडळाची नोकरी स्वीकारल्यावरही रितेपणा जाणवत राहिला आणि त्यांनी ही मनाची घालमेल कागदावर उतरवायला सुरुवात केली. ते लेखन पद्यरुपात अधिक बहरले. १९९० च्या काळात गझलेचा झंझावात असलेल्या सुरेश भटांचा 'काफला' हा गझलसंग्रह वाचनात आला आणि व्यंकटरावांना लेखनाची दिशा गवसली. उण्या पुऱ्या दहा वर्षात त्यांनी केवळ अठरा ते वीस गझल आणि वीसेक मतले लिहिले; मात्र जे लिहीले ते सकस आणि मनाच्या गाभाऱ्यातून प्रसवलेलेच ! 'काफला' ते 'कारवा' या प्रवासात आयुष्याच्या कित्येक क्षणांचा धांडोळा त्यांनी मांडून ठेवला आहे. त्यांची जगाकडे पहाण्याची दृष्टी आणि जगाने त्यांच्या वाट्याला दिलेल्या अनुभवांचे दान याची सांगड घालत त्यांची गझल सशक्त झाली. त्यातूनच त्यांनी स्वतःला पडलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळवण्याचा प्रयत्नही केला; मात्र काही प्रश्न उत्तरांसाठी नसतात. ते फक्त मनावरचे ओझे हलके करतात.

**दिले तारुण्य मी तेव्हा कुणाला अन् कशासाठी..**
**कुणाची याद म्हातारी मला येथे छळे आता?**

ही तक्रार नाही;ही स्वीकारोक्ती आहे.तारुण्य दिले,पण मोबदल्यात काहीच उरले नाही, फक्त थकलेली,छळणारी आठवण. या ओळी वाचताना कळते,गझल लिहिणे म्हणजे त्यांनी स्वतःला उलगडणे होते. खरंतर हा शेर वाचताना सरळ जाणवते,की ते इतर कुणाला नाही तर स्वतःलाच जाब विचारत आहेत.यातली 'म्हातारी याद' ही प्रतिमा म्हणजे त्यांच्या थकलेल्या मनाचा आरसा आहे.तारुण्य दिले गेले,पण कुणाला दिले, कशासाठी दिले,याचे उत्तर त्यांनाही ठाऊक नाही.ते फक्त एवढेच मान्य करतात की आठवण आता म्हातारी झाली आहे, पण अजून गेली नाही.

गझल म्हणजे शिस्त,हे व्यंकटरावांना चांगलेच माहीत होते. म्हणूनच ते स्वतःला सतत आठवण करून देताना दिसतात.

**होईल तो उद्याला साधू खराखुरा..**
**त्याच्याकडे मिळाला वाल्या तुझा सुरा..**

इथे ते आपल्याला काही सांगत नाहीत. ते स्वतःलाच बजावतांना दिसतात की साधुत्व म्हणजे गुळमुळीतपणा नाही.

परिवर्तनासाठी आतल्या वाल्याला सामोरे जावेच लागते. माणसाच्या दुटप्पी वागणुकीचा बेगडीपणाचा बुरखा फाडताना इथे त्यांचे मन व्यथित झालेले दिसते. हा शेर म्हणजे त्यांनी स्वतःशी केलेली करडी, प्रामाणिक प्रतिज्ञा आहे. शेरात परिवर्तनाची वेदना आहे. म्हणूनच त्यांच्या गझलेत गोडवे कमी आणि धार जास्त आहे. ते हसायचे. इरसाल बोलायचे.समोरच्याला नकळत टोचायचे.पण त्या हास्यामागे एक खोल थकवा होता.

**स्वप्नात जगायाचे सत्यात मरायाचे**
**यालाच तुम्ही आम्ही आयुष्य म्हणायाचे**

व्यंकटरावांचा हा शेर सर्वाधिक गैर समजला गेला. लोकांना वाटते, ते आयुष्याची व्याख्या करतात मात्र, खरे तर ते स्वतःलाच बजावत आहेत की, स्वप्नात रमू नकोस, कारण वास्तव तुझी वाट पाहत आहे. पण तरीही. ते स्वप्नातच राहतात..

कारण काही माणसांना वास्तव सहन होत नाही. त्यांचा संवेदनशील मनाचा टिपकागद फारच मुलायम असतो. म्हणूनच काही गोष्टी त्यांच्या मनात कायम खोलवर रुतून बसतात. ही ओळ म्हणजे जगण्याची व्याख्या नाही ती एक हळवी कबुली आहे. स्वप्नात जगणारा माणूस वास्तवात कसा झिजतो, याचे हे शांत निवेदन आहे. यासाठी व्यंकटरावांनी मोठमोठे शब्द टाळले. त्यांनी साध्या प्रतिमांतूनच स्वतःचे दुःख सांगितले.

**अखेरी फेकल्या गेलो सडा मी**
**तुझ्या दळणातला होतो खडा मी**

आपल्याला फक्त गरजेपुरते वापरून अलगद बाजूला सारले जाणे ही कसली माणुसकी ?

इथे कटुता नाही.
तक्रारही नाही.
फक्त स्वीकार आहे.
ते स्वतःशीच म्हणतात
मी उपयोगी होतो, पण अडथळा ठरलो. आणि म्हणूनच मला फेकले गेले.



व्यंकटरावांचा हा शेर म्हणजे स्वतःच्या खंतावलेल्या मनाला दिलेली शांत, निःशब्द समजूत आहे. त्यांनी स्वतःला कधीच असामान्य समजले नाही.

म्हणूनच हा शेर लिहिताना ते आरशासमोर उभे आहेत, असे वाटते. मनाप्रमाणे जगण्यासाठी आयुष्यात अनेक संधी मिळाल्या तरी कर्तव्य आणि जबाबदाऱ्यांच्या हिंदोळ्यावर मन कायम दोलायमानच राहिल्याचे त्यांच्या लेखनात जाणवते.

दळणातला खडा म्हणजे उपयोगी असूनही नकोसा झालेला माणूस. समाजाला अडथळा ठरणारा प्रामाणिकपणा. हा शेर म्हणजे त्यांची स्वतःची ओळख आणि अशा कित्येक अनाम माणसांचीही.

**सामान्य माणसाला दोन्हीकडून संधी**
**इकडे विहीर त्याला तिकडून आड आहे**

हा शेर समाजावर केलेली टीका नाही, तर स्वतःवर केलेली टिप्पणी आहे. तुझ्या आयुष्यात संधी होत्या, पण मार्ग कुठलाच नव्हता अशी ते स्वतःची समजूत घालताना दिसतात.ही ओळ वाचताना हेही वाटते की व्यंकटराव हे सामान्य माणसासाठी नव्हे सामान्य माणसातूनच लिहित होते.

**आयुष्य दान केले मग भाळली गझल......**

गझल ही त्यांची करमणूक नव्हती.ती त्यांची शरणागती होती. ती कधीच पंचपक्वांन्नाच्या थाळीतून आलेली नाही तर ती कायम चुलीच्या जाळातून खरपूस फुगलेल्या भाकरीनेच सजवली आहे. आपल्या जगण्याचे संदर्भ पद्यपंक्तींना बहाल करणाऱ्या परंपरेतले एक शांत वारसदार होते व्यंकटराव देशमुख. ४९ वर्षांच्या आयुष्यात त्यांनी गझलेवर नितांत प्रेम केले. गझल त्यांच्या आयुष्यात आली,असे म्हणणे अपुरे ठरेल.खरंतर ते स्वतःच गझलेत शिरले... पूर्णपणे,निःशेष.

जगाने केलेले मानसिक आघात गझलमध्ये सशक्त करणारा हा अवलिया शारीरिक दुखण्यावर मात्र मात करू शकला नाही. आजारपणात मृत्यूचे स्वागत करतानाही त्यांच्या गप्पांत गझलच होती. आपल्या १०० गझल पूर्ण व्हाव्यात, त्याचा संग्रह प्रकाशित व्हावा ही त्यांची इच्छा. मात्र अपूरीच राहिली. एखाद्या अधूऱ्या मतल्याप्रमाणेच ! इथेही आयुष्याने त्यांना नामोहरम केले. जणू गझलच त्यांचा श्वास होती. आजही त्यांच्या वहीत काही मतले तसेच आहेत..अर्धवट!

कोणतीही दुसरी ओळ नाही.

ते मतले ते आपल्यासाठी सोडून गेले नाहीत तर ते स्वतःसाठीच लिहीत होते. आणि कदाचित म्हणूनच ते पूर्ण झाले नाहीत. कारण काही संवाद पूर्ण करण्यासाठी नसतातच!

कदाचित पूर्णत्वाची भाषा गझलेला मान्य नसते आणि म्हणूनच वाटते की व्यंकटराव देशमुख आजही कुठेतरी स्वतःशीच बोलत असावे...

एका अर्धवट मतल्यात !

**क्षिप्रा मंगेश देशमुख,** पुणे

# बीजीई सोसायटीची ३३ प्राध्यापकांची भरती उच्च न्यायालयाने ठरवली रद्द

## नव्याने नियमबद्ध भरतीचे आदेश; विद्यापीठ जाहिरात प्रमाणीकरण समितीच्या चुकीचा संस्थेला नाहक भुर्दंड

■ प्रतिनिधी | अकोला ■

*दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी (बीजीई) अंतर्गत येणाऱ्या श्री आर. एल. टी. कॉलेज ऑफ सायन्स व श्री. नथमल गोयनका लॉ कॉलेजमधील सहाय्यक प्राध्यापकांच्या तब्बल ३३ पदांची भरती मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने शुक्रवारी रद्द ठरवली. समांतर आरक्षण धोरणाचा गोंधळ, गंभीर त्रुटी व नियमांची पायमल्ली झाल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने बीजीई सोसायटीची पार पाडलेली पदभरती रद्द ठरवली. या निकालामुळे शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.*

भरती प्रक्रियेत शासनाच्या आरक्षण धोरणाचे पालन झाले नसल्याचे न्यायालयाने स्पष्टपणे नोंदवले. त्यामुळे बीजीई सोसायटीला नामुष्कीला सामोरे जावे लागले आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, मागील वर्षी बीजीई सोसायटीच्या अखत्यारीत असलेल्या दोन महाविद्यालयातील ३३ सहाय्यक प्राध्यापकांची पदभरती पाड पाडली. सोसायटीने या सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरण्यासाठी शासनाची परवानगी मिळाल्यानंतर अमरावती विद्यापीठाकडे जाहिरात मंजुरीसाठी अर्ज केला होता. त्यानुसार विद्यापीठाने २४ जानेवारी २०२४ रोजी जाहिरात मंजूर व प्रमाणित केली.

ही जाहिरात वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाल्यानंतर शासनाच्या नियमांनुसार २० ते २९ मार्च २०२५ या कालावधीत पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या निवड प्रक्रियेसाठी शासनाचे तसेच विद्यापीठाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मुलाखतीनंतर निवड झालेल्या उमेदवारांचे मंजुरी प्रस्ताव ३ एप्रिल २०२५ रोजी विद्यापीठाकडे सादर करण्यात आले होते आणि त्यास विद्यापीठाने मान्यता देखील दिली होती. मात्र, या संपूर्ण प्रक्रियेविरोधात एका महिला उमेदवाराने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली.

या याचिकेत अमरावती विद्यापीठ, महाराष्ट्र शासनासह बीजीई सोसायटीला प्रतिवादी करण्यात आले होते.

६ फेब्रुवारी रोजी दिलेल्या निकालात उच्च न्यायालयाने जाहिरातीत समांतर आरक्षणाबाबत संपूर्ण व स्पष्ट माहिती असणे आवश्यक असल्याचे नमूद करत, सदर पदभरती प्रक्रिया रद्द केली. तसेच, नियमबाह्य बाबी दुरुस्त करून नव्याने जाहिरात प्रमाणित करण्याची जबाबदारी विद्यापीठावर टाकली आहे. उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे विद्यापीठांच्या जाहिरात मंजुरी प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, भविष्यात अशा पदभरती प्रकरणांमध्ये अधिक काटेकोरपणा ठेवावा लागणार आहे.

'संस्थेने संपूर्ण प्रक्रिया शासन व विद्यापीठाने दिलेल्या मंजुरीनुसारच राबवली होती. याआधीही अमरावती विद्यापीठांतर्गत याच स्वरूपाच्या जाहिरातींना मान्यता देऊन पदभरती करण्यात आली आहे. त्यामुळे जाहिरात प्रमाणित करण्याची जबाबदारी पूर्णतः विद्यापीठाचीच आहे.'

**ॲड. मोतीसिंह मोहता**
अध्यक्ष
बीजीई सोसायटी, अकोला

### वर्चस्वातून कुरघोड्या ?

संस्थेत गेल्या काही काळापासून वर्चस्वाचे शीतयुद्ध पेटले आहे. शिस्तबद्ध स्वरूपात सुरू असलेला कारभार अनेकांना पटत नसल्याने नानाविध प्रकारचे कारण समोर आणत संस्थेतीलच काही झारीतील शुक्राचार्यांकडून संस्थेलाच अडचणीत आणण्याचा खटाटोप सुरू असल्याची चर्चा या निर्णयानंतर सदस्यांमध्ये रंगू लागली आहे.

# डाटा संघटनेचे जिल्हाधिका–यांमार्फत राज्यपाल व मुख्यमंत्र्यांना निवेदन

■ प्रतिनिधी | अकोला ■

नाशिक येथे प्रजासत्ताक दिन कार्यक्रमादरम्यान घडलेल्या वादग्रस्त घटनेचा तीव्र निषेध नोंदवित डॉ. बाबासाहेब आंबेडकर टिचर्स असोसिएशन (डाटा) च्या वतीने राज्यपाल व मुख्यमंत्री यांना जिल्हाधिकारी अकोला यांच्यामार्फत निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनात प्रजासत्ताक भारताचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव कार्यक्रमात न घेणे हे संविधानाचा व बाबासाहेबांच्या विचारांचा अवमान असल्याचा आरोप करण्यात आला आहे. संवैधानिक पदावर असलेल्या मंत्र्यांकडून घडलेली ही बाब अत्यंत दुर्दैवी व निषेधार्ह असल्याचे डाटा संघटनेचे विभागीय सचिव डॉ. एम. आर. इंगळे यांनी स्पष्ट केले.

या घटनेविरोधात आवाज उठविणाऱ्या महिला वन कर्मचारी सौ. माधवी जाधव यांच्यावर कोणतीही अन्यायकारक, शिस्तभंगाची अथवा निलंबनाची कारवाई करू नये, अशी ठाम



**नाशिक प्रजासत्ताक दिन वादाचा निषेध; माधवी जाधव यांना न्याय देण्याची मागणी**

मागणी निवेदनात करण्यात आली आहे. सदर प्रकरणाची नि:ष्पक्ष चौकशी करून अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे संरक्षण करण्यात यावे, असेही नमूद करण्यात आले.याशिवाय शासनाने प्रजासत्ताक दिनाच्या प्रत्येक कार्यक्रमात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा अनिवार्यपणे लावावी, त्यांच्या संविधान निर्मिती कार्याचा गौरव करावा, याबाबत स्पष्ट शासन निर्णय काढावा व त्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. संविधान किंवा कोणत्याही महापुरुषांचा अवमान हा राष्ट्रद्रोहाचा गुन्हा ठरवावा, तसेच राष्ट्रध्वजाला सलामी देताना ध्वजसंहितेचे उल्लंघन करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी, मंत्री, आमदार व खासदारांवर कठोर कारवाई करावी, अशा मागण्या निवेदनातून करण्यात आल्या.

यावेळी डाटा संघटनेचे विभागीय सचिव प्रा. डॉ. एम. आर. इंगळे, अकोला जिल्हाध्यक्ष डॉ. प्रसन्नजीत गवई यांच्यासह डॉ. एस. एम. भोवते, डॉ. अशोक इंगळे, डॉ. दीपक कोचे, किरण पळसपगार, डॉ. एस. आर. दामोदर, डॉ. डी. आर. खंडेराव, डॉ. कैलाश वानखडे, डॉ. हरिचंद नरेटी, प्रा. रविंद्र सदांशिव, डॉ. प्रविण कावळे, प्रा. प्रभु भारसाकळे, प्रा. रोहन शिरसाट, प्रा. सुमेध कावळे, प्रा. राहुल माहुरे आदी उपस्थित होते.

# ट्रक दरीत कोसळून चालक व क्लीनरचा जागीच मृत्यू



■ प्रतिनिधी | अकोला ■

नागपूर–मुंबई राष्ट्रीय महामार्गावर ग्राम कुरुम शिवारातील तीन पुलाजवळ शुक्रवारी (दि. ७) रात्री आयशर ट्रकचा भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत ट्रक चालक व क्लीनर असे दोघेही जागीच ठार झाले. अपघाताने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

एमएच-२९-बीएफ-६०७४ क्रमांकाचा आयशर ट्रक नागपूर येथून संभाजीनगरकडे लोखंडी पाइप घेऊन जात होता. दरम्यान, कुरुम शिवारात तीन पुलाजवळ अचानक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. ट्रक रस्त्यावरील डिव्हायडर ओलांडून विरुद्ध दिशेला जाऊन पुलालगतच्या खोल दरीत कोसळला. अपघाताच्या तीव्र धक्क्याने ट्रकमधील लोखंडी पाइप केबिनमध्ये घुसून चालक व क्लीनरच्या अंगावर कोसळले. या अपघातात चालक अनिसउद्दीन रफिकउद्दीन काझी आणि क्लीनर मोहम्मद रेहान मोहम्मद नाजिम (दोघेही रा. जोहर नगर, बुलढाणा) हे गंभीर जखमी होऊन जागीच ठार झाले. घटनेची माहिती मिळताच माना पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले. या प्रकरणाचा पुढील तपास माना पोलीस स्टेशनचे ठाणेदार गणेश नावकार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार दीपक सोळंके करीत आहेत.

# विदर्भाच्या पंढरीत वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्यसेवा

## श्री सत्यसाई सेवा संघटना व निलेश देव मित्र मंडळाचा सेवाभावी उपक्रम

■ प्रतिनिधी | अकोला ■

गजानन महाराज प्रगट दिनानिमित्त श्री सत्यसाईबाबा सेवा संघटना व निलेश देव मित्र मंडळ, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने वारकरी भक्तांसाठी मोफत आरोग्यसेवा उपक्रम राबविण्यात आला. 'वारकरी भक्तांसाठी आरोग्य सेवा – आरोग्य यंत्रणा आपल्या दारी' या विशेष मोहिमेअंतर्गत अकोला ते नागझरी मार्गावर दोन ठिकाणी प्राथमिक उपचार केंद्रे उभारण्यात आली होती.

गजानन महाराज पायदळ वारीदरम्यान ७ फेब्रुवारी रोजी, त्यागमूर्ती रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीच्या दिवशी संध्याकाळी वारकरी भक्तांना वैद्यकीय तपासणी, प्राथमिक उपचार तसेच आवश्यक औषधोपचार मोफत देण्यात आले. या सेवेत हजारो वारकरी भक्तांनी लाभ घेतला. या उपक्रमात श्री सत्यसाई



सेवा संघटनेचे वरिष्ठ डॉक्टर व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. यामध्ये डॉ. अशोक ओळंबे, डॉ. प्रमोद हेलगे, डॉ. बाबुराव तोष्णीवाल, डॉ. विवेक गोतमारे, डॉ. सुमित गोतमारे, डॉ. अजय खरात, डॉ. तुषार चरखा, डॉ. टापरे, डॉ. सतीश चव्हाण, डॉ. मधुसूदन अपतुलकर व डॉ. प्रकाश मेटांगे यांचा समावेश होता. हा संपूर्ण उपक्रम सत्यसाई सेवा संघटना जिल्हाध्यक्ष किशोर रत्नपारखी तसेच निलेश देव मित्र मंडळाचे प्रमुख नगरसेवक व गटनेते निलेश देव यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला.

उपक्रमाच्या यशासाठी सुनील सरोदे, रवि गाडे, हरीश मेहरे, नवनीत सरोदे, प्रणव वारकर, रमेशभाऊ गोतमारे, जयंतराव सरदेशपांडे, सातपुते काका, राजेंद्र गुणलवार, मोहन भिरड, विजय वाघ, रामहरी हांगे, निलेश दुधलम, राजू कनोजिया, मंगेश भोळे, रमेश पवार, शैलेश देव, भास्करराव बैतवार, सार्थक देव व सुनील देशपांडे यांच्यासह अनेक सेवाभावी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

विदर्भाच्या पंढरीत वारकरी बंधू-भगिनींसाठी आरोग्यसेवा पुरविणे हाच खरा ईश्वरसेवेचा मार्ग असल्याची भावना यावेळी उपस्थित डॉक्टर व सेवेकऱ्यांनी व्यक्त केली. भविष्यातही असेच समर्पित सेवा उपक्रम राबविण्याचा संकल्प आयोजकांनी व्यक्त केला.

# वैभव फुलाडी यांना 'उत्कृष्ट कर्मचारी' पुरस्कार



■ प्रतिनिधी | अकोला ■

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील शाखाधिकारी वैभव फुलाडी यांना योगतज्ञ श्री विठ्ठलराव जिभकाटे यांच्या हस्ते सन २०२४–२५ साठीचा 'उत्कृष्ट कर्मचारी' पुरस्कार प्रदान करण्यात आला. विद्यापीठाच्या ४० व्या दीक्षांत समारंभात मान्यवरांच्या उपस्थितीत हा गौरव सोहळा पार पडला.

वैभव फुलाडी हे उच्चविद्याविभूषित अधिकारी असून, संपूर्ण कृषी विद्यापीठात अभ्यासू, कार्यक्षम व स्वच्छ प्रतिमेचे कर्मचारी म्हणून त्यांची ओळख आहे. मागील अनेक वर्षांपासून ते डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात कार्यरत असून, आपल्या कार्यनिष्ठा, शिस्तप्रियता व सेवाभावी वृत्तीमुळे ते सहकारी व कर्मचाऱ्यांमध्ये लोकप्रिय आहेत.

प्रत्येकाला मदतीचा हात देणे, जबाबदारीची जाणीव ठेवून काम करणे आणि प्रशासनातील कामकाजात पारदर्शकता राखणे ही त्यांची प्रमुख वैशिष्ट्ये मानली जातात. त्यांच्या या योगदानाची दखल घेत त्यांना 'उत्कृष्ट कर्मचारी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या सन्मानामुळे विद्यापीठातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून, विविध स्तरांतून वैभव फुलाडी यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ७२
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

**Change In Name**

My Old passport name was
**TAAJ BI SIKANDAR KHAN**
Now my new name is
**Tajbi Sikandar khan**
Old passport no: K6322160
Address - Maula Ali Pura. Barshitakli Akola dist Akola 444001 (MS)

**Change In Name**

I have Changed My Name Form
**SHANUR BANO BADRODDIN**
--TO--
**SHANUR BI YUSUF KHAN**
My residential Address in
Khair Mohammad Plot,
Zulfukar Nagar,
Akola 444002

**जाहीर नोटीस**

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११३/२०२६ — प्रोसेस नं.१०८२/२०२६
चौ.ता. २६/०२/२०२६ — दिनांक : २३/०१/२०२६

**अर्जदार :** १. सुभाष कुंजीलाल अग्रवाल रा. ए-५०३, हरेश्वर पॅराडाइस, न्यू लिंक रोड, दहीसर ईस्ट, ता. तहीसर, जि. मुंबई. २. मिना ललीतकुमार मुठा रा. फ्लॅट नं. २०८, आर. के.एस. अपार्टमेंट, हैदरगुडा, हैद्राबाद, ता. जि. हैद्राबाद. ३. सतिष कुंजीलाल अग्रवाल रा. फ्लॅट नं. बी-१३०२, पाटलीपुत्र, सी.एच.एस.लि. अंधेरी वेस्ट, मुंबई ता. अंभेरी ज़ि. मुंबई

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : कुंजीलाल तुकडुलाल अग्रवाल
**पत्ता :-** रा. व्दारा जितेंद्र अग्रवाल, न्यु भागवत प्लॉट, काळे हॉस्पिटल समोर, रामटेक हाईटस चे बाजूला, आयकॉन हॉस्पिटल जवळ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे. की, मयत कुंजीलाल तुकडूलाल अग्रवाल यांचे दि. २४/०३/२०२५ रोजी राहत्या घरी मुंबई येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २६/०२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहिर सुचना**

सर्व जनतेस व वित्तिय संस्थेस ह्या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, श्री. नरेंद्र मुरलीधर भिसे रा. वॉर्ड नं १, संग्रामपूर ता. संग्रामपूर जि. बुलढाणा यांनी पी.एन.बी. हॉऊसींग फायनांस लिमिटेड अकोला येथे खालील वर्णनाचि मालमत्ता गहाण ठेवून कर्ज मिळविण्यासाठी अर्ज केला आहे.

गट नं २२३/२२४/२, नगर पंचायत हद्दीतील अ. क्र. १८९२, मालमत्ता क्र. १८९२, प्लॉट नं १ मधून दक्षिण उत्तर वाटणीची मध्यभागातील गाळा क्र. ४ मौजे संग्रामपूर चे क्षेत्रफळ २४२ चौ फूट ता. संग्रामपूर जि. बुलढाणा'. ची मुळ नोंदणीकृत खरेदी खत ७५९/२०१० दि.१३.०५.२०१०, ज्यात लि घेणार :- मंगलाबाई वसंतराव ठाकरे व लिहून देणार ;- रमेश किसन चोपडे, गजेंद्र भाऊराव बकाल आणि वैकुंठ तोताराम ठाकरे हे आहेत ज्याची मुळ प्रत दिनांक ३०.०६.२०२४ रोजी नरेंद्र मुरलीधर भिसे यांच्याद्वारे गहाळ झाली आहे ज्याचा रिपोर्ट पोलीस स्टेशन तामगाव, येथे ता ३०.०१.२०२६ ला दिला आहे.

ज्या अर्थी वरील मालमत्ते वर कोणाचे काही कर्ज, हक्क, बोजा, गहाण, अधिकार, ताबा, आक्षेप असेल त्यांनी सदर सूचना प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसाचे आत खालील नमुद पत्त्यावर कागदोपत्र पुराव्यासह आक्षेप नोंद्वावा अन्यथा कोणाचाही कसलाही स्वरूपाचा आक्षेप नाही असे समजुन पी. एन. बी हॉऊसींग फायनांस लिमिटेड अकोला हे वरिल मालमत्ता गहाण ठेवुन कर्जाचि रक्कम वितरीत करतील त्यानंतर कोणाचीहि कसलीहि हरकत वा उजर चालनार नाही, याचि नोंद घ्यावी.

अकोला
दि ०५.०२.२०२६

**विरेंद्र सुरेशकुमार नान्दे**
रा:- रामधन प्लौट, रामदासपेठ, अकोला

**जाहीर नोटीस**

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, आमचे पक्षकार नामे आकाश सीताराम इंगळे मु. घानेगाव, ता. खामगाव, जी. बुलढाणा यांनी दिलेल्या अधिकार व माहितीच्या आधारे सर्वत्र लोकांना सूचित करण्यात येते की, आमचे पक्षकार आकाश सीताराम इंगळे यांच्या मालकीचे व ताब्यात असलेली मालमत्ता ज्याचे वर्णन :- ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ५५४, मौजे घानेगाव, ता. खामगाव, जी. बुलढाणा ज्याचे मोजमाप एकून क्षेत्रफळ २१७८ चौ. फुट ज्याचे चातुर्सिमा – पूर्वेस - रस्ता, पश्चीमेस - देविदास इंगळे यांची जागा, उत्तरेस- सुभाष इंगळे यांची जागा, दक्षिणेस – रस्ता या वर्णनाची मालमत्ता आमचे पक्षकार यांचे मालकीची आहे. सदरहू मालमत्ता गहान ठेवून आमचे पक्षकार हे जना स्माल फायनान्स बँक कडून कर्ज घेत आहेत.

येणेप्रमाणे सदरहु वरील वर्णनाच्या व चतु:सिमेतील सदर मिळकती संबंधी इतर कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा, गहाण, वा इतर कसल्याही प्रकारचा अधिकार असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसाचे आत खाली दिलेल्या पत्यावर लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही करिता हि जाहीर नोटीस.

ठिकाण :- अकोला
दिनांक :- ०६/०२/२०२६

**पक्षाकाराकरिता अधिवक्ता**
**ॲड. अजय. वा. गोडे**
शॉप क्र. २३ - ए, दुसरा माळा, शाकंभरी स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला, ता. जि. अकोला,
मो.क्र. ९१७५९३८२४२.

**जाहीर नोटीस**

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२७/२०२६ — प्रोसेस नं.११४२/२०२६
चौ.ता. २०/०३/२०२६ — दिनांक : २७/०१/२०२६

**अर्जदार :** १. देवानंद केशवराव गोपनारायण २. सेवानंद केशवराव गोपनारायण ३. पंजाबराव केशवराव गोपनारायण ४. अजाबराव केशवराव गोपनारायण ५. साहेबराव केशवराव गोपनारायण ६. विनोद केशवराव गोपनारायण सर्व रा. घुसर, ता. जि. अकोला. ७. वनमाला संजय डोंगरे रा. भिमनगर, वाडेगांव, ता. बाळापूर, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. केशवराव बन्सी गोपनारायण २. गोकर्णा केशवराव गोपनारायण
**पत्ता :-** रा. घुसर, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत केशवराव बन्सी गोपनारायण यांचे दि. २५/०२/२०२० रोजी व तसेच मयत गोकर्णा केशवराव गोपनारायण यांचे दि. २५/१२/२०२५ रोजी घुसर, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २०/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८०/२०२६ — प्रोसेस नं.१५९६/२०२६
चौ.ता. २०/०३/२०२६ — दिनांक : ०५/०२/२०२६

**अर्जदार :** १. राजेश्वर शंकरराव दांदळे रा. संकेत टायपिंगच्या बाजुला, गणेश नगर, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. २. कैलाश शंकरराव दांदळे रा. शिवचरण पेठ, राजेश्वर मंदिराच्या मागे, जुने शहर, अकोला, ता. जि. अकोला, ३. संजय शंकरराव दांदळे रा. योगेश गोतमारे यांच्या घराजवळ, रेणूका नगर, वाडेकर किराणा जवळ, जुने शहर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला. ४. श्रीमती शकुंतलाबाई महादेवराव नाकट रा. वाडेकर गल्ली, रेणुका नगर, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अनुसयाबाई शंकरराव दांदळे
**पत्ता :-** रा. संकेत टायपिंगच्या बाजुला, गणेश नगर, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अनुसयाबाई शंकरराव दांदळे यांचे दि.२७/११/२०११ रोजी अकोला, ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २०/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२८/२०२६ — प्रोसेस नं.१३८५/२०२६
चौ.ता. ०६/०३/२०२६ — दिनांक : ०२/०२/२०२६

**अर्जदार :** गोपीकिसन सुंदरलाल कानोजा रा. कोठाडी बाजार, अकोला. ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. सुंदरलाल ओंकारमल कानोजा २. ग्यारसीबाई सुंदरलाल कानोजा
**पत्ता :-** रा. कोठडी बाजार, अकोला. ता. जि. अकोला

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार हयांनी भारतीय उत्तराधिकार अधिनियमाचे कलम ३७२ अन्वये उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज केला आहे. त्यांनी अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुंदरलाल ओंकारमल कानोजा यांचे दि. २७/०९/२०२० रोजी कोरडे - हॉस्पीटल, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले. तसेच मयत ग्यारसीबाई सुंदरलाल कानोजा हयांचे दिनांक ०२.०९.२०२१ रोजी निधन झाले आहे.

अर्जामध्ये पूढे असेही नमूद आहे की सदरहू मयत सुंदरलाल ओंकारमल कानोजा यांचे नावे दि. वाशिम अर्बन को-ऑप. बँक लि. वाशिम, शाखा जुना कॉटन मार्केट, अकोला येथे रूपये ५०,०००/- इतकी रक्कम मुदत ठेव (एफ.डि.आर ) म्हणून ठेवली होती. त्याचा एफ.डि.आर. क. ११८८०८ आणि त्याच एफ. डि. आर. पावतीचे नामनिर्देशित त्यांची पत्नी म्हणजेच अर्जदार यांची आई मयत ग्यारसीबाई सुंदरलाल कानोजा होत्या. दि. वाशिम अर्बन को-ऑप. बॅक लि. वाशिम, शाखा जुना कॉटन मार्केट, अकोला येथे एफ. डि. आर. क्र. ११८८०८ नुसार परिपक्व काढण्याची रक्कम रूपये ७७,२५९, /- असेल आणि त्यावर प्रत्यक्ष काढण्याच्या तारखेपर्यंतचे व्याज असेल. सदरहू रकमेचा लाभ मिळण्याकरीता उपरोक्त अर्जदाराने उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळणेसाठी उपरलिखित अर्ज केला आहे. अर्जामध्ये पूढे असेही नमूद केले आहे की, वरील उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे. अर्जदार यांचे शिवाय मयतास कोणीही उत्तराधिकारी नाही. सबब, करीता अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०६/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल, हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# गावकऱ्यांचा कौल बाजूला, पुन्हा अधिकाऱ्यांची सत्ता

## तालुक्यातील मोठ्या ग्रामपंचायतींवर दुसऱ्यांदा प्रशासकराज लादला जाण्याची शक्यता

**सेलू / अभय बेदमोहता**

तालुक्यातील ग्रामीण लोकशाहीवर पुन्हा एकदा गंडांतर येण्याची चिन्हे स्पष्ट झाली आहेत. हिंगणी व येळाकेळी या तालुक्यातील मोठ्या आणि राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या ग्रामपंचायतींचा कार्यकाळ १५ फेब्रुवारी २०२६ रोजी संपत असताना, निवडणुकांचा साधा पत्ताही नसल्याने दुसऱ्यांदा प्रशासकराज येण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे गावकऱ्यांचा कौल की सरकारी फतवा असा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

कोरोना काळात निवडणुका न झाल्याने २०२०-२१ मध्ये तब्बल आठ महिने या ग्रामपंचायतींवर प्रशासकाची सत्ता होती. लोकनियुक्त प्रतिनिधींऐवजी अधिकाऱ्यांच्या हातात गावाचा कारभार गेला होता. आता पुन्हा तोच इतिहास घडवला जात असल्याची भावना गावोगावी व्यक्त होत आहे.



**निवडणुका कुठे गायब ?**

फेब्रुवारी जवळ येऊनही निवडणुकांचे कोणतेही अधिकृत वेळापत्रक जाहीर झालेले नाही. परिणामी सरपंच व सदस्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर ग्रामपंचायती थेट प्रशासकाच्या हवाली जाणार, हे जवळपास निश्चित मानले जात आहे. विशेष म्हणजे, एकाच ग्रामपंचायतीवर दुसऱ्यांदा प्रशासक नेमण्याची वेळ येणे ही दुर्मीळ व चिंताजनक बाब मानली जात आहे.

**प्रशासक कोण? गावात संभ्रम**

प्रशासक म्हणून स्वतंत्र अधिकारी नेमला जाणार की कार्यकाळ संपलेल्या सरपंचांनाच तात्पुरता पदभार दिला जाणार, यावरून नागरिकांमध्ये संभ्रम आहे.

सामान्यतः विस्तार अधिकारी किंवा वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांची नियुक्ती होते. मात्र राजकीय हस्तक्षेप टाळून विकासकामांना गती देणारा सक्षम प्रशासक मिळावा, अशी अपेक्षा ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत.

**चारमंडळ-धपकीतही 'प्रशासकराज'ची चाहूल**

हिंगणी-येळाकेळीपुरतेच हे संकट मर्यादित नाही. तालुक्यातील चारमंडळ-धपकी गट ग्रामपंचायतींचा कार्यकाळ मार्चमध्ये संपत असून, येथेही निवडणुकांची कोणतीही हालचाल दिसत नाही.

परिणामी येथेही प्रशासकराजाचीच शक्यता गडद झाली आहे.

निवडणुका लांबणीवर पडल्यास गावगाड्याचा कारभार लोकनियुक्त प्रतिनिधींऐवजी अधिकाऱ्यांच्या हातात जाणार आहे. हा प्रशासकराज विकासाला गती देणार की लोकशाहीला खीळ घालणार, याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## विविध समाजोपयोगी पुरस्कारांसाठी अर्ज आमंत्रित

**वर्धा/जनमाध्यम**

विमुक्त जाती व भटक्या जमातीतील पारंपरिक लोककलाकारांना नटराज पुरस्कार, पारंपरिक कारागिरांना विश्वकर्मा पुरस्कार, तसेच सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी कार्य करणाऱ्या साहित्यिक, समाज प्रबोधनकार, सामाजिक कार्यकर्ते व संस्थांना क्रांतिवीर राजे उमाजी नाईक पुरस्कार देण्यात येणार आहे. या पुरस्कारांसाठी इच्छुक नागरिक व संस्थांनी दि. १८ फेब्रुवारी पर्यंत आपले प्रस्ताव सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, वर्धा या कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.विमुक्त जाती व भटक्या जमातीतील कला, साहित्य व समाजकार्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना सन्मानित करण्यासाठी राज्य शासनाने विविध पुरस्कार योजनांना मंजुरी दिली आहे. मंत्रिमंडळाच्या दि. २० ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

## रात्रीच्या कामात 'सतरा विघ्न'

**आष्टी (शहीद)/जनमाध्यम**

आष्टी तालुक्यातील बोरखेडी येथे सुरू असलेल्या सिमेंट रस्त्याच्या रात्रीच्या कामात 'सतरा विघ्न' उभी ठाकली आहेत. कारंजा (घा.) तालुक्यातील नारा येथील सिमेंट मिक्सिंग प्लांटमधून मटेरियल घेऊन येणारा श्प-१२-श्-९७९३ क्रमांकाचा मिक्सर मध्यरात्री भरधाव वेगात बोटोणा गावाजवळील कमळगीर महाराज देवस्थान परिसरात पलटी झाला. चालकाच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात झाल्याचे बोलले जात असून चालक गंभीर जखमी झाला आहे.



रात्री सुरू असलेल्या कामासाठी मटेरियलची वाहतूक वेगाने सुरू असते. मात्र, अंधार, अपुरी प्रकाशव्यवस्था, साईड न देणे, वेगमर्यादेचे उल्लंघन आणि बेफिकीर वाहनचालक यामुळे अपघातांची शक्यता वाढली आहे. सुदैवाने रस्त्यावर वर्दळ नसल्याने मोठी जीवितहानी टळली, असे ग्रामस्थांनी सांगितले.

दरम्यान, काही चालक दारूच्या नशेत वाहन चालवत असल्याच्या तक्रारीही पुढे येत आहेत. अपघातानंतर रस्त्यावर आडवा पडलेला मिक्सर बाजूला करण्यासाठी बराच वेळ लागला. रात्रीच्या कामात सुरक्षिततेची पायमल्ली सुरूच असल्याचा आरोप होत असून, संबंधित कंपनी व ठेकेदारांवर कडक कारवाई, वेगमर्यादा व पोलिस बंदोबस्ताची जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

## धामंत्री येथे नागेश्वर महादेव संस्थानमध्ये शिवमहापुराण कथा

**आर्वी/जनमाध्यम**

धामंत्री येथील प्राचीन श्री नागेश्वर ज्योतिर्लिंग महादेव संस्थानमध्ये महाशिवरात्री उत्सवानिमित्त भव्य शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. माघ कृष्ण सप्तमी ९ फेब्रुवारी पासून दररोज दुपारी १ ते ५ वाजेपर्यंत ही कथा होणार आहे. रासेगाव येथील सुप्रसिद्ध कथावाचक ह.भ.प. अविनाश महाराज कडू यांच्या वाणीतून भाविकांना शिवकथांचे श्रवण करता येणार आहे.

कथेच्या प्रारंभीच्या दिवशी ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता वर्धा नदीच्या पावन तीरावरून भव्य कलशयात्रा काढण्यात येणार आहे. धामंत्री नगरीत कलशपूजन व पालखीपूजन करून वर्धा नदीतून पवित्र जल भरून श्री नागेश्वर महादेवाच्या स्वयंभू शिवलिंगावर जलाभिषेक करण्यात येणार आहे.दि. १५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री मोठ्या भक्तिभावात साजरी करण्यात येणार असून यानिमित्त दर्शन, प्रसाद व भाविकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तर दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी काल्याचे कीर्तन ह.भ.प. अविनाश महाराज कडू यांच्या वाणीतून होणार आहे.श्री नागेश्वर महादेव मंदिर हे त्रेतायुगापासून अस्तित्वात असल्याचे पुरावे आढळतात. वर्धा नदीच्या काठावर कैलास टेकडी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उंच ठिकाणी वसलेले हे हेमाडपंथी शैलीतील, खरप्या दगडात बांधलेले स्वयंभू शिवलिंग असलेले पुरातन देवस्थान आहे. मंदिर परिसरात प्राचीन मूर्ती, कोरीव नक्षीकाम व भव्य महाघंटा भाविकांचे लक्ष वेधून घेतात.या पावन पर्वावर सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष कैलाशकुमार पनपालीया यांनी केले आहे. यावेळी विश्वस्त विजय करडे, मोहन इंगळे, रवींद्र भोयर, धीरज चांडक, सुनील मारबदे, रमेश राउत यांच्यासह सहकारी उपस्थित होते.

## वर्धेत पोलिसांचा नवा चेहरा : लाठीपेक्षा आधी माणुसकी

**वर्धा/जनमाध्यम**

रस्त्यावर भटकणाऱ्या, समाजा च्या कडेला ढकलल्या गेलेल्या मनोविकल व्यक्तींना केवळ धोका म्हणून पाहण्याची मानसिकता मोडीत काढत वर्धा जिल्हा पोलिसांनी माणुसकीचा ठोस आदर्श घालून दिला आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी पुढाकार घेत सुरू केलेल्या विशेष शोध मोहिमेमुळे २५ मनोविकल व्यक्तींना उपचारांचा आणि सुरक्षिततेचा आधार मिळाला असून, या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

अलीकडे आर्वी शहरात घडलेल्या एका दुर्दैवी घटनेनंतर मनोविकल व्यक्तींविषयी समाजात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

अचानक मानसिक स्थिती बिघडल्यास अशा व्यक्तींकडून इजा होण्याची शक्यता असते; मात्र त्याहून भयावह बाब म्हणजे गैरसमज, अफवा आणि जमावाच्या संतापातून त्यांच्यावर हल्ले होऊन कायदा-सुव्यवस्थेचा



### मनोविकल व्यक्तींसाठी संवेदनशील मोहीम

गंभीर प्रश्न उभा राहू शकतो. हीच बाब ओळखून पोलिसांनी वेळीच पाऊल उचलले.मानसिक आरोग्य काळजी अधिनियम १९८७ अन्वये योग्य उपचार मिळावेत, या उद्देशाने पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल आणि अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२६ दरम्यान संपूर्ण वर्धा जिल्ह्यात विशेष शोध मोहीम राबविण्यात आली. जिल्ह्यातील १९ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत पोलिसांनी अशासकीय संस्था, सामाजिक संघटना व इतर विभागांच्या सहकार्याने मनोविकल व्यक्तींचा शोध घेतला.या मोहिमेत एकूण २५ मनोविकल व्यक्ती आढळून आल्या. त्यांच्या पालक व नातेवाईकांचा शोध घेऊन, त्यांना विश्वासात घेत संबंधित व्यक्तींना विविध मनोरुग्णालयांत उपचारकामी दाखल करण्यात आले. नातेवाईक उपलब्ध असलेल्या प्रकरणांत त्या व्यक्तींना त्यांच्या स्वाधीनही करण्यात आले.कायदा-सुव्यवस्थेइतकीच समाजाची मानसिक आरोग्य सुरक्षितताही महत्त्वाची आहे.

अशा व्यक्तींना उपचार व निवारा मिळवून देणे हे आमचे कर्तव्य आहे, असे पोलीस अधीक्षक अग्रवाल यांनी स्पष्ट केले. वर्ध्यात पोलिसांचा हा माणुसकीचा चेहरा आज समाजाला दिलासा देणारा ठरतो आहे.

## बुद्ध टेकडीवरील वृक्षसंवर्धन धोक्यात

### समाजविघातकांचा उपद्रव वाढला; पेट्रोलिंग वाढविण्याची मागणी

**वर्धा/जनमाध्यम**

वर्धा शहरालगत सिंदी (मेघे) ग्रामपंचायत हद्दीतील केशव सिटी लगत असलेली बुद्ध टेकडी पर्यावरणीय दृष्टिकोनातून हिरवीगार करण्यासाठी 'बुद्ध टेकडी मित्र परिवार' गेल्या सहा वर्षांपासून सातत्याने प्रयत्नशील आहे. रस्ता, पाणी व वीज यांसारख्या मूलभूत सुविधांचा अभाव असतानाही कार्यकर्त्यांनी आतापर्यंत ६०० हून अधिक झाडांची लागवड केली असून त्यापैकी सुमारे ४०० झाडे आज चांगल्या स्थितीत उभी आहेत.

मात्र गेल्या दोन-तीन दिवसांपासून काही समाजविघातक प्रवृत्तींकडून झाडांच्या संरक्षणासाठी लावलेले लोखंडी कठडे तोडण्याचे व चोरून नेण्याचे प्रकार सुरू झाल्याचे समोर आले आहे. दोन झाडांचे कठडे पूर्णपणे काढून चपटे करण्यात आले असून एक ट्री गार्ड खाली फेकून दिल्याचे (दि.५) दुपारी झाडांना पाणी



देण्यासाठी गेलेले बुद्ध टेकडीचे सदस्य संजीव मांडवे यांच्या निदर्शनास आले. यानंतर प्रकाश कांबळे, सुनील ढाले, कृषिकेश फुसाटे, प्रनोज बनकर आदी कार्यकर्त्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन नुकसान झालेली सामग्री जमा केली.दरम्यान, टेकडीवरील पाण्याच्या टाकीच्या परिसरात दुपारी तसेच अंधार पडल्यानंतर युवकांचा वावर वाढत असून सिगरेट, गुटखा, गांजा व दारूचे सेवन होत असल्याची बाबही चिंतेची ठरत आहे. यामुळे भविष्यात अनुचित घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.या पार्श्वभूमीवर बुद्ध टेकडीवरील वृक्षसंवर्धनाचे संरक्षण व्हावे तसेच अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या युवकांचा वावर रोखावा, यासाठी टेकडी परिसरात पोलीस पेट्रोलिंग वाढविण्याची मागणी रामनगर पोलीस स्टेशनचे ठाणेदार अजय भुसारी यांच्याकडे (दि.६ फेब्रुवारी २०२६) रोजी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी पोलीस उपनिरीक्षक प्रमोद जांभूळकर, सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी नरेंद्र भगत,गौतम कांबळे, सुरेश विघ्ने,मुख्याध्यापक मुकुंद नाखले यांच्यासह बुद्ध टेकडीचे सदस्य उपस्थित होते.

# क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमातून काम दिशा - पालकमंत्री डॉ. पंकज भोयर

**वर्धा/जनमाध्यम**

वेगवेगळ्या विभागांच्या क्रीडा आणि सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून अनेक न भेटलेल्या अधिकाऱ्यांच्या भेटी होत असतात. त्याच पद्धतीने एकमेकांसोबत समन्वय होत असतो आणि आपण आपल्या भागामध्ये काय काम केलं किंवा आपल्या कार्यालयामध्ये काम करण्याची पद्धत कशी अवलंबली याच्यामध्ये चर्चा होते. त्यामुळे अशा क्रीडा स्पर्धा उपयुक्त ठरत असून अधिकारी, कर्मचाऱ्यांना काम करण्यासाठी नवीन कल्पना व दिशा मिळते, असे प्रतिपादन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात जिल्हा परिषदेच्या क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्याहस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण,



अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल भोसले, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी मनिषा कुरसंगे, कार्यकारी अभियंता शुभम गुंडतवार, गटविकास अधिकारी समर्थ शेवाळे यांच्यासह विविध विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.पालकमंत्री डॉ. भोयर पुढे म्हणाले, वर्धा जिल्हा परिषदेचा राज्यामध्ये ज्या काही चांगल्या जिल्हा परिषदा आहेत त्यामध्ये क्रमांक लागतो. काम करत असतांना अनेक वेळेस स्वतःकडे दुर्लक्ष होत असते किंवा आपल्या कुटुंबाकडे पण दुर्लक्ष होत. त्यामुळे क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धातून काम करण्याची नवी उर्जा मिळते, असे त्यांनी सांगितले.मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण म्हणाले, वर्षभराचे काम आणि कामच यातून थोडेसे बाहेर पडून आपल्या कुटुंबीयांसमोर थोडेसे रिलॅक्स या स्पर्धेतून होता येईल. स्पर्धेच्या निमित्ताने दोन-तीन दिवस इथे एकत्र असणार आहोत. मनमोकळेपणाने आपल्याला जे येते ते सादर करा आणि कार्यक्रमाचा आनंद घ्या, असे ते म्हणाले.कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाची रूपरेषा व आयोजनामागची भूमिका अमोल भोसले यांनी सांगितली. संचालन व आभार मोहन सायंकार यांनी मानले. या कार्यक्रमास अधिकारी, कर्मचारी व कुटुंबिय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गुन्हेगारी वार्ता

### रेतीची अवैध वाहतूक; ७ लाखांचा मुद्देमाल जप्त

**वडनेर** - रेतीच्या अवैध वाहतुकीविरोधात वडनेर पोलिसांनी प्रभावी कारवाई केली. वडनेर शिवारात नाकेबंदी दरम्यान रेतीने भरलेला ट्रॅक्टर पकडण्यात आला. तपासणीअंती सदर ट्रॅक्टरकडे कोणतीही वैध परवानगी नसल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी ट्रॅक्टरसह रेती असा सुमारे ७ लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे अवैध रेती वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. या प्रकरणी विजय गणपत उईके (रा. कुटकी) व सुरज उर्फ शेरा पिंपळकर (रा. दारोडा) यांच्याविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अवैध उत्खनन व वाहतुकीविरोधात पुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### क्षुल्लक कारणातून शेतात सळाखीने मारहाण

**वर्धा** - क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादातून शेतात काम करणाऱ्या व्यक्तीस सळाखीने मारहाण केल्याची घटना पाचगाव शेतशिवारात घडली. राजू मोडे हे शेतात काम करीत असताना दिलीप उर्फ गोलू कोडापे तेथे आला. शेतात कामाला कसा काय आला, अशी विचारणा करत त्याने वाद सुरू केला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. आरोपीने सळाखीने मारहाण केल्याने राजू मोडे जखमी झाले.जखमीने दिलेल्या तक्रारीवरून देवळी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ग्रामीण भागात किरकोळ कारणांवरून होणाऱ्या हिंसक घटनांमध्ये वाढ होत असल्याचे या घटनेतून पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

### शिवीगाळ रोखल्याने विटेचा हल्ला

**वर्धा** - पैसे परत देण्यासाठी वेळ लागेल, असे सांगितल्याने शिवीगाळ सुरू झाल्यानंतर हटकले असता विटेने मारहाण केल्याची घटना हिंगणघाट तालुक्यातील वेळा येथे घडली. अरुण श्यामराव पंडित यांच्याकडे अरविंद वाघमारे पैसे मागण्यासाठी आला होता. पैसे देण्यास दोन ते तीन महिन्यांचा कालावधी लागेल, असे सांगताच आरोपीने शिवीगाळ सुरू केली. शिवीगाळ थांबविण्यास सांगितल्यावर आरोपीने रागाच्या भरात विट मारून अरुण पंडित यांना जखमी केले. जखमीच्या तक्रारीवरून हिंगणघाट पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. किरकोळ आर्थिक कारणांवरून वाढणाऱ्या हिंसक वर्तनामुळे परिसरात चिंतेचे वातावरण आहे.

### कारचा धक्का लागल्याने लोखंडी रॉडने मारहाण

**वर्धा** - रस्त्यावर चालताना कारचा धक्का लागल्याने जाब विचारल्याचा राग धरून एका व्यक्तीस लोखंडी रॉडने मारहाण करण्यात आल्याची घटना केळझर येथे घडली. किशोर प्रेम पवनीकर हे घरातून रस्त्यावर येत असताना कारचा धक्का लागला. गाडी नीट चालवण्याबाबत विचारणा करताच कारचालक खाली उतरला आणि त्याने लोखंडी रॉडने किशोर पवनीकर यांच्यावर हल्ला केला. या मारहाणीत ते जखमी झाले. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. जखमीच्या तक्रारीवरून सेलू पोलिसांनी कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. रस्त्यावरील वाद थेट हिंसाचारात बदलत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

### रोख रक्कम व मोबाईल हिसकावणाऱ्या अज्ञातांचा धुमाकूळ

**वर्धा** - देवळी-वर्धा मार्गावर वाहन थांबवून मोबाईलवर बोलत असलेल्या व्यक्तीकडील मोबाईल व रोख रक्कम हिसकावून अज्ञातांनी पोबारा केल्याची घटना घडली. धीरज हांडे हे दुचाकीने प्रवास करीत असताना फोन आल्याने त्यांनी स्मशानभूमीजवळ वाहन थांबवले. याच संधीचा फायदा घेत काळ्या रंगाच्या वाहनातून आलेल्या दोन अज्ञातांनी बळजबरी मोबाईल व ७ हजार रुपये हिसकावले. घटनेनंतर आरोपी फरार झाले. परिसरात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी सावंगी पोलिसांनी तक्रारीवरून गुन्हा दाखल केला असून अज्ञात आरोपींचा शोध सुरू आहे. महामार्गालगत वाढणाऱ्या अशा घटनांमुळे प्रवाशांची सुरक्षितता ऐरणीवर आली आहे.

### किराणा दुकान फोडून २२ हजारांचा ऐवज लंपास

**कारंजा(घाडगे)** - येथील दोन किराणा दुकाने फोडून अज्ञात चोरट्यांनी २२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. दाभा मार्गावरील दुकानदार बाहेरगावी गेले असताना चोरट्यांनी संधी साधली. दुकानांचे शटर वाकवून आत प्रवेश करत सोयाबीन तेलाचे डबे, हेअर ऑईलची पेटी तसेच रोख रक्कम चोरून नेण्यात आली. दुकान फोडल्याचे निदर्शनास येताच परिसरात खळबळ उडाली. वाढत्या चोरीच्या घटनांमुळे व्यापाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. या प्रकरणी कारंजा (घा.) पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### हॉटेलच्या परिसरात वृद्धाचा मृतदेह

**वर्धा** - सातोडा परिसरातील एका हॉटेलच्या मागील बाजूस वृद्ध व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. अरुण रामचंद्र कोटरंगे (वय ७५) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. नागरिकांच्या निदर्शनास मृतदेह येताच पोलिसांना माहिती देण्यात आली. घटनास्थळी पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून विविध अंगांनी तपास सुरू आहे. वृद्ध व्यक्तीचा मृतदेह सार्वजनिक ठिकाणी आढळल्याने नागरिकांमध्ये चर्चेला उधाण आले आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - ७४
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
**ई-मेल**-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# नांदगाव पेठ मध्ये १४० एकरात आयटी पार्क तरुणांना मिळणार रोजगारची संधी



**अमरावती/प्रतिनिधीः-** नांदगाव पेठ मध्ये १४० एकर मध्ये आयटी पार्क स्थापित होणार आहे. तरुण पिढीसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण हा निर्णय घेण्यात आला आहे. गेल्या अनेक वर्षापासून आयटी पार्क स्थापन करण्याची मागणी करण्यात येत होती. त्यासाठी सातत्याने केलेल्या संघर्षाला यश आले आणि आयटी पार्क स्थापन होत आहे. युवकांच्या भविष्याची जाणीव ठेवून उचललेले हे महत्त्वपूर्ण पाऊल आहे. शहरवासीयांसाठी हा योग्य असा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती भाजपा नेता किरण पातुरकर यांनी आज शनिवार ७ फेब्रुवारी रोजी पत्रकार परिषद मध्ये दिली. त्यांनी सांगितले की अमरावतीत आयटी पार्क स्थापन व्हावे यासाठी आयटी पार्क कृती समिती स्थापन करून आम्ही केवळ निवेदन पुरते मर्यादित नाही राहिलो. सातत्याने कार्यक्रम ,बैठक व चर्चासत्र घेतली. लोकप्रतिनिधी, उद्योग क्षेत्र व शिक्षण तज्ञ यांना एकत्र आणले. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, उद्योग मंत्री यांच्याशी थेट भेटीगाठी घेऊन अमरावतीचा मुद्दा ठामपणे मांडला. विदर्भ विकास हा घोष फक्त भाषणपुरता न ठेवता प्रत्यक्ष अंमलबजावणीची मागणी केली आणि या संघर्षाला यश आले. तरुणांच्या हक्कासाठी केलेला संघर्ष यशस्वी झाला आणि अमरावती मध्ये आयटी पार्क ची घोषणा झाली. अमरावती हे पश्चिम विदर्भाचे मुख्यालय आहे. येथे अमरावती विद्यापीठ व रायसोनी विद्यापीठ आहे.१६५ हून अधिक तांत्रिकी व अभियांत्रिकी अभ्यासक्रम आहे. दरवर्षी २५ हजार पेक्षा अधिक आयटी व तांत्रिकी शिक्षण घेतलेली विद्यार्थी येथून बाहेर पडतात. पण स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी नसल्याने ते पुणे, मुंबई ,बेंगलोर, हैदराबाद येथे स्थलांतरण करतात. आयटी पार्क सुरू झाल्याने तरुणांना रोजगाराची संधी मिळणार आहे. अल्प वेतन, नोकऱ्या व सामाजिक असंतुलन ही परिस्थिती बदलण्यासाठी स्थानिक आयटी पार्क हा एकमेव शाश्वत उपाय आहे. या पार्कमध्ये आधुनिक तांत्रिकी पायाभूत सुविधा डिजिटल कनेक्टिव्हिटी, वीजपुरवठा, डेटा सेंटर व क्लाऊड रेडी सुविधा, सायबर सुरक्षा स्मार्ट बिल्डिंग ऑटोमेशन, ट्रॅफिक मॅनेजमेंट ऑफिस सुविधा कौशल्य विकास व स्टार्टअप सह इतर सुविधा मिळणार आहे. आयटी पार्क हजारोंना अप्रत्यक्ष रोजगार मिळणार, विदर्भाचे अर्थव्यवस्थेला चालना मिळणार असून अमरावतीचा औद्योगिक व आयटी नकाशावर ठसा उमटणार आहे.भूमिपूजन निधी वेळापत्रक व प्रत्यक्ष काम सुरू होईपर्यंत कृती समितीचा पाठपुरावा सुरू राहील. अशी माहिती देण्यात आली. पत्रकार परिषद मध्ये गजानन देशमुख, रवींद्र खांडेकर उपस्थित होते.

# इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेश

## -आधार, स्वयंम योजनेचा लाभ घ्या- १५ फेब्रुवारी अंतिम मुदत

**अमरावती/प्रतिनिधीः-** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून राज्यातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. यामध्ये वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना यांचा लाभ घेण्यासाठी १५ फेब्रुवारीपूर्वी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

बारावीनंतरच्या बिगर व्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सदर योजनांचा लाभ घेण्यासाठी शासकीय वसतिगृहामध्ये अर्ज करणे अनिवार्य आहे. अर्ज hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने स्वीकारले जाणार आहे. वरील दिलेल्या दिनांकापर्यंत मुलांनी इतर मागास बहुजन कल्याण मुलांचे शासकीय वसतिगृह, अग्रवाल टॉवर जाफरीन प्लॉट आदर्श हॉटेल जवळ कॉटन मार्केट रोड अमरावती तसेच मुलींनी इतर मागास बहुजन कल्याण मुलींचे शासकीय वसतिगृह, ब्लॉक", राम लक्ष्मण संकुल, तिसरा मजला, रामपूरी कॅम्प जवळ, विलास नगर चौक, अमरावती या वसतिगृहामध्ये अर्ज सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणच्या सहायक संचालक सरीता बोबडे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण अमरावती, सामाजिक न्याय भवन पोलीस आयुक्तालयाचे मागे, चांदुर रेल्वे रोड, अमरावती तसेच ई-मेल आयडी dobbwoamravati @gmail.com यावर कार्यालयाशी संपर्क साधावा.

## जाहिरनामा / सायटेशन
### दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
### वि. श्रीमती. आर.डी.सिंघनाळे २३ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्रमांक : १७३०/२०२५ पुढील तारीख २०.०२.२०२६

**श्री. गझनफार सज्जाह अधिक चार विरुध्द निरंक**

अर्जदार- 1.**Gazanfar Sajjad Husain Holawala** Age-72 yrs, Occ- Business R/o. Sarafa Bazar, Bohra Masjid Saifee Marg Amravati, Tq. & Dist. Amravati. **2. Quid Joher Sajjad Husain Holawala** Age 65 yrs., Occu. Business R/o. Sarafa Bazar, Bohra Masjid Saifee Marg Amravati, Tq. & Dist. Amravati. **3. Zulfiquar Sajjad Husain** Age 68 yrs., Occu. Business R/o. Sarafa Bazar, Bohra Masjid Saifee Marg Amravati & Dist. Amravati. **4. Amama Sajjad Husain Holawala** Age-78 yrs, Occu. Household R/o. Near Bohra Masjid Sarafa Bazar Amravati, Tq. & Dist. Amravati. **5. Nafisa Bano Sajjad Husain Holawala** Age-71 yrs, Occu. Household, R/o. Amravati R/o. Bohra Masjid Saifee Marg Sarafa Bazar Amravati, Tq. & Dist. Amravati Tq. & Dist. Amravati. **6. Farida Shabbar Husain Holawala** Age70, Occu. Household R/o. Saifee Marg, Bohra Masjid, Sarafa Bazar, Amravati, Tq. and Dist. Amravati. **7. Adnan Shabbarhusain Holawala** Age-42 Occu. Business R/o. Near Bohra Mosque, Sarafa Kholapuri Gate, Amravati Tq. And Dist. Amravati. **8. Juzer Shabbar Husain Holawala** Age-36 yrs, Occu. Business R/o. Vidya Colony Camp, Amravati Tq. And Dist. Amravati. **9. Tasneem Jafar Holawala** Age 62 Occu. Household R/o. Bohra Masjid Saifee Marg, Amravati Tq. And Dist. Amravati. **10. Arwa Jafar Holawala** Age 37 Occu. Household R/o Near Bohra Masjid Sarafa Bazar, Amravati Tq. & Dist. Amravati **11. Taha Jafar Holawala**Age 32 Occu. Education, R/o. Near Bohra Masjid Sarafa Bazar, Amravati Tq. And Dist. Amravati.

**विरुध्द**
**गैरअर्जदार- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत मलेका सज्जाद हुसैन होलावाला** हया ०५.०९.२०११ रोजी अमरावती ता. जि अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार गझनफार सज्जाह अधिक दहा विरूध्दध निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्री. गझनफार सज्जाह अधिक दहा विरूध्द** निरंक वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ०६.०२.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती.**

# कौशल्य विकास केंद्राचा 'प्लेसमेंट ड्राईव्ह' सोमवारी

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मोहिमे'चे आयोजन करण्यात येणार आहे. त्या अंतर्गत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर, अमरावती व शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय, अमरावती यांचे संयुक्त विद्यमाने रोजगार मेळाव्याचे आयोजन सोमवार, दि. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार आहे. तसेच मेळाव्यामध्ये विविध कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहे.

जिल्ह्यातील युवक-युवतींना नोकरीच्या संधी मिळवून देण्याच्या उद्देशाने जास्तीत-जास्त उमेदवारांना रोजगार मेळाव्यामधून नोकरी देण्याचा प्रयत्न जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातर्फे करण्यात येतो. त्यात विविध आस्थापनांचे, कंपन्यांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित राहून उमेदवारांच्या थेट मुलाखती घेतील. मुलाखतीनंतर पात्र ठरणा-या उमेदवारांना लगेच नोकरीची संधी मिळेल. या मेळाव्यामध्ये सहभागी होण्यासाठी www. mahaswayam.gov.in या लिंकवर जाऊन ऑनलाईन नोंदणी करावी. ापली रजिट्रेशन ची प्रिंट काढून मेळाव्याच्या दिनांकास उपस्थित राहावे.

याबाबत काही अडचण असल्यास अमरावती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, दुरध्वनी क्रमांक ०७२१-२५६६०६६ किंवा amravatirojgar @gmail. com या इमेलवर संपर्क साधावा. तसेच ९ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, शासकीय तांत्रिक विद्यालय परिसर डेपो रोड, अमरावती येथे स्वखर्चाने बायोडाटा, पासपोर्ट साईज फोटो व आवश्यक कागदपत्रासंह कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित रहावे, असे आवाहन अमरावती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत करण्यात आले आहे.

## जाहीरनामा
### दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
### वि. श्री. एस.एस. भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्रमांकः १०४/२०२६ पुढील तारीख ०६.०३.२०२६

**श्री. प्रफुल्ल अधिक एक विरुध्दध निरंक**

अर्जदार- **1. Prafulla Suresh Chichakhede** Age 39 yrs, Occu. Service,
**2. Smt. Damayanti Suresh Chichakhede** Both R/o Sanjay Gandhi Nagar No.2, Near Bagade Kirana Amravati.444606.
Age 60 yrs, Occu. Household,

**विरुध्द**
**गैरअर्जदार**
**निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत सुरेश रघुनाथ चिंचखेडे हे ०२.०५.२०२२ रोजी अमरावती ता. जि अमरावती येथे मयत** झाले. **अर्जदार प्रफुल्ल अधिक एक विरूध्द** निरंक यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.त्यापेक्षा **श्री. प्रफुल्ल अधिक एक विरूध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहुं मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सबहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ०३.०२.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर ,अमरावती**

**मा.सहदिवाणी न्यायाधिश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**
किरकोळ (आर.एम.जे.सी.) क्र.२२/२०२६ ने.ता.२७.०२.२०२६

**अर्जदार ः १. कस्तुश प्यारेलाल यादव** रा.बडनेरा रोड, चंद्रवती नगर, साई नगर अमरावती, ता.जि.अमरावती

**// वि //**
**निरंक**

ज्याअर्थी **मयत कमलाबाई शिवमंगल अहेर (यादव)** यांचा मृत्यू दिनांक **०२.०९.२०२०** रोजी **धानोरा फसी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती** येथे झाला.मयतांचे पती नामे शिवमंगल बिंदाजी अहेर (यादव) यांचा मृत्यू दि.२०.०३.१९७५ रोजी **धानोरा फसी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती** येथे झाला. मयताचे अर्जदार नं.१ ही मुलगी आहे. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय,क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०२ फेब्रुवारी २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय,नांदगाव खंडेश्वर**

## अर्जट घर विकणे आहे

प्लॉट १४३३ चौ.फुट, बांधकाम ७०० चौ.फुट (1 BHK) पुर्वेस व उत्तरेस रोड, पुर्वमुखी, पश्चिमेस खुली जागा, हवेशीर व घरापासून १ कि.मी.वर वलगांव रेल्वे स्टेशन

**संपर्क**
८४२१७२९२११,
९८२३७८६४१०

# जाहिरात

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती या संस्थेतील छायाप्रत / संगणक छपाई सुविधा केंद्र चालविण्या साठी वर्ष २०२६-२७ करीता विद्यार्थी सहकारी भांडार छायाप्रत / संगणक छपाई दरपत्रक पंजीबध्द / नोंदणीकृत सेवाधारका कडून विहित नमुण्यात दरपत्रक मागविण्यात येत आहे.

निविदा आवेदन पत्र महाविद्यालयाच्या ग्राहक भांडारातून कार्यालयीन वेळेत दि. ०९/०२/२०२६ ते दि. १६/०२/२०२६ पर्यंत रु. १०००/- रोख भरून प्राप्त करून घ्यावे. संपूर्ण भरलेले दरपत्रक दि. २०/०२/२०२६ रोजी संध्याकाळी ५.०० पर्यंत सादर करण्यात यावे.आवेदन पत्रासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडावी लागतील. अन्यथा कागदपत्रां अभावी आवेदन पत्र रद्द करण्यात येईल. विलंबाने प्राप्त होणारे आवेदन पत्र विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.अधिकची माहिती करीता महाविद्यालयाचे संकेतस्थळ **www.gcoea.ac.in** वर पाहावे.

**प्राचार्य**
**शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती**

**वि.मा.का./अम./जाहि./१०२३...२०२५-२५**

## सायटेशन / जाहीरातनामा
### विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब (क. स्तर) मोर्शी

आर.एम.जे.सी.क. ६१/२०२६ ने.ता. ७/३/२०२६

**अर्जदार- १. सुधाकर बाजीराव राऊत,** वय ७६ वर्षे, व्यवसाय -सेवानिवृत्त रा श्रीहरी कॉलनी (साईनगर) वर्धा रोड आर्वी, ता. आर्वी, जि. वर्धा
**२. प्रकाश बाजीराव राऊत,** वय ६५ वर्षे, व्यवसाय -मजुरी रा. इलेक्ट्रॉनिक क्षेप, गजानन नगर, एम.आय.डी.सी. हिंगणा रोड नागपुर, ता.जि. नागपुर
**३. साहेबराव बाजीराव राऊत (मयत) तर्फे वारस-**
**३अ.** श्रीमती मालाबाई साहेबराव राऊत, वय ७० वर्षे, व्यवसाय -घरकाम रा. खापर्डे प्लॉट परतवाडा, ता.अचलपुर, जि. अमरावती
**३ब. सौ. पुष्पलता प्रकाशराव महल्ले,** वय ५० वर्षे, व्यवसाय -घरकाम रा. भुगाव, ता.अचलपुर, जि. अमरावती
**३क. शुभांगी राजेंद्र लहाने,** वय ४८ वर्षे, व्यवसाय -घरकाम रा. विश्रोळी, ता.चांदुरबाजार, जि. अमरावती
**३ड. उमेश साहेबराव राऊत,** वय ४२ वर्षे, व्यवसाय -मजुरी रा. खापर्डे प्लॉट परतवाडा, ता. अचलपुर, जि. अमरावती
**३इ. शिल्पा सतिश धोटे,** वय ३९ वर्षे, व्यवसाय -घरकाम रा. करजगांव, ता.जि. अमरावती
**४. रामदास बाजीराव राऊत (मयत) तर्फे वारस-**
**४अ. श्रीमती रत्ना रामदास राऊत,** वय-५५ वर्षे,व्यवसाय -घरकाम रा. दस्तुर नगर, दुधगंगा कॉलनी, पोकळे किराणाजवळ, छत्री तलाव रोड अमरावती, ता.जि. अमरावती
**४ब. शुभांगी अशोकराव वानखेडे,** वय ३८ वर्षे, धंदा-घरकाम रा. जेवड नगर, शीशी कारखान्याजवळ, छत्री तलाव रोड, अमरावती ता.जि. अमरावती
**४क. मोनाली चंद्रशेखर राऊत,** वय ३२ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा. दस्तुर नगर, जेवड नगर गल्ली कं. २ (अल्का ड्रेसेस दुकान) ता.जि. अमरावती
**४ड. कोमल भुपेंद्र मुंगूलकर,** वय-२८ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा. वास्प रेसीडेन्सी, दुसरा मजला फलॅट नं. २०१, सामरा नगर, एम.आय.डी.सी. रोड अमरावती, ता.जि. अमरावती

**विरुध्द- गैरअर्जदार**
**रामभाऊ बाजीराव राऊत (मयत) तर्फे वारस-**

**१अ. श्रीमती बेबी रामभाऊ राऊत,** वय ६० वर्षे व्यवसाय - घरकाम
**१ब. सौ. वृषाली निलेश डाहाके,** वय ३६ वर्षे, व्यवसाय - घरकाम दोघेही रा.नयावाठोडा, ता. मोर्शी, जि. अमरावती
**१क. सौ. रुपाली संदीप डुबे,** वय ३२ वर्षे, व्यवसाय -घरकाम रा. शिवकृपा बिल्डींग, ध्रुव नगर, रिअल स्वीट जवळ सातनुर नाशिक, ता. जि. नाशिक

**विरुध्द- निल**

वरील अर्जदाराने वि. दिवाणी न्यायाधिश साहेब (क. स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत ळ/ २ बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार कं. १ व २ यांचे वडील, तर अर्जदार कं. ३अ ४अ, चे सासरे व अर्जदार कं.३ब ते ३ई तसेच अर्जदार कं. ४ब ते ४ड यांचे आजोबा व गैरअर्जदार कं. १अ चे सासरे तर १ब व १क चे आजोबा नामे बाजीराव मनाजी राऊत यांचा दिनांक ३१/०३/१९७८ रोजी नयावाठोडा, ता. मोर्शी, जि. अमरावती येथे मृत्यु झाला. तसेच अर्जदार कं. १ व २ यांची आई, तर अर्जदार कं. ३अ ४अ, ची सासु व अर्जदार कं.३ब ते ३ई तसेच अर्जदार कं. ४ब ते ४ड यांची आजी व गैरअर्जदार कं. १अ ची सासु तर १ब व १क ची **आजी नामे द्रौपदाबाई बाजीराव राऊत हीचा दिनांक २५/०५/२०११ रोजी नयावाठोडा, ता. मोर्शी, जि. अमरावती येथे मृत्यु** झाला. अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस आहे. तसेच मयतांचे नांवे असलेल्या शासकीय तथा निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयतांना वरील अर्जदारांशिवाय ईतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, जर कोणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महीण्याच्या आंत वि. न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

शिक्का
**आदेशानुसार**
**(सहायक अधिक्षक)**
**दिवाणी न्यायालय क. स्तर मोर्शी**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज ०६/२०२६
**शमशाद अधिक पाच..वि..निरंक**
पुढील ता.२३.०२.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
1. Shamshad Bano Taslim Khan, Age 56 Yrs. Occu.: Household
2. Mohsin Khan Tasleem Khan, Age 38 Yrs. Occu.: Business
3. Tausif KhanTasleem Khan, Age 35 Yrs. Occu.: Business
4. Shireen Khanam Abrar Khan, Age 32 Yrs. Occu.: Household R/o Near Nawaj Medical, Taj Nagar No.1, Amravati
5. Kashif Khan Tasleem Khan, Age 30 Yrs. Occu.: Business
6. Saima Bano Taslim Khan, Age 27 Yrs. Occu.: Household Applicants no.1, 2,3,5 & 6 , R/o. Taj Nagar No.1, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Tasleem Khan Habib Khan हया दिनांक 05.06.2022 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Shamshad Bano Taslim khan+5 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Shamshad Bano Taslim khan+5 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२८.०१.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## जाहीरनामा
### दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
### वि. श्री. ए.बी.कट्टे ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्रमांकः १०१/२०२६ पुढील तारीख ०७.०३.२०२६

**रामचंद्र व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार- **1. Ramchandra Namdeorao Gedam** Age: 57 yrs, Occ-Service
**2. Riya Ramchandra Gedam** Age-18 yrs Occ- Education
Both R/o Telephone Colony, near Arjun Nagar Amravati

**विरुध्द**
**गैरअर्जदार**
**निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत बबीता रामचंद्र गेडाम दि.१६.०९. २०२५** रोजी अमरावती, येथे मयत झाले. अर्जदार **रामचंद्र व इतर विरूध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा रामचंद्र व इतर विरूध्द निरंक वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. २८.०१.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर ,अमरावती**

## जाहीरनामा
### दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
### वि. श्री. ए.बी.कट्टे ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्रमांकः ३१३९/२०२६ पुढील तारीख २५.०२.२०२६

**संगीता विरुध्द निरंक**

अर्जदार-**1. Sangita Panjab Gulhane** Age: 57 yrs, Occ-Household R/o Plot No. 2147/7/A, Amba Nagar, Near Jwalamukhi Mandir, Amravati
**2. Abhay Panjabrao Gulhane** Age-35 yrs, Occ- Labour
R/o Akoli Road, Near Durga Devi Mandir Amba nagar Amravati

**विरुध्द**
**गैरअर्जदार- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत पंजाब मारोतराव गुल्हाणे दि०४१० २०२१ रोजी अमरावती, येथे मयत झाले अर्जदार संगिता व इतर विरूध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **संगीता विरुध्द निरंक** निरंक वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. २८.०१.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर ,अमरावती**

## जाहीर नोटीस
### विद्यमान ९ वे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

**Succession No..** २७३९/२०२४ चौ.ता. ०९/०३/२०२६

अर्जदारः **1- Ashvini Atul Iwnate** Aged about 32 yrs, Occ- Household
**2- Atashw Atul Iwnate** Aged about 3 yrs, Occ- Nil Both R/o At Post Kurha, Tq. Tiosa Distt. Amravati (Through his Natural Guardian Mother i. e. Applicant no. 1)

**विरुध्द**
**गैरअर्जदार- निरंक**

**1. Smt. Jyoti Ramesh Iwnate**
Aged about yrs, Occu- Household R/o Near Murmura Karkhana Vjijay Nagar, Sai Nagar, Amravati

ज्याअर्थी अर्जदार यांनी भारतीय वारसा कायदा १९२५ च्या कलम ३७२ अन्वये या न्यायालयात उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, मयत अतुल रमेश इवनाते यांचे निधन दिनांक १३/०८/२०२४ रोजी अमरावती येथे झाले असून वरील अर्जदार त्यांचे कायदेशीर उत्तराधिकारी आहेत व इतर कोणीही मय्यतास उत्तराधिकारी नाही. सबब उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत वि. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), अमरावती या न्यायालयामध्ये हजर होवून आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल हयाची नोंद घ्यावी.

आज दि. २७/०१/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिली.

शिक्का
**आदेशानुसार**
**सहा. अधिक्षक(प्रशासन)**
**दिवाणी न्यायालय(व.स्तर) अमरावती**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज ७/२०२६
**श्री चंद्रकांत अधिक दोन विरुध्द निरंक**
पुढील ता.१८.०२.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
1. Chandrakant Bhaskar Dighade Age about 68 Yrs. Occu.: Service R/o. S.No. 14/3 Chintamani River View Flat No. 903, Bhalei, Near Bhalekar Udyan Karve Nagar, Pune City, Navsahyadri, Pune, Maharashtra 411052
2. Rekha Vijay Bobde, Age about 60 Yrs. Occu.: Household R/o. Ward No.3, Laxmi Nagar, Wardha (M.S.)- 442001
3. Anita Anil Dighade, Age about 57 Yrs. Occu.: Household R/o. Dastur Nagar Road, Near Ram Temple,Varsha Colony, Rukhmini Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत सिंधुताई भास्करराव दिघडे** हया १४.०५.२०२४ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार चंद्रकांत अधिक दोन विरुध्द निरंक यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **चंद्रकांत अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२७.०१.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

## जाहीर नोटीस

माझे पक्षकाराने दिलेल्या माहिती व अधिकारानुसार सर्व जनतेस या जाहीर नोटीसव्दारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार नामे **श्रीमती इंदू गोकुल भोंडे** यांनी यांनी इंडिया शेल्टर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड, शाखा अमरावती येथील कंपनीतून गृह लोण मिळावे या करिता अर्ज केलेला असून खालील प्रमाणे नमुद मालमत्ता रजिस्टर खरेदीखत क्र.१४६२ ता.०३/०४/२००१ नामे पांडूरंग नारायणराव बगेकर व प्राजीत्सेन गुलाबराव दामले/देवराव मोतीराम दामले, मौजे- महाजनपुरा, प्रगणे बडनेरा, शेत सर्वे नं.४/२ मधील रा.मा.क्र.**21/NAP-34** महाजनपुरा **81-82** असुन सदरील मालमत्तेची ओरिजिनल खरेदीची झेरॉक्स काढण्याकरिता साईनगर ते राजकमल ऑटो मधून लाल कलरची पिशवी गहाळ झाली त्यासोबतच दस्त क्र.१८९४/०६.०८.२००३ नामे **श्रीमती इंदू गोकुल भोंडे** व **पांडूरंग नारायणराव बगेकर** या ओरिजिनल खरेदी खत मधुन पान नं.०९ हे देखील गहाळ झाले आहे.तरी अश्या नावाची खरेदी कुणाला सापडल्यास अथवा खरेदीनुसार नमुद मालमत्ता बाबत कुणीही कर्ज/गहाण/बोजा आढळल्यास अथवा कुठलाही या मालमत्ता बाबत, पैशाचा व्यवहार झाल्यास ०३ दिवसात खालील पत्त्यावर कागदपत्रासहीत संपर्क करावा.

दि.०७.०२.२०२६
**(ॲड.अनिकेत देशमुख)**
इंडिया शेल्टर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड, अमरावती
मो.नं.९५६१२४८२१५

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९७/२०२६
**रविंद्र चोरडीया अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.२८.०२.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
1. Dr.Ravindra Phulchand Chordia, Age 76 Yrs. Occu.: Medical Practitioner R/o Shrikrishna Peth, Amravati
2. Dr.Rohit Ravindra Chordia, Age 49 Yrs. Occu.: Medical Practitioner R/o Shrikrishna Peth, Amravati
3. Yash Ravindra Chordia, Age 44 Yrs. Occu.: Business R/o Shrikrishna Peth, Amravati (Mob.No.9422121628)
4. Seema Nitin Chhajed, Age 41 Yrs. Occu.: Business R/o Flat No.666, Balaji Heights, Plot No.5, Opp.Tip Top Convent, Swalambi Nagar, Khamla, Nagpur.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Nirmala Ravindra Chordia हे दिनांक 30.12.2025 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Dr.Ravindra Phulchand Chordia + 3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Dr.Ravindra Phulchand Chordia + 3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०२.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.
संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १५३
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# विदर्भाची पंढरी : श्री क्षेत्र शेगाव



श्री गजानन महाराजांची शेगाव नगरी म्हणजे खऱ्या अर्थाने विदर्भाची पंढरी झाली आहे.बाराव्या शतकापासून भक्ती परंपरा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात, घराघरात पोहोचली आहे. ही संतांची भूमी आहे. विदर्भात संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, ज्ञानेशकन्या गुलाबराव महाराज, वासुदेव महाराज, गजानन महाराज अशा थोर महानुभाव व वारकरी संत महात्म्यांचा हा विदर्भीय प्रदेश आहे. या संप्रदायाचे सामूहिक जीवन समूहभाव भक्ती परंपरेचे वैशिष्ट्य आहे.वारकरी संप्रदायाची परंपरा संपूर्ण महाराष्ट्रामध्ये प्राचीन परंपरा म्हणून आपण या परंपरेकडे बघतो.ही परंपरा केवळ महाराष्ट्र पुरतीच नव्हे तर पंजाब पर्यंत पोहोचवण्याचे काम संत नामदेवांनी तत्कालीन केले. आज ही परंपरा टिकविण्याचे कार्य श्री गजानन महाराज संस्थान प्रकर्षाने करताना आपल्याला दिसते.लाखोच्या संख्येने असलेला महाराजांचा भक्तगण समोर दिसला की ज्ञानोबा तुकाराम तुकोबांची पंढरी आठवते. भक्तांच्या त्या जनसमुदायांमध्ये जणू परमेश्वरच आपल्यासह वास करतो आहे असे वाटते. शेगाव नगरीतील रोजच्या दिवसाची गर्दी बघता असंख्य भक्तांची माऊलींच्या दर्शनासाठी तासंतास दर्शन बारीत उभे राहून 'गण गण गणात बोते 'चा नाम गजर ऐकला की 'जय जय राम कृष्ण हरी' ही संतांची मांदियाळी वर्तमान स्थितीत कशी नादमय झाली आहे ते दिसते.

संत गजानन महाराजांचा भक्तगण हा संपूर्ण महाराष्ट्रभर नव्हे तर महाराष्ट्र बाहेरी अनेक प्रदेशांमध्ये महाराजांची महती सर्वदूर पसरली आहे. कार्तिकी,आषाढीला श्री गजानन महाराजांच्या संस्थानांमधून पालख्या पंढरपुराकडे जातात आणि प्रकट दिनाला आणि ऋषिपंचमीला त्याचबरोबर चतुर्थी गुरुवार या दिवशी देखील गाव खेड्यातून कानाकोपऱ्यातून अनेक पालख्या शेगाव नगरीमध्ये प्रवेशतात. संतांची मांदियाळी जशी चंद्रभागेच्या वाळवंटामध्ये एकरूप झाली होती त्याचीच प्रचिती शेवगाव नगरीतील या दिंड्या, पताका, पालख्या बघितल्या की येते. श्री गजानन महाराज संस्थान शेगावचे आणखी वैशिष्ट्य म्हणजे असंख्य भक्तांना निशुल्क रोज जो महाप्रसाद दिला जातो आणि सगळीकडे जी प्रचंड शिस्त आणि स्वच्छता दिसते ती क्वचितच कुण्या देवस्थानावर असेल असे वाटते. आपल्या स्वच्छता आणि शिस्तीसाठी ज्ञात असलेले हे शेगाव संस्थान श्रींच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना आदर्श देणारे आहे. अनेकांच्या मुखातून हे उद्गार निघतात की शेगाव संस्थानची शिस्त, स्वच्छता व महाप्रसाद अद्वितीय आहे.आणि लाखोंच्या संख्येने असलेला भक्तगण हेच खरं विदर्भाचं वैभव आहे. प्रत्येक वैदर्भीय माणसांनीच नव्हे तर इथे येणारा प्रत्येक जण काय घेऊन जाईल तर ते असेल महाराजांच्या संस्थांची शिस्त आणि स्वच्छता भक्तांनी निदान ही गोष्ट जरी अंगीकारली तरी 'स्वच्छ भारत समृद्ध भारत' झाल्या वाचून राहणार नाही. स्वच्छतेतून आरोग्याचा मंत्र आणि शिस्तेतून प्रगतीची वाट दर्शवणारे हे संस्थान आहे. अनेकांचा असाही अनुभव आहे या नगरीत पाऊल टाकताच आपोआपच आपल्यामध्ये शिस्त संचारते. स्वच्छता पाळली जाते.

नियमांचा भंग करू नये असे वर्तन घडते. ही या भूमीतील असलेल्या पावित्र्याची वैश्विक शक्ती आहे. जी प्रत्येक जीवात्म्याला स्वतःकडे आकर्षित करते. इथे येणारा प्रत्येक भक्त माऊली होऊन राहतो. वारीत, दर्शन रांगेत मौन पाडतो 'गण गण गणात बोते, असा नाम गजर करतो. कुणी पारायण करतं, तर कुणी गणराया च्या नामाचा गजर करतो. ध्यान मंदिरात असंख्य भाविक गजानन महाराजांच्या २१ अध्यायाच्या चरीत्र ग्रंथाचे, भक्ती विजय ग्रंथाचे पारायण करतो. परिसरामध्ये हजारो च्या संख्येने भक्तगण असतात पण जी अलौकिक शांतता आणि सुख, समाधान प्राप्त होते. त्याने लौकिकातील कुठल्याही सुखाची बरोबरी होत नाही. दर्शन बारीत सगळ्यांच्या मनामध्ये एकच भाव उचंबळून आलेला असतो तो म्हणजे श्रीच्या दर्शनाचा अतिव आनंद होय. शेकडो किलोमीटर पायी प्रवास केल्यानंतर विठू माऊलीच्या क्षणभर दर्शनाचा जो आनंद आहे तोच आनंद तोच आत्मानुभूतीचा चिद्आनंद तीच, सुखानुभूती भाविकांना श्री गजानन महाराजांची पायी वारी करणाऱ्या व दर्शनाला येणाऱ्या प्रत्येक भाविकाला मिळते. वारी हा सामूहिकपणे जगण्याचा,सुखदुःख विसरण्याचा भक्ती मार्गातील हे अनुपम्य सोहळा आहे.मानवी मनाला कायमच सहवासाची ओढ असते, त्यातूनच एकत्र येऊन निर्माण झालेले दिंडी, पालखी, वारी, दर्शन सोहळा अनुपम्या होताना दिसतो. सांसारिक सुखदुःखाच्या पलीकडे भक्ती सुखाची ओढ भक्तांच्या मनामध्ये कायम असते. या अनामिक अशा ओढीने लाखोचा भक्त समुदाय महाराजांच्या प्रगट दिनानिमित्त शेगाव नगरीमध्ये एकत्र येतो. एकता, संघटन आणि विविधता हे आपल्या भारतीय माणसाची वैशिष्ट्यच आहे.

लाखोच्या जनसमुदायांमध्ये देखील शांती मिळते ती महाराजांच्या दर्शनाने. श्री मुखदर्शनाची आस मनामध्ये असल्यामुळेच कित्येक किलोमीटरचा पायी प्रवास करून क्षणाचा दर्शन घेण्याचा सुख सोहळा हे भक्त मंडळी अनुभवतात. महाराजांचा प्रकट दिन केवळ शेगाव नगरीतच नव्हे तर विदर्भातील गावागावा, नगरात, शहरात मोठ्या भक्तिभावाने पारायण सोहळा, किर्तन, भजन, पताका यांचे दर्शन घडते. महाप्रसादाचे मोठ्या प्रमाणावर सगळीकडे आयोजन केले जाते. माऊलीच्या दर्शनाची ओढ व महाप्रसादाची गोडी अनुभवण्यासाठी प्रत्येक भाविक हा या शेगाव नगरीच्या गजाननाचा भक्त विदर्भाला प्रति पंढरपूरचा रूप देऊन जातो.

**डॉ. सुवर्णा गाडगे**
प्राध्यापक,मराठी विभाग प्रमुख
श्री शिवाजी कला व वाणिज्य
महाविद्यालय अमरावती

## संक्षिप्त

### पी.आर.पोटे पाटील आयुर्वेद रुग्णालयात शिबीर



**अमरावती-** पी. आर. पोटे पाटील आयुर्वेद रुग्णालय, अमरावती यांच्या वतीने १० फेब्रुवारी रोजी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १०.०० ते १.०० या वेळेत या विशेष शिबिरात मुळव्याध ,फिशर,भगंदर,पोटाचे आजार, मुत्रमार्गाचे विका,पायलोनाईडल सायनस, हर्निय,हायड्रोसिल, इतर शरीरावर कुठलीही चरबीची, घामाची गाठ, स्तनाच्या गाठी, कान शिवणे, (फाटलेले कान शिवणे), कुरुप काढणे, जखमेवर टाके मारणे, त्वचा विकार हि लक्षणे असल्यास लगेच दाखवून तपासणी करून घ्यावी व गरज असल्यास भरती ठेऊन उपचार करण्यात येईल.या शिबिरासाठी अमरावती येथील तज्ञ चिकित्सक डॉ. नितेश ना. सानप ,डॉ. अश्विनी अं खार्डे रुग्णांची तपासणी, उपचार आणि आजाराविषयी मार्गदर्शन करतील. या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन पी. आर. पोटे पाटील आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रणजित देशमुख यांनी केले आहे.



### श्री संत गजानन महाराजांचा प्रकटदिन

**टाकरखेडा संभू-** चांदूरबाजार तालुक्यातील तळवेल येथील श्री संत गजानन महाराज मंदिर, तळवेल येथे श्रींच्या १४८ व्या प्रकटदिनानिमित्त ७ ते ९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान भव्य धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तीन दिवस चालणाऱ्या या सोहळ्यात अभिषेक, पारायण, होम, भजनी काला व महाप्रसादाचे आयोजन असून परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे.प्रथम दिवशी – ७ फेब्रुवारी रोजी पहाटे ५ वाजता श्रींचा सामूहिक अभिषेक व तीर्थस्थापना करण्यात येणार आहे. सकाळी ७ वाजता दैनंदिन आरतीनंतर श्री संत गजानन महाराज विजय ग्रंथाचे पारायण होईल.द्वितीय दिवशी – ८ फेब्रुवारी रोजी पहाटे ४ वाजता अभिषेक, सकाळी ७ वाजता आरती, सकाळी १० वाजता श्रींकरिता ५६ भोगांचा नैवेद्य, दुपारी १२ वाजता होम होईल. सायंकाळी ७ वाजता आरतीनंतर रात्री ७.३० वाजता महाप्रसाद आयोजित करण्यात आला आहे.तृतीय दिवशी – ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता भजनी काला होऊन सोहळ्याची सांगता होणार आहे.हा सोहळा श्री संत गजानन महाराज भक्त परिवार, तळवेल यांच्या वतीने आयोजित करण्यात आला असून तळवेल व बऱ्हाणपूर येथील सर्व ग्रामस्थांच्या सहकार्याने कार्यक्रम पार पडणार आहे. सर्व भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा, तसेच तन-मन-धनाने सहकार्यकरावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## हनुमान गढी येथे ब्रह्माकुमारींच्या ओमशांती तपस्याधाम रिट्रीट सेंटरचे भूमिपूजन



**अमरावती/का.प्र.**

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, अमरावती यांच्या वतीने हनुमान गढी, इंद्रेश्वर मंदिर परिसरालगत उभारण्यात येणाऱ्या तपस्याधाम रिट्रीट सेंटरच्या भूमिपूजन व उद्घाटन सोहळ्याचे आयोजन अत्यंत उत्साही व आध्यात्मिक वातावरणात पार पडले. या शुभप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून आ.रविभाऊ राणा, आ. राजेशजी वानखेडे, आंतरराष्ट्रीय वक्ते व प्रसिद्ध चिकित्सक डॉ. सचिनजी परब तसेच अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. सर्व मान्यवरांच्या हस्ते रिट्रीट सेंटरच्या इमारतीचे भूमिपूजन करण्यात आले.

कार्यक्रमास अमरावती जिल्ह्यासह परिसरातील विविध भागांतून ब्रह्माकुमारी परिवारातील बंधू-भगिनी, सेवाभावी नागरिक तसेच जिल्ह्यातील प्रमुख माध्यम प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी राजयोगिनी ब्रह्माकुमारी सीता दीदी यांनी तपस्याधाम रिट्रीट सेंटरची उद्दिष्टे स्पष्ट करताना सांगितले की, हे केंद्र भविष्यात मानव आत्म्यास खरे सुख, शांती व अंतर्गत सशक्तीकरण देणारे प्रमुख आध्यात्मिक केंद्र ठरेल. कार्यक्रमात बोलताना डॉ. सचिनभाई परब यांनी ब्रह्माकुमारी संस्थेच्या जागतिक कार्याचा आढावा घेत सांगितले की, ही संस्था आज १५० पेक्षा अधिक देशांमध्ये आत्मिक जागृती, समाजनिर्माण आणि मानवी मूल्यांच्या संवर्धनासाठी कार्यरत आहे. तपस्याधाम रिट्रीट सेंटरदेखील अनेक आत्म्यांना खरे सुख व खरी शांती देण्याचे कार्य करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमास अमरावतीचे प्रसिद्ध संत सागर महाराज देशमुख यांचीही उपस्थिती लाभली.

त्यांनी या आध्यात्मिक उपक्रमास शुभेच्छा दिल्या तसेच आळंदी येथे प्रस्तावित भव्य बांधकाम प्रकल्पाची माहिती देत तेथील प्रस्तावित साहित्य विभागात ब्रह्माकुमारी शिक्षकांच्या योगदानाचे आवाहन केले. कार्यक्रमाची सुरुवात बी.के. प्रमोदभाई यांनी सादर केलेल्या सुमधुर आध्यात्मिक गीताने झाली, ज्यामुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले. कार्यक्रमाचे सुंदर व शिस्तबद्ध सूत्रसंचालन बी.के. सुनंदा दीदी यांनी केले. या भव्य सोहळ्याने तपस्याधाम रिट्रीट सेंटरच्या बांधकाम कार्यास औपचारिक सुरुवात झाली. उपस्थित सर्व मान्यवरांनी हा सेवा प्रकल्प समाजासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे मत व्यक्त करत तो लवकरात लवकर पूर्ण व्हावा, अशी एकमुखी कामना केली. यावेळी कमल किशोर मालानी, दिनेश सेठिया, हर्षल रेवणे, दिनेश टेकाम, विरेंद्र उपाध्याय, पवन जाजोदिया, विनय तन्ना, आरती वानखेडे, श्रद्धा दांडगे यांच्यासह ब्रम्हकुमारी परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सिपना अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्योतन २०२६ थाटात




**अमरावती/का.प्र.**

सिपना अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचा तांत्रिक उत्सव विद्योतन २०२६ दरवर्षीप्रमाणे आयोजित करण्यात आला."powered by AI, Driven by Innovation' हे ब्रीदवाक्य असलेल्या विद्योतनाच्या उदघाटनासाठी प्रमुख पाहुणे, प्रवीण भामरे, ग्लोबल डिलिवरी हेड, टाटा कंसल्टंसी सर्व्हिसेस, पुणे, सिपना शिक्षक प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष अजयभाई श्रॉफ, प्राचार्य डॉ. संजय खेरडे, अधिख्याता विद्यार्थी उपक्रम डॉ. प्रवीण मळसने, कार्यक्रम अधिकारी, डॉ. लीना गौतम,सिपना शिक्षक प्रसारक मंडळ पदाधिकारी, विभागप्रमुख, विद्यार्थी प्रतिनिधी, विद्यार्थी उपस्थित होते.

सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली.साक्षी वडोदकर हिने सरस्वती स्तुवन सादर केले. यानंतर विद्योतन थीम प्रदर्शित करण्यात आली.प्राचार्य डॉ. संजय खेरडे यांच्या हस्ते पाहुण्यांचे वृक्ष रोपटे देऊन स्वागत करण्यात आले. संयोजक डॉ. लीना गौतम यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सादर केली. प्राचार्य डॉ. संजय खेरडे सरांनी स्वागतपर भाषण दिले. संस्थेचे उपाध्यक्ष अजयभाई श्रॉफ ह्यांचे हस्ते प्रवीण भामरे सरांचे शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे, प्रवीण भामरे ह्यांनी विद्यार्थ्यांना ए आय हे नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून भारताचे प्रगती करिता योगदान करण्याचे आवाहन केले. यक्ष प्रश्न,स्नेक लॅडर, इंनोटेक, रोबोविंग्स, व्ही कप, इत्यादी १४ स्पर्धा जिंकणाऱ्या चमूला सुरेंद्र पाटील, चीफ स्ट्रटेजिक ऑफिसर, सियाराम सिल्क मिल ठाणे, प्राचार्य डॉ. संजय खेरडे, डॉ. लीना गौतम, डॉ. प्रवीण मळसने ह्यांचे हस्ते पुरस्कृत करण्यात आले.सुरेंद्र पाटील ह्यांनी भारतीय थल सेना येथे यशस्वीरीत्या सेवा देऊन विशिष्ट सेवा मेडल अर्जित केले होते. व्ही कप शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाने पटकाविले.मंच संचालन ईश्वरी शेरेकर,सृष्टी टिंगने, मैत्रेयी मानापुरे, ईश्वरी भेरडे, श्रावणी गणोरकर, वैदेही मोहोड आणि आभार प्रदर्शन दिशा चव्हाण, प्रा. हरीश ग्वालाणी ह्यांनी केले. साक्षी वडोदकर हिचे पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## पी.आर.पोटे पाटील कॉलेज कॅम्पस प्लेसमेंटमध्ये
# आंतरराष्ट्रीय स्तरावरील 'मॅक्लिओड्स फार्मा'त ४९ विद्यार्थ्यांची निवड



**अमरावती/का.प्र.**

पी.आर.पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप द्वारे संचलित,पी. आर.पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी,अमरावती यांच्यातर्फे नुकताच कॅम्पस ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मॅकलिओड्स फार्मास्युटिकल्स लि.' (Macleods Pharmaceuticals Ltd.) या फार्मसी क्षेत्रातील, बहुराष्ट्रीय कंपनीने सहभाग घेतला. १७० हून अधिक देशांमध्ये जागतिक उपस्थिती असलेली ,ही एक प्रमुख जागतिक, उभ्या एकात्मिक औषध कंपनी आहे,ज्यामध्ये २२,००० पेक्षा जास्त कर्मचारी आहेत.या मुलाखतींसाठी डी फार्म, बी. फार्म आणि एम. फार्म यांसारख्या विविध शाखांतील आणि विविध महाविद्यालयातील उत्तीर्ण आणि अंतिम वर्षातील ४५० पेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी झाले होते. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना क्वालिटी अश्युरन्स (QA), क्वालिटी कंट्रोल (QC) आणि प्रॉडक्शन यांसारख्या महत्त्वाच्या विभागांमध्ये, काम करण्याची संधी मिळणार आहे.

या ड्राईव्हमध्ये पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, अमरावतीच्या डी फाम.,बी फाम. आणि एम फार्म च्या एकुण ४९ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. सदर कार्यक्रमात मॅकलिओड्स फार्मास्युटिकल्स लि.यांच्यातर्फे व्यवस्थापक मयंक जैन व इतर टेक्निकल एक्सपर्ट यांनी मार्गदर्शन केले .तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. दीप्ती रुईकर यांनी औषध निर्माण क्षेत्रातील संधी व आव्हाने यावर मार्गदर्शन केले. पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, अमरावती महाविद्यालयातर्फे दरवर्षी विद्यार्थ्याकरिता अशा प्रकारच्या कॅम्पस प्लेसमेंट करिता, नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्यांना महाविद्यालयात आमंत्रित करते, व त्यांचा लाभ विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर होतो.सदर कॅम्पस ड्राईव्ह चे नियोजन ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे प्रमुख डॉ. भूषण भोयर यांनी केले. तसेच कॅम्पस ड्राईव्हच्या यशस्वी आयोजनामध्ये सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

## सोमवारी अजितदादा पवार यांच्या सर्वपक्षीय श्रद्धांजली सभेचे आयोजन



**अमरावती-** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा दिवंगत उपमुख्यमंत्री आदरणीय अजितदादा पवार यांना सर्वपक्षीय श्रद्धांजली वाहण्याला घेऊन येत्या ९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता, संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन अमरावती येथे श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. दिवंगत लोकनेता अजितदादा पवार यांच्या अकाली निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला असून तमाम चाहते व समर्थक शोकसागरात बुडाले आहे. दादांच्या पवित्र कार्याचे स्मरण करून त्यांना आदरांजली वाहण्यासाठी अमरावती येथे एक सर्वपक्षीय श्रद्धांजली सभा व्हावी, अशी इच्छा आ.संजय खोडके व आ.सुलभा खोडके यांनी व्यक्त केली आहे.या सभेला जिल्ह्याचे पालकमंत्री ना. चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्यासह जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेते,आजी-माजी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्ते, विविध समाज संघटना, मंडळे व संस्थाचे पदाधिकारी देखील उपस्थित राहतील, अशी माहिती आ.संजय खोडके यांनी दिली. तसेच सर्वानी दिवंगत लोकनेता अजितदादा पवार यांना आदरांजली वाहण्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन देखील आ. संजय खोडके यांनी केले आहे.

# महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयामध्ये वार्षिक स्नेहसंमेलन

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक अस्मिता शिक्षण मंडळ द्वारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयामध्ये नुकतेच वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन झाले.याप्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मीनल भोंडे अध्यक्ष, अस्मिता शिक्षण मंडळ, स्नेहसंमेलनाचे उद्घाटक प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलगुरू, महात्मा गांधी मिशन विद्यापीठ, संभाजीनगर,प्रमुख उपस्थिती गुरुवर्य सुरमणी प्रा.कमल भोंडे, विश्वस्त अस्मिता शिक्षण मंडळ, प्रा. डॉ. मृणाल भोंडे,सचिव,अस्मिता शिक्षण मंडळ,प्रा. डॉ.श्रीकृष्ण सावरकर, कोषाध्यक्ष, अस्मिता शिक्षण मंडळ, प्रा. शशिकांत येवतकर, कार्यकारणी सदस्य, अस्मिता शिक्षण मंडळ, स्नेहसंमेलन प्रभारी प्रा. डॉ श्रीधर धाकुलकर, संचालक, शारीरिक शिक्षण विभाग, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय अमरावती हे व्यासपीठावर उपस्थित होते.

कुलगुरू प्रा. डॉ. विलासजी सपकाळ यांनी महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन करून आपले मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ मीनल भोंडे यांचे प्रती कृतज्ञता व्यक्त करन महाविद्यालयाला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छाही दिल्यात.प्रमुख उपस्थिती डॉ.श्रीकृष्ण सावरकर यांनी पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून दिवसेंदिवस महाविद्यालयाची प्रगती होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला.अध्यक्षीय मनोगतातून प्राचार्य डॉ. मीनल भोंडे यांनी संधीचे सोने करण्याचे आवाहन केले.वेळ जशी अनमोल आहे तशीच संधीही मोलाची असते.युजी आणि संशोधन यांच्यातील दुवा म्हणजे पी जी असते. नवीन शैक्षणिक धोरणातून ही संधी उपलब्ध होत आहे.पण त्यासाठी अंतचक्षू पासून प्रज्ञा चक्षु पर्यन्त दृष्टी बदलविण्याची गरज आहे असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.स्नेहसंमेलन उद्घाटनादरम्यान महाविद्यालयात



गेल्या सत्रात विशेष प्राविण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते त्यांचा गुणगौरव करण्यात आला. संत गाडगे बाबा अमरावती विद्यपीठाच्या उन्हाळी २०२५चे परीक्षेत गुणवत्ता यादीत एम.एस.सी मधून सातव्या स्थानावर आलेली वैष्णवी ठाकूर, प्रथम मानसी राठी,द्वितीय सेजल मोटवानी आणि तृतीय स्नेहा मुंदे,संगणक शास्त्र पदवी परीक्षेतून गुणवत्ता यादीत आठवे स्थान प्राप्त केलेली तनुजा शेगोकार आणि नववे स्थान प्राप्त केलेले प्रज्वल डोंगरे, स्नेहसंमेलनादरम्यान आयोजित विविध स्पर्धा रांगोळी, मेहंदी,गीत गायन, पोस्टर मेकिंग,स्लोगन, डोज बॉटल, स्लो सायकलींग, परंपरागत वेशभूषा, चरित्र व्यक्तिमत्व स्पर्धा, मिस मॅच स्पर्धा यात प्रावीण्य प्राप्त विद्यार्थी, विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये संशोधन पर लेख सादरीकरण करणारे मानसशास्त्र पदव्युत्तर विभागाचे विद्यार्थी या सर्वांना मान्यवरांच्या हस्तो स्मृतिचिन्ह,प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

दरवर्षी स्नेहसंमेलना अंतर्गत शारीरिक शिक्षण विभाग व प्लेसमेंट सेलद्वारा आयोजित आंतरमहाविद्यालय स्पर्धा परीक्षेत प्रथम क्रमांक प्राप्त साहिल किल्लेवार, विद्याभारती महाविद्यालय याला स्व. वासुदेवराव वैद्य स्मृती प्रित्यर्थ श्री वैद्य ब्रदर्स यांच्या द्वारा प्रायोजित २१००/ रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक प्राप्त रामेश्वर दोडके, गो.सी. टोम्पे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय चांदूर बाजार यांना स्व. भाऊसाहेब बोंडे यांचे स्मृती प्रित्यर्थ प्रा. डॉ. अजय बोंडे यांच्यातर्फे १५०१/रू रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र तर तृतीय क्रमांक प्रथमेश मसराम, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय यांना स्व. वंदनाताई भामोदकर स्मृती प्रित्यर्थ श्री प्रज्वल भामोदकर यांच्यातर्फे ११०१/ रुपये रोख स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, प्रोत्साहन पर पारितोषिक स्व. उषाताई विनायक इंगळे यांच्या स्मृती प्रित्यर्थ विनायकराव इंगळे यांच्यातर्फे प्रायोजित करण्यात आले होते.यामध्ये अपूर्वा बनसोड, ऋतुजा कडू व संचिता मेने महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय अमरावती यांना प्रत्येकी ५०१/ रुपये रोख व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. आंतर महाविद्यालयीन खो-खो स्पर्धेत उपविजेची ठरलेली मुलीच्या चमूला महाविद्यालयाच्या विद्यार्थी कल्याण निधी आणि प्राध्यापकांच्या सहकार्य निधीतून प्रत्येकी एक ट्रॅक सूट भेट म्हणून मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. स्नेहसंमेलन प्रभारी प्रा. डॉ. श्रीधर धाकुलकर यांनी प्रास्ताविकाच्या माध्यमातून महाविद्यालयाचे प्रगतीचा थोडक्यात आढावा घेतला आणि स्नेहसंमेलनाच्या आयोजनामागील भूमिका विशद केली. उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. स्वाती गिरासे, भूगोल विभाग यांनी केले तर उपस्थियांचे आभार प्रा. अंबिका बडनखे यांनी मानले. स्नेहसंमेलन कार्यक्रमात वार्षिक स्नेहसंमेलनात सर्व विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उत्साहाने सहभागी झालेत.

## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे **डिगांबर मारोतराव घोरपडे** आणि **मंगेश डिगांबर घोरपडे** यांचे वतीने सादर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाने,

**मिळकतीचे वर्णनः मौजे कारंजा लाड, नझुल शिट क्रं.३२-D, नझुल प्लॉट क्रं. ३, ता. कारंजा लाड आणि जिल्हा.वाशीम,**

सदर मिळकत माझे पक्षकार नामे **डिगांबर मारोतराव घोरपडे आणि मंगेश डिगांबर घोरपडे** यांच्या मालकीची आहे. तदनंतर **डिगांबर मारोतराव घोरपडे आणि मंगेश डिगांबर घोरपडे** यांनी **PIRAMAL FINANCE LTD BR. AMRAVATI.** येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता, **सदर मिळकतीचे पूर्वीचे मूळ खरेदी खत दि.३०/१०/२०१९ रोजीचे दस्त क्र. ४६०२ सदर मुळ खरेदी खत गहाळ झालेले आहे.** तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान, पतसंस्था/राष्ट्रीयकृत/सहकारी अथवा खाजगी बँक, संस्था बोजा, या मालमतेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल नं. वर ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या ७ दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही करिता ही जाहीर सूचना देत आहे.

**आपला**
**ॲड. रवींद्र रू. वाटाणे**
**स्नेहगंधा कॉलोनी, अमरावती**
**मो. नं. ९८२३६९८७४५**

शिक्का

# विधीसंघर्षग्रस्त बालकांच्या कंबरेला देशी कट्टे!

## अमरावतीत शस्त्रांचा खेळ धोकादायक वळणावर

### -दोन देशी कट्टे, जिवंत काडतुस जप्त





**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहर गुन्हे शाखेने बडनेरा परिसरात धडक कारवाई करत दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांना देशी कट्टे व जिवंत काडतुससह ताब्यात घेतले असून, या कारवाईने एकच खळबळ उडाली आहे.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात कठोर भूमिका घेण्याचे स्पष्ट आदेश दिल्यानंतर, पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखेने शस्त्रविरोधी मोहीम अधिक तीव्र केली आहे. त्याच अनुषंगाने ७ फेब्रुवारी २०२६ रोजी गुन्हे शाखेला ☞(पान २ वर)

# महागाव नगरपंचायतीतील भ्रष्टाचार झाकण्यासाठी 'किडनॅप ड्रामा'?

## उपाध्यक्ष प्रमोद भरवाडेंची बनावट अपहरण कथा

**महागाव/प्रतिनिधीः-** महागाव नगरपंचायतीतील भ्रष्टाचार, अवैध ठराव आणि दारू दुकानांच्या परवानग्यांवरून सुरू असलेल्या तीव्र वादाच्या पार्श्वभूमीवर नगरपंचायत उपाध्यक्ष प्रमोद उर्फ शाखा भरवाडे यांनी सहकुटुंब अपहरण झाल्याची बनावट कहाणी रचल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. मात्र महागाव पोलिसांच्या कसून व तांत्रिक तपासामुळे हा तथाकथित 'किडनॅप ड्रामा' अवघ्या काही तासांतच कोसळला.

दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी मध्यरात्री सुमारे दोन वाजता अज्ञात व्यक्तींनी बंदुकीचा धाक दाखवून उपाध्यक्षांचे संपूर्ण कुटुंब अपहरण केल्याची अफवा पसरवण्यात आली. याबाबत पोलिस ठाण्यात चुकीची माहिती देण्यात आली, तसेच काही ठराविक मित्रांना फोन करून संभ्रम निर्माण करण्यात आला. परिणामी संपूर्ण यवतमाळ जिल्ह्यातील पोलीस यंत्रणा अलर्ट मोडवर आली.

मात्र तपास सुरू होताच धक्कादायक वास्तव समोर आले. सीसीटीव्ही फुटेजमध्ये उपाध्यक्ष प्रमोद भरवाडे हे स्वतःच सहकुटुंब आपल्या स्विफ्ट डिझायर गाडीतून निघून जाताना स्पष्ट दिसून आले. बिजोरा टोलनाक्यावर ते स्वतः वाहन चालवत असल्याचे पुरावे पोलिसांच्या हाती लागले. पुढे ☞(पान २ वर)



### ■ तक्रार नाही, फक्त चर्चा

या प्रकरणात पोलिस तपासादरम्यान अनेक बाबी तपासून पाहिल्या असता संपूर्ण प्रकार बनावट असल्याचा ठोस संशय व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे संबंधितांकडून अद्यापही अधिकृत अपहरणाची तक्रार दाखल करण्यात आलेली नाही. पाच जणांनी अपहरण केल्याची केवळ चर्चा केली जात असली, तरी गुन्हा नोंदवण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ होत असल्याने हा प्रकार नेमका काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे हा सर्व प्रकार मुद्दाम रचलेला ड्रामा असल्याचा संशय अधिक बळावला आहे. या संदर्भात पोलीस ठाणेदार धनराज निले यांनी 'प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून सत्य लवकरच समोर येईल,' अशी माहिती दिली आहे.

# मेळघाटाच्या डोंगरदऱ्यांत जिल्हा प्रशासनाचा 'ट्रेकिंग' अनुभव

## ऐतिहासिक गाविलगड किल्ल्याची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी





**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आज, दि. ७ फेब्रुवारी रोजी गाविलगड किल्ल्याची पाहणी आणि पदभ्रमंती केली. त्यासोबतच जिल्हाधिकारी यांनी मोझरी पॉईंट येथून गाविलगड किल्ला पायी चढण्याचा अनुभव घेतला. त्यांनी सुमारे सहा किलोमीटर ट्रेकिंग करत दरीतून चढण्याचा थरारक अनुभव घेतला.

जिल्ह्यातील प्रशासकीय कामाचा ताण हलका करण्यासाठी आणि निसर्गाच्या सानिध्यात वेळ घालवण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे हा उपक्रम राबवण्यात आला. जिल्हा प्रशासनातील सर्व अधिकारी व त्यांच्या कुटुंबीयांसाठी विशेष 'ट्रेकिंग' मोहिम घेण्यात आली. निसर्गाच्या कुशीत एक अविस्मरणीय प्रवास असलेला 'मेळघाट ट्रेकिंग अनुभव' या मोहिमेत सहभागी झालेल्यांना मेळघाटातील घनदाट जंगले आणि हिरव्यागार दऱ्यांचा थरार जवळून अनुभवता आला. या उपक्रमाचे मुख्य ☞(पान २

# पाणी टाकी साहित्य चोरी प्रकरणात चार ताब्यात

### -गाडगेनगर डी.बी. पथकाची कारवाई



**अमरावती/प्रतिनिधीः-** कठोरा नाका येथील नव्या पाण्याच्या टाकीच्या बांधकामस्थळावरून मोठ्या प्रमाणात बांधकाम साहित्य चोरीस गेल्याच्या प्रकरणात गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या डिटेक्शन ब्रँच (डी.बी.) पथकाने यशस्वी कारवाई करत चार आरोपींना अटक केली आहे. तसेच चोरीचा मुद्देमाल विकत घेणाऱ्या भंगार विक्रेत्याकडूनही साहित्य जप्त करण्यात आले आहे.

या प्रकरणी गाडगेनगर पोलीस स्टेशन येथे फिर्यादी हेमंत सुदाम वंजारी (वय ४२, रा. हर्षराज कॉलनी, अमरावती) यांनी तक्रार दाखल केली होती. फिर्यादी हे इंदरदीप इन्फा इंडिया लिमिटेड या कंपनीत स्टार असिस्टंट म्हणून कार्यरत असून, कठोरा नाका येथे नव्या पाण्याच्या टाकीचे बांधकाम सुरू आहे. ३ फेब्रुवारी रोजी पहाटे ४ ते ५ वाजेदरम्यान अज्ञात चोरट्यांनी बांधकाम साईटवरून सुमारे ७,६५,००० रुपये किमतीचे बांधकाम साहित्य चोरी केले होते. या प्रकरणी ४ फेब्रुवारी २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास करत असताना गाडगेनगर डी.बी. पथकाला गुप्त माहिती प्राप्त झाली. त्या आधारे डिकेश शनी भोसले (वय २५), नज्जेश नज्ज्या भोसले (वय २०), सुरेंद्र सुरेश पवार (वय २४) आणि तुषार आरेश पवार (वय २०) (सर्व रा. राजुरा पारधी बेडा, मार्डी रोड, जि. अमरावती) यांना ताब्यात ☞(पान २ वर)

# ट्रक दरीत कोसळल्याने २ ठार

## अमरावती - अकोला राष्ट्रीय मार्गावर कुरुमजवळ अपघात

**मूर्तिजापूर/प्रतिनिधीः-** अमरावती-अकोला राष्ट्रीय महामार्गावर ग्राम कुरुम शिवारातील पुलाजवळ शुक्रवारी मध्यरात्री भीषण अपघात झाला. नागपूरहून संभाजीनगरकडे लोखंडी पाइप घेऊन जाणारा आयशर ☞(पान २ वर)







# सेंट्रल बँक ऑफ इंडियाचा एमएसएमई क्रेडिट आऊटरिच कार्यक्रम उत्साहात

### बँकेतर्फे २७ कोटी रुपयांचे कर्ज वाटप



**अमरावती/प्रतिनिधीः-** सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या अमरावती क्षेत्रीय कार्यालयातर्फे एमएसएमई क्रेडिट आऊटरिच कार्यक्रम पार पडला. एमआयडीसी असोसिएशनचे ☞(पान २ वर)

# अवैध प्रवासी वाहतुकीवर ग्रामीण पोलिसांचा कडक 'ब्रेक'

### १०६ वाहनांवर कारवाई; ५८ हजारांहून अधिक दंड वसूल

**अमरावती :** जिल्ह्यात रस्ते अपघातांचे वाढते प्रमाण रोखण्यासह अवैध प्रवासी वाहतुकीला आळा घालण्याच्या उद्देशाने अमरावती ग्रामीण पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. मा. पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण श्री. विशाल आनंद यांच्या स्पष्ट निर्देशानुसार जिल्हा वाहतूक शाखेमार्फत ही मोहीम राबविण्यात आली.

जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली परतवाडा, अंजनगाव, चांदूर बाजार व मोर्शी परिसरात विशेष तपासणी करण्यात आली. या दरम्यान अवैध प्रवासी वाहतूक, विना हेल्मेट वाहन चालविणे, क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक करणे तसेच नो-पार्किंग क्षेत्रात वाहने उभी केल्याप्रकरणी एकूण १०६ वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात आली. या कारवाईत ११,८०० रुपये तात्काळ दंड वसूल करण्यात आला असून, एकूण ५८,३०० रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांविरुद्ध ☞(पान २ वर)

# आरटीओ कार्यालयातून केला ट्रक गायब

## १० चाकी ट्रक स्क्रॅप करून विक्रीचा डाव उधळला



**अमरावती/प्रतिनिधीः-** शासकीय कार्यालयेही चोरट्यांच्या निशाण्यावर असल्याचे पुन्हा एकदा उघड झाले असून, आरटीओ कार्यालयातून थेट १० चाकी ट्रक चोरीला जाण्याची धक्कादायक घटना घडली होती. मात्र अमरावती शहर गुन्हे शाखेने वेगवान हालचाली करत अवघ्या २४ तासांत चोरीचा गुन्हा उघडकीस आणत ८ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणात शहानवाज खान सिराजोद्दीन खान (वय ३९) व जैनुलाबेदीन सिराजोद्दीन खान (वय ४५, दोघेही रा. पॅरडाईज कॉलनी, अमरावती) या दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. विशेष म्हणजे चोरी गेलेला ट्रक चोरट्यांनी थेट स्क्रॅपमध्ये रूपांतरित केल्याचे तपासात समोर आले आहे. शहरात वाढणाऱ्या चोरीच्या घटनांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी दिल्यानंतर, पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखेची पथके समांतर तपास करत होती. गाडगेनगर पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्याचा तपास सुरू असतानाच गुन्हे शाखेला गोपनीय माहिती मिळाली की, आरटीओ कार्यालयातून चोरी गेलेला टाटा कंपनीचा १० चाकी ट्रक चालकानेच ☞(पान २ वर)

# रात्री घरफोडी करणारा गुन्हेगार जेरबंद

### खल्लार पोलिसांची कारवाई

**खल्लार/प्रतिनिधीः-** खल्लार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मोचर्डा गावात रात्री घरफोडी करणाऱ्या चोरट्याला पोलिसांनी तात्काळ जेरबंद करत संपूर्ण मुद्देमाल हस्तगत केला आहे. विशेष म्हणजे फिर्यादी व आरोपी हे एकाच गावातील रहिवासी असल्याचे तपासात उघड झाले आहे.

मोचर्डा येथील कुलदीप प्रकाश घोगरे (वय ३२) यांच्या घरी दि. ६ फेब्रुवारी रोजी रात्री अज्ञात चोरट्याने मागील दार तोडून घरात प्रवेश करत कपाटातील रोख १० हजार रुपये व सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण १ लाख ५५ हजार ३०१ रुपयांचा मुद्देमाल लंपास केला होता. या प्रकरणी कुलदीप घोगरे यांच्या तक्रारीवरून खल्लार पोलीस ठाण्यात कलम

■ 'खल्लार पोलीस ठाण्याच्या हद्दीत कुठेही संशयास्पद किंवा अनोळखी व्यक्ती वावरताना आढळल्यास नागरिकांनी तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा.' **– रविंद्र बारड,** ठाणेदार, खल्लार



गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेच्या दिवशी फिर्यादी हे पत्नी व कुटुंबीयांसह रात्री ९ वाजता गावातील गजानन महाराज मंदिरात किर्तनासाठी गेले होते. रात्री साडे दहा वाजता घरी परतल्यानंतर घराचे मागील दार तुटलेले व कपाट फोडलेले आढळून आले. त्यानंतर चोरी झाल्याचे निदर्शनास येताच त्यांनी तात्काळ पोलिसांत तक्रार दाखल केली. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन ठाणेदार ☞(पान २ वर)

# अ.भा. आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल महिला स्पर्धेत दुस-या दिवशी थरार

## -विविध संघांच्या खेळाडूंनी मैदान गाजविले





**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री शिवाजी शिक्षण संस्था संचालित श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय येथे सुरू असलेल्या 'अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल (महिला) स्पर्धेत दुस-या दिवशी विविध संघांच्या खेळाडूंनी मैदान गाजविले. श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या मुख्य क्रीडांगणासोबतच मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालय आणि डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय अशा पाच ठिकाणच्या क्रीडांगणावर सॉफ्टबॉल स्पर्धेचे सामने सुरू आहेत.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली आणि श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या सहकार्याने आयोजित 'अखिल भारतीय आंतरविद्यापीठ महिला सॉफ्टबॉल स्पर्धेला' उत्साहात सुरुवात झाली आहे. ९८ विद्यापीठाचे देशभरातील महिला संघ या सामनाकरीता अमरावतीत आले आहेत. आज दुस-या दिवशी झालेल्या सामन्यांमध्ये नांदेड विद्यापीठ विरुध्द बंगलोर विद्यापीठ सामन्यामध्ये नांदेड विद्यापीठाने १४-० ने सामना जिंकला. दुर्ग विद्यापीठ विरुध्द जेएनटीयू विद्यापीठ हैद्राबाद यांच्यातील सामना दुर्ग विद्यापीठाने ५-१ ने जिंकला. एमजीयू नालगोंडा विद्यापीठ विरुध्द पतियाला विद्यापीठ यांच्यातील सामना नालगोंडा विद्यापीठाने ७-० ने जिंकला. बीएयू विद्यापीठ संभाजीनगर विद्यापीठ विरुध्द रोहिलखंड विद्यापीठ, बरेली यांच्यातील सामना संभाजीनगर विद्यापीठाने एकतर्फी जिंकला. नागपूर विद्यापीठ विरुध्द जीवाजी विद्यापीठ, ग्वालियर यांच्यातील सामना नागपूर विद्यापीठाने १६-३ ने जिंकला. सौराष्ट्र विद्यापीठ, गुजरात ☞(पान २ वर)

### पाटीपुरा ड्रग्स अड्ड्यावर पोलिसांची कारवाई

# २५.५ ग्रॅम एमडीसह दोघे ताब्यात

### ३.८२ लाखांचा साठा जप्त

अमरावती/प्रतिनिधीः- अमरावती शहरात अमली पदार्थांच्या वाढत्या साखळीला छेद देण्यासाठी गुन्हे शाखेने दि. ७ फेब्रुवारी २०२५ रोजी नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पाटीपुरा परिसरात राबविण्यात आलेल्या कारवाईत २५.५ ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) ड्रग्स जप्त करत दोन आरोपींना अटक केली. जप्त करण्यात आलेल्या ड्रग्सची बाजारातील किंमत सुमारे ३ लाख ८२ हजार ५०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणात अब्दुल शोएब अब्दुल जब्बार (वय २२) आणि सईद खान शरीफ खान (वय ४६, दोघेही रा. पाटीपुरा) यांना ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपींच्या राहत्या घरावर छापा टाकण्यात आला असता एमडी ड्रग्स साठवणूक केल्याचे उघडकीस ☞(पान २ वर)

# सारांश

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय






# रेल्वेसाठी १४ हजार कोटींची तरतूद

यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प मराठवाड्याला चांगलाच पावला. मराठवाड्यातील प्रलंबित रेल्वे मार्गासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात १४ हजार कोटींची तरतूद करण्यात आली. यामध्ये अहमदनगर-बीड-परळी तसेच जालना-जळगाव व नांदेड-वर्धा रेल्वे मार्गांचा समावेश आहे. मराठवाड्याच्या विकासासाठी हे तीन रेल्वे मार्ग पूर्ण होणे अत्यंत आवश्यक आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून हे रेल्वे प्रकल्प प्रलंबित असल्याने त्यावरील कामाचा खर्च दिवसेंदिवस वाढतच होता; परंतु केंद्रीय अर्थसंकल्पात या रेल्वे मार्गांसाठी १४ हजार कोटींची तरतूद करण्यात आल्याने आता मराठवाड्याच्या विकासाला मोठा हातभार लागणार आहे. अहमदनगर-बीड - परळी या रेल्वे मार्गासाठी ४ हजार ९५७ कोटींची तरतूद करण्यात आली. जालना-जळगाव रेल्वे मार्गासाठी ५८०४ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला. तसेच मराठवाडा व विदर्भाला जोडणारा नांदेड-वर्धा हा रेल्वे मार्ग गेल्या अनेक वर्षांपासून पूर्ण झालेला नाही.

या रेल्वे मार्गासाठी ३ हजार ४४५ कोटींची तरतूद या केंद्रीय अर्थसंकल्पात करण्यात आली. या तिन्ही रेल्वे मार्गांच्या प्रलंबित कामांसाठी मराठवाड्यातून गेल्या अनेक वर्षांपासून पाठपुरावा सुरू आहे. मराठवाड्यातील खासदार या पाठपुराव्याला कमी पडल्यामुळेच आजपर्यंत या कामाला उशीर झाला. माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी याबाबत केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला होता. मराठवाडा व कर्नाटकला जोडणारा नांदेड बिदर या रेल्वे मार्गासाठी महाराष्ट्राने आपला वाटा राज्याच्या अर्थसंकल्पात मंजूर केला आहे; परंतु कर्नाटक राज्याने त्यांच्या भागातील रेल्वे मार्ग मंजूर करण्यासाठी निधी देण्यास टाळाटाळ चालविली आहे. त्यामुळे या प्रकल्पाचे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडले आहे. विशेष म्हणजे नांदेडचे खासदार या कामासाठी कमी पडत आहेत. तसेच नांदेड येथे राज्यसभेवर असलेले भाजपचे दोन्हीही खासदार यासाठी अपुरे पडत असल्याचे जाणवत आहे. २०१४ पासून नरेंद्र मोदी हे भारताचे पंतप्रधान झाल्याने देशाचा समतोल विकास होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील मराठवाड्याच्या विकासाकडे विशेष लक्ष केंद्रित केलेले आहे. मराठवाड्यातील प्रलंबित रेल्वे प्रश्नांना पूर्णत्वास नेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच वारंवार आढावा घेत आहेत. प्रलंबित रेल्वे मार्गांच्या कामासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या भागातील खासदारांना कामाला लावावे, अशी मागणी होत आहे. नांदेड-मनमाड मार्गावरील नांदेड-पुणे ही रेल्वे पुणेऐवजी हडपसरपर्यंत धावत आहे. नांदेडवरून दुपारी ३ वाजून पंधरा मिनिटांनी सुटणारी ही रेल्वे मनमाडमार्गे हडपसर येथे सकाळी ७.३० वाजता पोहोचत आहे. यामुळे पुणे शहर व पिंपरी-चिंचवड या भागात जाण्यासाठी प्रवाशांना आर्थिक झळ सोसावी लागत आहे. विशेष म्हणजे २६ जानेवारीपासून हा बदल करण्यात आला. पूर्वी ही रेल्वे पुणे स्थानकापर्यंत धावत होती. त्यावेळी या रेल्वेसाठी तिकीटही मिळणे अवघड होते; परंतु आता ही रेल्वे मराठवाड्यातील प्रवाशांसाठी गैरसोयीची केल्याने केवळ ट्रॅव्हल्सवाल्यांचे फावत आहे. ज्या रेल्वे सेवेला चांगला प्रतिसाद असतो अशा रेल्वे सेवा अडगळीत टाकण्याचे प्रकार हल्ली वाढले आहे. सर्वसामान्य प्रवाशांना अशा बदलामुळे त्रास सहन करावा लागतो. याकडे लक्ष देण्यासाठी सक्षम यंत्रणा नसल्याने मराठवाड्यातून संताप व्यक्त केला जात आहे. नांदेड-पुणे या मार्गावर मराठवाड्यातील प्रवासी वंदे भारत रेल्वेसेवेची वाट पाहत आहेत. मराठवाड्यातील हजारो विद्यार्थी शिक्षणासाठी पुण्यात स्थायिक आहेत. याचबरोबर नोकरीच्या निमित्ताने मराठवाड्यातील अनेकजण पुण्याला ये-जा करतात. विशेष म्हणजे मराठवाड्यातून पुण्याला हजारो ट्रॅव्हल्स दररोज धावत असतात. ट्रॅव्हल्स चालकांची लॉबी मराठवाड्यातून पुण्याला जाणाऱ्या रेल्वे सेवेला नेहमीच अडथळे आणतात, असा संताप मराठवाड्यातून नेहमीच व्यक्त होत असतो. मराठवाड्यातील खासदारांनी आपल्या ताकदीची एकजूट दाखवून नांदेड पुणे वंदे भारत सेवा सुरू करून दाखवावी, अशी मागणी मराठवाड्यातून गेल्या अनेक दिवसांपासून होत आहे. मराठवाडा व तेलंगणाला जोडणाऱ्या नांदेड-हैदराबाद दरम्यान वंदे भारत रेल्वेसेवा सुरू होणार असल्याचे तीन महिन्यांपूर्वीच काही खासदारांनी जाहीर केले होते; परंतु



अद्यापपर्यंत नांदेड-हैदराबाद दरम्यान वंदे भारत रेल्वेसेवेचे कसलेही नियोजन झालेले नाही. या रेल्वेसेवेबाबत कसलाही निर्णय झालेला नसतानाच नांदेडमधील काही खासदारांनी याचे श्रेय घेऊन स्वतःची प्रसिद्धी करून घेतली.

मराठवाड्यातील तीन महत्त्वाच्या प्रलंबित रेल्वे मार्गांसाठी १४ हजार कोटींची तरतूद करण्यात आल्याने भविष्यात मराठवाडा हा एक महत्त्वाचा औद्योगिक विकासाचा भाग म्हणून ओळखला जाणार आहे. ज्या भागात रेल्वे सेवा नव्हती, तिथपर्यंत रेल्वे सेवेचा विस्तार झाल्यास भविष्यात दळणवळण व वाहतुकीची सुविधा वाढणार आहे. एकीकडे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मराठवाडा, विदर्भ तसेच राज्यातील सर्व प्रमुख रस्ते चकाचक केल्यामुळे त्याचा फायदा औद्योगिक विकासासाठी होत आहे. यापुढे रेल्वेसेवेचा विस्तार झाल्यानंतर देशाच्या कानाकोपऱ्यांतून तसेच बाहेर देशातूनही मराठवाड्यात औद्योगिक विकासाला चालना मिळेल, अशी अपेक्षा केली जात आहे.

यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प मराठवाड्यातील रेल्वे सेवांच्या बाबतीत अतिशय महत्त्वपूर्ण ठरला. या केंद्रीय अर्थसंकल्पात भरीव निधीची तरतूद करण्यात आल्याने भविष्यात मराठवाड्याचा मोठा कायापालट दिसून येणार आहे. कुठलेही प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ठरावीक वेळेत ती कामे होणे महत्त्वाची असतात. याच दृष्टीने मराठवाड्यासाठी केलेली निधीची तरतूद योग्य वेळी केली गेली तर त्याचा फायदा नक्कीच मराठवाड्याच्या विकासासाठी होणार आहे, हे मात्र निश्चित.

***मराठवाडा व कर्नाटकला जोडणारा नांदेड बिदर या रेल्वे मार्गासाठी महाराष्ट्राने आपला वाटा राज्याच्या अर्थसंकल्पात मंजूर केला आहे; परंतु कर्नाटक राज्याने त्यांच्या भागातील रेल्वे मार्ग मंजूर करण्यासाठी निधी देण्यास टाळाटाळ चालविली आहे. त्यामुळे या प्रकल्पाचे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडले आहे. विशेष म्हणजे नांदेडचे खासदार या कामासाठी कमी पडत आहेत. तसेच नांदेड येथे राज्यसभेवर असलेले भाजपचे दोन्हीही खासदार यासाठी अपुरे पडत असल्याचे जाणवत आहे.***



# उपकारक टक्कर?

साधारणतः कोणतीही 'टक्कर' त्रासदायक, हानिकारक किंवा विनाशकारी असते. मुद्दाम कोणी आवडीने कशावर तरी जाऊन धडकत नाही. वाहनांच्या टक्करीसुद्धा तांत्रिक किंवा मानवी गफलतीने होतात. अंतराळातल्या टक्करीचं तसं नाही. निसर्गाच्या निर्हेतुक 'नियमा'नुसार त्या घडतात. त्या कोणी 'घडवत' नाही. मात्र त्याचे परिणाम जाणवतातच. कधी भले तर कधी बुरे. सुमारे साडेसहा कोटी वर्षांपूर्वी पृथ्वीवर एक महाप्रचंड शक्तीचा आणि १५ किलोमीटर रुंदीचा अशनी आदळला. परिणाम काय झाला तर त्यापूर्वी लाखो वर्षे पृथ्वीचा ताबा घेऊन सुखाने नांदणारे डायनॉसॉर एका फटक्यात नाहीसे झाले. या महाकाय आणि तुलनेने क्षीणगती सजीवांना पळ काढायला वाव मिळाला नाही व पळून जाणार तरी कुठे? अवघ्या पृथ्वीभर पसरलेल्या डायनॉसॉरना छोटय़ाशा गुहेत वगैरे 'लपता' येणं शक्य नव्हतं. शिवाय त्या धडकेने निर्माण केलेली भयावह कंपनं आणि उष्णता एवढी भीषण होती की, बिचारे डायनॉसॉर नामशेष झाले. त्यांची प्रचंड आकाराची अंडीसुद्धा नष्ट झाली आणि नवी 'प्रजा' जन्माला येण्याची संधी मावळली. आपल्या हिंदुस्थानातही हे महाकाय सजीव एकेकाळी असल्याचा पुरावा आहे.

ही गोष्ट झाली साडेसहा कोटी वर्षांपूर्वीच्या विनाशी टक्करीची. अर्थात, त्यानंतरच इतर प्राण्यांची योग्य वाढ झाली आणि माणसं 'प्रगत' म्हणून पुढे आलीष्ठ 'मरणात खरोखर जग जगते' ते असे! आजचा विषय एका वेगळ्याच 'उपकारक' म्हणाव्या अशा टक्करीचा. ५ अब्ज वर्षांपूर्वी आपला सूर्य जन्माला आला आणि त्यासोबतच त्याचं कुटुंबसुद्धा अवतरलं. अनेक ग्रह त्याभोवती गरगरायला लागले. त्यातला आपला जीवनदाता ग्रह अर्थातच पृथ्वी, परंतु समजा एक विशिष्ट धडक पृथ्वीला बसली नसती तर आपण अस्तित्वात असतो का? हाच एक प्रश्न आहे. सुमारे साडेचार अब्ज वर्षांपूर्वी आपल्या ग्रहाच्या नवजात अवस्थेच्या काळातच साधारणपणे मंगळ ग्रहाच्या आकाराचा 'थेया' नावाचा ग्रह आपल्याला (म्हणजे पृथ्वीला) जोरदारपणे टक्करला! या 'थेया'ची गोष्ट म्हणजे एक संकल्पना मानली जाते. या हायपोथेटिकल 'थेया'ने पृथ्वीला टक्कर दिल्यानेच आज आपली पृथ्वी नि त्यावरची आपल्यासकटची जीवसृष्टी जशी आहे तशी दिसते असं ही 'थेया-थिअरी' सांगते.

या सिद्धांतानुसार काय काय घडलं? वास्तविक अशा भीषण टक्करीने पृथ्वीचे तुकडेच झाले असते तर या संकल्पनेची चर्चा करायला आपण नसतोच.



**जर 'थेया' पृथ्वीला धडकला नसता तर पृथ्वीचा गाभा लहान राहिला असता. मॅग्नॅटिक फिल्ड खूपच क्षीण अवस्थेत असतंष्ठआणि अनेक खंडांची निर्मिती न होता तसेच ॠतुचक्राचं आवर्तन न घडता, पृथ्वीवर जीवसृष्टी निर्माण झाली नसती. त्यामुळे कदाचित काल्पनिक असली तरी 'थेया'ची ही कहाणी आपल्या अस्तित्वाला सहाय्यक ठरून त्याचा विचार करण्याच्या 'ध्येया'पर्यंत घेऊन आली एवढं खरं आणि खरंच अशी टक्कर झाली असेल तर थेया 'थोर तुझे उपकार' असंच म्हणायला हवं!**

विश्वनिर्मिती ग्रहमालेचा जन्म याबाबत खगोल अभ्यासक अनेक बाजूंनी विचार करतात. त्यातलीच एक 'थेया-थिअरी.' सध्याच्या 'बातम्या'मध्ये जसं 'सूत्रां'कडून असं समजतं वगैरे येतं तसंच 'थेया' बाबतचं 'सूत्र' सांगतं की, या थेया ग्रहाची पृथ्वीला बसलेली धडक एवढी भीषण होती की, त्यामुळे पृथ्वीचा पृष्ठभाग पार वितळून गेला. मग त्यातून एक गोलक बाहेर फेकला गेला तो आपला चंद्र! त्यामुळे चंद्रनिर्मिती पृथ्वी आणि थेया यांच्या संयोगातून झाली असावी.

या प्रचंड टक्करीमुळे 'थेया'सुद्धा वितळून पृथ्वीत सामावून जायला हवा होता, परंतु अलीकडच्या संशोधनानुसार तसं पूर्णत्वाने घडलं नाही. या दोन्ही ग्रहांच्या द्रव्यातून तयार झालेले विशाल आकाराचे दोन 'खंड' आजही आफ्रिका खंडाच्या आणि पॅसिफिक महासागराच्या तळाशी आहेत. त्यांना 'लार्ज लो व्हेलॉसिटी प्रॉव्हिन्सेस' किंवा 'एलएलव्हीपी' म्हटलं जातं. पृथ्वीवरच्या अथांग पाण्यात बुडून हे खंडप्राय तुकडे थंड झाले नि तसेच राहिले.

'थेया' ग्रहाचा गाभा प्रचंड लोहयुक्त होता. तो पृथ्वीच्या गाभ्यात विलीन झाला. त्यामुळे या गाभ्याची घनता मोठय़ा प्रमाणात वाढली. याशिवाय 'थेया'वरही पृथ्वीसारखं बरचं पाणी होतं (म्हणे!) ते सारं पृथ्वीवरच्या जलसाठय़ात वाढ करणारं ठरलं. त्यामुळेच आपला ग्रह 'हॅबिटेबल' किंवा वसाहतयोग्य बनला. याहून महत्त्वाची गोष्ट घडली ती म्हणजे या धक्क्याने पृथ्वी साडेतेवीस अंशात कलली. परिणामी पुढे ॠतुचक्र निर्माण झालं. पृथ्वीचा वेग मंदावला आणि ती स्वतःभोवती आताप्रमाणे २४ तासांत फिरू लागली. थेयामुळेच पृथ्वीच्या पृष्ठभागाखालील 'प्लेट टॅक्टॉनिक' तयार होण्यास मदत झाली असावी असंही म्हटलं जातं.

जर 'थेया' पृथ्वीला धडकला नसता तर पृथ्वीचा गाभा लहान राहिला असता. मॅग्नॅटिक फिल्ड खूपच क्षीण अवस्थेत असतं आणि अनेक खंडांची निर्मिती न होता तसेच ॠतुचक्राचं आवर्तन न घडता, पृथ्वीवर जीवसृष्टी निर्माण झाली नसती. त्यामुळे कदाचित काल्पनिक असली तरी 'थेया'ची ही कहाणी आपल्या अस्तित्वाला सहाय्यक ठरून त्याचा विचार करण्याच्या 'ध्येया'पर्यंत घेऊन आली एवढं खरंष्ठआणि खरंच अशी टक्कर झाली असेल तर थेया 'थोर तुझे उपकार' असंच म्हणायला हवं!

# विचारांची चोरी झेपेल?

चोरीच्या घटनेला चांगले तीन दिवस उलटून गेल्यावरही पोलीस आपल्याला पकडू शकले नाहीत म्हणून मेलबोर्नमधील चोर खुशीत होते. आता गांधींच्या पुतळ्याचे तुकडे करायला काही हरकत नाही. यातले लोखंड व तांबे मिळून ४०० किलो भंगार निघाले तरी शंभर डॉलर्सची कमाई ठरलेली. असा विचार करत ग्राईंडर हातात घेताच त्यांना पुतळ्यात हालचाल जाणवली. हे काय नवीन असे म्हणत ते क्षणकाळ थांबले तसा पुतळ्यातून आवाज यायला लागला.




'तुम्ही मला चबुतऱ्यावरून उचलून आणले. काही हरकत नाही. रात्र असल्यामुळे माझा जरासा डोळा लागला होता. तेवढ्या वेळात तुम्ही ही जबरदस्ती केली. मला जागे केले असते तर मीच स्वत:हून तुमच्यासोबत आलो असतो. माझा आक्षेप एवढाच की तुम्ही माझे पाय तिथेच कशाला ठेवले? सत्य आणि अहिंसेसोबतच पाय हेसुद्धा माझे शस्त्रच होते.

जिवंतपणी मी हजारो मैल चाललो. तेही इतक्या जलदगतीने की साऱ्या भारत देशाला माझ्यामागे अक्षरश: धावावे लागायचे. पाय कापून माझी शक्ती हिरावून घेतली असे तुम्हाला वाटत असेल तर ते चूक. माझी शक्ती आहे ती विचारांत. जिवंत असताना ती शरीरात नव्हती व आता पुतळ्यात तर नाहीच नाही. तुमच्या या कृत्यानंतर दोन प्रश्न माझ्या कानावर आदळत आहेत. तुम्ही द्वेषातून हे कृत्य केले का? तसे असेल तरी माझी काही हरकत नाही. मी जिवंत असताना व आताही मला द्वेषाला सामोरे जावे लागतेच. अलीकडे तर जरा जास्तच.

माझेच काही बांधव माझ्या पुतळ्यावर गोळ्या घालून आनंद मिळवतात. कुणी माझे नावच सरकारी योजनेतून काढतात. भारतात मी आता नोटेपुरता उरलोय. तुम्हालाही त्या द्वेषाची लागण झाली असेल तर माझी काही हरकत नाही. मी जिवंतपणी नेहमी एक वाक्य म्हणायचो. 'माझे डोळे मिटल्यावर व देह भस्मभूत झाल्यावर माझ्या कामाविषयी निर्णय घेण्यासाठी लोकांकडे बराच वेळ शिल्लक राहील.' याच वेळेचा ते सदुपयोग करताहेत असे मी मानतो.

माझे म्हणणे एकच. 'माझ्या विचारांपेक्षा वेगळा लोककल्याणाचा विचार तुमच्याकडे असेल तर तो रुजवा. लोक आपसूकच मला विसरतील. मग मीही पुतळ्यात जीव ओतणे सोडून देईन. तुमचा उद्देश द्वेषमूलक असेल तर पाय कापण्याने माझी उंची कधीच कमी होणार नाही. ती पर्यायी कल्याणकारी विचारानेच होईल. भारतातून मला हद्दपार करण्याचे प्रयत्न सुरू असले तरी जगभरात मी सर्वत्र आहेच. तिथूनही संपवण्याच्या प्रयत्नाचा भाग म्हणून तुम्ही हे कृत्य केले असेल तरीही मला आनंदच वाटेल. अलीकडे द्वेष बाहेर करण्यासाठी माझे पुतळे हीच हक्काची जागा ठरू लागलीय. मी आधीही सामान्य होतो व आताही. त्यामुळे द्वेषाचा सामना प्रेमाने करण्याची माझी शक्ती आजही अबाधित आहे.

आता दुसरा प्रश्न. तुम्ही चोरीच्या उद्देशाने हे कृत्य केले का? तसे असेल तरी माझी हरकत नाही. हे लोखंड व तांबे तुम्ही जरूर विका. त्यातून पोटाला दोन घास मिळत असतील तर मला आनंदच वाटेल. माझे सांगणे एकच. अशी चोरी करण्याऐवजी तुम्ही विचारांची चोरी करायला शिका. माझ्याच नाही तर मानवतेचा संदेश देणाऱ्या अन्य कुणाच्याही.' हे ऐकून चोर जागच्या जागी थिजले. हा कुणीतरी भलताच माणूस दिसतो असे म्हणत त्यांनी गुपचूप तो पुतळा पुन्हा 'इंडियन कम्युनिटी सेंटर' समोर नेऊन ठेवला.

# मी मारण्यापूर्वी..., अभिनेत्री काजोलचे खळबळजनक वक्तव्य



बॉलिवूडची सुप्रसिद्ध अभिनेत्री काजोल ही प्रेक्षकांच्या मनावर आजही तेवढंच राज्य करते जेवढं ती आधी करत होती.

तिने अनेक चित्रपटांमध्ये दमदार भूमिका साकारत ९० च्या दशकातील काळ हा गाजवला आहे. परंतु आज काजोल मोठ्या पडद्यावर दिसत नसली तरीही कायम कोणत्या न कोणत्या कारणांमुळे चर्चेत असते. अशातच तिच्या एका वक्तव्यामुळे ती चर्चेत आली आहे.

काजोलने सोशल मीडियावर एक पोस्ट केली आहे. त्या पोस्टमध्ये तिने स्वतःबद्दल एक खास गोष्ट शेअर केली आहे. स्वतःचे काही फोटो पोस्ट करत काजोल म्हणाली, 'मी मरण्यापूर्वी करण्याच्या १०० गोष्टी वाचून पूर्ण केल्या...

पण मदतीसाठी हाक मारणे... हे त्यामध्ये कधीच नव्हतं...

याचं मला आश्चर्य वाटतं... असं देखील कॅप्शनमध्ये म्हणाली आहे.



# धुरंधर २ चित्रपटाच्या शुटिंगदरम्यान पोलिसांकडून कारवाई

रणवीर सिंग, अक्षय खन्ना, संजय दत्त, आर माधवन आणि अर्जुन रामपाल अशी तगडी स्टारकास्ट असलेल्या धुरंदर या चित्रपटाने जगभरात धुरळा उडवला. प्रत्येकजण या चित्रपटाबाबत बोलताना दिसत आहे. बॉक्स ऑफिसवर धुवांधार कमाई केलेल्या या चित्रपटाचा दुसरा भाग लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या दुसऱ्या भागाच शुटिंग सुरू आहे. मात्र या शुटिंगदरम्यानच चित्रपट कायद्याच्या कचाट्यात सापडलाय.धुरंदर २ साठी साऊथ मुंबईमध्ये काही ठिकाणी शुटिंग सुरू आहे. यावेळी ड्रोनचा वापर करण्यात आला आहे. फोर्ट परिसरात परवानगीशिवाय ड्रोन उडवल्याप्रकरणी 'धुरंधर २' चित्रपटाच्या लोकेशन मॅनेजरविरोधात मुंबई पोलिसांनी कारवाई केली आहे. एमआरए मार्ग पोलीस ठाण्यात रिंकू राजपाल वाल्मिकी यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता कलम २२३ अंतर्गत एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार १ फेब्रुवारी रोजी ही घटना घडली आहे. त्या दिवशी प्रसिद्ध अभिनेता संजय दत्त आणि चित्रपटाची संपूर्ण टीम फोर्ट परिसरात उपस्थित होती.

शूटिंगदरम्यान एका महत्त्वाच्या सीनसाठी ड्रोनचा वापर करण्यात आला होता. मात्र यावेळी कोणतीही अधिकृत परवानगी घेण्यात आली नव्हती. त्यामुळे नियमांची पूर्तता न करता ड्रोनचा वापर केल्याने पोलिसांनी तात्काळ कारवाई केली.

# आर.माधवनला 'या' कारणामुळे पत्नीने काढलेले घराबाहेर

कोविडच्या काळात अनेक सेलिब्रिटी घरी बसून होते. काहींना तर त्यानंतरही बराच काळ कामं मिळत नव्हती, त्यामुळे तो काळ त्यांच्यासाठी कठीण होता. असंच काहीसं घडलं लोकप्रिय अभिनेता आर. माधवनबरोबर. परंतु, यावेळी त्याच्या पत्नीने त्याला समजावून सांगितलं आणि त्याला यातून बाहेर काढलं.

आर. माधवन बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेता आहे. त्याला प्रेमाने त्याचे चाहते मॅडी म्हणतात. आतापर्यंत त्याने विविध चित्रपटांत काम करत त्याच्या सहजसुंदर अभिनयाने प्रेक्षकांची मनंकली आहेत. आर. माधवन अनेकदा मुलाखतींमधून मोकळा संवाद साधतना दिसतो. अशातच नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत त्याने त्याच्या पत्नीबद्दल सांगितलं आहे. कोविडच्या काळात पत्नीने कसं प्रोत्साहन दिलं, याबद्दल त्याने अनफिल्टर एंटर्टेंमेंटशी संवाद साधताना सांगितलं आहे. अभिनेता नेमकं काय म्हणाला सविस्तर जाणून घेऊयातष्ठ



**आर. माधवन याची पत्नी काय म्हणाली?**

आर. माधवन म्हणाला, 'माझी बायको म्हणते तू कधीच कामातून बाहेर येऊ शकणार नाही. तू तमिळ कॉमेडी, ॲक्शन, ओटीटी, हिंदी ॲक्शन, इंग्लीश ओटीटी या सगळ्या माध्यमांवर काम करत असतोस, त्यामुळे तू घरी आहेस हे पाहून मला आश्चर्य वाटतंय. कोविड २०२० दरम्यान तिने मला घराबाहेर काढलं आणि म्हणाली, बाहेर जाऊन काम कर आणि पैसे कमाव.'

आर. माधवन याने पुढे त्याची मानसिक स्थिती समजून घेतल्यामुळे त्याच्या पत्नीचे आभार मानले. तो म्हणाला, 'एक दिवस माझ्या बायकोने मला विचारलं की तुला काय झालं आहे? ती म्हणाली की तू घरी पुन्हा येण्यासाठी कामावर जात आहेस असं वाटतंय. ते ऐकून मी विचारात पडलो.' मला तिचं म्हणणं पटलं.दरम्यान, आर. माधवन सध्या 'धुरंधर' चित्रपटामुळे चर्चेत आहे. यामध्ये त्याने महत्त्वपूर्ण भूमिका साकारली आहे. आदित्य धर दिग्दर्शित या चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळाला; तर आता लवकरच पुढच्या महिन्यात १९ मार्च रोजी धुरंधरचा सीक्वल प्रदर्शित होणार आहे.

# बिग बॉसच्या घरात वादाचा भडका

कलर्स मराठीवरील 'बिग बॉस मराठी'च्या घरात सध्या हाय-व्होल्टेज ड्रामा पाहायला मिळत आहे. नुकत्याच समोर आलेल्या प्रोमोमध्ये राकेश आणि रुचिता यांच्यात जोरदार खडाजंगी झाल्याचे दिसत आहे. या भांडणामुळे घराचे वातावरण पूर्णपणे तापले असून, इतर स्पर्धकांनाही मध्यस्थी करणे कठीण झाले आहे.



**नेमकं काय घडलं?**

प्रोमोमध्ये दिसल्याप्रमाणे, एका टास्कदरम्यान किंवा चर्चेदरम्यान राकेश आणि रुचिता यांच्यात शाब्दिक चकमक सुरू झाली.

या वादाचे रूपांतर बघता बघता मोठ्या भांडणात झाले. राकेशचे बोलणे आणि त्याला चोख प्रत्युत्तर देणारी रुचिता यामुळे घरात प्रचंड तणाव निर्माण झाला आहे.

दोघांनी आक्रमक पवित्रा घेतल्याचे दिसून येत आहे. दोघांमधील संवाद इतका टोकाला गेला आहे की, घरातील इतर सदस्यही यात ओढले गेले. या वादामुळे घरातील समीकरणं बदलण्याची शक्यता असून, सदस्य कुणाची बाजू घेणार याकडे प्रेक्षकांचे लक्ष लागले आहे. या राड्यामुळे बिग बॉस काही कठोर पाऊल उचलणार का? हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. हा राडा नेमका कशामुळे झाला आणि याचे पडसाद घरामध्ये कसे उमटणार, हे आज कळेलच.

# 'रंबा हो हो हो' फेम अभिनेत्रीचा डान्स व्हिडीओ व्हायरल

सिनेसृष्टीत असे अनेक कलाकार आहेत, ज्यांनी यशाच्या शिखरावर असताना अभिनय सोडला आणि वेगळा मार्ग निवडला. काहींनी विदेशात स्थलांतर केले. आता सोशल मीडियामुळे अनेक कलाकारांची झलक पाहायला मिळते. बॉलीवूड सोडलेले कलाकार आता काय करतात, कुठे राहतात, त्यांचे आयुष्य कसे असते, याबद्दल माहिती मिळते. काही दिवसांपूर्वी ज्येष्ठ अभिनेत्री कल्पना अय्यर यांचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला होता. एका कार्यक्रमात त्यांनी रंभा हो हो हो या गाण्यावर डान्स केला होता. ६९ व्या वर्षीदेखील त्यांच्यातील एनर्जी पाहून नेटकरी थक्क झाले होते.

हा व्हिडीओ पाहिल्यानंतर अनेकांनी त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला होता. फक्त चाहत्यांनीच नाही तर कलाकारांनी कमेंट्स करत त्यांच्या उत्साहाचे आणि एनर्जीचे कौतुक केले होते. ज्या गाण्यामुळे कल्पना अय्यर पुन्हा एकदा चर्चेत आल्या, एकेकाळी त्याच गाण्यातून त्यांना लोकप्रियता मिळाली होती. १९८१ ला प्रदर्शित झालेल्या अरमान या चित्रपटातील 'रंबा हो हो हो' या गाण्यामुळे कल्पना अय्यर घराघरात पोहोचल्या होत्या. कल्पना अय्यर यांनी १९८० आणि १९९० च्या दशकात सत्ते पे सत्ता, बडे दिलवाला, हम पाँच, लाडला, अंजाम अशा अनेक चित्रपटांत भूमिका साकारल्या. हम साथ साथ हैं या सुपरहिट चित्रपटातील संगीता या भूमिकेसाठी त्या विशेष लक्षात राहिल्या.

**'माझ्याकडे कधीच कोणी'**

१९९९ नंतर कल्पना अय्यर यांनी बॉलिवूड सोडले आणि त्या दुबईला स्थायिक झाल्या. आता कल्पना अय्यर यांनी नुकतीच इंडिया टुडेला मुलाखत



दिली. या मुलाखतीत त्यांनी बॉलीवूड सोडण्याचे कारण सांगितले. त्या म्हणाल्या, 'नंतरच्या काळात खूप गोष्टी बदलल्या. कास्टिंग एजंट, सेक्रेटरी आणि मॅनेजर आले. माझ्याकडे कधीच कोणी नव्हते. मी नेहमीच माझे काम स्वतःहून करायचे किंवा माझी आई आणि बहीण माझ्या कामाच्या गोष्टी मॅनेज करायचे.'

अभिनेत्री पुढे म्हणाल्या, 'सगळीकडे तेच तेच लोक दिसू लागले.लोकांचे गट तयार झाले. मी कोणत्याच गटाचा भाग नव्हते. मी इंडस्ट्रीतल्या किंवा टीव्हीच्या गटातही नव्हते. त्यावेळी मला ज्या कामाच्या ऑफर मिळत होत्या, त्यामुळे मी आनंदी नव्हते. तर मी पुढे काम करण्यात काय अर्थ होता?' आता काम करण्याची इच्छा असल्याची इच्छा व्यक्त करत कल्पना अय्यर म्हणाल्या, 'मी फार दूर राहत नाही. कोणीही माझ्याशी संपर्क साधू शकते. मुंबईतील अर्ध्याहून जास्त लोक इथे दुबईत राहतात. जर तुम्हाला कोणाच्या संपर्कात राहायचे असेल तुम्ही त्या व्यक्तीच्या संपर्कात राहता, यावर माझा विश्वास आहे. इच्छा असेल तर मार्ग निघतो.

पण, मला वाटते की माझी वेळ कधी आली नाही. आता मी आशा करते, प्रार्थना करते की ती वेळ ही आहे. बघूया, माझ्यापर्यंत कोण पोहोचते.' दुबईला त्या का गेल्या, यावर बोलताना कल्पना अय्यर म्हणाल्या, 'माझा एक मित्र दुबईला होता.

मी त्याच्याबरोबर काम करण्यासाठी आले. वेळ निघून गेला. मी सुखी आयुष्य जगत होते. त्यामुळे माझे कुटुंबही आनंदी होते.'

दरम्यान, रंबा हो हो हो हे गाणे धुरंधरमध्येदेखील पाहायला मिळाले. त्यामुळे या गाण्याची पुन्हा एकदा चर्चा झाली.

# गोविंदाला येतात जीवे मारण्याच्या धमक्या

बॉलीवूड अभिनेता गोविंदा कुठल्या ना कुठल्या कारणांमुळे नेहमी चर्चेत असतो. अशातच त्याच्या मॅनेजरने अभिनेत्याला जीवे मारण्याच्या धमक्या येतात, असं म्हटलं आहे. परंतु, त्याच्याकडे स्वत:ची बंदूक असल्यानं त्याच्यावर झालेल्या हल्ल्यातून त्याची सुटका झाल्याचंही म्हटलं आहे. गोविंदाचा मॅनेजर नेमकं काय म्हणाला याबद्दल सविस्तर जाणून घेऊयातष्ठ

गोविंदाचा मॅनेजर शशी सिन्हानं गोविंदाला येत असलेल्या धमक्याा आणि त्याच्यावर झालेल्या हल्ल्याबद्दल 'एएनआय'सी संवाद साधताना सांगितलं आहे. ते म्हणाले, 'त्याला जीवे मारण्याच्या धमक्या येत असतात. जेव्हा त्याच्यावर हल्ला झाला होता. तेव्हा देवाच्या कृपेनं त्याच्याकडे बंदूक होती. त्यामुळे त्यानं स्वत:ची सुटका करून घेतली. नाही तर देव जाणे काय झालं असतं. मी पहाटे ४ वाजता त्याच्याकडे गेलो आणि आम्ही एफआयआर दाखल केली. त्या रात्री काय झालं याचा आमच्याकडे व्हिडीओही आहे.'

शशी यांनी यावेळी ते नेमक्या कोणत्या हल्ल्याबद्दल बोलत आहे हे स्पष्ट केलेलं नाही. तर त्यांनी गोविंदा स्वत:चा बचाव करत असताना त्यालाच दुखापत झाल्याचंही सांगितलं. 'दी इंडियन एक्स्प्रेस'च्या वृत्तानुसार ऑक्टोबर २०२४ मध्ये गोविंदाला रुग्णालयात दाखल करण्यात आलेलं.

कारण- तो त्याची बंदूक साफ करताना चुकून स्वतःच्या पायावर गोळी झाडल्याचं सांगितलं गेलं. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, तो मुंबईतील आपल्या घरात असताना आणि विमानतळासाठी निघणार असताना त्याच्या शस्त्रातून अपघातानं गोळी निघाली आणि त्याला पायाला जखम झाली.

गोविंदाचा मॅनेजर शशी यांनी सांगितलं की, गोविंदा सकाळी ४:४५ वाजता विमानतळासाठी निघणार होता. तो कोलकाताला जाणाऱ्या ६ वाजताच्या फ्लाइटसाठी निघणार होता. त्याच्या परवानाधारक रिव्हॉल्व्हरचा ट्रिगर त्यानं कपाटात ठेवताना अपघातानं दाबला गेला. बंदूक चुकीनं फायर झाली आणि गोळी त्याच्या पायाला लागली. पोलिसांनी सांगितलं की, या प्रकरणी कोणतीही तक्रार नोंदवलेली नाही.



**शिल्पा शेट्टी सुनीता आहुजाबद्दल काय म्हणालेली?**

उल्लेख केलेल्या माध्यमाच्या वृत्तानुसार गोविंदानं या अपघातानंतर त्याची प्रकृती आणि परिस्थिती चिंताजन नसल्याची माहिती दिलेली. त्यानं क्रिटीकेअर रुग्णालयातील डॉक्टरांनी त्याच्या पायातील गोळी यशस्वीपणे काढली असून, तो त्यांचा आभारी असल्याचं सांगितलेलं.

यावेळी त्यानं शिल्पा शेट्टी जेव्हा त्याला रुग्णालयात भेटायला गेलेली तेव्हा तिनं केलेला विनोदही सांगितला. त्यावेळी त्याने, शिल्पा त्याची विचारपूस करण्यासाठी आल्यानंतर तिनं घरगुती भांडणामुळे सुनीता यांनी त्याच्यावर गोळी झाडली असेल, असा विनोद केला होता.

# समर-आनंदच्या मैत्रीत फुट पाडण्याचा मल्लिकाचा प्रयत्न; मालिकेवर भडकले प्रेक्षक

'वीण दोघांतली ही तुटेना' मालिकेमध्ये नव-नवीन ट्विस्ट येत आहेत. स्वानंदी, अंशुमनचा खरा चेहरा राजवाडेंसमोर आणते. त्यामुळे समर त्याला शिक्षा देतो. स्वानंदीच्या प्लॅनमध्ये आनंद आणि निकितासुद्धा सहभागी असतात. आपल्या लेकाचा बदला घेण्यासाठी म्हणून मल्लिका प्रयत्न करते. त्याचबरोबर दुसरीकडे तिचे, रोहन आणि अधिराचा संसार मोडण्याचे प्रयत्नही सुरू असतात. मात्र, डिव्होर्सचा कारनामा स्वानंदीच्या लक्षात येतो, त्यामुळे अधिरा पुन्हा सासरी येते. झी मराठीनं शेअर केलेल्या प्रोमोमध्ये दाखवण्यात आल्याप्रमाणे, आता मालिकेमध्ये मंदाकिनी मल्लिकाचा खरा चेहरा आणि तिचं कटकारस्थान समरसमोर आणणार आहे. अशातच आता 'झी मराठी'नं सोशल मीडियावर 'वीण दोघांतली ही तुटेना' मालिकेचा प्रोमो शेअर केलाय. या प्रोमोमध्ये मल्लिकानं पुन्हा नवा कट रचलेला दिसून येतोय.

'वीण दोघातली ही तुटेना' नव्या मालिकेसंदर्भात बोलताना बाबा स्टेजवर आले अन् तेजश्रीच्या डोळ्यात पाणी

'वीण दोघांतली ही तुटेना' प्रोमो

अंशुमनला शिक्षा दिल्यामुळे मंदाकिनी पुन्हा कुरघोडी करण्याचा प्रयत्न करते. समर आणि आनंद खूप चांगले मित्र असतात आणि ते मिळून कंपनी चालवतात. समरचा आनंदवर पूर्ण विश्वास असतो. मात्र, आता मल्लिका, समर आणि आनंदच्या मैत्रीत फुट पाडण्याचा प्रयत्न करते. 'झी मराठी'नं शेअर केलेल्या 'वीण दोघांतली ही तुटेना' मालिकेच्या प्रोमोमध्ये मल्लिका आनंदला हॉटेलमध्ये भेटायला बोलावते. मल्लिका आनंदला म्हणते, 'तू जर नसतास ना, तर आमच्या समरची कंपनी एवढी ग्रो पण झाली नसती. मी तुला १० लाख रुपये पगार देते, माझ्या कंपनीत जॉईन हो.' त्यावर आनंद मल्लिकाला, 'थँक्यू, पण...' असं म्हणतो आणि तिथून निघतो. ईंर्टूे ऊग्सेएका शोसाठी घ्यायची १ लाखाचं मानधन, दिवसाचा २०,००० खर्च; फिरले नशिबाचे फासे, आता चालवतेय १००० रुपयांत कोचिंग क्लासेस

पुढे, मल्लिकाची माणसं आनंदला किडनॅप करतात. तर दुसरीकडे, समरला आनंदचा मेसेज येतो, 'प्रिय समर, मला माफ कर. माझ्या जॉबपेक्षा चांगली संधी मला मिळाली आहे. म्हणून मी तुझ्या कंपनीतून बाहेर पडू इच्छितो.' हे वाचून समरला धक्का बसतो. 'झी मराठी'नं मालिकेचा प्रोमो शेअर करत, 'मल्लिकाचा नवा डाव समर आणि आनंदच्या मैत्रीत फुट पाडणार!' असं कॅप्शन लिहिलं आहे. त्यामुळे आता समर आनंदला शोधून मल्लिकाच्या प्लॅनवर पाणी फेरेल का? हे पाहणं उत्सुकतेचं ठरणार आहे.

प्रोमीवर नेटकऱ्यांच्या प्रतिक्रिया

दरम्यान, 'वीण दोघांतली ही तुटेना' मालिकेच्या या प्रोमोवर नेटकऱ्यांनी, 'आता हे काय नवीन, आम्हाला समर आणि आनंदची मैत्री खूप आवडते, त्यांना तरी सोडा काकू...', 'भयानक दाखवतात, कार्यक्रमाचं नाव बदला...', 'काकूची नवीन कंपनी कुठून आली? ती तर पैशांसाठीच समरच्या पुढे पुढे करते ना?', 'काकूला शकुनी मामांनी ट्रेनिंग दिली असावी बहुतेक, एकालाही सोडायचं नाव नाही.' अशा कमेंट्स करत मालिकेवर नाराजी व्यक्त केली आहे.

# ‘आरोग्य – आरोग्यम् धनसंपदा’

आरोग्य उत्तम राखण्यासाठी ऋतूनुसार आहार-विहार-निद्रा याबाबत आयुर्वेदात योग्य दिनचर्या सांगितली जाते. शरीराला या दिपामाची सवय लागली की शांतता, आनंद आणि दीर्घायुष्य निश्चितच मिळते.

आपल्या दैनंदिन जीवनासाठी तयार केलेली अशी दिपाम पद्धत जी आपल्याला आपल्या जैविक घडय़ाळाशी जोडून ठेवते. आयुर्वेदाने हजारो वर्षांपासून निसर्गाशी सुसंवाद राखण्याचे महत्त्व सांगितले आहे, मात्र पाश्चिमात्य शास्त्रज्ञांना आता हळूहळू हे समजू लागले आहे की शरीरासाठी निसर्गाच्या लयीशी जोडलेले राहणे किती आवश्यक आहे. या लयीत बिघाड झाल्यास मेंदूची कार्यक्षमता कमी होणे, मनस्थिती व झोपेचे विकार, मधुमेह, स्थूलता, दिवसा झोप येणे, शिकण्यात अडचणी, व्यसनाधीनता, हृदयरोग आणि काही प्रकारचे कर्करोग असे अनेक आरोग्यविषयक त्रास होऊ शकतात.

आयुर्वेदानुसार प्रत्येक दिवशी बदलाची दोन चक्रे असतात – सूर्यपा आणि चंद्रपा. ही पो आपल्या दोषांशी (वात, पित्त, कफ) संबंधित असतात. दिनचर्येमुळे आपल्याला लवकर उठणे, व्यायाम, स्नान, ध्यान, प्रार्थना, आहार, अभ्यास, काम, विश्रांती आणि झोप यांसाठी योग्य वेळ समजतो. निरोगी शरीर, मन आणि आत्म्यासाठी हे अत्यंत आवश्यक आहे. आयुर्वेदात सांगितलेल्या दिनचर्येचे फायदे अनेक आहेत. उदाहरणार्थ- दोषांचे संतुलन राखण्यास मदत, पचनढिया सुधारते, शिस्त लागते, शांतता, आनंद आणि दीर्घायुष्य मिळते.

वरील दोषपांवर आधारित आदर्श दिनक्रम खाली दिला आहे.

सकाळी उठण्याची वेळ निरोगी व्यक्तीसाठी सूर्योदयाच्या सुमारे दोन तास आधी, म्हणजे ब्रह्ममुहूर्तात उठावे. या वेळेत वातदोष प्रभावी असतो. हा दिवसातील सर्वोत्तम काळ मानला जातो. या वेळेतील सकारात्मक ऊर्जा आपल्या शरीराशी जुळवून घेतल्यास ताजेतवाने वाटते. नोकरदार लोकांना लवकर उठणे हे काही नवीन नाही, पण धावपळ सुरू होण्यापूर्वी पुढील काही दिपाम अवलंबिला तर निश्चितच फायदा होईल.

शरीरशुद्धी – आजकाल याला डिटॉक्स म्हणण्याची प्रथा झाली आहे.

सकाळी उठल्यानंतर एक ग्लास कोमट पाणी प्यावे. यामुळे आतडी व मूत्राशय साफ होतात आणि पचनसंस्था सुरळीत राहते. दीर्घकालीन पचनविकार कमी होण्यास मदत होते. ज्ञानेंद्रियांची स्वच्छता राखणे, उदाहरणार्थ- डोळे, त्वचा, कान, नाक आणि जीभ इत्यादी अवयव स्वच्छ करावे. तोंडाची स्वच्छता करताना गुळण्या करणे, दात घासणे आणि जीभ स्वच्छ करणे आवश्यक आहे. यामुळे चवीच्या ग्रंथी सढिय होतात. व्यायाम आणि स्नान – सकाळी ६ ते १० या वेळेत व्यायाम करणे सर्वोत्तम असते. कारण हा काळ कफदोषाचा असून शरीर शारीरिकदृष्टय़ा सर्वाधिक मजबूत असते. व्यायामामुळे आळस दूर होतो, जठराग्नी प्रज्वलित होतो, चरबी कमी होते आणि मनाला शांतता व आनंद मिळतो.




**आपल्या दैनंदिन जीवनासाठी तयार केलेली अशी दिपाम पद्धत जी आपल्याला आपल्या जैविक घडय़ाळाशी जोडून ठेवते. आयुर्वेदाने हजारो वर्षांपासून निसर्गाशी सुसंवाद राखण्याचे महत्त्व सांगितले आहे, मात्र पाश्चिमात्य शास्त्रज्ञांना आता हळूहळू हे समजू लागले आहे की शरीरासाठी निसर्गाच्या लयीशी जोडलेले राहणे किती आवश्यक आहे.**

सूर्यनमस्कार हा एक अत्यंत महत्त्वाचा व्यायाम प्रत्येकाला करणे आवश्यक आहे. यामध्ये नऊ आसने आहेत. ज्यामुळे आपल्या लसिका ग्रंथी आणि त्यांच्या वहनात सुसूत्रता येते. परिणामी रोगप्रतिकारशक्ती वाढते.

सेतूबंध हाही एक उत्तम आसन प्रकार आहे. ज्यामुळे जननेंद्रिय आणि आसपास असलेल्या मांसपेशी सुदृढ राहतात. पश्चिमोत्तानासन, पवनमुक्तासन, अर्धमत्स्येंद्रासन, शलभासन, पर्वतासन, वङ्कासन अशी अनेक योगासने आहेत, ज्यामुळे पाठ, पोट, मांडय़ा आणि सर्वच शरीराला लवचिकता आणि ताकद येते.

योगासने व प्राणायाम यामुळे दिवसभरासाठी ऊर्जा मिळते. नाडीशुद्धी, भ्रामरी, कपालभाती आणि भस्त्रिका या श्वासांच्या व्यायामामुळे मन शांत, प्रसन्न होते. एकाग्रता वाढवते. नैराश्य, चिंता कमी होतात. सायकल चालवणे, चालणे, पोहणे किंवा दोरीवर उडय़ा मारणे हेही चांगले पर्याय आहेत. व्यायामानंतर कोमट पाण्याने स्नान करावे. हलके, आरामदायी कपडे परिधान करावेत. प्रार्थना व ध्यान – प्रार्थना व उपासना म्हणजे परमेश्वराशी संवाद साधण्याची वेळ. सुमारे २० मिनिटे ध्यान केल्याने प्राणशक्ती संतुलित होते. दिनचर्येत हे अत्यंत महत्त्वाचे असून यामुळे अंतरिक शांतता व समाधान मिळते आणि दिवसाची सकारात्मक सुरुवात होते. दिनचर्येत आहार-विहार महत्त्वाचे असतात. व्यायाम आणि प्रकृतीचे स्वरूप, त्यानुसार दोष हे आपण पाहिले. यात योग्य वेळेनुसार आहार आणि निद्रादेखील तितकीच महत्त्वाची. याबाबत आपण पुढच्या भागात पाहू या.

**आयुर्वेदानुसार दोषांचे दैनंदिन चक्र**

पहिले चक्र सूर्योदय सूर्यास्त -सकाळी ६ ते १० कफ, सकाळी १० ते दुपारी २ पित्त, दुपारी २ ते संध्याकाळी ६ , वात- दुसरे चक्र सूर्यास्त सूर्योदय संध्याकाळी ६ ते १० कफ रात्री १० ते पहाटे २ पित्त पहाटे २ ते सकाळी ६ वात

**डॉ. आशुतोष कुलकर्णी**

# ‘जेन्झी’ पेक्षा ‘मिलेनियल्स’ जास्त बुद्धिवान

आपण एका जनरेशनचा विचार करतो, तेव्हा असे मानले जाते की, नेक्स्ट जनरेशन ही नेहमी आधीच्या जनरेशनपेक्षा स्मार्ट असते, परंतु अलीकडच्या एका अभ्यासाने हा दावा खोटा ठरवला आहे. अभ्यासानुसार, जेन झी आपल्या आधीच्या पिढीपेक्षा म्हणजे मिलेनियल्सपेक्षा कमी बुद्धिमान आढळून आलीय. याचाच अर्थ मिलेनियल्स ही अशी एक जनरेशन आहे, जी तिच्या पुढच्या जनरेशनपेक्षा एक पाऊल पुढे आहे.



न्यूरोसायंटिस्ट डॉ. जेरेड कूनी हॉरवाथ यांच्या मते, आधीच्या पिढय़ांच्या तुलनेत जेन झेडला अधिक फॉर्मल एज्युकेशन मिळाले असले तरी त्यांच्या कॉग्निटिव्ह डेव्हलपमेंटमध्ये घसरण नोंदवण्यात आली आहे. अटेंशन स्पॅन, प्रॉब्लम सॉल्विंग स्कील, रीडींग, मॅथ्स आणि एकूणच आयक्यूमध्ये ‘जेन झेड’ हे मिलेनियल्सपेक्षा खूप मागे असल्याचे दिसून आले. डॉ. हॉरवाथ यांनी अमेरिकेच्या सिनेट कमिटीच्या समोर हा मुद्दा उपस्थित करत म्हटले की, शाळा आणि कॉलेजच्या शिक्षण व्यवस्थेत गरजेपेक्षा जास्त एज्युकेशनल टेक्नोलॉजी म्हणजे ॲडटेकचा वापर झाला आहे. विद्यार्थ्यांच्या बुद्धय़ांकात घसरण होण्यास हेच कारण आहे.

तज्ज्ञांच्या मते, एज्युकेशन टेक्नोलॉजी अपग्रेड करणे हा या समस्येवर उपाय नाही. कारण टेक्नोलॉजी मेंदूच्या काम करण्याच्या पद्धतीशी जुळत नाही. अभ्यासानुसार, ८० पेक्षा अधिक देशांमध्ये शिक्षण व्यवस्थेत डिजिटल टेक्नोलॉजीचा वापर मोठ्या प्रमाणात झाला. मात्र त्याच वेळी विद्यार्थ्यांच्या परफॉर्मन्समध्ये घसरण झाली. जेन झेड म्हणजे १९९७-२०१० सालादरम्यान जन्मलेली मुले. मिलेनियल्स म्हणजे १९८१ ते १९९६ दरम्यान जन्मलेली मुले.

# घराचा ताबा मिळाला, पण रजिस्ट्रेशन रखडले



घर किंवा फ्लॅट खरेदी केल्यानंतर त्याची नोंदणी करणे खूप महत्त्वाचे असते. मालमत्तेची नोंदणी कायदेशीर दस्तऐवज आहे. त्यामुळे नोंदणी वेळेवर करावी.

२ बिल्डरने ताबा दिला, पण रजिस्ट्री केली नाही तर तुम्ही त्याबद्दल रेराकडे तक्रार करू शकता. नोंदणीसाठी ग्राहक न्यायालयातही खटला दाखल करू शकता.

३ वकिलामार्फत बिल्डर किंवा विकासकाला कायदेशीर नोटीस पाठवून नोंदणी करण्यास सांगा. त्याही पुढे गरज वाटल्यास दिवाणी न्यायालयात खटला दाखल करा.४ सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार केवळ मालमत्तेची नोंदणी केल्याने तुम्ही त्याचे मालक आहात हे सिद्ध होत नाही. त्यासाठी इतर आवश्यक कागदपत्रेही द्यावी लागतील.

५मालमत्ता कर पावत्या, ताबापत्र, वाटपपत्र, उत्तराधिकार प्रमाणपत्र किंवा मृत्युपत्र यांसारख्या गोष्टीदेखील मालकी हक्क सिद्ध करतात.

# सकाळी संपूर्ण पोट साफ होईल...

काही जणांना नेहमीच अपचनाचा त्रास होतो. खाण्यापिण्यात थोडा काही बदल झाला किंवा थोडं जास्त खाण्यात आलं, जेवणाच्या वेळांमध्ये बदल झाला तर लगेचच अपचन होणे, पोट फुगणे किंवा पोट गुबारल्यासारखे होणे असा त्रास होऊ लागतो. हा त्रास वारंवार होणं खूपच त्रासदायक आहे. मात्र, काही फळं आपल्याला यापासून आराम मिळण्यासाठी मदत करतात.

यातलंच एक फळ म्हणजे पपई. हे केवळ एक स्वादिष्ट फळच नाही तर आरोग्याचा खजिनादेखील आहे. त्यात मुबलक प्रमाणात जीवनसत्त्वे, खनिजे आणि एंझाइम असतात, जे आपले शरीर निरोगी ठेवतात. शतकानुशतके शरीर निरोगी ठेवण्यासाठी याचा वापर केला जात आहे. लोक सकाळच्या नाश्त्यात पपईचे सेवन करतात. पपई पचन सुधारण्यास आणि वजन कमी करण्यास मदत करते. बद्धकोष्ठतेचा त्रास असलेल्या लोकांनी दररोज पपई खाल्ल्यास त्यांना बद्धकोष्ठतेपासून आराम मिळेल. भारतीय योग गुरु, लेखिका, संशोधक आणि टीव्ही व्यक्तिमत्त्व डॉ. हंसा योगेंद्र म्हणाल्या की, पपई पोटासाठी एक औषध आहे. पपईमध्ये असलेले पपेन एंझाइम बद्धकोष्ठतासारख्या पचन समस्या दूर करते.

मेडिकल न्यूज टुडे आणि अनेक आरोग्य मासिकांनुसार, पपईमध्ये भरपूर प्रमाणात फायबर आणि पाणी असते. पपईचे सेवन केल्याने मल मऊ होतो आणि आतड्यांची हालचाल वाढते. ते आतड्याच्या भिंतींना वंगण घालते, ज्यामुळे आतड्यांची हालचाल सुलभ होते आणि दीर्घकालीन बद्धकोष्ठतेपासूनही आराम मिळतो. पपईचे सेवन केल्याने पचन कसे सुधारते आणि त्याचे आरोग्य फायदे कसे होतात ते पाहूया.



**पपई पचनक्रियेत कशी मदत करू शकते?**

पपईच्या फायद्यांचा विचार केला तर त्याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे त्याचे पचन. पपईमध्ये पपेन नावाचे नैसर्गिक एंझाइम असते, जे प्रथिने तोडण्यास आणि पोटात अन्न कार्यक्षमतेने पचवण्यास मदत करते. या गुणधर्मामुळे पपई अपचन, पोटफुगी आणि आम्ल ओहोटीसारख्या पाचन समस्यांवर प्रभावी उपाय बनते. शिवाय, पपईमध्ये विरघळणारे फायबर चांगले असते, जे मल मऊ करते आणि आतड्यांची हालचाल सुलभ करते. बद्धकोष्ठतेच्या वेळी दररोज पपईचे सेवन केल्याने पचनसंस्थेचे नियमन होते आणि आतडे निरोगी राहतात.

**गर्भवती महिलांनी टाळावे**

कच्च्या किंवा कमी पिकलेल्या पपईमध्ये लेटेक्स असते, ज्यामुळे गर्भाशयाचे आकुंचन होऊ शकते. गर्भवती महिलांनी डॉक्टरांचा सल्ला घेतल्याशिवाय पपई खाणे टाळावे.

**पपई खाण्याची योग्य वेळ आणि पद्धत**

सकाळी रिकाम्या पोटी पपई खा. पपईतील पपेन एंझाइम विषारी पदार्थ प्रभावीपणे बाहेर टाकते. जेवणानंतर किंवा सकाळी रिकाम्या पोटी एक वाटी पिकलेली पपई खाल्ल्याने पचन सुधारते आणि पोटफुगी नियंत्रित होते.

**पपईचे आरोग्य फायदे**

पपई खाल्ल्याने वजन कमी करणे सोपे होते. त्यात कॅलरीज कमी आणि फायबर जास्त असते, ज्यामुळे तुमचे जास्त काळ पोट भरलेले राहू शकते. ते कमी कॅलरीज असलेले स्नॅक म्हणून वापरले जाऊ शकते. पचन सुधारल्याने तुमच्या त्वचेच्या चमकदारपणावर थेट परिणाम होतो. पपईतील व्हिटॅमिन सी आणि लायकोपिन निरोगी त्वचेची दुरुस्ती आणि प्रोत्साहन देते. पपई खाल्ल्याने नैसर्गिकरित्या कोलेजन तयार होते, त्वचा घट्ट होते आणि चेहऱ्यावरील सुरकुत्या दूर होतात.

दररोज पपई खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते आणि शरीराचे आजारांपासून संरक्षण होते. पपई हृदयाचे आरोग्य राखण्यासाठीदेखील प्रभावी आहे. फायबर, पोटॅशियम आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्मांनी समृद्ध पपई खाल्ल्याने हृदयाचे कार्य सुधारते. ते हृदयरोगाचे एक प्रमुख कारण असलेल्या कोलेस्ट्रॉलवर नियंत्रण ठेवते. ते मधुमेहाच्या रुग्णांसाठी औषध म्हणूनदेखील काम करते .

पपई हे फक्त एक फळ नाही तर पचन आरोग्यासाठी एक नैसर्गिक उपाय आहे. त्यातील पपेन एंझाइम आणि उच्च फायबर सामग्री दीर्घकालीन बद्धकोष्ठता आणि आम्ल रिफ्लक्ससारख्या समस्यांना तोंड देण्यास मदत करते.

मात्र, हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की आरोग्याशी संबंधित कोणतेही बदल प्रत्येक व्यक्तीवर वेगवेगळ्या प्रकारे परिणाम करू शकतात. गर्भवती महिला आणि ॲलर्जी असलेल्यांनी ते खाण्यापूर्वी विशेषतः वैद्यकीय सल्ला घ्यावा.

# पैठणीचा नवा ‘रॉयल’ ट्रेंड! पिकॉक-पॅरेट बॉर्डर पाहून पडाल प्रेमात - पिढ्यांपिढ्या जपावी अशी पैठणी...

मराठी संस्कृतीची शान आणि वस्त्रांची महाराणी असलेली पैठणी म्हणजे सगळ्या महिलावर्गाच पाहिलं प्रेम...पैठणीवर केलेलं नक्षीकाम, रंगसंगती आणि पारंपरिक बॉर्डर यामुळे तिचं सौंदर्य अधिक खुलतं.

विशेषतः मोरांच्या आणि पोपटांच्या नजाकतीने सजलेली पिकॉक-पॅरेट बॉर्डरपैठणी सध्या महिलांच्या पसंतीस उतरत आहे. मोर आणि पोपट यांचं सूक्ष्म आणि उठावदार नक्षीकाम असलेली पिकॉक – पॅरेट बॉर्डर पैठणी म्हणजे पैठणी साडीचा असाच एक उत्तम, नवीन प्रकार...

पैठणी म्हटली की डोळ्यासमोर येतो तो म्हणजे तिचा भरजरी पदर आणि काठ. पण सध्या पारंपरिक पैठणीमध्ये एक अतिशय सुंदर आणि कलात्मक बदल पाहायला मिळतोय, तो म्हणजे ’पिकॉक-पॅरेट’ (मोर-पोपट) बॉर्डरची पैठणी.

निसर्गातील दोन सर्वात सुंदर पक्षी जेव्हा रेशमी धाग्यांच्या विणकामात उतरतात, तेव्हा त्या साडीचे सौंदर्य कैक पटींनी वाढते. लग्नसराई असो किंवा एखादा सण, ही नक्षी असलेली पैठणी तुम्हाला गर्दीत उठून दिसते.

राजस लुक, समृद्ध परंपरा आणि कलात्मक डिझाईन्स यांचा सुंदर मिलाफ असलेली ही पैठणी लग्नसमारंभ, सण-उत्सव आणि खास प्रसंगांसाठी परफेक्ट ठरते.

या पैठणीच्या काठावर मोराचा डौल आणि पोपटाची नजाकत रेशमी धाग्यांनी अत्यंत बारीक रीतीने विणलेली असते. मोर हा सौंदर्य, शाही थाट आणि समृद्धीचं प्रतीक मानला जातो, तर पोपट आनंद, शुभ आणि सकारात्मकतेचं चिन्ह आहे. या दोन्ही पक्ष्यांचं नक्षीकाम पैठणीच्या बॉर्डरवर केल्यामुळे साडीला वेगळाच उठाव मिळतो.


पिकॉक – पॅरेट बॉर्डर असलेली पैठणी प्रामुख्याने हातमागावर विणली जाते. त्यामुळे प्रत्येक साडी ही एक वेगळी आणि खास कलाकृती असते.पिवळा, हिरवा, जांभळा, लाल, निळा, मोरपिसी हिरवा अशा पारंपरिक आणि तेजस्वी रंगांमध्ये या पैठणी उपलब्ध असतात. सोनसळी जरी आणि रंगीत धाग्यांचा वापर साडीला शाही लुक देतो.मोराची नक्षी पारंपरिक असली, तरी पोपटाच्या आकृत्यांची जोड दिल्याने या साडीला एक आधुनिक ’डिझाइनर’ लूक मिळतो.

पदरावर रंगीबेरंगी मोर आणि मध्येच लपलेले सुंदर पोपट, जे साडीला एक भारी लूक देतात.

हल्ली नवरीच्या ’शालू’ ऐवजी अशा प्रकारच्या हेवी बॉर्डर असलेल्या पैठणीला जास्त पसंती दिली जात आहे, कारण ती वजनाला हलकी आणि दिसायला अतिशय रॉयल असते.मोर-पोपटांसोबतच कमळ, वेलबुट्टी अशा पारंपरिक मोटिफ्सचा समावेश बॉर्डरमध्ये केला जातो, ज्यामुळे साडी अधिक समृद्ध दिसते.

# भुवयांमधील कोंड्यावर उपाय, हे करून पहा

कोंडा हा डोक्यातील केसांमध्येच होतो, असे अनेकांना वाटते. त्यामुळे डोक्यातील केस आणि त्वचेची जास्त काळजी घेतली जाते. मात्र, भुवयांमध्येही कोंडा होतो. त्याकडे फार कोणाचे लक्ष नसते. भुवयांमधील कोंडा कमी करण्यासाठी बदाम तेल उपयुक्त ठरते. कोमट बदाम तेलाने भुवयांवर हलक्या हाताने मसाज करा. यामुळे कोंडा कमी होतो. तसेच भुवयांचे केसही मजबूत होतात. आणखी एक उपाय म्हणजे, कोरफडीचा गर. भुवयांवर कोरफडीचा गर लावून



काही वेळाने कोमट पाण्याने धुऊन घ्या. याशिवाय कडुनिंबाचे तेल नियमित लावल्याने भुवयांजवळची मृत त्वचा आणि कोंडय़ाचा थर हळूहळू निघून जातो.

# चुकीच्या माहितीचे मायाजाल




इंटरनेटने जगाला एक केले असे म्हटले जाते. जगातील विविध प्रांतांतील अनमोल ज्ञानाचा खजिना सर्वांसाठी सहजपणे उपलब्धदेखील झाला. कला, क्रीडा, मनोरंजन, व्यवसाय, पाककृती याबरोबर आरोग्यविषयक सल्लेदेखील इथे एका क्लिकवर उपलब्ध व्हायला सुरुवात झाली. मात्र आरोग्यासारख्या एखाद्या संवेदनशील विषयावर मिळालेल्या एखाद्या चुकीच्या माहितीमुळे किती गंभीर परिणामांना सामोरे जावे लागते, प्रसंगी जीव गमावण्याची वेळदेखील एखाद्या व्यक्तीवर येऊ शकते हे आता समोर आले आहे. तामीळनाडूमधील मदुराईच्या सेलूर जिह्यातील मीनाबलपुरम येथील एका विद्यार्थिनीने यूटयूबवर वजन कमी करण्यासाठी काय करावे याचा सल्ला देणारा एक व्हिडीओ पाहिला. या व्हिडीओमध्ये दिलेल्या सल्ल्यानुसार तिने बोरॅक्स या पदार्थाचे सेवन केले. मात्र या पदार्थामुळे काही वेळातच तिला खूप उलटय़ा झाल्या आणि ती बेशुद्ध पडली. तिला तातडीने एका खासगी रुग्णालयात नेण्यात आले. तिथे उपचार झाल्यानंतर तिला घरी सोडण्यात आले. मात्र रात्री तिची प्रकृती पुन्हा एकदा खालावली आणि पुन्हा रुग्णालयात नेत असताना वाटेतच तिचा मृत्यू झाला.

या घटनेनंतर सोशल मीडिया, यूटयूब, विविध मेसेजिंग अॅप्स यांच्या माध्यमातून वेगाने पसरणाऱ्या माहितीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. अशा माहितीची विश्वासार्हता न तपासता अनेक लोक तिच्यावर विश्वास ठेवतात आणि स्वतःच्या जिवाशी खेळतात. वैद्यकीय क्षेत्रातील अनेक तज्ञांनी अशा व्हिडीओंवर बंदी घालण्याची मागणी सरकारकडे केली आहे. वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित कोणतीही पदवी घेतलेली नसतानादेखील अनेक लोक स्वतःला आरोग्य सल्लागार, फिटनेस गुरू म्हणवून घेत लोकांना विविध विषयांवर व्हिडीओ अथवा लेखाच्या माध्यमातून अनेक चित्रविचित्र सल्ले देत असतात. अशा लोकांना आता चाप लावण्याची मागणी जोर पकडू लागली आहे. कलैयारासी या विद्यार्थिनीचे वजन थोडेसे जास्त होते. वजन कमी करण्यासंदर्भातील एक व्हिडीओ पाहत असताना त्या व्हिडीओत बोरॅक्स हा पदार्थ खाण्याचा सल्ला देण्यात आल्याचे तिने पाहिले आणि तो उपाय अमलातदेखील आणला. स्थानिक फार्मसी म्हणून तिने बोरॅक्स खरेदी केले आणि जणू मृत्यूलाच आमंत्रण दिले. वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ सांगतात की, बोरॅक्स हा एक विषारी पदार्थ आहे. रसायनशास्त्रात त्याला सोडियम बोरेट असे म्हणले जाते. सामान्य भाषेत सांगायचे तर ही पावडर आपण कॅरम खेळताना कायम वापरत असतो. काही लोक तिला मुंग्यांची पावडर म्हणूनदेखील ओळखतात.

या प्रकरणी आता सेलूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पोलिसांनी आपल्या तपासाला सुरुवातदेखील केली आहे. दुसरीकडे मृत विद्यार्थिनीच्या वडिलांनी या प्रकरणाचा सर्व ठपका सदर यूटयूब व्हिडीओवर ठेवला असून अशा कोणत्याही पदार्थाचे सेवन वैद्यकीय तज्ञांच्या सल्ल्याशिवाय न करण्याचा सल्लादेखील आपण मुलीला दिला होता असा दावा केला आहे. हा एक विषारी पदार्थ असून त्याचे थेट सेवन हे कोणत्याही वयोगटाच्या व्यक्तीसाठी हानिकारक आहे असे तज्ञ सांगतात. शारीरिक जाडी हा आजदेखील आपल्या समाजात एक विनोदाचा विषय आहे. स्थूलपणा असणे हा जणू एक गुन्हा आहे असे त्या माणसाच्या मनावर विविध मार्गाने, थट्टा, टवाळीने सतत बिंबवले जात असते. स्थूलपणाने आरोग्याच्या किती मोठय़ा समस्या उद्भवू शकतात याची भीतीदेखील काही वेळा घातली जाते. अशावेळी थोडय़ाशा स्थूलपणालादेखील संकट समजलेली व्यक्ती मिळेल त्या सल्ल्याचा उपयोग आपले वजन कमी करण्यासाठी करायला सुरुवात करते. मात्र शारीरिक व्याधी असो वा स्थूलपणा असो, कोणत्याही समस्येवर उपाय शोधताना कायम वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञाचेच मत घेणे किती महत्त्वाचे आहे, हेच या घटनेने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. इंटरनेटवर उपलब्ध असलेले आणि प्रचंड चुकीची माहिती, गैरसमज पसरवणारे हे व्हिडीओ आता कायद्याच्या कक्षेत कसे आणले जातील आणि त्यांच्यावर कायमची बंदी घालून सदर व्यक्तींना शासन कसे देता येईल यासाठी संपूर्ण समाजाने सरकारवर दबाव निर्माण करण्याची आता गरज आहे.

**प्रसाद ताम्हनकर**

**प्रत्येक देशाचे भविष्य तिथल्या शिक्षण धोरणावर आणि त्याच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. चांगले शिक्षण समाज आणि देशाच्या प्रत्येक क्षेत्रात सक्षम व जबाबदार कार्यशैलीसह प्रभावी युवा शक्ती निर्माण करते. ज्या देशांनी प्रगती केली आहे ती त्यांनी त्यांच्या मजबूत आणि कार्यक्षम शिक्षण प्रणालीच्या बळावर केली आहे. भविष्य फक्त त्या देशांचेच उज्ज्वल असेल, ज्यांना शिक्षणाची गुणवत्ता समजते.**

# दर्जेदार शिक्षण हीच प्रगतीची गुरुकिल्ली

शिक्षण ही माणसासाठी एक अमूल्य संधी आहे. शिक्षणच एखाद्या व्यक्तीला इच्छित ध्येय साध्य करण्यास सक्षम करते. यासोबतच शिक्षणावर मानवाच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारीदेखील आहे. शिक्षणामुळे माणसाला चांगले जीवन जगण्याची आणि जीवनात येणाऱ्या समस्या सोडवण्याची ताकद मिळते. शिक्षण केवळ मानवी मूल्यांना परिष्कृत करत नाही, तर आपल्या कलात्मक कौशल्यांनादेखील वाढवते. आजच्या स्पर्धात्मक युगात ते आपल्याला अधिक कार्यक्षम बनण्यास मदत करते. ते आपल्याला प्रगतीसाठी प्रेरणा देते आणि सतत प्रगतीच्या मार्गावर जाण्यास मार्गदर्शन करते. जगातील ज्या देशांना शिक्षणाची गुणवत्ता आणि महत्त्व समजले आहे, ते देश आज समृद्ध राष्ट्रांमध्ये गणले जातात, लहान देशही शिक्षणाच्या गुणवत्तेच्या बळावर विकसित होऊन उन्नत झाले आहेत. तरुणांना त्यांची स्वप्ने पूर्ण करण्यास मदत करण्यासाठी आपल्या देशात नवीन शिक्षण प्रणाली आणि कौशल्य विकासावर भर दिला जात आहे. फ्यूचर ऑफ जॉब्स रिपोर्ट २०२५ नुसार, २०३० पर्यंत सध्याच्या कामगारांपैकी सुमारे ३९ टक्के लोकांची कौशल्ये कालबाह्य होण्याची शक्यता आहे. इंडिया स्किल्स रिपोर्ट २०२५ नुसार, फक्त ५४.८ टक्के भारतीय तरुणांना रोजगारयोग्य मानले जाते आणि अनेकांमध्ये कामाच्या ठिकाणी यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेली डिजिटल प्रवीणता, अनुकूलता आणि सॉफ्ट स्किल्सचा अभाव आहे.

नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्युरोच्या आकडेवारीनुसार, २०२२ मध्ये भारतात अटक केलेल्या सर्व अल्पवयीन मुलांपैकी जवळ जवळ निम्मे (४९.५ टक्के) हिंसक गुह्यांमध्ये सहभागी होते, जी २०१६ मध्ये ३२.५ टक्क्यांपेक्षा लक्षणीय वाढ आहे. २०२२ मध्ये प्रति लाख मुलांमागे ६.९ वरून २०२३ मध्ये राष्ट्रीय बाल गुन्हेगारी दर किंचित वाढून ७.१ झाला. दिल्लीत मुलांमध्ये सर्वाधिक गुन्हेगारीचा दर ४१.१ प्रति लाख मुलांमागे नोंदवला गेला, जो राष्ट्रीय सरासरीपेक्षा खूपच जास्त आहे. मानसिक ताणाची समस्या झपाटय़ाने वाढली आहे आणि देशातील तरुणांमध्ये ती सतत वाढत आहे. वाढता ताण, चिंता आणि



नैराश्य, मानसिक आधाराचा नितांत अभाव व सततचा सोशल स्टिग्मा यामुळे तरुणांना मानसिक आरोग्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. २०२०-२२ मध्ये, भारतात १५-२९ वयोगटातील लोकांमध्ये आत्महत्येमुळे ६०,७०० हून अधिक मृत्यू झाले, जे जगात सर्वाधिक आहे. सुशिक्षित तरुणांमध्ये बेरोजगारी वाढत आहे. कारण शिक्षण आणि कौशल्ये नोकरी बाजाराच्या गरजांनुसार जुळत नाहीत, तर अनेकांना मजबुरीमुळे कमी पगाराच्या, किरकोळ किंवा धोकादायक नोकऱ्यांमध्ये काम करावे लागते.

'कॅग'च्या २०२५ च्या अहवालानुसार, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेत मोठय़ा प्रमाणात अनियमितता आढळून आली आहे. ज्याअंतर्गत ५६.१४ लाख तरुणांना प्रशिक्षण देण्यात आले होते, त्यापैकी फक्त २३.१८ लाख तरुणांना रोजगार मिळाला, तर ३२.९६ लाख तरुण म्हणजेच ५८.७१ टक्के तरुण कौशल्य विकास योजनेचा लाभ घेत असूनही बेरोजगार राहिले. यामध्ये १३.३३ टक्के तरुण उमेदवारांना कौशल्यासाठी आवश्यक असलेली किमान पात्रतादेखील पूर्ण करता आली नाही. ९४.५३ टक्के प्रकरणांमध्ये बँक खात्यांचे तपशील रिकामे होते. ९४ टक्क्यांहून अधिक बँक खात्यांमध्ये वैध माहिती नव्हती, त्यामुळे ३४ लाख तरुणांना ५०० रुपयांचे रिवॉर्डदेखील मिळाले नाही. या योजनेंतर्गत एकाच ठिकाणी घेतलेल्या प्रशिक्षणाचे फोटो अनेक राज्यांमध्ये वापरले जात होते. अनेक प्रशिक्षण केंद्रे प्रत्यक्षात बंद होती, पण ती कागदावर कार्यरत होती. बहुतेक तरुण उमेदवारांचे ई-मेल आयडी आणि मोबाईल नंबरदेखील बनावट होते. २०१५ ते २०२४ दरम्यान या योजनेंतर्गत एकूण ९,२६१ कोटी खर्च करण्यात आले आहेत. १३.२ दशलक्ष तरुणांना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट होते आणि १.१ कोटी तरुणांना कागदावर प्रशिक्षण प्रमाणपत्रे मिळाली, परंतु 'कॅग'ने याला आकडय़ांचा फेरफार म्हटले.

देशातील वाढती आर्थिक असमानता समाजात मोठी दरी निर्माण करत आहे, विकासकामांना अडथळा आणत आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचा वार्षिक सर्वेक्षण अहवाल, 'युथ पल्स २०२६ः नेक्स्ट जनरेशन व्हिजन फॉर अ चेंजिंग वर्ल्ड'च्या निष्कर्षांनुसार, ४८.२ टक्के प्रतिसादकर्त्यांनी वाढती आर्थिक असमानता हे सर्वात मोठे संकट म्हणून ओळखले. या सर्वेक्षणात १४४ देशांनी भाग घेतला. ५७ टक्के तरुणांनी आर्थिक चिंता हे तणावाचे मुख्य कारण असल्याचे सांगितले. ५७.२ टक्के तरुणांनी रोजगार निर्मिती किंवा उपलब्धतेला गरज म्हणून प्राधान्य दिले, तर ४६.१ टक्के तरुणांनी परवडणाऱ्या आणि दर्जेदार शिक्षणाची उपलब्धता ही एक गरज मानली. देशातील बेरोजगारीची व्याप्ती आपल्या सर्वांना माहिती आहे, परंतु दशकांपासून रिक्त पदे न भरल्याने व्यवस्था आणि कार्यपद्धती कमकुवत होते. अनेक राज्यांमधील शिक्षण विभागाची स्थिती खूपच भयानक आहे. देशातील अनेक राज्यांमध्ये शिक्षण विभागातील घोटाळे वारंवार समोर येतात. भ्रष्टाचार, परीक्षेचे पेपर फुटणे, बनावट कागदपत्रे, बनावट भरती, परीक्षेसाठी बनावट उमेदवार आणि बनावट पदव्या खरेदी हे सर्व उघड होत आहे. मध्यंतरी महाराष्ट्रात शालार्थ आयडी घोटाळा चर्चेत होता. हे सर्व शिक्षणाच्या पवित्र व्यवसायाला कलंकित करते आणि देशाच्या सध्याच्या व भावी पिढय़ांना त्याचे परिणाम भोगावे लागतात.

देशातील अनेक राज्यांमधील खासगी शैक्षणिक संस्था आणि सरकारी शाळांमध्ये मोठी तफावत आहे. पुन्हा ही तफावत झपाटय़ाने वाढत आहे. गेल्या दशकात (सुमारे २०१४-२०२४), भारतात अंदाजे ९० हजार सरकारी शाळा बंद झाल्या आणि सरकारी आकडेवारी व युनेस्कोच्या अहवालाच्या मते भारतात खासगी शाळांची संख्या अंदाजे ४२ हजार ९४४ ने लक्षणीयरीत्या वाढली आहे. दर्जेदार शिक्षण, चांगल्या आरोग्य सुविधा आणि पात्रतेनुसार नोकरी किंवा व्यवसायाची उपलब्धता या तीन गोष्टी माणसाला सहज उपलब्ध व्हायला हव्या.

भेदभाव किंवा आर्थिक असमानता कधीही यासाठी अडथळा ठरू नये. प्रत्येक देशाचे भविष्य तिथल्या शिक्षण धोरणावर आणि त्याच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. चांगले शिक्षण समाज आणि देशाच्या प्रत्येक क्षेत्रात सक्षम आणि जबाबदार कार्यशैलीसह प्रभावी युवा शक्ती निर्माण करते. ज्या देशांनी प्रगती केली आहे ती त्यांनी त्यांच्या मजबूत आणि कार्यक्षम शिक्षण प्रणालीच्या बळावर केली आहे. भविष्य फक्त त्या देशांचेच उज्ज्वल असेल, ज्यांना शिक्षणाची गुणवत्ता समजते.

**डॉ. प्रीतम भी. गेडाम**

# 'डेटा लीक' चा भयकंप



सोशल मीडिया क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी असणाऱ्या 'इन्स्टाग्राम'च्या दीड कोटींहून अधिक वापरकर्त्यांच्या माहिती सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. गेल्या काही दिवसांत जगभरातील वापरकर्त्यांना त्यांनी विनंती केलेली नसतानाही पासवर्ड बदलण्याचे अनाहूत संदेश प्राप्त झाले. या प्रकारामुळे वापरकर्त्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. वापरकर्त्यांचा वैयक्तिक डेटा धोक्यात असल्याचा दावा केला जात आहे. ही सर्व माहिती डार्क वेबवर विक्रीसाठी उपलब्ध असल्याचे निदर्शनास आल्याने चिंता वाढली आहे.

आजच्या काळात इन्स्टाग्राम हे सोशल मीडिया वापरकर्त्यांच्या सर्वाधिक पसंतीचे ठरलेले माध्यम म्हणून पुढे आले आहे. विशेषतः 'टिकटॉक'वर बंदी घातल्यानंतर इन्स्टाने रिल्स नामक संकल्पना अचूक वेळी पुढे आणली आणि तिथून पुढे 'इन्स्टाग्राम'चा अक्षरशः झंझावात सुरू झाला. वैयक्तिक माहिती शेअर करण्यापासून ते विविध ब्लॉगपर्यंत सर्वदूर इन्स्टाग्राम वापरले जाऊ लागले. पण अलीकडे इंस्टाग्राम वापरकर्त्यांच्या इनबॉक्समध्ये अचानक पासवर्ड रिसेट ईमेल्सचा पूर येऊ लागल्याचे दिसून आले. कोणतीही मागणी न करता आलेले हे ईमेल्स अनेकांना गोंधळात टाकणारे ठरले. खोलात जाऊन माहिती घेतल्यानंतर याच्या मुळाशी सायबर सुरक्षेच्या दृष्टीने एक महत्त्वाची आणि चिंताजनक घडामोड असल्याचे समोर आले. त्याच वेळी डार्क वेबवरील एका मंचावर सुमारे १७.५ दशलक्ष इंस्टाग्राम खात्यांची माहिती उपलब्ध झाल्याच्या बातम्यांनी वापरकर्त्यांच्या अस्वस्थतेत भर घातली.

सद्यस्थितीत दोन अब्जहून अधिक मासिक सक्रिय वापरकर्ते असलेले इंस्टाग्राम हे सायबर गुन्हेगारांचे प्रमुख लक्ष्य असणे स्वाभाविक आहे. वापरकर्त्यांचे खाते ताब्यात घेण्यासाठी ब्राऊझर एक्स्टेन्शनपासून ते फिशिंग मोहिमांपर्यंत अनेक क्लृप्त्या वापरल्या जातात. मात्र अलीकडे दिसून आलेली पद्धत तुलनेने अधिक सोपी आणि मानसशास्त्रीय दबाव निर्माण करणारी आहे. थेट इंस्टाग्रामकडून आलेला खरा पासवर्ड रिसेट करण्याबाबतचा ईमेल वापरकर्त्याला गोंधळात टाकणारा ठरला. असा ईमेल मिळाल्यावर साहजिकच 'माझे खाते धोक्यात आहे' अशी भावना निर्माण होते आणि घाईघाईने निर्णय घेण्याची शक्यता वाढते. हाच क्षण हल्लेखोरांसाठी महत्त्वाचा ठरतो.

'याहू'ची डेटा गळती ही सायबर इतिहासातील सर्वात मोठय़ा डेटा गळतींपैकी एक घटना मानली जाते. २०१३ आणि २०१४ मध्ये दोन वेगवेगळ्या सायबर हल्ल्यांमध्ये याहूच्या सुमारे ३ अब्ज वापरकर्त्यांची खाती बाधित झाली. वापरकर्त्यांची नावे, ईमेल पत्ते, फोन क्रमांक, जन्मतारीख आणि एक्रिप्टेड पासवर्ड बाहेर गेले. ही बाब २०१६ मध्ये उघडकीस आली होती आणि या गळतीमुळे याहूच्या व्हेरिझॉनसोबतच्या विक्री कराराच्या किमतीत कपात झाली. त्यापूर्वी २०१३ मध्ये ?डोबीच्या सॉफ्टवेअर प्रणालीत झालेल्या हल्ल्यात १५ कोटी वापरकर्त्यांची माहिती चोरीला गेली.

'इक्विफॅक्स' या अमेरिकेतील क्रेडिट रेटिंग कंपनीमध्ये झालेल्या डेटा लीक प्रकरणात १४.७ कोटी नागरिकांची अत्यंत संवेदनशील माहिती बाहेर पडली. सामाजिक सुरक्षा क्रमांक, जन्मतारीख, पत्ते आणि ड्रायव्हिंग लायसन्स तपशील ठकसेनांच्या हाती लागल्याने ही घटना आर्थिक आणि कायदेशीरदृष्टय़ा अत्यंत गंभीर ठरली. परिणामी, कंपनीला अब्जावधी डॉलर्सची नुकसानभरपाई आणि दंड भरावा लागला. २०१८ मध्ये घडलेले फेसबुक-कॅम्ब्रिज ?नालिटिका प्रकरण अद्यापही चर्चिले जाते. कारण यामध्ये तब्बल ८.७ कोटी फेसबुक वापरकर्त्यांचा डेटा परवानगीशिवाय राजकीय उद्देशांसाठी वापरण्यात आला. एका तृतीय-पक्ष ?पद्वारे डेटा गोळा करून तो कॅम्ब्रिज ?नालिटिका या राजकीय सल्लागार संस्थेला देण्यात आला. या प्रकरणामुळे फेसबुकवर जागतिक स्तरावर विश्वासाचा मोठा तडा गेला आणि डेटा गोपनीयतेवर गंभीर चर्चा सुरू झाली. २०१८ मध्ये मॅरियट समूहाच्या स्टारवूड हॉटेल सिस्टीममध्ये दीर्घकाळ सुरू असलेल्या घुसखोरीमुळे ५० कोटी ग्राहकांची माहिती गळतीला लागली होती. यात पासपोर्ट क्रमांक, प्रवास तपशील, संपर्क माहिती आणि काही प्रकरणांत क्रेडिट कार्ड डेटा समाविष्ट होता. ही घुसखोरी अनेक वर्षे लक्षात न येणे, ही बाब अधिक धक्कादायक ठरली. २०२२ मध्ये ट्विटरच्या एपीआयमधील त्रुटीचा वापर करून हॅकर्सनी ५.४ कोटी खात्यांचे ईमेल आणि फोन नंबर गोळा केले होते. ही माहिती नंतर डार्क वेबवर विक्रीसाठी ठेवण्यात आली. ही घटना थेट हॅकिंग न करता प्रणालीतील कमकुवत दुव्याचा वापर कसा केला जातो, याचे उदाहरण मानली जाते.

जानेवारीच्या पहिल्या आठवडय़ात अनेक वापरकर्त्यांना एकापाठोपाठ एक पासवर्ड रिसेट ईमेल्स मिळाले. हे ईमेल्स बनावट नव्हते, तर इंस्टाग्रामच्या अधिकृत प्रणालीतूनच पाठवले गेले होते. त्यामुळे पारंपरिक फिशिंगप्रमाणे लिंक खोटी आहे का, ईमेल ?ड्रेस संशयास्पद आहे का, अशी शंका निर्माण होण्यास वावच नव्हता. ईमेलमधील मजकूर मात्र स्पष्टपणे सांगतो की, तुम्ही ही रिक्वेस्ट केली नसेल तर पासवर्ड बदलला जाणार नाही. साहजिकच, हे वाचल्यानंतर घाबरलेला वापरकर्ता अनेकदा विचार न करता 'रिसेट' पर्यायावर लिक करतो. याच मानसिकतेवर हल्लेखोर अवलंबून असतात. या पार्श्वभूमीवर डार्क वेबवरील 'ब्रिचफोरम्स' या मंचावर १७.५ दशलक्ष खात्यांचा डेटाबेस उपलब्ध झाल्याची माहिती समोर आली. या डेटामध्ये वापरकर्त्यांची नावे, ईमेल पत्ते, फोन क्रमांक आणि युजर आयडी समाविष्ट असल्याचे सांगितले गेले. या घटनेचा आणि पासवर्ड रिसेट ईमेल्सच्या लाटेचा थेट संबंध आहे का, हा प्रश्न उपस्थित झाला. मेटाने मात्र आपल्या प्रणालीत कोणतीही घुसखोरी झालेली नाही, असे स्पष्ट केले. कंपनीच्या अधिकृत निवेदनानुसार एका त्रुटीमुळे बाहेरील व्यक्तींना पासवर्ड रिसेट ईमेल्स ट्रिगर करता येत होते, ती त्रुटी दुरुस्त करण्यात आली असून वापरकर्त्यांची खाती सुरक्षित आहेत असे सांगितले गेले. परंतु हे स्पष्टीकरण अनेकांना अपुरे वाटले. कारण प्रणालीत घुसखोरी झालेली नाही आणि वापरकर्त्यांची माहिती बाहेर नाही या दोन गोष्टी वेगळ्या आहेत. तसेच हा डेटाबेस नवीन नसून २०२२ मध्ये एपीआयमधील त्रुटीतून गोळा झालेल्या जुन्या माहितीतून तयार झालेला आहे. ही माहिती २०२४ मध्ये सायबर गुन्हेगारी गटांमध्ये फिरत होती, मात्र आता ती सार्वजनिकपणे उपलब्ध झाल्यामुळे तिचा गैरवापर मोठय़ा प्रमाणावर होऊ शकतो. या सगळ्या गोंधळात वापरकर्त्यांनी नेमके काय करावे, हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. सर्वप्रथम कोणताही अनपेक्षित पासवर्ड रिसेट ईमेल मिळाल्यास घाई करू नये. ईमेलमधील लिंकवर लिक करण्याऐवजी थेट ?प किंवा अधिकृत वेबसाईटवर जाऊन खाते सुरक्षित आहे का, हे तपासणे अधिक शहाणपणाचे ठरते. दुसरे म्हणजे प्रत्येक प्लॅटफॉर्मसाठी वेगळा आणि मजबूत पासवर्ड वापरणे आवश्यक आहे. यामुळे एका ठिकाणची माहिती लीक झाली तरी इतर खाती सुरक्षित राहतात. तिसरे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे टू स्टेप ऑथेंटिकेशन सुरू ठेवणे. ओळख न झालेल्या उपकरणावरून लॉगिनचा प्रयत्न झाला तर अतिरिक्त कोडची गरज भासते आणि यामुळे हल्लेखोरांचा मार्ग अडतो. इंस्टाग्रामने काही प्रकारच्या खात्यांसाठी हे प्रमाणीकरण आपोआप सुरू केले आहे, मात्र अनेक सामान्य वापरकर्ते ते बंद करतात किंवा दुर्लक्ष करतात. सध्याच्या परिस्थितीत ही चूक महागात पडू शकते. खाते आधीच ताब्यात गेले असल्यास इंस्टाग्रामकडून दिलेल्या अधिकृत प्रक्रियेद्वारे ते परत मिळवण्याचा प्रयत्न करावा.

ही घटना केवळ इंस्टाग्रामपुरती मर्यादित नाही. ती आजच्या डिजिटल युगातील एक व्यापक वास्तव दाखवणारी आहे. सायबर गुन्हेगार थेट प्रणाली फोडण्याऐवजी कायदेशीर आणि वैध प्रक्रियांचा गैरवापर करून गोंधळ निर्माण करत आहेत. त्यामुळे कंपन्यांना केवळ अंतर्गत सुरक्षा नव्हे, तर वापरकर्त्यांचा अनुभव आणि त्यांच्यापर्यंत पोहोचणारे संकेत यांचाही गंभीरपणे विचार करावा लागणार आहे. डिजिटल सुरक्षितता ही एकदाच करून संपणारी गोष्ट नाही, तर सतत जागरुक राहण्याची प्रक्रिया आहे. घाई, भीती आणि गोंधळ यावर नियंत्रण ठेवले, तर अशा हल्ल्यांचा प्रभाव मोठय़ा प्रमाणावर कमी करता येऊ शकतो.

**शहाजी शिंदे**